
म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १४३९
१९५९

REFBK-0010530
REFBK-0010530

## सादर समर्पण—

# मातृदेवो भव।



REFBK-0010530

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

आई तुज भावें करितों वंदन। सौख्याचें निधान तूंचि जगीं ॥ १ ॥
तितिक्षा मर्यादा पावित्र्य सद्भाव। आई तुझे पाय मूर्तिमंत ॥ २ ॥
पूज्य-पतिसेवा हेंचि तुझें व्रत। जन्मभरी तप आचरिलें ॥३॥
पवित्र ती कुक्षि लाभली मजसी। काय मी तुजसी अर्पूं माते ॥ ४ ॥
पावन मंगल करूनि स्मरण। करितों प्रकाशन भारताचें ॥ ५ ॥
'अभंग-भारत' प्रथम हा खंड। पठणें उदंड यश देवो ॥ ६ ॥
ऐसा आशीर्वाद पार्वती-तनय। मागे वासुदेव बालभावें ॥ ७ ॥

क्रमांक ..... दि: .....

श्री

# प्रास्ताविक निवेदन

### ॐ नमो भगवते वासुदेवाय ।

श्रीमन्महाभारत हें या पुण्यभूमीचें मंगल लेणें आहे. भारतीय वाङ्मयाचें तें सौभाग्य आहे. भारतीय तत्त्वज्ञान–सिद्धांतांचा तो मुक्ताहार आहे. भारतीय नीतितत्त्वांची ती संग्रहपेटिका आहे. आणि भारतीय इतिहासाचा तो सारसंग्रहच आहे.

संशोधकांना दिव्य दृष्टि, कवींना स्फूर्ति, वीरांना उत्साह, भाविकांना श्रद्धा, ज्ञात्यांना समाधान आणि सामान्य· जनांना व साधकांना मार्गदर्शन या सार्‍याच गोष्टी या ग्रंथांत सारख्याच अधिकारानें निवेदिलेल्या आहेत.

विजयेच्छु व्यावहारिकांना ‘ यतो धर्मस्ततो जयः ’ हा महाभारताचा महान्संदेश आहे. सत्य, अहिंसा, दया, धर्म, अर्थ आणि काम इत्यादींच्या मर्यादा भारतावांचून इतरत्र पहावयास मिळणें कठिण आहे. सांख्ययोगादि-शास्त्रांचे सिद्धांत याहून सुलभ रीतीनें कथन करणें शक्य नाहीं. मोक्ष आणि त्याचीं साधनेंहि महाभारतांत निःसंदिग्धपणें प्रतिपादिलीं आहेत. राजकारण–राजधर्म–तर भारताचें प्रत्यक्ष अंगच आहे असें म्हटलें तरी चालेल. ‘ सर्वेधर्मा राजधर्मप्रधानाः ’ हा भारताचा निर्वाळा आहे. व्यक्तिधर्म आणि राष्ट्रधर्महि एथेंच पहावयास मिळतील. तात्पर्य ‘यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित्’ हेंच खरें आहे. इतका उपयुक्त आणि ‘ भारतं पंचमो वेदः ’ इतका पवित्र असा दुसरा ग्रंथच नाहीं. याहून भारताची महती काय गावी !

रामायण–परमोदात्त चारित्र्य–हा वैदिकधर्माचा भक्कम पाया आहे. महाभारत–ईश्वरोन्मुख निर्दोष व्यवहार–हें वैदिक धर्मीयांचें-सकल-विभाग-नियमित असें विशाल, भव्य आणि परम पावन मंदिर आहे. आणि श्रीमन्महा-भागवत हा या मंदिराचा विशुद्ध प्रेममय कळस आहे.

अशा या परमपवित्र मंदिरांत सद्भावानें व शास्त्रोक्तमार्गानें प्रविष्ट होऊन त्या ठिकाणीं सर्वदा वास करणाऱ्या सुखदुःखातीत ज्ञानस्वरूप आणि आनंद-मय अशा परमात्म्याचें दर्शन घेणें–तद्रूप होणें–हेंच भारतीयांचें अंतिम साध्य आहे.

## इतकें तरी अवश्य वाचा—

महाभारतांतील विदुरनीति, सनत्सुजात कथित ज्ञान, इत्यादि बोधपूर्ण असें उद्योगपर्व, भीष्मपर्वोक्त भगवद्गीता आणि ज्ञानसागरच असें शांतिपर्व एवढें तरी प्रत्येकानें अवश्य अभ्यासावें. राजधर्माचा बोध होण्यासाठीं सभा-पर्वांतील नारदनीति, उद्योगपर्व आणि शांतिपर्वांतील राजधर्मपर्व एवढें अभ्यासिलें तर कोणासहि भारतीय राजधर्माचें भरींव आणि पायाशुध्द ज्ञान लाभल्यावांचून रहाणार नाहीं.

## विदुरनीतीचें महत्व

भगवद्गीता हा भारतीय तत्वज्ञानाचा कळस आहे. म्हणून त्याचा प्रचार जितका होईल तितका थोडाच आहे यांत शंका नाहीं, पण कळस हा मंदि-रावरच शोभत असतो आणि चढवावयाचा असतो. असें असल्यामुळें त्या मंदिराची रचना केल्यावांचून खरें पहातां कळसाला काय मोल आहे ? मंदिर असेल तरच कळसाचें कळसपण, आणि कळस असेल तरच मंदिराची परिपूर्णता. या दृष्टीनें प्रत्येक भगवद्गीतेच्या अभ्यासकानें विदुरनीतीरूपी मंदिर आपल्या हृदयांत आधीं विराजित करून मगच भगवद्गीतेचा अभ्यास केल्यास तो खरा फलदायक होईल. प्रथमदर्शनीं माझें हें विधान कदाचित कोणास जरा चमत्का-रिक वाटेल पण परिणामीं प्रत्येक विचारवंतास तें पटल्यावांचून रहाणार नाहीं.

## भारतीयांचा सांचा

श्रीमन्महाभारत हाच भारतीयांचा सांचा असल्यामुळें जेव्हां जेव्हां आपले ठसे गुळगुळीत होऊन आपलें नाणें व्यवहारांत चालेनासें होईल तेव्हां तेव्हां तें महाभारताच्या सांच्यांतूनच पुनः सिद्ध करून घेतलें पाहिजे, तरच आपणांस आपला आकार लाभेल, आणि म्हणूनच महाभारत हा भारतीयांचा ‘ राष्ट्रीय ग्रंथ ’ आहे असें सर्व विद्वान् एकमुखानें म्हणतात.

अशा या राष्ट्रीय ग्रंथांत कांहीं अलौकिक आणि गूढ असें दैवी सामर्थ्य आहे. तें तसा विशिष्ट अभ्यास करणारांस प्रत्ययासहि आल्यावांचून रहात नाहीं; परंतु अभ्यास न करणारांसहि एका विशिष्ट उच्च वातावरणांत मग्न करून आपलें आयुष्य ध्येयमय करण्याइतका प्रसाद या ग्रंथांत निश्चित आहे, हें या ग्रंथाचें नियमित वाचन करणाऱ्या कोणाहि वाचकाच्या प्रत्ययास येईल.

महाभारतांतील बाकी सर्व ठीक आहे पण व्यास–द्रोणादिकांची उत्पत्ति, पांडवांचा जन्म, द्रौपदीचें पंचपतित्व इत्यादि कांहीं गोष्टी आमच्या बुद्धीला पटत नाहींत असें म्हणणारांस मी नम्रपणें एवढेंच विनवितों कीं, तुम्ही म्हणतां ते आक्षेप हे आक्षेपच नाहींत. हें प्रत्यक्ष पटवून देणारा शास्त्र-प्रगतीचा काल जवळ येतच आहे. पण क्षणभर तें सोडून दिलें तरी देखील 'एथें लाटाच फार,' 'हा मगरांनी व्याप्त किंवा खडकयुक्तच आहे.' या तक्रारीनें पाणबुड्या जसा सागरांतून मौक्तिकें काढण्याचें सोडीत नाहीं तसेंच या ज्ञान-सागरांत एकदां पोहूं लागा म्हणजे या वर वर वाटणाऱ्या शंका आपणास कधींच त्रास देणार नाहींत असाच सर्वांस अनुभव येईल. एवढी या ग्रंथाची महती आहे.

असा या महा प्रासादिक ग्रंथाचा कल्पवृक्ष मराठीच्या अंगणांत फुल-विण्याची ज्या सर्वान्तर्यामीनें प्रेरणा केली त्याच्या इच्छेनेंच हें कार्य सुरू झालें असल्यामुळें त्याचें कर्तृत्व अहंभावानें घेण्याचा तत्वतः कोणासहि अधि-कार नाहीं. तथापि व्यवहारतः निमित्तीभूत झाल्यामुळें या ग्रंथाच्या रचनेसंबं-धानें आणि स्वरूपासंबंधानें सामान्य रूपरेषा पुढें देत आहें.

मूळ महाभारत हा ग्रंथ फारच मोठा आहे. त्यांत अनेक कारणांनीं वारंवार पुनरावृत्ति, गुंतागुंत, अति विस्तार आणि कांहीं ठिकाणीं क्लिष्टता, आल्यामुळें पुष्कळ वेळां वाचक गोंधळून जातो. आणि कांहीं ठिकाणीं तर त्याला कंटाळाहि वाटूं लागतो. अशावेळीं थोडी अधिक चिकाटी नसली तर शेवटीं मनुष्य या ग्रंथवाचनापासून परावृत्तहि होतो. यासाठीं शक्यतों वरील प्रकार वगळून पण मूळ विषयाचें वैशिष्ट्य लवमात्र कमी न होऊं देतां ग्रंथाचें मुख्य कार्य सुकर व्हावें हाच 'अभंग भारताचा' मुख्य उद्देश आहे. या खंडांतील आदिपर्वांतच वर उल्लेखिलेल्या बहुतेक सर्व गोष्टींचा वाचकांस

प्रत्यक्ष अनुभव येईल. पुढें, सभापर्वाचा विषय मात्र सुलभ, रम्य आणि हृदयद्रावक आहे. त्याचें यथार्थ स्वरूपहि या खंडांत आपणांस प्रत्यक्ष पहावयास मिळेल.

अशारीतीनें महाभारत हा भारतीय सिद्धांतांचा रत्नाकर आहे. पण तीं रत्नें कंठगत करितां येऊन भारतीय स्त्री-पुरुषांस सालंकृत होतां आल्यावांचून त्या रत्नांचा खरा उपयोग नाहीं. आणि हीं रत्नें काव्यांत गुंफल्यावांचून तीं कंठगत होऊं शकत नाहींत. यासाठीं मी तीं तशीं काव्यांत ग्रंथित करण्यांचें योजिलें. अशा काव्यास अभंगा-इतका सुलभ, गेय, परिणामकारक आणि लोकप्रिय असा मराठींत दुसरा काव्यप्रकार नसल्यामुळें यासाठीं मुद्दाम अभंगाचीच निवड करण्यांत आली. गद्याची सुलभता, पद्यांचें गेयत्व, आणि काव्याचें माधुर्य आणि प्रसाद या गोष्टींनीं वाचकांच्या हृदयाची पकड घेतली तर तो विषय परिणामकारक झाल्यावांचून रहात नाहीं. या अनुभवानेंच भारताचें '**अभंग-भारत**' करण्याची योजना मनांत आली आणि या ग्रंथास नांवहि तेंच देण्यांत आलें.

## पांच वर्षांचा संकल्प

एवढें मोठें काम करावयाचें तर तें होईल तेव्हां होईल असें न मानतां अमुक दिवसांत तें पूर्ण झालेंच पाहिजे असें निश्चित ठरवून कामास लागल्यावांचून तें सिध्दीस जाणें शक्य नसतें. म्हणून मी प्रतिचातुर्मास्यांत महाभारतावरच कीर्तनें करावयाचीं असें ठरविलें. आणि निदान पांच वर्षांत–पांच चातुर्मास्यांत–तें सांगून संपलेंच पाहिजे अशी विभागवारीनें योजनाहि आंखिली. या प्रमाणें दृढ संकल्पपूर्वक आणि ईश्वरस्मरण करून पुणें येथें धर्मचैतन्य संस्थेंत शके १८६९ ज्येष्ठ शु. १० गुरुवार या शुभ दिवसापासून महाभारतावरील कीर्तनांस सुरवात केली. आणि आतां अपेक्षेप्रमाणें अर्धें अधिक भारत कीर्तनरूपानें सांगूनहि झालें आहे. ज्याच्या कृपाशीर्वादानें हें कार्य सुरू होऊन एथपर्यंत सिध्दीस गेलें तोच परमात्मा तें पूर्ण सिध्दीस नेईल असा माझा दृढविश्वास आहे.

## छापण्याची कल्पना नव्हती

एवढा मोठा ग्रंथ छापण्यास एकट्यानें सुरवात करणें हें खरोखरच धाडस असल्यामुळें तशी कल्पनाहि प्रथम माझ्या मनांत नव्हती परंतु महाराष्ट्रांतील

माझ्या अनेक ठिकाणच्या श्रोत्यांनी या पैकीं पहिला भाग तरी छापावा असा आग्रह केल्यामुळें आदिपर्व आणि सभापर्वाचा हा प्रथम खंड काढण्याचें निश्चित केलें. पुढें बेळगांव, मुंबई, ठाणें, पुणें, चिपळूण, वसई इत्यादि अनेक ठिकाणचे श्रोते आगाऊ ग्राहक झाले आणि कित्येकांनीं या भागासाठीं आर्थिक साह्यहि केलें म्हणूनच हें अभंग-भारत छापण्याचें अवघड कार्य सुलभ झालें. याचे एकंदर ५ खंड होतील. पुढील प्रत्येक खंड सुमारें ४००–४५० पृष्ठांचा होईल असा अंदाज आहे.

## सहाय्यार्थ विनंती

सर्व भारताभिमानी स्त्री-पुरुष, धनिकवर्ग आणि माझे सर्व सहृदय श्रोते या सर्वांस माझी अशी नम्र विनंती आहे. कीं, त्यांनीं या कार्याचें महत्व लक्षांत घेऊन या कामीं हस्तें-परहस्तें साह्य करावें, ग्राहक वाढवावे, आणि दातेहि मिळवून द्यावे म्हणजे या पुढील अत्यंत महत्वाचे असे ४ खंड लवकरच प्रसिद्ध होऊं शकतील.

## चित्राचा खुलासा

श्रीगणेश आणि सरस्वती हीं सर्वांना 'अभंग-भारत' हा प्रसाद देत आहेत, देवदेवता तें आनंदानें पहात आहेत, भारताभ्यासानें राणाप्रताप आणि शिवाजी सारखे वीरश्रेष्ठ निर्माण होतात, असें प्रत्यक्ष गजानन सांगत आहेत, आणि जनता या 'अभंग-भारताचा' मोठया उत्साहानें स्वीकार करीत आहे; अशा अर्थाचें तिरंगी चित्र या ग्रंथांत घातलें आहे.

## आभार

या खंडाचे देणगीदार आणि आगाऊ ग्राहक यांनाच या ग्रंथाच्या प्रकाशनाचें श्रेय आहे. तेव्हां त्यांचा कृतज्ञतेनें उल्लेख करणें हें माझें आद्य कर्तव्य आहे.

श्री. ग. वि. देशपांडे चित्रकार यांनीं माझ्या कल्पनेप्रमाणें अल्पावधींत उत्तम चित्र काढून दिलें, तसेंच श्री. गणपतराव मोघे यांनी सुहृद्भावानें त्याचा ठसा (ब्लॉक) त्वरित व उत्कृष्ट करून दिला याबद्दल त्या दोघांचाहि मी अत्यंत आभारी आहें.

येथील श्रीशारदा मुद्रणालयांतील सर्वांनींच मनापासून झटून अवघ्या दोन महिन्यांत या ग्रंथ छपाईचें काम सुंदर करून दिलें या बद्दल त्यांचाहि मी आभारी आहें.

वरील सर्व कामें धंदेवाईक दृष्टीनें न करितां सर्वांनींच आपलेपणानें केलीं आहेत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

माझे एकनिष्ठ सहाय्यक चि. रा. रा. सीतारामपंत बर्वे यांनीं हस्त-लिखितापासून मुद्रणालयांतील सर्वच कामें रात्रंदिवस अविश्रांत श्रम घेऊन केलीं म्हणूनच हा खंड आज प्रकाशित होऊं शकला हें सांगणेंहि अवश्य आहे.

शेवटीं ज्याच्या कृपेनें हें 'अभंग-भारत' रचिलें गेलें तोच पुढील सर्व खंडहि जनतेस अर्पण करण्याच्या पर्वणीचा मला लाभ देवो अशी त्याची नम्रभावानें प्रार्थना करून हें प्रास्ताविक निवेदन पुरें करितों.

आपला नम्र,

धर्मचैतन्य संस्था,
पुणें २.

वा. शि. कोल्हटकर

★

## —विषयानुक्रमणिका—

ग्रंथालय ... दा. क्र. 10430

# १ आदिपर्व

## अनुक्रमणीपर्व १ अध्याय १ पृष्ठें १—९

**अध्याय १** मंगलाचरण, नवी कविता कां केली, शौनकाच्या सत्रांत सौतीचें आगमन, त्यास ऋषींची भारत-कथनाची प्रेरणा, सौतीनें केलेलें मंगल, ब्रह्मांडाची उत्पत्ति, व्यासांची ब्रह्मदेवास विनंति, त्याची श्रीगजाननास लेखक करण्याविषयीं सूचना, गजाननाची अनुमति, भारतवृक्षाचें वर्णन, भारताची संक्षिप्त कथा, धृतराष्ट्राचें सांत्वन, भारताचें महात्म्य.

## पर्वसंग्रहपर्व २ अ. २ पृ. १०—११

**अध्याय २** समंतपंचकवृत्त, अक्षौहिणी आदींचें गणन, अष्टादश पर्वें व त्यांतील विषय, भारतश्रवणफल.

## पौष्यपर्व ३ अ. ३ पृ. ११—१७

**अध्याय ३** जनमेजयाला देवशुनीचा शाप, शापमुक्तीसाठीं पुरोहिताचा स्वीकार, धौम्य व त्याचे शिष्यांची कथा, वेद-शिष्य उत्तंक व पौष्य यांचे परस्परांस शाप, उत्तंकास गुरुपत्नि दिव्य कुंडलें मागते, त्यासाठीं उत्तंकाचें नागलोकीं गमन, गुरुपत्नीचा संतोष, तक्षकाचा सूड घेण्याविषयीं त्याची जनमेजयास प्रेरणा.

## पौलोमपर्व ४ अ. ४—१२ पृ, १८—२२

**अध्याय ४** सौतीचा प्रश्न. **अध्याय ५** भृगुवंश कथन, पौलोमोपाख्यान. **अध्याय ६** च्यवनोत्पत्ति. **अध्याय ७** अग्नीचा क्रोध, त्याचें

ब्रह्मदेवकृत सांत्वन. **अध्याय ८–११** रुरु व डुंडुभ कथा. **अध्याय १२** जनमेजय सर्पसत्र प्रस्ताव.

## आस्तीकपर्व ५ अ. १३–५८ पृ. २३--५२

**अध्याय १३–१५**– आस्तीककथा. **अध्याय १६** कद्रू व विनता यास कश्यपाचा वर, सर्प, अरुण व गरुड यांची उत्पत्ति. **अध्याय १७–१९** समुद्रमंथनाची कथा. **अध्याय २०** कद्रू व विनता यांचा पण, सर्पांना कद्रूचा शाप. **अध्याय २१–२२** कद्रू–विनतांचे उच्चैःश्रवावलोकन, सर्पांचें अश्वपुच्छवेष्टन. **अध्याय २३–३४** गरुडाचा जन्म, त्याचा पराक्रम, त्याचें इंद्राशीं युद्ध, अमृतहरण, इंद्राशीं सख्य, मातृविमोचन आणि सर्पांचें द्विजिव्हत्व. **अध्याय ३५** सर्पनामकथन, **अध्याय ३६** शेषाचें तप व वरप्राप्ति. **अध्याय ३७–३९** कद्रू शापपरिहारासाठीं सर्पांचा विचार. **अध्याय ४०** जरत्कारूची व्युत्पत्ति, परिक्षितराजाची मृगया, शमीकऋषीच्या गळ्यांत सर्पक्षेप. **अध्याय ४१–४३** शमीकपुत्राचा क्रोध, त्याचा परिक्षित्‌राजास शाप, राजाचा तक्षकदंशानें मृत्यु. **अध्याय ४४** जनमेजयाचा राज्याभिषेक व विवाह, **अध्याय ४५–४८** जरत्कारूस पितृदर्शन, त्याचा विवाह व आस्तीकाचा जन्म. **अध्याय ४९–५०** तक्षकदंशाविषयींचा वृत्तांत आणि जनमेजयाचा कोप. **अध्याय ५१–५८** जनमेजयाचें सर्पसत्र, सत्रांत आस्तीकाचें गमन, दग्धसर्पांचीं नांवें, यज्ञसमाप्ति, यज्ञांत आस्तीकाचा सन्मान, आस्तीकाला सर्पांचा वर, सर्पांनीं त्यास दिलेले सर्पभयनिवारक मंत्र.

## अंशावतरणपर्व ६ अ. ५९–६४ पृ. ५३--५९

**अध्याय ५९–६४** सौतीचें भारतकथन, सर्पसत्रांत व्यासांचें आगमन; त्यांस कौरव–पांडव कथेविषयीं प्रश्न, व्यासआज्ञेनें वैशंपायनाचें संक्षिप्त भारतकथन, भारतप्रशंसा, उपरिचर कथा, मत्स्यगंधेची उत्पत्ति, व्यास, विदुर, कर्णादिकांची उत्पत्ति, क्षत्रियोत्पत्ति, भूलोकीं देव–दानवांची उत्पत्ति, भूभारहरणार्थ देवांचे अंशावतार.

## संभवपर्व ७ अ. ६५–१४० पृ. ५९–१३८

**अध्याय ६५–६६** दक्षकन्या, देव, असुर आणि ऋषि यांचें वंशकथन

अध्याय ६७ जरासंधादिकांची उत्पत्ति, पांडव आणि अभिमन्यु यांची उत्पत्ति, पृथेची कथा, कुंती, माद्री इत्यादिकांचें जन्म. अध्याय ६८–७४ दुष्यंत–शकुंतलाख्यान, शकुंतलापुत्र भरताची श्रेष्ठता. अध्याय ७५ भरतवंश व ययातीचें संक्षिप्त चरित्र. अध्याय ७६–७७ ययातिकथा, कच-देवयानी आख्यान. अध्याय ७८–८० देवयानी-शर्मिष्ठा कलह आणि शर्मिष्ठेचा दास्यत्व स्वीकार. अध्याय ८१–९३ देवयानीचा ययातीशीं विवाह व पुत्रप्राप्ति, शर्मिष्ठेस पुत्रप्राप्ति, देवयानीचा कोप, ययातीला शुक्राचा शाप, पूरूचें पितृजराग्रहण, ययातीचें वैराग्य, पूरूचा राज्याभिषेक, ययातीचें स्वर्गगमन आणि अधःपतन, ययातीचा अष्टकादिकांशीं संवाद, ययातीचें पुनः स्वर्गगमन. अध्याय ९४–९५ पूरूवंशकथन आणि फलश्रुति. अध्याय ९६–९८ गंगेला शाप, शांतनूची कथा, भीष्माची उत्पत्ति. अध्याय ९९ वसिष्ठ–धेनुहरण आणि वसिष्ठाचा वसूंना शाप. अध्याय १०० शांतनुचरित्र, व्यास गंगेपासून भीष्माची प्राप्ति, भीष्मास यौवराज्याभिषेक, मत्स्यगंधादर्शन, भीष्माची पित्यास्तव भीष्म–प्रतिज्ञा. अध्याय १०१–१०२ शांतनूचा मृत्यु, विचित्रवीर्यास राज्याभिषेक, काशिराजकन्यांचें स्वयंवर, विचित्रवीर्याचा विवाह आणि त्याचा अकालीं मृत्यु. अध्याय १०३–१०४ कुलवृद्धीविषयीं विचार, भिष्मकथित उतत्थ्याची कथा. अध्याय १०५–१०६ व्यासोत्पत्तिवृत्त, सत्यवतीस व्यासांचें दर्शन, धृतराष्ट्र, पांडु आणि विदुर यांची उत्पत्ति. अध्याय १०७–१०८ अणीमांडव्यकथा. अध्याय १०९–११० पांडूचा राज्याभिषेक आणि धृतराष्ट्राचा विवाह. अध्याय १११–११२ कुंतीचें पूर्ववृत्त आणि विवाह. अध्याय ११३ माद्रीचा विवाह आणि पांडूचा दिग्विजय. अध्याय ११४ पांडूचा अश्वमेध, वनविहार आणि विदुराचा विवाह. अध्याय ११५–११८ गांधारीचा वर, दुर्योधनादिकांची उत्पत्ति, दुःशलेचा जन्म आणि वनांत पांडूस झालेला शाप. अध्याय ११९–१२० पांडूचें भार्यांसह शतशृंगावर गमन व त्याचें कुंतीशीं पुत्रोत्पत्तीविषयीं भाषण. अध्याय १२१–१२३ व्युषिताश्वकथा, श्वेतकेतूनें स्त्रियांस घातलेली मर्यादा, कुंतीचें मंत्रलाभकथन आणि पार्थांची उत्पत्ति. अध्याय १२४ नकुल–सहदेवांची उत्पत्ति. अध्याय १२५–१२७ पांडूचें निधन, पांडवांचें हस्तिनापुरांत आगमन, पांडूचें और्ध्वदेहिक व प्रजेचा शोक. अध्याय १२८–१२९ स्नुषांसह

सत्यवतीचें वनगमन, पांडवांची बालक्रीडा, भीमाला विषप्रयोग आणि कौरवांचें धनुर्वेदाध्ययन. **अध्याय १३०-१३१** कृपजन्म, द्रोणवृत्त, आणि त्यांची हास्तिनापुरांत योजना. **अध्याय १३२** कौरव-पांडवांचें शिक्षण, एकलव्याची कथा, राजपुत्रांची परीक्षा. **अध्याय १३३** अर्जुनाची परीक्षा आणि त्यास 'ब्रह्मशिरोस्त्राची' प्राप्ति. **अध्याय १३४-१३७** राजपुत्रांचें अस्त्रविद्या प्रदर्शन, अर्जुनाचें नैपुण्य, कर्णाचें कौशल्य, त्याचा पार्थाशीं कलह, कर्णास अंगदेशाचा राज्याभिषेक आणि दुर्योधनानें केलेली त्याची प्रशंसा. **अध्याय १३८** गुरुदक्षिणेसाठीं द्रुपदावर चाल, कौरवांचें पलायन, अर्जुनकृत द्रुपदाचा पराभव, द्रुपदास अर्धराज्यदान आणि त्याची बंधमुक्तता. **अध्याय १३९** पांडवांचा पराक्रम आणि धनसंपादन. **अध्याय १४०** कणिकानें धृतराष्ट्रास केलेला दुर्नीतीचा उपदेश आणि जंबूकाची कथा.

**जतुगृहपर्व** ८ अ. १४१-१५१ पृ. १३९--१४५

**अध्याय १४१** कौरवांचा पांडवांविषयीं मत्सर, पांडवांच्या नाशाचा उपाय. **अध्याय १४२-१४८** पांडवांना वारणावतास पाठविण्याविषयींचा विचार पुरोचनाकरवीं लाक्षागृह निर्मिति, लाक्षागृहवृत्त, पांडवांचें तेथून निर्गमन. **अध्याय १४९** विदुरानें पाठविलेल्या नौकेंतून पांडवांचें पार होणें. **अध्याय १५०** धृतराष्ट्राचा पांडवांविषयींचा शोक व त्यांचें और्ध्वदेहिक, पांडवांचें दक्षिणदिशेस गमन. **अध्याय १५१** भीम पाणी आणावयास जातो, परत येऊन निद्रिस्थ भ्राते व माता यांस पाहून विलाप करितो.

**हिडिंबवधपर्व** ९ अ. १५२-१५६ पृ. १४५-१४८

**अध्याय १५२-१५५** हिडिंबवर्णन, पांडवांकडे हिडिंबेचें आगमन, तिची भीमावर आसक्ति, हिडिंब राक्षसाचें आगमन व भीमाशीं युद्ध, हिडिंबाचा वध, हिडिंबेचा स्वीकार आणि घटोत्कचजन्म, हिडिंबेचें पुत्रासह गमन. **अध्याय १५६** पांडवांचा संचार, व्यासांचें आगमन व उपदेश, पांडवांचें एकचक्रानगरींत वास्तव्य.

**बकवधपर्व** १० अ. १५७-१६४ पृ. १४९--१५४

**अध्याय १५७-१५९** कुंतीनें ऐकिलेला ब्राह्मणाचा विलाप, ब्राह्मण-

पत्नि, ब्राह्मण आणि त्यांचीं मुलें यांचा संवाद. **अध्याय १६०–१६४** ब्राह्मणकथित बकाचा वृत्तांत आणि बकवधाची सविस्तर कथा.

**चैत्ररथपर्व** ११ अ. १६५–१८३ पृ. १५४–१६८

**अध्याय १६५–१६७** पांडव एकचक्रानगरींत असतांनां एका अतिथीनें निवेदिलेलें द्रौपदीस्वयंवराचें वृत्त, द्रौपदी आणि धृष्टद्युम्न यांची उत्पत्ति, धृष्टद्युम्नाचें शिक्षण. **अध्याय १६८–१६९** पांडवांचें पांचालदेशीं प्रस्थान, व्यासदर्शन व द्रौपदीचें पूर्वजन्मकथन. **अध्याय १७०** गंधर्वाचा क्रोध, त्याचा पराभव, परस्परविद्यादान आणि गंधर्वाचा पांडवांस पुरोहित करण्याविषयीं उपदेश. **अध्याय १७१–१७३** गंधर्वकथित तपती-संवरण वृत्त, तपती-संवरणापासून कुरूची प्राप्ति म्हणून पांडव हे तापत्य. **अध्याय १७४–१७५** वशिष्ठ-विश्वामित्रकथा, कामधेनूचें हरण, विश्वामित्राचा पराभव आणि तपश्चर्येनें ब्राह्मणत्वाची प्राप्ति. **अध्याय १७६** कल्माषपादाची कथा, त्यानें केलेला वसिष्ठांच्या सर्व पुत्रांचा संहार, दुःखाकुल वसिष्ठांचा आत्महत्येचा प्रयत्न. **अध्याय १७७** 'विपाशा' व शतद्रू नद्या, गर्भस्थ शक्तिपुत्राचा वेदध्वनि, अदृश्यंतीस कल्माषपादाचें भय, कल्माषपादाची शापनिवृत्ति आणि पुत्रप्राप्ति. **अध्याय १७८–१८१** शक्तिपुत्र पराशरोत्पत्ति, पूर्ववृत्तांतज्ञानानें पराशराचा क्रोध, त्याच्या शांतीकरितां वसिष्ठकथित और्वाची कथा, पराशराचें राक्षस सत्र, पुलस्त्याच्या उपदेशानें सत्रसमाप्ति. **अध्याय १८२** पार्थप्रश्नानें कल्माषपाद-पुत्रोत्पत्तीचें गंधर्वोक्त कथन. **अध्याय १८३** अर्जुनाचें गंधर्वास आग्नेयास्त्र समर्पण, गंधर्वदत्त अश्वांचा त्याजपाशींच न्यास, धौम्याला पौरोहित्य समर्पण आणि पांडवांचें स्वयंवरार्थ प्रयाण.

**स्वयंवरपर्व** १२ अ. १८४–१९२ पृ. १६९–१७४

**अध्याय १८४**—पांडवांस मार्गस्थ विप्रांची भेट व त्यांचा संवाद. **अध्याय १८५** पांडवांचा द्रुपदनगरींत निवास, ब्राह्मण-क्षत्रियांचें स्वयंवरार्थ आगमन, स्वयंवर मंडपाचें वर्णन, धृष्टद्युम्नाचें पण निवेदन. **अध्याय १८६** स्वयंवरास आलेल्या वीरांचें नामकथन. **अध्याय १८७** लक्ष्यवेधार्थ नृपाळांचा प्रयत्न, कृष्ण–बलरामांस विप्रवेषांतील पांडवांचें दर्शन, द्रौपदीचें 'मी सूतपुत्राला वरणार नाहीं' असें निषेधवचन, शिशुपाल–जरा

संधाचें अपयश. **अध्याय १८८** पार्थकृत लक्ष्यवेध, जयघोष, क्षत्रियांचा क्षोभ, द्रौपदीचें पार्थाबरोबर गमन. **अध्याय १८९–१९०** राजांचा द्रुपदवध-निश्चय, भीमार्जुनांनीं केलेला प्रतिबंध, क्रुद्ध नृपांशीं भीमार्जुनांचें युद्ध, पांडवांचा विजय, पुत्रांविषयीं कुंतीची चिंता. **अध्याय १९१** पांडवांस कुंतीचें ' भिक्षा-वांटून घ्या ' असें सांगणें, कृष्णदर्शन. **अध्याय १९२** कुलालसदनीं धृष्टद्युम्नाचें गुप्तपणें आगमन, पांडवांच्या गोष्टी ऐकून धृष्टद्युम्नाचें राजमंदिरीं प्रत्यागमन, द्रुपदाची चिंता.

## वैवाहिकपर्व १३ अ. १९३–१९९ पृ. १७५–१७९

**अध्याय १९३–१९५**—द्रुपदास धृष्टद्युम्नाचें वृत्तकथन, पांडवांस भोजनाचें निमंत्रण, पांडवांचा सत्कार, भोजन, त्यांची परीक्षा, द्रुपदाचा धर्मास ' तुम्ही कोण ' असा प्रश्न, धर्माचें उत्तर, द्रौपदीच्या विवाहाविषयीं मतभेद व व्यासांचें आगमन. **अध्याय १९६–१९९** द्रौपदीबहुपत्नित्वाविषयीं द्रुपदाचें मत, द्रौपदी व पांडव यांचें व्यासकथित पूर्वजन्मवृत्त, द्रौपदीचा पांडवांशीं विवाह, तिला कुंतीचा आशीर्वाद, पांडवांस श्रीकृष्णाकडून आलेला अहेर.

## विदुरागमन–राज्यलंभपर्व १४
### अ. २००--२१२ पृ. १७९--१८५

**अध्याय २००** पांडवांचें वृत्त ऐकून दुर्योधनाचा खेद. **अध्याय २०१–२०६** पांडवनाशार्थ दुर्योधन कथित उपाय, कर्णाचें मत, भीष्माचा उपदेश, द्रोणाचा उपदेश, कर्णाचें द्वेषमूलक भाषण, द्रोणाचें उत्तर, विदुराचें उत्तर, धृतराष्ट्रआज्ञेनें विदुराचें द्रुपदपुरींत गमन. **अध्याय २०७** पांडवांचें हस्तिनापुरांत गमन, त्यांस अर्धराज्याचा लाभ. **अध्याय २०८–२१२** पांडवांकडे नारदाचें आगमन, सुंदोपसुंद कथानिवेदन, नारदआज्ञेनें पांडवांचा द्रौपदीविषयीं नियम.

## अर्जुनवनवासपर्व १५ अ. २१३--२१८ पृ. १८५–१८८

**अध्याय २१३** पांडवांचा उत्कर्ष, विप्रधेनुहरण, त्याचा राजद्वारीं आक्रोश, अर्जुनकृत तस्करनिग्रह आणि वनगमन. **अध्याय २१४–२१८** अर्जुनाची तीर्थयात्रा, उलुपीचा स्वीकार, चित्रांगदेचें पाणिग्रहण, बभ्रुवाह-

नाचा जन्म, पंचतीर्थदर्शन आणि अप्सरांचा उद्धार, चित्रांगदेची पुनर्भेट व गोकर्णक्षेत्रीं गमन, अर्जुनाचें प्रभासक्षेत्रीं गमन, कृष्णदर्शन, रैवतकगमन आणि द्वारकाप्रवेश.

**सुभद्राहरणपर्व** १६ अ. २१९–२२० पृ. १८८–१८९

**अध्याय २१९–२२०** रैवतकावरील उत्सव, अर्जुनास सुभद्रेचें दर्शन, सुभद्राहरणाचा संकेत आणि सुभद्राहरण, यादवांचा क्षोभ.

**हरणहारिकापर्व** १७ अ. २२१ पृ. १९०–१९१

**अध्याय २२१** अर्जुनकृत सुभद्राहरण, पार्थाचें सुभद्रेसह खांडवप्रस्थास आगमन, अभिमन्यूचा जन्म, द्रौपदेयांची उत्पत्ति व त्यांचें शिक्षण.

**खांडवदाहपर्व** १८ अ. २२२–२२७ पृ. १९१–१९४

**अध्याय २२२–२२७** कृष्णार्जुनांचा यमुनातीर विहार, तेथें एका तेजस्वी ब्राह्मणाचें दर्शन, ब्राह्मणरूपी अग्नीची याचना, कृष्णार्जुनास दिव्या-युधप्राप्ति, खांडववनदाह, पार्थ व इंद्र यांचें युद्ध.

**मयदर्शनपर्व** १९ अ. २२८–२३४ पृ. १९४–१९६

**अध्याय २२८–२३४** पार्थकृत इंद्राचा पराभव, खांडवदाहांतून मयासुर आणि शार्ङ्गकपक्षी यांची मुक्तता, शार्ङ्गकपक्ष्यांचें वृत्त, कृष्णार्जुनास इंद्रादि देवांची भेट, शिवकृपेनें सर्व अस्त्रें लाभतील असा इंद्राचा पार्थास वर, अग्नीची प्रसन्नता, कृष्णार्जुनांचें मयासुरासह यमुनातीरीं आगमन.

---

# २ सभापर्व

**सभाक्रियापर्व** १ अ. १–४ पृ. १९७–१९९

**अध्याय १** मयसभेचा संकेत व सभाकार्यास प्रारंभ. **अध्याय २** श्रीकृ-ष्णाचें द्वारकेस गमन. **अध्याय ३** मयासुराची बिंदुसरोवराहून सामग्री आणून सभा निर्मिति, मयसभा वर्णन. **अध्याय ४** पांडवांचा मयसभाप्रवेश.

## लोकपालसभाख्यानपर्व २ अ. ५–१२ पृ. २००–२०८

**अध्याय ५** मयसभेंत नारदाचें आगमन, नारदाचें वर्णन, नारदकथित राजधर्मानुशासन ( नारद-नीति ) **अध्याय ६–११** युधिष्ठिराचा 'अशी सभा तूं कोठें पाहिली आहेस काय ? असा प्रश्न, नारदाचें उत्तर, इंद्र, यम, वरुण कुबेर आणि ब्रह्मदेव यांच्या सभांचें वर्णन. **अध्याय १२** इंद्रलोकीं हरिश्चंद्राचा सन्मान, नारदद्वारा पांडुराजाचा राजसूययज्ञ करण्याविषयीं धर्मास निरोप, नारदाचें गमन.

## राजसूयारंभपर्व ३ अ. १३–१९ पृ. २०९–२१५

**अध्याय १३** धर्मराजाचें सुराज्य, राजसूयाविषयीं विचार, कृष्णाचें आगमन, त्याला धर्माचा प्रश्न. **अध्याय १४** जरासंधाच्या पराक्रमाचें वर्णन आणि त्याच्या वधावांचून राजसूय सिद्धीस जाणें शक्य नाहीं असें श्रीकृष्णाचें स्पष्ट कथन. **अध्याय १५–१६** युधिष्ठिराची निराशा, भीम, कृष्ण आणि अर्जुन यांचें प्रोत्साहन. **अध्याय १७–१८** कृष्णाचें सयुक्तिक प्रोत्साहन आणि जरासंधजन्माचें सविस्तर वृत्त, जरेनें सांधल्यामुळें 'जरासंध' नामप्राप्ति, **अध्याय १९** चंडकौशिक कथित जरासंधाचें भावी प्रभावाचें कथन, जरासंधास राज्यप्राप्ति.

## जरासंधवधपर्व ४ अ. २०–२४ पृ. २१६–२२१

**अध्याय २०-२४** श्रीकृष्णाचें भीमार्जुनांसह मगधदेशीं प्रयाण, पर्वतावरून गिरिव्रजनगरीचें अवलोकन, जरासंधाची भेट, श्रीकृष्णाची जरासंधापाशीं युद्धाची मागणी, जरासंधाची भीमाशीं युद्ध करण्याविषयीं सिद्धता, भीम–जरासंध युद्ध, जरासंधवध, बंदिवान् राजांची मुक्तता वीरत्रयाचें इंद्रप्रस्थास प्रत्यागमन, युधिष्ठिराचा संतोष, श्रीकृष्णाचें द्वारकेंत गमन.

## दिग्विजयपर्व ५ अ. २५–३२ पृ. २२१–२२३

**अध्याय २५–३२** पांडवांचा दिग्विजय विचार, धनंजयाचा उत्तर-दिग्विजय, भीमसेनाचा पूर्वदिशेकडील विजय, सहदेवाचा दक्षिण दिग्विजय आणि नकुलाचा पश्चिम द्विग्विजय.

**राजसूयपर्व** ६ अ. ३३–३५ पृ. २२४--२२६

**अध्याय ३३–३५** धर्माच्या समृद्धीचें वर्णन, श्रीकृष्णगमन, व्यास-आज्ञेनें ऋत्विजांचें आगमन, राजसूयनिमंत्रणासाठीं दूतप्रेषण, धर्माचें दीक्षा-ग्रहण, निमंत्रित राजांचें आगमन, भीष्मद्रोणांचा सत्कार, यज्ञांतील विविध कार्यांवर भिन्न भिन्न कार्यकर्त्यांची योजना, यज्ञानुष्ठान.

**अर्घाभिहरणपर्व** ७ अ. ३६–३९ पृ. २२६–२२८

**अध्याय ३६–३९**—सोमयागाचे दिवशीं क्षत्रियनाशाविषयीं नारदाची चिंता, श्रीकृष्णाची अग्रपूजा, शिशुपालाचा विरोध, त्याचें कृष्णनिंदापूर्वक सभेंतून निर्गमन, भीष्मकथित कृष्ण–महात्म्य, सहदेवाचें भाषण, पूजार्हांचा सत्कार, शिशुपालादि नृपांचा युद्धसंकेत.

**शिशुपालवधपर्व** ८ अ. ४०--४५ पृ. २२९--२३२

**अध्याय ४०–४५**—युधिष्ठिराची चिंता, भीष्मकृत समाधान, शिशुपालकृत भीष्म निर्भर्त्सना, भीमाचा क्रोध, शिशुपालाचें जन्मवृत्त, शिशुपालाचा क्रोध, भीष्माचें उत्तर, शिशुपालाचें कृष्णास आव्हान, शिशुपालाचा वध, त्याच्या तेजाचा कृष्णशरीरांत प्रवेश, यज्ञसमाप्ति, कृष्णाचें द्वारकागमन.

**द्यूतपर्व** ९ अ. ४६--७३ पृ. २३२–२५२

**अध्याय ४६**–युधिष्ठिराचा व्यासांस प्रश्न, व्यासांचें कैलासगमन, युधिष्ठिराची चिंता. **अध्याय ४७** दुर्योधनाचा उपहास व त्याचें हस्तिनापुरास प्रयाण, मार्गांत त्याचा प्राणत्यागाचा निश्चय. **अध्याय ४८** शकुनीकथित पांडवांचा पराक्रम आणि त्यांना द्यूतांत जिंकण्याचें आश्वासन. **अध्याय ४९** शकुनीचें धृतराष्ट्रास दुर्योधनाच्या दुःस्थितीचें निवेदन. दुर्योधनाचें पांडववैभवावलोकनानें अस्वास्थ्य, धृतराष्ट्रापाशीं द्यूताची अनुज्ञा, पुत्रस्नेहाकुल धृतराष्ट्राची अनुमति, विदुराचा तीव्र निषेध. **अध्याय ५०–५३** धृतराष्ट्राचा दुर्योधनास उपदेश, दुर्योधनाचा संताप, त्यानें केलेलें राजसूयादि पांडववैभवाचें वर्णन. **अध्याय ५४–५५** धृतराष्ट्राचा उपदेश व दुर्योधनाचा संताप, **अध्याय ५६** शकुनीचें प्रोत्साहन आणि धृतराष्ट्राची विदुरास पांडवांना आणण्याविषयीं आज्ञा. **अध्याय ५७** विदुराचा निषेध. **अध्याय ५८** विदुराचें पांडवांकडे

## लोकपालसभाख्यानपर्व २ अ. ५-१२ पृ. २००-२०८

**अध्याय ५** मयसभेंत नारदाचें आगमन, नारदाचें वर्णन, नारदकथित राजधर्मानुशासन ( नारद- नीति ) **अध्याय ६-११** युधिष्ठिराचा ' अशी सभा तूं कोठें पाहिली आहेस काय ? असा प्रश्न, नारदाचें उत्तर, इंद्र, यम, वरुण कुबेर आणि ब्रह्मदेव यांच्या सभांचें वर्णन. **अध्याय १२** इंद्रलोकीं हरिश्चंद्राचा सन्मान, नारदद्वारा पांडूराजाचा राजसूययज्ञ करण्याविषयीं धर्मास निरोप, नारदाचें गमन.

## राजसूयारंभपर्व ३ अ. १३-१९ पृ. २०९-२१५

**अध्याय १३** धर्मराजाचें सुराज्य, राजसूयाविषयीं विचार, कृष्णाचें आगमन, त्याला धर्माचा प्रश्न. **अध्याय १४** जरासंधाच्या पराक्रमाचें वर्णन आणि त्याच्या वधावांचून राजसूय सिद्धीस जाणें शक्य नाहीं असें श्रीकृष्णाचें स्पष्ट कथन. **अध्याय १५-१६** युधिष्ठिराची निराशा, भीम, कृष्ण आणि अर्जुन यांचें प्रोत्साहन. **अध्याय १७-१८** कृष्णाचें सयुक्तिक प्रोत्साहन आणि जरासंधजन्माचें सविस्तर वृत्त, जरेनें सांधल्यामुळें ' जरासंध ' नामप्राप्ति, **अध्याय १९** चंडकौशिक कथित जरासंधाचें भावी प्रभावाचें कथन, जरासंधास राज्यप्राप्ति.

## जरासंधवधपर्व ४ अ. २०-२४ पृ. २१६-२२१

**अध्याय २०-२४** श्रीकृष्णाचें भीमार्जुनांसह मगधदेशीं प्रयाण, पर्वतावरून गिरिव्रजनगरीचें अवलोकन, जरासंधाची भेट, श्रीकृष्णाची जरासंधापाशीं युद्धाची मागणी, जरासंधाची भीमाशीं युद्ध करण्याविषयीं सिद्धता, भीम-जरासंध युद्ध, जरासंधवध, बंदिवान् राजांची मुक्तता वीरत्रयाचें इंद्रप्रस्थास प्रत्यागमन, युधिष्ठिराचा संतोष, श्रीकृष्णाचें द्वारकेंत गमन.

## दिग्विजयपर्व ५ अ. २५-३२ पृ. २२१-२२३

**अध्याय २५-३२** पांडवांचा दिग्विजय विचार, धनंजयाचा उत्तरदिग्विजय, भीमसेनाचा पूर्वदिशेकडील विजय, सहदेवाचा दक्षिण दिग्विजय आणि नकुलाचा पश्चिम द्विग्विजय.

**राजसूयपर्व** ६ अ. ३३–३५ पृ. २२४--२२६

**अध्याय ३३–३५** धर्माच्या समृध्दीचें वर्णन, श्रीकृष्णगमन, व्यास-आज्ञेनें ऋत्विजांचें आगमन, राजसूयनिमंत्रणासाठीं दूतप्रेषण, धर्माचें दीक्षा-ग्रहण, निमंत्रित राजांचें आगमन, भीष्मद्रोणांचा सत्कार, यज्ञांतील विविध कार्यांवर भिन्न भिन्न कार्यकर्त्यांची योजना, यज्ञानुष्ठान.

**अर्घाभिहरणपर्व** ७ अ. ३६–३९ पृ. २२६–२२८

**अध्याय ३६–३९**—सोमयागाचे दिवशीं क्षत्रियनाशाविषयीं नारदाची चिंता, श्रीकृष्णाची अग्रपूजा, शिशुपालाचा विरोध, त्याचें कृष्णनिंदापूर्वक सभेंतून निर्गमन, भीष्मकथित कृष्ण–महात्म्य, सहदेवाचें भाषण, पूजार्हांचा सत्कार, शिशुपालादि नृपांचा युद्धसंकेत.

**शिशुपालवधपर्व** ८ अ. ४०--४५ पृ. २२९--२३२

**अध्याय ४०–४५**—युधिष्ठिराची चिंता, भीष्मकृत समाधान, शिशु-पालकृत भीष्म निर्भर्त्सना, भीमाचा क्रोध, शिशुपालाचें जन्मवृत्त, शिशु-पालाचा क्रोध, भीष्माचें उत्तर, शिशुपालाचें कृष्णास आव्हान, शिशुपालाचा वध, त्याच्या तेजाचा कृष्णशरीरांत प्रवेश, यज्ञसमाप्ति, कृष्णाचें द्वारकागमन.

**द्यूतपर्व** ९ अ. ४६--७३ पृ. २३२–२५२

**अध्याय ४६**–युधिष्ठिराचा व्यासांस प्रश्न, व्यासांचें कैलासगमन, युधिष्ठिराची चिंता. **अध्याय ४७** दुर्योधनाचा उपहास व त्यांचें हस्तिनापुरास प्रयाण, मार्गांत त्याचा प्राणत्यागाचा निश्चय. **अध्याय ४८** शकुनीकथित पांडवांचा पराक्रम आणि त्यांना द्यूतांत जिंकण्याचें आश्वासन. **अध्याय ४९** शकुनीचें धृतराष्ट्रास दुर्योधनाच्या दुःस्थितीचें निवेदन. दुर्योधनाचें पांडववैभवा-वलोकनानें अस्वास्थ्य, धृतराष्ट्रापाशीं द्यूताची अनुज्ञा, पुत्रस्नेहाकुल धृत-राष्ट्राची अनुमति, विदुराचा तीव्र निषेध. **अध्याय ५०–५३** धृतराष्ट्राचा दुर्यो-धनास उपदेश, दुर्योधनाचा संताप, त्यानें केलेलें राजसूयादि पांडववैभवाचें वर्णन. **अध्याय ५४–५५** धृतराष्ट्राचा उपदेश व दुर्योधनाचा संताप, **अध्याय ५६** शकुनीचें प्रोत्साहन आणि धृतराष्ट्राची विदुरास पांडवांना आणण्याविषयीं आज्ञा. **अध्याय ५७** विदुराचा निषेध. **अध्याय ५८** विदुराचें पांडवांकडे

गमन आणि पांडवांचा हस्तिनापुरीं सभाप्रवेश. **अध्याय ५९** शकुनीचें आव्हान व युधिष्ठिराची द्यूतप्रवृत्ति, **अध्याय ६०–६५** द्यूतारंभ, विदुराचा उपदेश, युधिष्ठिराच्या सर्वस्वाचा अपहार. **अध्याय ६६–६७** दुर्योधनाचीं दुरुत्तरें, विदुरकृत निर्भर्त्सना, दुर्योधनाची द्रौपदीला सभेंत आणण्याविषयीं आज्ञा, द्रौपदीचा सभेस प्रश्न, भीष्माचें संदिग्ध उत्तर. **अध्याय ६८** भीमाचें धर्मास कठोर भाषण, अर्जुनकृत सांत्वन, विकर्णाची स्पष्टोक्ति, द्रौपदीचें वस्त्रापहरण, कृष्णकृत लज्जारक्षण, भीमाची घोर प्रतिज्ञा, विदुराचा उपदेश. **अध्याय ६९** द्रौपदीचा विलाप, भीष्मकृत सांत्वन. **अध्याय ७०** दुर्योधनकृत पांडवांचा उपहास, भीमाचें क्रोधवचन. **अध्याय ७१** कर्णाचें निंद्य भाषण, दुर्योधनाचें अंकदर्शन, भीमाची घोर प्रतिज्ञा, विदुराचें भाषण, राजवाड्यांत दुश्चिन्हें, धृतराष्ट्रानें द्रौपदीस दिलेले वर. **अध्याय ७२** कर्णाचें कटुवचन, भीमाचा क्रोध व युधिष्ठिरकृत सांत्वन. **अध्याय ७३** धृतराष्ट्राचा युधिष्ठिराला उपदेश आणि पांडवांचें इंद्रप्रस्थास प्रयाण.

**अनुद्यूतपर्व** १० अ. ७४–८१ पृ. २५२--२५९

**अध्याय ७४** पांडव परत जातांच दुर्योधनाची धृतराष्ट्रास अनुद्यूताची प्रेरणा, त्याची अनुज्ञा. **अध्याय ७५** गांधारीचा द्यूतविरोधी उपदेश. **अध्याय ७६** युधिष्ठिरास मार्गांतून परत आणणें, वनवास आणि अज्ञातवासाचा पण लावून पुनः द्यूत, शकुनीचा विजय. **अध्याय ७७** दुःशासनाचें दुर्वचन, भीमार्जुनादींची प्रतिज्ञा. **अध्याय ७८** वनांत जावयास निघालेल्या पांडवांस विदुराचा उपदेश. **अध्याय ७९** द्रौपदीस व पुत्रांस कुंतीचा उपदेश, पांडवांचें वनगमन. **अध्याय ८०** पांडवांच्या हावभावावरून त्यांच्या आशयाचें विदुरोक्त निवेदन, पौरजनांचा संताप, दुश्चिन्हदर्शन, नारदागमन, त्याचें उग्रवचन, दुर्योधनास द्रोणाचा उपदेश. **अध्याय ८१** धृतराष्ट्राचें असमाधान, त्याचा पश्चात्ताप आणि खेद.

राष्ट्रीय कीर्तनकार श्री. कोल्हटकर यांचें

## —राष्ट्रीय संग्राह्य वाङ्मय—

**कीर्तन मंदाकिनी—तरंग ४ [ चार पुस्तकें ]** १–२–०

**चैतन्य ग्रंथ-माला—**

१ महाराणा–प्रताप [ उत्कृष्ट चरित्र ] १–४–०
२ राम गीत सुधा [ गद्यपद्यात्मक रामायण, भाग १ ला ] २–०–०
३ राम गीत सुधा [ ,, ,, भाग २ रा ] ३–०–०
४ रूपनगरची राजकुमारी [ चरित्र आणि गीतें ] ०–६–०
५ सम्राट् सुभाष [ आवृत्ति २ री ] [ चरित्र आणि गीतें ] ०–१०–०
६ सुलभ कीर्तन–संग्रह ०–४–०
७ धर्मचैतन्य शिक्षण [ पुस्तक १ लें ] आवृत्ति ३ री ०–६–०
८ **धर्मचैतन्य शिक्षण [ पुस्तक २ रें ]** १–८–०

**आगामी प्रकाशन**

१ कीर्तनकला आणि शास्त्र [ शास्त्रीय ग्रंथ ]
२ अभंग–भारत [ पुढील ४ खंड ]
३ अभंग–रामायण
४ अभंग–भागवत
५ धर्मचैतन्य शिक्षण [ पुस्तक ३ रें ]
६ सिद्धांतामृतबिन्दु [ वेदान्त ग्रंथ ]
७ हिंदु मंदिरें

पत्ता—व्यवस्थापक, **धर्मचैतन्य संस्था,**
**सदाशिव पेठ, पुणें २.**

# धर्मचैतन्य संस्था, पुणें

संस्थापक—राष्ट्रीय कीर्तनकार श्री. वा. शि. कोल्हटकर

( स्थापना—शके १८६६ अक्षय्यतृतीया )

## उद्देश

(१) प्रत्येक व्यक्तीच्या नैतिक उन्नतीवरच राष्ट्राची उन्नति अवलंबून असल्याकारणानें बालपणापासूनच कोंवळया मनावर नीति धर्मांचे संस्कार करण्यासाठीं जागोजाग धर्म शिक्षणाचे वर्ग चालविणें. ( २ ) वेदशास्त्रांच्या अध्ययन-अध्यापनास साह्य करणें ( ३ ) धर्मजागृतीकरितां विद्वान् आणि तेजस्वी प्रचारक निर्माण करणें. ( ४ ) धर्मविषयक कार्यकर्त्यांचें संघटन करून त्यांच्या आर्थिक अडचणी दूर करण्याचा प्रयत्न करणें. ( ५ ) प्रतिवर्षी वैशाख महिन्यांत ' धर्मस्वरूप दर्शनमाला ' या नांवाची प्रवचनमाला चालविणें.

## संस्थेचीं चालू कामें

( १ ) संस्थेमध्यें वर्षांतील निरनिराळे धार्मिक सण व उत्सव होत असतात. ( २ ) संस्थेंत धर्म शिक्षणाचे मुलांकरितां व प्रौढांकरितां विनामूल्य वर्ग चालू असतात. ( ३ ) प्रत्येक मे महिन्यांत मुलांना २ वर्षेपर्यंत शिकवितां येईल एवढी माहिती शिक्षकांना दिली जाते. ( ४ ) संस्थेंत वेदशास्त्र व कीर्तन यांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची भोजनाची सोय केली जाते. ( ५ ) संस्थेनें अनेक धर्मग्रंथांचा अभ्यासू लोकांकरितां संग्रह केला आहे.

अशा सर्वस्वी लोकोपयोगी धार्मिक कामें करणाऱ्या या संस्थेस शक्य होईल तें तें सहाय्य करावें अशी विनंती आहे.

धर्मचैतन्य संस्था,
सदाशिव पेठ,
पुणें २

आपला नम्र,
**सी. कृ. बर्वे**
व्यवस्थापक, धर्मचैतन्य संस्था, पुणें २

-ॐ नमो भगवते वासुदेवाय-

# अभंग-भारत

( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )

## १ आदिपर्व

—०—

### अनुक्रमणीपर्व १

अध्याय १ ला

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ १ ॥

अभंग १ ला

नमूं नारायणा देवा । सर्व सुखाचा जो ठेवा ॥ १ ॥
चालक तो ब्रह्मांडाचा । तेंवि आधार विश्वाचा ॥ २ ॥
नररूपें कार्य करी । नरोत्तम तो श्रीहरी ॥ ३ ॥
वंदूं त्याचे चरणरज । कार्यसिद्धि ती सहज ॥ ४ ॥
देवी चित्कला शारदा । साह्य सत्कर्मासी सदा ॥ ५ ॥
वंदितों मीं तिच्या पायां । तेंवि व्यासमुनिराया ॥ ६ ॥
जयग्रंथही वंदिला । नमन सद्गुरु दत्ताला ॥ ७ ॥
तपस्वी तो पूज्य पिता । साध्वी वंदियेली माता ॥ ८ ॥
देव वामन परशुराम । करितील पूर्ण काम ॥ ९ ॥

१ धर्मचैतन्य संस्थेंतील देव.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.

श्रोते सज्जन भाविक । वंदितों मी पुण्यवंत ॥ १० ॥
'वासुदेव' नम्र दास । आरंभितो भारतास ॥ ११ ॥

२

झाले थोर थोर कवि । कांहो कविता ही नवी ॥ १ ॥
ऐसें पुसाल जी तरी । करा विचार अंतरीं ॥ २ ॥
स्वामी जगाचा महाराजा । त्याची शब्द सुमनपूजा ॥ ३ ॥
करितां पावेल संतोष । हीच एक मनीं आस ॥ ४ ॥
श्रोत्यां वक्त्यांचा उद्धार । हेतु हाचि निरंतर ॥ ५ ॥
सकलांची ऐसी सेवं । इच्छितात़ी कांहीं नवें ॥ ६ ॥
जाणुनी हें सुवर्णाला । साज नवा चढविला ॥ ७ ॥
तेचि गुण, रूप भिन्न । वासुदेवाचा प्रयत्न ॥ ८ ॥

३

जगद्गुरु वासुदेवा । वंदितों मी ब्रह्मदेवा ॥ १ ॥
वंदितसें नारदमुनी । हरिमय ज्याची वाणी ॥ २ ॥
नमूं विघ्नविनाशन । शिवभवानीनंदन ॥ ३ ॥
क्षेत्रपाल तो वंदिला । नमूं गायत्री देवीला ॥ ४ ॥
कुळस्वामी कोळेश्वर । अन्य देवहीं सकळ ॥ ५ ॥
मागे आशीर्वाद त्यांचा । वासुदेव दास साचा ॥ ६ ॥

४

रोमहर्षणाचा सुत । सौति नामें जनीं ख्यात ॥ १ ॥
शौनकाच्या सत्रामाजी । पाहुनी त्या मुनि राजी ॥ २ ॥
झालें स्वागत नैमिषवनीं । बैसाविलें उच्चस्थानीं ॥ ३ ॥
कुशल तयासी पुशिती । आलां कोठोनी म्हणती ॥ ४ ॥
विनवी वासुदेव लोकां । परिसा सूतपुत्र वाचा ॥ ५ ॥

५

परीक्षितीचा तनय । राजर्षि तो जनमेजय ॥ १ ॥
सर्पसत्रामाजी त्याच्या । बोध वैशंपायनाचा ॥ २ ॥
व्यास रचित जयग्रंथ । साग्र ऐकियेला तेथ ॥ ३ ॥

पुष्करादि तीर्थें नाना । नैमिषादि मंगलस्थानां ॥ ४ ॥
जातां, हर्ष अंतरांत । पुढती समंतपंचक ॥ ५ ॥
पाहूनियां येथ आलों । पुण्यदर्शनें या धालों ॥ ६ ॥
अग्निसम शुचिर्भूत । वंद्य तुम्हीं द्विजश्रेष्ठ ॥ ७ ॥
राजधर्म, रामकथा । अथवा वर्णू पतिव्रता ॥ ८ ॥
किंवा वर्णू सदाचार । वासुदेवाचा आधार ॥ ९ ॥

६

सौतीचा[1] हा प्रश्न ऐकूनियां मुनि । बोलले देवांनीं स्तविलें जया ॥१॥
पद वाक्यरूप विचित्र रचना । रम्य अर्थ नाना जयामाजी ॥ २ ॥
पौष्य पौलोमादि तेंवि सभा, वन । पर्वें, आत्मज्ञान जयामाजी ॥ ३ ॥
व्यास कथित तें भारत कथावें । नटलें स्वभावें संस्कारांनीं ॥ ४॥
अविरुद्ध असे सर्व शास्त्रांलागीं । वेदार्थ ज्या अंगीं प्रगटला ॥५॥
पवित्र संहिता पापश्रमहारी । तारक संसारीं वासुदेवा ॥ ६ ॥

७

उग्रश्रवा म्हणे सर्वसाक्षी हरि । श्रीकृष्ण मुरारि अंतर्यामी ॥ १ ॥
तोचि यज्ञभोक्ता वंद्य त्रैलोक्यासी । व्यक्त अव्यक्तासी आधारतो ॥२॥
ॐकार स्वरूप तेंचि परब्रह्म । शुध्द सनातन मंगल तें ॥ ३ ॥
वंदूनियां तया हृषीकेशालागीं । कथामृतामाजी पोंहू आतां ॥ ४ ॥
व्यासदेवाची ही पवित्र रचना । वर्णियेली जाणा ज्ञानियांनीं ॥ ५ ॥
पूर्वीं वर्णियेली आजही वर्णिती । पुढती या लोकीं वर्णितील ॥ ६ ॥
त्रैलोक्यीं विख्यात विस्तृत संक्षेपें । रक्षिती कौतुकें ज्ञानि, यासी ॥७॥
मंगलकारक शब्दमाला येथ । प्रिय सकलांस ग्रंथ जाणा ॥ ८ ॥
मर्यादा या ग्रंथीं देव मानवांच्या । वासुदेव त्याचा भाट झाला ॥ ९ ॥

८

पूर्वीं अंधःकार अज्ञान व्यापलें । अंडें एक झालें तयामाजी ॥ १ ॥
तेंचि या विश्वाचें मूळ अप्रमेय । एक अद्वितीय कूटस्थ तें ॥ २ ॥

१ सौति.

तेथ प्रजापति पितामह झाला । म्हणती तयाला हिरण्यगर्भ ॥ ३ ॥
तीन गुणें त्याच्या तीन देव होती । तेचि हे त्रैमूर्ति महेशादि ॥ ४ ॥
मानससंतानें ब्रह्मयाचीं तीं चार । तयांचा विस्तार थोर झाला ॥५॥
मत्स्यकूर्मादिक तोचि महाविष्णु । यक्ष,साध्य, भानु शिवजाणा ॥६॥
उत्पत्ति, पालन, संहार हीं कर्में । होती अनुक्रमें स्थूल सूक्ष्म ॥ ७ ॥
ऐसा ब्रह्मांडाचा विस्तार वाढला । वासुदेव झाला नम्र तेथ ॥ ८ ॥

९

उलट क्रमानें लीन होई जेव्हां । कल्पक्षय तेव्हां म्हणती त्यासी ॥१॥
शीत उष्ण जैसे ऋतु पालटती । कल्पारंभीं होती वस्तु तैशा ॥ २ ॥
जगच्चक्र ऐसें फिरे वारंवार । अष्ट वसु, रुद्र, आदित्य ते ॥ ३ ॥
तेहतीस संख्या असे या देवांची । पुढें विस्तारासी अंत नाहीं ॥ ४ ॥
कुरु, यदु, तैसे भरत, इक्ष्वाकु । वंश ते अनेकु पुढती झाले ॥ ५ ॥
वासुदेव देवां तयां वंदितसे । विश्व नटलासे लीलामात्रें ॥ ६ ॥

१०

जारज स्वेदज उद्भिज अंडज । देह चतुर्विध ऐसे जाणा ॥ १ ॥
कर्म उपासना तैसें ज्ञानकांड । धर्मही प्रसिद्ध श्रौत स्मार्त ॥ २ ॥
अर्थ काम शास्त्रें तेंवि धनुर्वेद । तैसा आयुर्वेद गांधर्वही ॥ ३ ॥
लोकयात्राकारी शास्त्रें सकलही । योगबळें पाही व्यास तयां ॥ ४ ॥
नीतिधर्म तैसा कथिला भारतीं । वासुदेव कथी तोचि ग्रंथ ॥ ५ ॥

११

रचिलें भारत जनां शिकवाया । प्रसिद्धि उपाया काय करूं ॥ १ ॥
ऐसी चिंता लागे द्वैपायनालागीं । ब्रह्मा तैं भूभागीं प्रगटला ॥ २ ॥
लोटांगण पदीं घालूनियां व्यास । स्वहेतु ब्रह्मयास कथितसे ॥ ३ ॥
म्हणे ब्रह्मदेवा ग्रंथ मी रचिला । संकलित केला सकल बोध ॥४॥
वेद वेदांगांचें रहस्य कथिलें । इतिहास केले व्यक्त सर्व ॥ ५ ॥

---

१ ब्रह्मा, विष्णु, महेश, २ अष्ट वसु, द्वादश अदित्य, एकादश रुद्र, इंद्र आणि प्रजापति.

जरा मृत्यु भय काळही कथिले । वर्णाश्रम केले सुलभ जनां ॥ ६ ॥
वेद उपवेद सकल तीं शास्त्रें । जन्म, कर्म, तीर्थं सांगितलीं ॥७॥
लोक व्यवहार संपूर्ण कथिला । लेखक लाभला नाहीं मज ॥ ८ ॥
संप्रदायाविण व्यर्थ ग्रंथ जाई । ऐसी चिंता येई मनामाजी ॥ ९ ॥
ब्रह्मदेव म्हणे गृहस्थ आश्रम । तैसा थोर जाण ग्रंथ तुझा ॥ १० ॥
प्रार्थी गजानना लेखक व्हावया । वासुदेव पायां वंदितसे ॥ ११ ॥

१२

जगत्स्रष्टा ब्रह्मा सांगूनियां गेला । प्रार्थी हेरंबाला व्यास तेव्हां ॥१॥
भक्त मनोरथ सिद्धीसी न्यावया । पातले त्या ठाया गजानन ॥ २ ॥
बैसवोनि प्रेमें आसनीं पूजिलें । भारत कल्पिलें म्हणे मनीं ॥ ३ ॥
लेखक तूं होईं गजानना मज । हेतु हा सहज पूर्ण करीं ॥ ४ ॥
गजानन म्हणे न थांबो लेखणी । तरी या लेखनीं साह्य माझें ॥५॥
विनवी द्वैपायन अर्थ बोधाविण । न लिहावें जाण एकदंता ॥ ६ ॥
ॐकारें उच्चारें सिद्ध गजानन । वासुदेव मन हर्ष पावे ॥ ७ ॥

१३

चातुर्य व्यासांचें कूट श्लोक केले । प्रसन्न जाहले गजानन ॥ १ ॥
व्यास आणि शुक अर्थ तो जाणती । संजयाची मति मोह पावे ॥ २ ॥
कुंठितचि होई मति विद्वानांची । गति प्रमाणांची न चले तेथें ॥ ३ ॥
गजानन करी ऐकुनी चिंतना । करिती रचना व्यास तेव्हां ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे थोरांची हे क्रीडा । हरी भवपीडा साधकांची ॥ ५ ॥

१४

बद्ध जे कर्मानें अंध अज्ञानानें । मुक्त ते ज्ञानानें भारताच्या ॥ १ ॥
भारत न होतें तरी अंधःकार । मूढ ते बधिर सर्व लोक ॥ २ ॥
दिव्य ज्ञानांजनें बुद्धि शुद्ध केली । किरणें फांकलीं तिन्हीं लोकीं ॥३॥
धर्म अर्थ काम मोक्षही वर्णिले । उपकार केले जगावरी ॥ ४ ॥

---

१ ॐइत्युक्त्वा गणेशोपि बभूव किल लेखकः ।

भारतचंद्राचीं किरणें वेदार्थ । बुद्धि कुमुदांस हर्षविती ॥ ५ ॥
जनहृदयीं तो प्रकाश कोंदला । प्रफुल्लित झाला वासुदेव ॥ ६ ॥

१५

संग्रह तें बीज पौलोम आस्तिक । दृढमूळ देख शोभतसे ॥ १ ॥
संभव विस्तार, नीडें सभा, वन, । विराट उद्यम मज्जा त्याची ॥२॥
भीष्म द्रोण शाखा पल्लव शोभती । सुमनें डोलती कर्णपर्व ॥ ३ ॥
स्त्रीपर्व ऐषिक तेचि रम्य छाया । शांति फल जया सुधेसम ॥४॥
अश्वमेध तोचि जाणा मधुर रस । आश्रमवासिक पार त्याचा ॥५॥
मौसल शाखाग्रें द्विज ते सज्जन । वृक्ष हा विस्तीर्ण भारताचा ॥६॥
पर्जन्य ज्यापरी जीवन भूतांचें । भारत हें साचें तैशापरी ॥ ७ ॥
धर्म पुष्प, सत्य मोक्ष फल तेथ । वासुदेव नित्य राहूं म्हणे ॥ ८ ॥

१६

रचूनियां तें भारत । मुनि पराशर सुत ॥ १ ॥
क्षेत्रीं विचित्रवीर्याचे । जन्म होतां सुपुत्रांचे ॥ २ ॥
गेला तपालागीं वनीं । पुढती संप्रदाय जनीं ॥ ३ ॥
पुत्र सद्गतीतें जातां । कीर्ति जगीं या भारता ॥ ४ ॥
जनमेजयादि विनविती । प्रेमें वैशंपायन कथी ॥ ५ ॥
काय वर्णावी ती कथा । मोद वासुदेव चित्ता ॥ ६ ॥

१७

कुरुवंशाचा विस्तार । गांधारीचा सदाचार ॥ १ ॥
सत्वबुध्दि तो विदुर । तोष कुंतीचा तें धैर्य ॥ २ ॥
वासुदेवाचें महात्म्य । पांडवांचें सत्यप्रेम ॥ ३ ॥
चोविस सहस्र मुख्य ग्रंथ । उपाख्यानें तीं बहुत ॥ ४ ॥
ऐसी लक्ष संख्या झाली । कथा शुकातें पढविली ॥ ५॥
देव पितर गंधर्व । तुष्ट भारतानें सर्व ॥ ६ ॥

एक उणें लक्ष साठ । अन्य लोकींचे ते श्लोक ॥ ७ ॥
सूत म्हणे लक्ष द्यावें । वासुदेवा साह्य व्हावें ॥ ८ ॥

१८

क्रोध-वृक्ष दुर्योधन । अंग वृक्षाचें त्या कर्ण ॥ १ ॥
शकुनी दुःशासन शाखा । विपुल पुष्प फळें देखा ॥ २ ॥
मूढ धृतराष्ट्र नृपाळ । महावृक्षाचें त्या मूळ ॥ ३ ॥
वाढे ऐसा विषवृक्ष । वासुदेव तेथें दक्ष ॥ ४ ॥

१९

धर्म-वृक्ष युधिष्ठिर । पार्थ तयाचें शरीर ॥ १ ॥
भीम नकुल सहदेव । शाखा पुष्प फळें नव ॥ २ ॥
मूळ कृष्ण भगवान । वेद तैसेचि ब्राह्मण ॥ ३ ॥
लागतां ती वृक्ष छाया । धन्य वासुदेव काया ॥ ४ ॥

२०

देश बहुत जिंकिला । पंडु वनामाजि गेला ॥ १ ॥
मृगया करुनी तेथ राहे । परिवारासह पाहें ॥ २ ॥
ऋषि एक मृगरूपी । रमतां वनांत मृगीसी ॥ ३ ॥
वधितां पंडूनें तयाला । मुनि कोपाविष्ट झाला ॥ ४ ॥
नाश होईल स्त्रीसंगें । मुनि बोलला तें रागें ॥ ५ ॥
ऐशा विपत्तींत वनीं । पुत्र झाले सुलक्षणी ॥ ६ ॥
लीला अगाध हरीची । वासुदेव अवलोकी ॥ ७ ॥

२१

यमधर्म वायु इंद्र ते अश्विनी । यांलागीं प्रार्थुनी पुत्र झाले ॥ १ ॥
वाढले सुपुत्र ऋषि सान्निध्यांत । पावतां पंचत्व पंडुराजा ॥ २ ॥
कुंती माद्री दोन्ही माता त्यांलागूनि । सांभाळिती वनिं प्रेमभावें ॥ ३ ॥

---

१, ३० लक्ष देवलोकांत, १५ लक्ष पितृलोकांत, १४ लक्ष गंधर्वलोकांत आणि १ लक्ष मृत्युलोकांत.

हस्तिनापुरासी आणितां त्यां मुनि। रायासी भेटुनी कथिती वृत्त ॥४॥
स्वाधीन नृपाच्या करोनियां मुनि। जाती ते आश्रमीं संतोषानें ॥५॥
सज्जनांसी मोद, संशय तो खळां। कोलाहल झाला तया ठाई ॥६॥
तदा पुष्पवृष्टि दुंदुभीचा नाद। पाहुनी आनंद होई जनां ॥ ७ ॥
सुजन हर्षले आनंद पावोनी। राजपुत्र मनिं निश्चय त्यां ॥ ८ ॥
विद्याभ्यासें पुत्र मान्यता पावती। वासुदेव चित्तीं संतोषला ॥९॥

२२

शुचित्व धर्माचें धैर्य तें भीमाचें। विक्रम पार्थाचे रुचती लोकां ॥१॥
शुश्रूषा गुरूची क्षमा विनयानें। नकुल सहदेवानें मोहियेलें ॥ २ ॥
ऐसे ते पांडव लोकप्रिय झाले। पुढती वाढलें वैर थोर ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे वन्हि हा वैराचा। प्राण सकलांचा हरितसे ॥ ४ ॥

२३

उत्कर्षासहिष्णु कौरव जाहले। वैर तें वाढलें क्षणोक्षणीं ॥ १ ॥
राजसूय नेला सिद्धीसी पार्थानें। श्रीकृष्ण भगवानें कृपा केली ॥ २ ॥
जरासंध चेदि पूर्वींच मारिले। विघ्न दूर केलें नीति बळें ॥ ३ ॥
मयसभा जेव्हां पाही दुर्योधन। जागोजागीं भ्रम होई तया ॥ ४ ॥
भीम हंसे तेव्हां पाहोनी गद्गदां। दुर्योधन क्रोधा सीमा नाहीं ॥५॥
वैराग्नीच्या ज्वाळा द्यूतरूप घेती। कोप येई चित्तीं वासुदेवा ॥ ६ ॥

२४

झाला परिणाम घोर। होई युद्ध अनिवार ॥ १ ॥
अटीतटीचा सामना। साम न रुचेचि मना ॥ २ ॥
दुःशासन शकुनी कर्ण। दुर्योधनाचे ते प्राण ॥ ३ ॥
झाले जेव्हां कासावीस। दुःख तदा धृतराष्ट्रास ॥ ४ ॥
म्हणे संजयालागुनी। आलें पूर्वींच हें मनीं ॥ ५ ॥
जेव्हां मत्स्यवेध केला। कळलें शौर्य तेंचि मला ॥ ६ ॥
केलें सुभद्राहरण। अग्नीलागीं खांडववन ॥ ७ ॥
ऐसे अनेक विक्रम। केला निर्धार ऐकून ॥ ८ ॥
विजयी होतील पांडव। वासुदेव तेथें जय ॥ ९ ॥

२५

ऐषीकास्त्र सोडी अश्वत्थामा जेव्हां। वंश नाश तेव्हां जाणोनियां ॥१॥
ब्रह्मशिरोस्त्रानें केलें निवारण। काढोनियां रत्न दीन केलें ॥ २ ॥
हाय हाय झाला नाश हा शेवटीं। पीळ पडे पोटीं काय करूं ॥ ३ ॥
अठरा अक्षौहिणी वीर ते संपले। प्राण द्यावे आलें मनीं माझ्या ॥४॥
कठिण कठिण पुत्रशोक जनीं। ऐसें येई मनीं संजयाच्या ॥ ५ ॥
नारद कथित चोवीस नृपांचें। वृत्त कथितसे धृतराष्ट्रातें ॥ ६ ॥
धृतराष्ट्रा नको शोक करूं आतां। वासुदेव कथा ऐका म्हणे ॥ ७ ॥

२६

बुद्धि यत्नाहूनि दैव थोर जनीं। राजा हें जाणुनी शांत होई ॥ १ ॥
कालापुढें बल नचले कोणाचें। उत्पत्ति, स्थितीचें कारण तो ॥ २॥
सुख दुःख मान उत्कर्षापकर्ष। कारण सर्वांस काल जाणा ॥ ३ ॥
सर्वदा जागृत कालातें लंघून। जाईल या कोण जगीं सांगा ॥ ४ ॥
कालाचाही काल तो एक श्रीहरि। चिंतितां त्या दुरी व्यथा सर्व ॥५॥
वासुदेव म्हणे कालभय कोणा। चित्तीं नारायणा धरी त्यासी ॥६॥

२७

शोक निमित्त तो अभिमान जाणा। त्यागितां या जना सुख होई ॥१॥
ऐसा बोध करी संजय रायासी। तेणें तो चित्तासी शांति पावे ॥२॥
ज्ञाते सर्वलोकां हेंचि कथिताती। तेंचि या भारतीं सांगितलें ॥३॥
दह्यांमाजी जैसें नवनीत सार। मानवांत विप्र थोर जैसा ॥ ४ ॥
उपनिषदें तीं वेदांमाजी जैसीं। पशूंमाजी जैसी धेनु श्रेष्ठ ॥ ५ ॥
तैसें हें भारत तोलुनी पहातां। वाटते श्रेष्ठता वेदांहूनी ॥ ६ ॥
ग्रंथ अर्थ दोन्ही श्रेष्ठचि एथींचे। फल भावनेचें नित्य जाणा ॥ ७ ॥
प्रपचनें याच्या सकल पुरुषार्थ। श्रवणें आयुष्यवृद्धि पावे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे प्रथम अध्याय। पवित्र हा देह भारताचा ॥ ९ ॥

---o---

## पर्वसंग्रहपर्व

### अध्याय २ रा

२८

सूतपुत्र म्हणे समंतपंचक । कथितों मी वृत्त तुम्हांलागीं ॥ १ ॥
त्रेता द्वापाराच्या पुण्य संधिकालीं । क्षत्रियांसी आली घोर वेळ ॥२॥
जामदग्न्यराम पांच डोह भरी । तर्पणही करी रुधिरानें ॥ ३ ॥
वर मागोनियां तींच क्षेत्रें केलीं । भूमी जी भोंवतालीं पंचक तें ॥४॥
समेतांचा नाश कलियुगारंभीं । समंतपंचकीं याचि झाला ॥ ५ ॥
कारण परत्वें तेंचि पडे नांव । वासुदेव न्याय ऐसा पाही ॥ ६ ॥

२९

अक्षौहिणी संख्या सूत कथितसे । आनंदें ऋषींतें तया वेळीं ॥१॥
एक रथ गज, अश्व तीन जाणा । पांच मानवांना पत्ति नांव ॥ २ ॥
सेना, गुल्म, गण, वाहिनी पृतना । अनीकिनी जाणा त्रिगुणक्रमें ॥ ३ ॥
दहा अनीकिनी तेचि अक्षौहिणी । वासुदेव मानी निश्चय हा ॥ ४ ॥

३०

मृत्युमुखीं गेल्या अठरा अक्षौहिणी । दश दिन भीष्मांनीं युद्ध केलें ॥१॥
पांच दिन द्रोण करिती रक्षण । दिनद्वय कर्ण युद्ध करी ॥ २ ॥
अर्धदिन शल्य दुर्योधन अंतीं । गुरुपुत्रमति रात्रौ भ्रष्ट ॥ ३ ॥
छापा घालोनियां सर्वनाश केला । दुर्लौकिक झाला जगामाजीं ॥४॥
चिरंजीव जनीं, यश अपयश । निवडी सत्यास वासुदेव ॥ ५ ॥

३१

पर्व संग्रह ऐकोनी । कथा आणावी हे ध्यानीं ॥ १ ॥
शुश्रूषा, तें भार्गवभाग्य । जरत्कारूचें दुर्भाग्य ॥ २ ॥
सकल कवींसी आधार । महाभारत हें सार ॥ ३ ॥

---

१ एकत्र झालेल्यांचा.

प्रमुख जाणा आदिपर्व । मूळ कथियेलें सर्व ॥ ४ ॥
सभापर्वी राजसूय । वनपर्व कथामय ॥ ५ ॥
वास अज्ञात विराटीं । उद्योगांत युक्ति मोठी ॥ ६ ॥
गीता भीष्मपर्वी गा ती । वासुदेवाची विश्रांती ॥ ७ ॥

३२

द्रोणपर्वामाजी रौद्ररस वसे । वध अनेकांचे वर्णियेले ॥ १ ॥
कर्ण शल्य पुढें युद्धाची समाप्ति । पुढती भ्रष्टमति सौप्तिकपर्वी ॥ २ ॥
स्त्रीपर्व दुःखाचें शांति तें शमाचें । माहेर धर्माचें अनुशासन ॥ ३ ॥
अश्वमेधपर्वी पापांचा प्रणाश । पुढता आश्रमवास नारदभेटी ॥ ४ ॥
मौसलपर्वात यादवांचा नाश । महाप्रस्थानिक प्रस्थान तें ॥ ५ ॥
स्वर्गारोहणीं ते स्वर्गती धर्माची । वासुदेव चित्तीं संतोषला ॥ ६ ॥

३३

हरिवंशपर्व खिलपर्वी जाण । भविष्य कथन तेंवि केलें ॥ १ ॥
भारत पिकाचें मंजुळ हें गीत । रुचेल तो शब्द अन्य केंवि ॥ २ ॥
आचरावा धर्म निष्ठा ठेऊनियां । न जाईच वांयां कदाकाळीं ॥ ३ ॥
परलोकीं बंधु तो एक होईल । द्रव्य तें संपेल कांता पुत्र ॥ ४ ॥
अलंकारयुतशतधेनुदान । पुण्य हें श्रवण करितां जोडे ॥ ५ ॥
शाश्वतसुखाची लागलिया गोडी । सकल चिंता सोडी वासुदेव ॥ ६ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक २५४२७ वि: ९/५५
क्रमांक ७७३८ नों: दि ३०/५/५४

## पौष्यपर्व ३
### अध्याय ३ रा

३४

श्रुत, उग्र, भीम जनमेजय भ्राते । सरमासुतातें ताडिती पैं ॥ १ ॥
रूदन करित पुत्र ये जवळी । देवशुनि सत्रीं जाई मग ॥ २ ॥
कारण पुशितां कोणिही न बोले । शापूनियां केलें कंपित तें ॥ ३ ॥

१ श्रुतसेन, उग्रसेन व भीमसेन. २ देवांची कुत्री.

येईल अकाळीं विघ्न तुम्हांवरी । राव तो अंतरीं खिन्न झाला ॥४॥
जावोनियां राव हस्तिनापुरासी । तपस्वी विप्रासी शोधितसे ॥५॥
पुरोहित लाभो विघ्नविनाशक । निःशंक मनांत वासुदेव ॥ ६ ॥

३५

राव जनमेजय वनामाजी येई । अश्रमांत पाही श्रुतश्रवा ॥ १ ॥
सोमश्रवा त्याचा सुत तपोनिष्ठ । होवो म्हणे श्रेष्ठ पुरोहित ॥ २ ॥
पितृआज्ञा घेई ऐसें तो बोलतां । राव जोडी हाता पित्यालागीं ॥३॥
सर्पिणी तनय असे माझा सुत । असे एक व्रत थोर त्याचें ॥ ४ ॥
विप्र इच्छा करी पूर्ण हा सर्वदा । सामर्थ्य संपदा थोर याची ॥५॥
शंकरावांचोनी शाप हा सर्वांचे । दूर करी साचे क्षणामाजी ॥ ६ ॥
मान्य तें वचन करी जनमेजय । वासुदेव पाय धरी त्याचे ॥ ७ ॥

३६

सोमश्रवा पुरोहित । येई घेवोनियां नृप ॥ १ ॥
वृत्त कथूनी बंधूसी । म्हणे आज्ञा पाळा याची ॥ २ ॥
ऐसें सांगूनियां गेला । तक्षशिला नगरीला ॥ ३ ॥
जिंकूनियां ती नगरी । राव परते मंदिरीं । ॥ ४ ॥
वर्णधर्माचा प्रभाव । जाणे चित्तीं वासुदेव ॥ ५ ॥

३७

याच समयीं धौम्य मुनि । राहियेला एक्यावनीं ॥ १ ॥
पिता तयाचा अपोद । तेणें धौम्य तो आपोद ॥ २ ॥
करी अपोद जलपान । तेंचि निर्वाह साधन ॥ ३ ॥
आपोदाचे तीन शिष्य । आरुणी उपमन्यु वेद ॥ ४ ॥
आरुणीस म्हणे मुनि । जल जातसे वाहूनी ॥ ५ ॥
करीं रक्षण शेताचें । अडवीं उदक तेथिचें ॥ ६ ॥
करोनियां आज्ञा मान्य । शिष्य करी बहु यत्न ॥ ७ ॥
अंतीं स्वयेंचि निदेला । रुद्ध करण्यासी उदकाला ॥ ८ ॥
हर्ष चित्तीं वासुदेवा । नित्य यशाचा हा ठेवा ॥ ९

३८

गुरु द्रवले अंतरीं । स्वयें येती तया स्थळीं ॥ १ ॥
येवोनियां संबोधितां । उठूनियां वंदी पदां ॥ २ ॥
बांध फोडोनियां येतां । मोद सद्गुरूच्या चित्ता ॥ ३ ॥
उद्दालक नाम त्यासी । ठेवुनि आशीर्वाद देती ॥ ४ ॥
सहज स्फुरती तया वेद । वासुदेवासी आनंद ॥ ५ ॥

३९

म्हणती उपमन्यूसी धौम्य । करीं धेनूचें रक्षण ॥ १ ॥
करी पालन आज्ञेचें । चरण वंदी श्रीगुरूचे ॥ २ ॥
धेनु नेई प्रातःकाळीं । आणीतसे सायंकाळीं ॥ ३ ॥
पुशितां कायरे भक्षिसी । म्हणे मागतों भिक्षेसी ॥ ४ ॥
मज अर्पिल्या वांचून । कांरे भक्षितोसी अन्न ॥ ५ ॥
ऐसें श्रीगुरु बोलतां । मागे दोन वेळ भिक्षा ॥ ६ ॥
गुरु करिती प्रतिबंध । शिष्य प्राशन करी दुग्ध ॥ ७ ॥
पुढती वत्समुखफेन । राही संतोषें सेवून ॥ ८ ॥
गुरु आज्ञेचा जो दास । वासुदेव वंदी त्यास ॥ ९ ॥

४०

वृत्त कळतां म्हणती धौम्य । नव्हे योग्य ऐसें कर्म ॥ १ ॥
प्रेमें टाकिति अधिक फेंस । तेणें उपोषित वत्स ॥ २ ॥
ऐसें न करींरे बाळा । दोष सर्वथा तुजला ॥ ३ ॥
गुरुवचन मान्य करी । राही अर्कपत्रांवरी ॥ ४ ॥
हाय पुढती अंध झाला । कूपीं पतन पावला ॥ ५ ॥
सत्यपरीक्षेची वेळ । वासुदेव कथी खेळ ॥ ६ ॥

४१

सायंकाळीं बाळ न दिसे गुरूसी । करोनी चौकशी वनीं गेले ॥ १ ॥
वत्सा उपमन्यो येईं बा सत्वरीं । ऐशा हांका मारी धौम्यमुनि ॥ २ ॥
ऐकोनी ओरडे बाळ कूपांतूनि । गुरूसी वंदूनी वृत्त कथी ॥ ३ ॥

गुरु म्हणे बाळा अश्विनीकुमार। देतील ते नेत्र पार्थी तयां ॥ ४ ॥
गुरुवचनें तो करितो प्रार्थना। वासुदेव जना प्रार्थीतसे ॥ ५ ॥

४२

सद्रूप ब्रह्मयाचें रूप तुम्ही देवा। अद्वैताचा ठेवा द्यावा मज ॥ १ ॥
संसार भयाची करावी निवृत्ति। रज्जुसर्पभ्रांति घालवोनी ॥ २ ॥
दिनरजनीचें वस्त्र तें विणोनी। कालप्रवर्तनी दक्ष तुम्ही ॥ ३ ॥
कालचक्रांतूनी मुक्त करा मज। स्थिति ती सहज प्राप्त होवो ॥४॥
मूढजन होती इंद्रियकिंकर। सत्वरि उद्धार करीं त्यांचा ॥ ५ ॥
कूपामाजी मज होवोनी आधार। करावा उद्धार बालकाचा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सदय देवांसी। करुणा भक्तांची कां न येई ॥ ७ ॥

४३

आले प्रसन्न चित्तानें। देती अपूप प्रेमानें ॥ १ ॥
बाळ म्हणे आज्ञेविना। देवा कांहीं मीं भक्षींना ॥ २ ॥
देव म्हणती पूर्वी देतां। गुरु जाहला भक्षिता ॥ ३ ॥
बाळ म्हणे मजसी वंद्य। जरी कर्म त्यांचें निंद्य ॥ ४ ॥
पाहोनी ही गुरूभक्ति। देव संतोषले चित्तीं ॥ ५ ॥
दिले दंत सुवर्णाचे। नेत्र कमलासारिखे ॥ ६ ॥
सर्वविद्यालाभ झाला। वासुदेव वंदी त्याला ॥ ७ ॥

४४

शिष्य तो तिसरा वेद नाम ज्याचें। फळ शुश्रूषेचें लाभे त्यासी ॥१॥
गुरु नांगरासी जुंपितां तयासी। साहे तो द्वंद्वासी आनंदानें ॥ २ ॥
अवज्ञा गुरूची न करी सर्वथा। सद्गुरूच्या चित्ता दया येई ॥ ३ ॥
अर्पोनियां विद्या धाडिलें गृहासी। भाग्य थोर त्यासी प्राप्त होई ॥४॥
वासुदेव म्हणे सेवा सद्गुरूची। चढवी भाग्यासी मानवातें ॥ ५ ॥

४५

वेद ठेवी शिष्य तीन। लवही देईना त्यां श्रम ॥ १ ॥
पूर्वस्मरणें राहे सदा। मानी शिष्य हे संपदा ॥ २ ॥

जनमेजय पौष्य येती। यज्ञ कार्यार्थ विनविती ॥ ३ ॥
सकल कार्य उत्तंकासी। सांगूनियां गुरु जाती ॥ ४ ॥
स्त्रिया अकार्य कथिती। उत्तंकाची दृढमती ॥ ५ ॥
महापातक तें टाळी। पुढती गुरुकृपा झाली ॥ ६ ॥
प्रेमें वासुदेव म्हणे। धैर्ये धर्म हा राखणें ॥ ७ ॥

४६

शिके दक्षिणा न देतां। तया यश न सर्वथा ॥ १ ॥
धर्म्य दक्षिणा न घेई। दोष त्याचे माथां येई ॥ २ ॥
ऐसा निर्बंध मोडितां। मृत्यु दोहोंमाजी एका ॥ ३ ॥
ऐसें जाणुनी उत्तंक। विनवी सद्गुरूसी देख ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे श्रम। व्यर्थ घेई तो अधम ॥ ५ ॥

४७

गुरु म्हणे मज इच्छा नसे कांहीं। मागे तरी देई कांतेलागीं ॥ १ ॥
गुरुपत्नि म्हणे कुंडलें प्रीतीचीं। पौष्याच्या राणीचीं द्यावीं मज ॥२॥
चतुर्थदिनीं त्या पुण्यकव्रतातें। वाढिन विप्रांतें लेऊनी तीं ॥ ३ ॥
गुरुकार्यास्तव ऐकुनी उत्तंक। पौष्यनगरमार्ग क्रमीतसे ॥ ४ ॥
उत्तंकासी मार्गी वृषभारूढ कोणी। म्हणे जा भक्षुनी गोमयातें ॥५॥
गुरूनेंहि तुझ्या पूर्वी भक्षियेलें। ऐकुनी सेविलें उत्तंकानें ॥ ६ ॥
उभ्यां उभ्यां तेथें केलें आचमन। नृपाचें सदन गांठियेलें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे चुकूं नये धर्म। कर्माचें तें वर्म विधि जाण ॥ ८ ॥

४८

पौष्य नृपालागीं म्हणे मी याचक। वेदमुनि देख गुरु माझा ॥ १ ॥
राव नम्रभावें म्हणे सेवा सांगें। अथवा जें मागें मनीं तुझ्या ॥ २ ॥
कुंडलें राणीचीं देई मजप्रती। राव म्हणे तिसी मागें जाई ॥ ३ ॥
अंतःपुरीं जातां न दिसेचि राणी। मुनि म्हणे वाणी मिथ्या राया ॥४॥
उच्छिष्ट मुखानें पातलासी काय। म्हणतां हें राव, स्मरलें त्यासी ॥५॥
अशुद्ध नरासी न दिसे महिषी। पुण्यवंत सती विख्यात ते ॥ ६ ॥

पुनरपि केलें आचमन शुद्ध । राणी तैं प्रगट जाहलीसे ॥ ७ ॥
अर्पूनी कुंडलें म्हणे रक्षीं यासी । तक्षक अपेक्षी कुंडलें हीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे होणारें चुकेना । अतर्क्य घटना घडुनी येई ॥ ९ ॥

४९

सत्पात्र अतिथि लाभला सहज । श्राद्धतिथि आज पौष्य म्हणे ॥१॥
उत्तंक बोलला त्वरिताचि वाढीं । केली पात्रसिद्धि तात्काळचि ॥२॥
अपवित्र अन्न पाहुनी उत्तंक । म्हणे नृपा ' अंध होई ' क्रोधें ॥ ३ ॥
निरपत्य होई क्रोधें राव म्हणे । अपराधाविणें शापिसी कां ॥ ४ ॥
सकेश तैं अन्न दाविलें नृपातें । पाहूनियां खेदें क्षमा मागे ॥ ५ ॥
सदय मुनींद्र शाप मागें घेई । नृपाळ न घेई शाप मागें ॥ ६ ॥
राव म्हणे तीक्ष्ण शस्त्रधारेसम । क्षत्रियाचें मन, वाणी गोड ॥ ७ ॥
वाचा ती प्रखर कोमल अंतर । राहे निरंतर ब्राह्मणाचें ॥ ८ ॥
शाप कैंवि घेऊं माघारा मुनींद्रा । मुनी म्हणे भद्रा होवो व्यर्थ ॥ ९ ॥
ऐसें बोलोनियां उत्तंक निघाला । विस्मय वाटला वासुदेवा ॥ १० ॥

५०

वस्त्रहीन भिक्षु मागोमाग येई । अदृश्याचि होई क्षणामाजी ॥ १ ॥
कुंडलें ठेवोनी उदकासि जातां । भिक्षूचिया हाता लागलीं तीं ॥२॥
गुरुस्मरणानें पाठलाग केला । प्रगट जाहला तक्षक तो ॥ ३ ॥
वचन राणीचें आठवे मुनीसी । तैंचि पाताळासी गेला नाग ॥ ४ ॥
मुनीयष्टीमाजी येई वज्रबळ । संकटीं त्या इंद्र साह्य होतां ॥ ५ ॥
खोदूनियां बीळ पाताळांत गेला । तेथ पाहियेला नागलोक ॥ ६ ॥
स्तवूनि नागांसी संतुष्ट तैं केलें । लाभोत कुंडलें म्हणे मज ॥ ७ ॥
परी कुंडलांची नच होई प्राप्ति । चिंता मानसासी उत्तंकाच्या ॥८॥
श्वेतकृष्ण तंतु विणितां देखिल्या । सपरिवार स्त्रिया दोन तेणें ॥ ९ ॥
दिव्य कांतिमान पुरुष, अश्वहि । पाहूनियां स्तवि मुनि तयां ॥१०॥

५१

दिव्य पुरुष तोषला । अश्व मुनीसी दाविला ॥ १ ॥
गुदद्वारीं फुंक मारी । म्हणे कामना ती पुरी ॥ २ ॥

अहो घडला चमत्कार। भरला नागलोकीं धूर ॥ ३ ॥
आला शरण तक्षक। घेउनि कुंडलें करांत ॥ ४ ॥
अश्वावरी मुनि बैसे। क्षणीं आश्रमीं प्रवेशे ॥ ५ ॥
त्याच दिवशीं होतें व्रत। गुरुपत्नि होती क्रुद्ध ॥ ६ ॥
पाहूनियां उत्तंकासी। देई आशीर्वाद त्यासी ॥ ७ ॥
अणिमादि सिद्धि अर्पी। वासुदेव हर्षे चित्तीं ॥ ८ ॥

५२

मार्गस्थ वृत्तांत कथूनियां शिष्य। म्हणे मज साह्य कोण झालें ॥१॥
उत्तंकासी वेद म्हणे ऐक शिष्या। साह्य मित्र माझा इंद्र तुज ॥ २ ॥
धाता विधाता त्या दोन स्त्रिया जाण। रजनी आणि दिन तंतु दोन्ही ॥
द्वादश आरांचें चक्र संवत्सर। ऋतु ते कुमार सहा जाण ॥ ४ ॥
पुरुष पर्जन्य अग्नि तोचि अश्व। ऐकतां आश्चर्य शिष्यालागीं ॥ ५ ॥
वृष ऐरावत पुरुष तो इंद्र। अमृताचा लाभ गोमय तें ॥ ६ ॥
ऐसा मित्र माझा साह्य तुज झाला। नागलोकीं केला पूर्ण हेतु ॥७॥
नम्रभावें तदा अनुज्ञा घेवूनि। उत्तंक निघूनि जाई गृहीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे गुरुकृपा जरी। तरीच व्यवहारीं यश लाभे ॥ ९ ॥

५३

आज्ञा घेऊनियां उत्तंक निघाला। त्वरित भेटला जनमेजया ॥१॥
म्हणे पृथ्वीपते असावें कल्याण। कार्य विस्मरण कैसें तुज ॥ २ ॥
तक्षकानें प्राण घेतला पित्याचा। करावा तयाचा नाश वेगें ॥ ३ ॥
प्रदीप्त वन्हींत जाळावें तयासी। सर्पांच्या सत्रासी आरंभावें ॥ ४ ॥
पित्याचा सत्कार होईल त्या योगें। हेतु पूर्ण माझे होती तेणें ॥५॥
पितृवधवृत्त पुसोनि मंत्र्यांतें। क्रोध अंतरातें नृपाळाच्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे थोर साह्य जाण। दुष्टनिर्दळणकार्य व्हावें ॥ ७ ॥

---

# पौलोमपर्व ४

## अध्याय ४ था

### ५४

सौति पुराणिक कुशल तो वक्ता । शौनकाच्या सत्रामाजी जाई ॥१॥
वंदूनि ऋषींसी म्हण काय कथा । कथावी तें सांगा मजलागीं ॥२॥
मुनि म्हणती सूता येतिल शौनक । सांगतील तुज तेंचि कथीं ॥३॥
मान्य करी सूत तोंचि येती मुनि । कर्म उरकोनी यथाविधि ॥४॥
वासुदेव म्हणे अध्याय संपला । कथिती सूताला शौनक पुढें ॥५॥

## अध्याय ५ वा

### ५५

भृगुकुलदीप शौनक सूतातें । म्हणे त्या भृगूचें वृत्त कथीं ॥ १ ॥
भार्गवाचें वृत्त सूत कथी ऐका । सुत तो ब्रह्मयाचा भृगुऋषि ॥२॥
अग्नीपासूनियां वरुण यज्ञांत । जाहला वृत्तांत ऐसा असे ॥ ३ ॥
भृगुलागीं पुत्र च्यवनभार्गव । प्रमती त्या पुत्र सुकन्येचा ॥ ४ ॥
प्रमती–घृताची पुत्र रुरु जाणा । शुनक शहाणा पुत्र त्याचा ॥ ५ ॥
हित मित शुद्ध आहार तयाचा। लौकिकहि साचा थोर जनीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मुनि तो यशस्वी । संयमी तपस्वी ब्रह्मवेत्ता ॥ ७ ॥

### ५६

पुलोमा भृगूची कांता साध्वी सती । होती गर्भवती एकेकाळीं ॥१॥
स्नानार्थ बाहेरी गेले भृगुऋषि । पुलोमा दैत्यासी काम बाधे ॥ २ ॥
शिरतां आश्रमीं अतिथि मानोनी । सत्कारितां मनीं संतोषला ॥३॥
बालपणीं पिता बोलला रडतां । ' नेई ये राक्षसा ' पुलोमेसी ॥ ४ ॥
आश्रमासान्निध पुलोमा तैं होता । भार्या ते तत्वतां मानियेली ॥ ५ ॥

हें नांव मुनिपत्नीचें व दैत्याचेंहि होतें.

पुढती पित्यानें भृगुलागीं दिली । हरूं योग्य वेळीं चिंती दैत्य ॥ ६ ॥
सहज शब्दाचा लाभ घेती दुष्ट । मानी बहु कष्ट वासुदेव ॥ ७ ॥

५७

भृगुऋषि जातां स्नाना । येई आश्रमीं पुलोमा ॥ १ ॥
पुशी राक्षस अग्नीसी । कांता सांगा ही कोणाची ॥ २ ॥
मिथ्यावादी हिचा पिता । सांग सत्य जें सर्वथा ॥ ३ ॥
अग्नि राहिला तटस्थ । भय त्याच्या अंतरास ॥ ४ ॥
म्हणे राक्षस हरीन । बोलें निर्णय वचन ॥ ५ ॥
अग्नि सचिंत जाहला । भय ऋषीचें त्याजला ॥ ६ ॥
विधियुक्त केलें दान । पती भृगुऋषि जाण ॥ ७ ॥
सत्य बोले अग्निदेव । वासुदेव तो निर्भय ॥ ८ ॥

अध्याय ६ वा

५८

पुढती रूप वराहाचें । धरुनी हरी पुलोमेतें ॥ १ ॥
भयें गर्भ पतन होई । तेजस्वी तो च्यवन पाही ॥ २ ॥
तया तेजें दग्ध दैत्य । माता निघे आश्रमास ॥ ३ ॥
मार्गी येवोनियां ब्रह्मा । शांत करी तिच्या मना ॥ ४ ॥
अश्रु नेत्रींचे वाहती । ‘ वधूसरा ’ होई नदी ॥ ५ ॥
येतां आश्रमीं ते सती । भृगु वृत्त पुशिताती ॥ ६ ॥
जेणें कथिलें मम नातें । शाप देईन मी त्यातें ॥ ७ ॥
अग्नि कारण जाणोनी । सर्व भक्षीं वदती मुनी ॥ ८ ॥
वासुदेव चिंतीतसे । क्रोध नावरे थोरांतें ॥ ९ ॥

अध्याय ७ वा

५९

क्रोधें अग्निदेव बोलला भृगूसी । कां रे शापिलेंसी व्यर्थ मज ॥ १ ॥
असत्य कथनें दोष पूर्वजांस । न कथितां त्यास तोचि दोष ॥ २ ॥

तुज शाप देणें अशक्य न मातें। परी मी विप्रांतें पूज्य मानी ॥ ३ ॥
देव पितरांचें मीचि मुख जाण। सर्वही भक्षून कैसा राहूं ॥ ४ ॥
ऐसें बोलूनियां शांत झाला अग्नि। यज्ञक्रिया जनीं केंवि होती ॥५॥
वासुदेव म्हणे क्रुद्ध होतां एक। आपत्ती समस्त भोगिताती ॥ ६ ॥

६०

ऋषींसह देव ब्रह्मयासी विनविती। पाचारी अग्नीसी ब्रह्मदेव ॥ १ ॥
ब्रह्मा म्हणे देवा पवित्र तूं सदा। अगा जातवेदा नारायणा ॥ २ ॥
अपान ज्वाला तें सर्व भक्षितील। शुद्धचि राहील रूप तुझें ॥ ३ ॥
अपवित्र कांहीं न राहे सर्वथा। अभक्ष्य भक्षितां शुद्ध होय ॥ ४ ॥
क्रव्यादा[1] तनू तें भक्षील अशुद्ध। सन्मुनीचा शब्द सत्य होवो ॥ ५ ॥
ऐसें सांगूनियां ब्रह्मदेव गेला। अग्निलाभ झाला सर्व लोकां ॥ ६ ॥
भृगूचें हें वृत्त कथिलें सौतीनें। वासुदेव प्रेमें कथन करी ॥ ७ ॥

अध्याय ८ वा

६१

स्थूलकेश नामें महातपोधन। आचरी दारुण तप वनीं ॥ १ ॥
विश्वावसूनामें गंधर्वापासोनी। मेनका गर्भिणी होती तेव्हां ॥ २ ॥
मेनका निर्दय निर्लज्ज अंतरीं। गर्भ नदीतीरीं ठेवीतसे ॥ ३ ॥
आश्रमासन्निध पाहुनी कन्येसी। सदय मुनीसी दया आली ॥ ४ ॥
प्रेमभरें तिचें संगोपन केलें। नांव ठेवियेलें प्रमद्वरा ॥ ५ ॥
प्रमती सुपुत्र सुकन्या–च्यवनां। तयालागीं जाणा पुत्र रुरु ॥ ६ ॥
कन्येतें उपवर रुरूनें पाहिली। आपणा चिंतिली वधु तेणें ॥ ७ ॥
दैवयोग परी विचित्रचि होता। वासुदेव चित्ता नवल वाटे ॥ ८ ॥

६२

खेळ खेळतां सुंदरी। पडे पाय सर्पावरी ॥ १ ॥
दंश करितां तो क्रूर। प्राण सोडिती शरीर ॥ २ ॥
कठ उद्दालक श्वेत। मुनि धांवुनि येती तेथ ॥ ३ ॥

१ मनुष्यादिकांच्या अमेध्य मांसाचें भक्षण करणारी.

प्रेत पहाती बापुडे । कित्येकांसी येई रडें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे रुरु । आतां म्हणे काय करूं ॥ ५ ॥

अध्याय ९ वा

६३

रुरु करोनी आक्रोश । पुण्य लावितो पणास ॥ १ ॥
देवदूत एक त्याला । म्हणे न करीं शोकाला ॥ २ ॥
ज्याचें संपलें आयुष्य । पुनरपि तो अप्राप्य ॥ ३ ॥
अर्धे वय नरवरा । देतां लाभे प्रमद्वरा ॥ ४ ॥
रुरूलागीं होतां मान्य । यमधर्मासी सांगून ॥ ५ ॥
उठविली प्रमद्वरा । हर्ष रुरूच्या अंतरा ॥ ६ ॥
काय विचित्र हें दैव । पहा म्हणे वासुदेव ॥ ७ ॥

६४

मुहूर्त पाहिला जो पूर्वाफाल्गुनी । विवाह त्या दिनीं होई त्यांचा ।१।
कमलनयना सुकुमार कन्या । लाभली वरेण्या रुरूलागीं ॥ २ ॥
तदा प्रभृति तो सर्पांवरी क्रुद्ध । होवोनियां नित्य दंडधारी ॥ ३ ॥
ऐसा सर्पवध बहुताचि केला । डुंडुभ[1] देखिला वनामाजी ॥ ४ ॥
कालदंडासम दंड उगारिला । डुंडुभ बोलला तयालागीं ॥ ५ ॥
कांरे निरागसा-मज मारितोसी । हिंसा करितोसी कांरे व्यर्थ ॥६॥
वासुदेव म्हणे स्वभाव आरसा । पूर्वानुभवांचा वाटे लोकीं ॥ ७ ॥

अध्याय १० वा

६५

रुरु कथी वृत्त सकळ कांतेचें । वैर तें सर्पांचें म्हणे मज ॥ १ ॥
निर्विष मी सर्प बोलला डुंडुभ । काय अपराध माझा सांगें ॥ २ ॥
मंडुक भक्षूनी राहतों जळांत । आणीं हें मनांत धर्मज्ञ तूं ॥ ३ ॥

---

१ निरुपद्रवी दुतोंड्या साप

रुरु म्हणे मनीं शापग्रस्त कोणी । असावा हा मुनि मज वाटे ॥४॥
वृत्त पुशितांचि म्हणे 'सहस्रपात'। मुनी मीं शापांत सांपडलों ॥५॥
कां रे किती दिन क्लेश हे, विचारी । वासुदेव हरि स्मरे मनीं ॥ ६ ॥

अध्याय ११ वा

६६

खगम नांवाचा विप्र मित्र माझा । प्रखर वाणीचा तपस्वी तो ॥ १ ॥
बालपणीं तृणसर्प करूनियां । भिवविलें तया विप्रालागीं ॥ २ ॥
मूर्छा जावोनियां सावध तो होतां । क्रोधें शापवाचा बोले मज॥३॥
तेणें मी राहिलों डुंडुभ होवोनी । रुरो उद्धरोनी नेई मज ॥ ४ ॥
पूर्वरूप घेई विप्र तो आनंदें । वासुदेव मोदें वंदी तया॥ ५ ॥

६७

विप्र बोलला रुरूसी । ऐकें बोधवाणी माझी ॥ १ ॥
धर्मामाजी उत्तम धर्म । अहिंसा हें जाणे वर्म ॥ २ ॥
मुख्य धर्म ब्राह्मणाचा । करूं नये प्राणिहिंसा ॥ ३ ॥
क्षमा सत्य तैं स्वाध्याय । ब्राह्मणांचा यांत जय ॥ ४ ॥
मुख्य क्षत्रियाचा धर्म । व्हावें प्रजेचें रक्षण ॥ ५ ॥
जनमेजयाच्या सत्रांत । सर्पां रक्षितो आस्तीक ॥ ६ ॥
कथि रुरूसी भूदेव । तेंचि गातो वासुदेव ॥ ७ ॥

अध्याय १२ वा

६८

रुरु वंदूनी विप्रासी । पुशि आस्तीक वृत्तासी ॥ १ ॥
येरु बोलला रुरूतें । विप्र कथितील तूतें ॥ २ ॥
ऐसें बोलुनि गुप्त झाला । रुरु शोधितसे त्याला ॥ ३ ॥
अंतीं पावला आश्रमीं । प्रमती पित्यालागीं नमीं ॥ ४ ॥
कथिली तेणें आस्तीक कथा । वासुदेव सांगे आतां ॥ ५ ॥

———×———

## आस्तीकपर्व ५

### अध्याय १३ वा

६९

सूतालागीं म्हणे आदरें शौनक । सर्पसत्रवृत्त कथीं मज ॥ १ ॥
आस्तीकाची कथा कथावी संपूर्ण । ऐकूनियां मन हर्ष पावे ॥ २ ॥
व्यासकृपेचें हें आख्यान ऐकावें । सौति म्हणे जावें उद्धरूनी ॥ ३ ॥
जरत्कारु पिता आस्तीकाचा जाण । विधात्यासमान समर्थ तो ॥४॥
ऊर्ध्वरेता तैसा यायावर[1] श्रेष्ठ । तपस्वी वरिष्ठ हिंडे जनीं ॥ ५ ॥
असामान्य व्रतें आचरी तो नित्य । जिंकिलें वायूस, विषयभोगां ॥६॥
निद्राही जिंकिली पत्र पुष्प भक्षी । नित्य हें संरक्षी व्रत जाण ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे निष्ठावंतालागीं । अशक्य या जगीं कांहीं नसे ॥८॥

७०

हिंडतां तो अवनीवरी । पितर देखियेले दुरी ॥ १ ॥
गर्तेमाजी ते लोंबती । ऊर्ध्व चरण अधोमुखी ॥ २ ॥
अंतरांत दया आली । म्हणे कोण हो या स्थळीं ॥ ३ ॥
कालमूषक भक्षित । तृणस्तंबाचि[2] आश्रय येथ ॥ ४ ॥
म्हणती असूनी सनाथ । आजी जाहलों अनाथ ॥ ५ ॥
पुत्र जरत्कारु वंशीं । एक आधार आम्हासी ॥ ६ ॥
नाहीं संतति तयासी । पतन तेणें हें आम्हासी ॥ ७ ॥
सदयता आम्हासम । वृत्त पुशिसी तूं कोण ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे बोध । सहज होई जरी योग ॥ ९ ॥

७१

पुत्र जरत्कारु तुमचा मीच भाग्यहीन ॥
पूर्वज पितामह तुम्ही कांहो झालां दीन ॥ १ ॥
उद्धारार्थ तुमच्या सांगा काय मी करावें ॥
हर्ष पूर्वजांसी होई ऐकुनी स्वभावें ॥ २ ॥

---

१ ग्रामांत एक रात्र राहाणारा. २ वेळूचें बेट.

वंशवृद्धिसाठीं अपुल्या यत्न करीं बाळा ॥
पुत्रवंताची ते गति लाभेना कोणाला ॥ ३ ॥
स्वयें धर्मास्तव किंवा आज्ञा मानूनियां ॥
पुत्रलाभ व्हावा ऐसी धरावी कामना ॥ ४ ॥
जरत्कारु पूर्वजांचा हेतु आणि ध्यानीं ॥
वासुदेव म्हणे. धन्य पूर्वजाभिमानी ॥ ५ ॥

७२

नाहीं लालसा मनांत । सौख्य नसे प्रपंचांत ॥ १ ॥
जरी माझिया नांवाची । पत्नि लाभे शीलवती ॥ २ ॥
कोणी अर्पितां सौख्यानें । स्वीकारीन आनंदानें ॥ ३ ॥
कोण अर्पील कन्येसी । मज अकिंचनाप्रती ॥ ४ ॥
सकलव्रतत्यागाविण । आश्रमातें स्वीकारीन ॥ ५ ॥
पुत्रलाभ होतां थोर । तुमचा करील उद्धार ॥ ६ ॥
वासुदेव सांगे चित्ता । कठिण राखणें निजनिष्ठा ॥ ७ ॥

अध्याय १४ वा.

७३

कन्येसाठीं हिंडे मुनि ही अवनी । पुढें एक्यावनीं पातला तो ॥ १ ॥
कन्येची हो भिक्षा मज कोणी घाला । वनांत बोलला तीन वेळां ॥२॥
वासुकी पातला घेवोनी भगिनी । नांव विचारूनि स्तब्ध राही ॥ ३ ॥
नाम जरत्कारु ऐकुनी हर्षला । विवाह जाहला उभयांचा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे कैसा योग आला । हेतु पूर्ण झाला हरिकृपा ॥ ५ ॥

अध्याय १५ वा.

७४

शापमुक्तीसाठीं भगिनी दिधली । पुढती जाहली पुत्रवती ॥ १ ॥
पुत्र तो आस्तीक तपस्वी महात्मा । जाई स्वयें यज्ञा सर्पसत्रीं ॥ २ ॥

मातुलादिकांसी सोडविलें तेणें । ऋणत्रय प्रेमें फेडियेलें ॥ ३ ॥
जरत्कारु एसा उध्दरूनि गला । कथा ही जनांला पुण्यदाई ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सौति अन्य कथा । कोणती ते आतां सांगूं म्हणे ॥५॥

## अध्याय १६ वा.

### ७५

सूतपुत्रालागीं बोलले शौनक । रसाळ ते देख वाणी तुझी ॥ १ ॥
आस्तीकाची कथा सांगें सविस्तर । तोषवीं अंतर पित्यासम ॥ २ ॥
सौति म्हणे पूर्वी सत्ययुगामाजी । प्रजापतीलागीं कन्या दोन ॥ ३ ॥
कद्रू ते विनता कश्यपासी दिल्या । मागावें वराला म्हणे त्यांसी ॥४॥
कद्रू म्हणे व्हावे सहस्र नाग बळी । विनता महाबळी पुत्र मागे ॥५॥
तथास्तु म्हणोनी तोषवोनी तयां । जाई मुनीराया तपालागीं ॥६॥
वासुदेव म्हणे ऋषींचें वचन । जाणावें प्रमाण सर्वकाळ ॥ ७ ॥

### ७६

दिन लोटतां बहुत । विनताकद्रूंसी आनंद ॥ १ ॥
कद्रू अंडीं सहस्र घाली । विनतेसी दोन झालीं ॥ २ ॥
ऐसीं वर्षशतें पांच । उबविलीं तीं उबेंत ॥ ३ ॥
कद्रूलागीं सहस्र नाग । विनता लाजली सहज ॥ ४ ॥
अंडें घाईनें फोडिलें । अर्ध शरीर पाहिलें ॥ ५ ॥
क्रुध्द जाहला बालक । 'होई दासी' देई शाप ॥ ६ ॥
वर्षें पांचशत जनीं । कद्रू होईल स्वामिनी ॥ ७ ॥
अव्यंग हा द्वितीय पुत्र । होतां तुजसी स्वातंत्र्य ॥ ८ ॥
ऐसें अरुण बोलला । अंतरिक्षामाजी गेला ॥ ९ ॥
झाला सूर्याचा सारथी । दिसे आपणा प्रभातीं ॥ १० ॥
वासुदेव म्हणे घाई । कार्यामाजी चालत नाहीं ॥ ११ ॥

७७

योग्य समय पुढती येतां । पाही सुपुत्र विनता ॥ १ ॥
सर्पभक्षक गरुड । गेला नभीं पक्षिराज ॥ २ ॥
त्यासी क्षुधेनें पीडिलें । अन्न ब्रह्म्यानें निर्मिलें ॥ ३ ॥
भक्षणार्थ सोडुनि जातां । पाही विस्मयानें माता ॥ ४ ॥
म्हणे वासुदेव वेळ । चुकविणें नसे खेळ ॥ ५ ॥

अध्याय १७ वा

७८

उच्चैःश्रवा अश्व पाहिला दोघींनीं । समुद्रमंथनीं प्राप्ति ज्याची ॥१॥
दिव्य सुलक्षणी नित्य युवा जाणा । वंद्य तो देवांना पूजिती ते ॥ २ ॥
सूता मंथन तें केव्हां कोठें झालें । शौनक बोलले विस्मयानें ॥ ३ ॥
अप्रमेय मेरुपर्वतशिखरीं । बैसले विचारीं देव सर्व ॥ ४ ॥
अमृताचा लाभ कैसा होई आम्हां । देवांलागीं ब्रह्मा सांगतसे ॥ ५ ॥
वनस्पति रत्नें घालूनी सागर । मंथूनियां सार काढा त्याचें ॥ ६ ॥
देव दानवांसी पीयूष लाभेल । वदला हे बोल नारायण ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसे महा यत्न । करील तो जाण धन्य लोकीं ॥ ८ ॥

अध्याय १८ वा

७९

मंदराद्रि कैसा उचलावा नकळे । देव तदा गेले विष्णूपाशीं ॥ १ ॥
अनंतासी आज्ञा करी नारायण । पर्वत उचलून धरी शेष ॥ २ ॥
विनवितां सागरा सुधेमाजी अंश । म्हणे श्रमास्तव माझा असो ॥३॥
मान्यता देवोनी कूर्मपृष्ठावरी । वेगें मंदराद्रि ठेवियेला ॥ ४ ॥
इंद्र दृढ धरी, वासुकीची दोरी- । करोनी, सत्वरि सिद्ध होती ॥ ५ ॥
असुर दानव मुखाकडे होते । पुच्छ वासुकीचें देव घेती ॥ ६ ॥
ऐसें आरंभिलें समुद्रमंथन । वासुदेव मन हर्ष पावे ॥ ७ ॥

८०

निश्वास नागांचे तेचि मेघ झाले । पर्जन्य वर्षले देवांवरी ॥ १ ॥
असंख्य प्राण्यांचा संहार जाहला । वेगें अग्निज्वाला गिरीवरी ॥२॥

देवेंद्रानें केलें अग्नीलागीं शांत । गळती जळांत चीक, रस ॥ ३ ॥
दिव्य उदकें त्या अमर त्रिदश । वंदितो देवांस वासुदेव ॥ ४ ॥

८१

तृण उदकाचें धेनु करी दुग्ध । तैसें होई घृत सागरांत ॥ १ ॥
पाहूनियां देव म्हणती चतुरानना । अमृत न आम्हां लाभे काय ॥२॥
श्रांत पाहूनियां कृपा करी देव । उत्साहित सर्व होती तेव्हां ॥ ३ ॥
पुनरपि वेगें मंथन करितां । विधु येई हाता सकलांच्या ॥ ४ ॥
मागोमाग लक्ष्मी शुभ्र वस्त्रधारी । तैसी सुरादेवी पुढती अश्व ॥५॥
कौस्तुभ विष्णूसी,चारी तीं आकाशीं । देवांच्या बाजूसी राहियेलीं॥६॥
धन्वंतरि येई, कमंडलु करीं । अमृताची सरी नाहीं कोणा ॥ ७ ॥
माझें माझें ऐसें सर्वही बोलती । वासुदेव ख्याती गाई त्यांची ॥ ८॥

८२

आला ऐरावतगज । इंद्रें धरिला सहज । ॥ १ ॥
कालकूट वरी आलें । गंधें विश्व त्या भ्रमलें ॥ २ ॥
जनाहितालागीं थोर । प्राशी विष तें शंकर ॥ ३ ॥
दैत्य विस्मित जाहले । वैर अंतरीं उदेलें ॥ ४ ॥
तदा मोहिनीचें रूप । करी धारण अच्युत ॥ ५ ॥
मोहूनियां दानवांतें । अर्पी अमृत देवांतें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अंतीं । स्वार्थें जगीं कलह होती ॥ ७ ॥

अध्याय १९ वा

८३

तदा दानव झुंजले । देवांवरी ते धांवले ॥ १ ॥
विष्णु हरूनी अमृत । देवांलागीं तें अर्पित ॥ २ ॥
देव प्राशन करितां । वेषधारी राहू होता ॥ ३ ॥
घेतां अमृताचा घोट । येई ध्यानीं तें कपट ॥ ४ ॥
सूर्य चंद्रांनीं पाहिलें । शिर विष्णूनें छेदिलें ॥ ५ ॥

गेलें गर्जत आकाशीं। अद्यापि तें उभयां ग्रासी ॥ ६ ॥
झालें समर दारुण। लढले नरनारायण ॥ ७ ॥
दैत्य पराभूत झाले। तळीं सागरीं दडाले ॥ ८ ॥
सुधेलागीं रक्षी नर। देव करिती जयजयकार ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे देव–। साह्य लाभे, त्या विजय ॥ १० ॥

अध्याय २० वा.

८४

शौनकासी कथी अमृताची कथा। सौति म्हणे ऐका वृत्त पुढें ॥१॥
अश्व उच्चैःश्रवा देखिला दोघींनीं। बोलती लावूनी पण मोदें ॥२॥
कद्रू म्हणे वर्ण कोणता अश्वाचा। श्वेतवर्ण त्याचा विनता सांगे ॥३॥
कृष्णवर्ण पुच्छ कद्रू म्हणे त्याचें। चुकतां दास्यातें स्वीकारावें ॥४॥
उदईक लावूं निर्णय आपुला। उद्वेग वाटला वासुदेवा ॥ ५ ॥

८५

कापट्य योजूनी कद्रू म्हणे सुतां। वांचवा ही माता दास्यांतुनी॥ १ ॥
पुच्छ कृष्णवर्ण करा त्या अश्वाचें। आच्छादन त्यातें स्वयें घाला॥ २॥
न ऐकती त्यांसी कद्रू देई शाप।' सत्रामाजी भस्म ' होवो ऐसा॥३॥
ऐकोनियां ब्रह्मा म्हणे कश्यपातें। दोष न कद्रूतें नियति ऐसी ॥ ४॥
ऐसें बोलूनियां विद्या विषहरा। अर्पिली पवित्रा विप्रालागीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दयाळू केशव। करितो उपाय संकटांत ॥ ६ ॥

अध्याय २१—२२ वा

८६

पैज हौसेनें मारूनी। दोघी सिद्ध अन्यदिनीं ॥ १ ॥
कोण दासी होई पाहूं। अश्व देखण्यासी जाऊं ॥ २ ॥

१ चंद्र व सूर्य यांस

एसें म्हणोनी सुंदरी । येती सागराचे तीरीं ॥ ३ ॥
ज्याचा अचिंत्य विस्तार । तीर्थराज तो सागर ॥ ४ ॥
जेथ पाञ्चजन्य लाभ । अत्रीसी न ज्याचा थांग ॥ ५ ॥
मैनाकासी अभयदान । असुरांचें आश्रयस्थान ॥ ६ ॥
नृत्य करी तरंगांनीं । चंद्र ज्याच्या भाग्यस्थानीं ॥ ७ ॥
गगनमार्गे आक्रमिला । वेगें सागर लंघिला ॥ ८ ॥
मातृशापातें भिऊनी । नाग पुढती जावोनी ॥ ९ ॥
कृष्णवर्ण पुच्छ केलें । वासुदेव चित्त भ्यालें ॥ १० ॥

अध्याय २३ वा.

८७

संक्षेपें कथिलें गरुडाचें वृत्त । ऐकावें विस्तृत सौति म्हणे ॥ १ ॥
अश्वासन्निध त्या येऊनी पहाती। शुभ्र स्वच्छ कांति त्याची असे ॥२॥
परी पाहूनियां कृष्णवर्ण पुच्छ । विनता मनांत दुःख पावे ॥ ३ ॥
दासी होऊनियां राहिली कद्रूची । तीच गरुडाची जन्मवेळ ॥ ४ ॥
उडाला गगनीं वृद्धि पावूनियां । देव त्या समया भयग्रस्त ॥ ५ ॥
तेजः पुंज अग्नि भासला देवांसी । प्रार्थिती तयासी शांत होईं ॥ ६ ॥
अग्नि म्हणे नव्हे माझें हें स्वरूप । कश्यपाचा सुत गरुड जाणा ॥७॥
चला मजसंगें दावितों तुम्हासी । वंदितो अग्नीसी वासुदेव ॥ ८ ॥

८८

अग्नीसह गेले गरुडासन्निध । प्रार्थिती विबुध तयालागीं ॥ १ ॥
पक्षीश्वरा देवा तूंचि विष्णुब्रह्मा । अतर्क्य महिमा असे तव ॥ २ ॥
आंवरूनी घेईं तेज हें आपुलें । कंपित हे झाले लोक सर्व ॥ ३ ॥

---

१ अत्रिऋषींनीं समुद्राचा थांग लागावा म्हणून १०० वर्षें तप केलें पण त्यांना अंत लागला नाहीं.

कल्याणार्थ ऐसी करिती प्रार्थना । दया येई मना गरुडाच्या ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे दयाळू सज्जन । स्वभावाचि जाण असे त्यांचा ॥ ५ ॥

## अध्याय २४ वा

### ८९

गरुडानें केला तेजाचा संकोच । धीर सकलांस देऊनियां ॥ १ ॥
अरुणासवें तो मातेसी भेटाया । सिध्दचि जावया सिंधूतीरीं ॥ २ ॥
राहूपीडित तो भानु क्रुध्द होई । जाणीवचि नाहीं म्हण कोणा ॥३॥
हितार्थ देवांच्या रोष मजवरी । कोणीही न करी साह्य आतां ॥ ४ ॥
संकटीं आपुला आपण जाणोनी । क्रुध्द होतां, जनीं ताप झाला ॥५॥
विनविती देव अहा ब्रह्मदेवा । ताप कैंवि व्हावा सह्य लोकां ॥ ६ ॥
मध्यरात्रीं ऐसी दशाही जनांची । उगवतां कैसी स्थिति होई ॥ ७ ॥
कश्यपाचा सुत हरील ही चिंता । बोलला विधाता देवांलागीं ॥८॥
उदित सूर्यासी आच्छादि अरुण । संकट दारुण दूर होई ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे मूळ कथा ऐका । जन्म मरण धोका टळे जेणें ॥१०॥

## अध्याय २५–२६ वा

### ९०

सागराच्या पैलतीरीं । चरण विनतेचे धरी ॥ १ ॥
पराभूत ती माउली । दास्यपंकांत रुतली ॥ २ ॥
कद्रू म्हणे विनते नेई । सिंधूमाजी रम्य ठाई ॥ ३ ॥
विनता सांगे गरुडातें । वचन पाळी तो मातेचें ॥ ४ ॥
गगनीं उंच उंच गेला । ताप न साहे सर्पाला ॥ ५ ॥
कद्रू स्तविते इंद्रासी । ऐकोनियां मोद त्यासी ॥ ६ ॥
मेघ वर्षती नभांत । तेणें होती सर्प शांत ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे येती । सर्प रमणकद्वीपीं ॥ ८ ॥

## अध्याय २७ वा

### ९१

रमणकद्वीपामाजी। होता लवणासुर राजी ॥ १ ॥
परी आतां तो न दिसे। शोभा अपूर्वेचि भासे ॥ २ ॥
वहुविध पुष्पलता। भान हरे पक्षी गातां ॥ ३ ॥
वायु सुगंध पसरी। पुष्पवृष्टि नागांवरी ॥ ४ ॥
आनंदित नाग झाले। सुखें तेथेंचि राहिले ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जीव। धरी नित्य नवी हांव ॥ ६ ॥

### ९२

नेईरे गरुडा आम्हा अन्य रम्य स्थानीं ॥
संचार तुझा लीलेनें होतसे गगनीं ॥ १ ॥
सर्पआज्ञा त्या वीरासी सहन होईना।
म्हणे मातेसी कां साहूं ऐशा अपमाना ॥ २ ॥
विनता म्हणे तूं वाळा जरी बलवंत ॥
दासी जाहलें मी मज जिंकिलें पणांत ॥ ३ ॥
पुच्छ देव-अश्वाचें त्या केलें कृष्णवर्ण ॥
कपट करूनी ऐसा जिंकियेला पण ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सत्य वृत्त हें कळतां ॥
दुःख असह्यचि होई गरुडाच्या चित्ता ॥ ५ ॥

## अध्याय २८ वा

### ९३

मोल देऊनियां स्वयें जो गृहीं आणीला ॥
दास तो गृहीं वा कोणी विद्येसी राहीला ॥ १ ॥
पण जिंकुनीयां अथवा कोणा दास्य येई ॥
काय करितां सर्पांनो दास्य मुक्ति होई ॥ २ ॥
धन विद्या कीं पुरुषार्थ दावूं मी तुम्हांला ॥
सर्प बोलले गरुडातें। सुधा दे आम्हाला ॥ ३ ॥

वासुदेव म्हणे ऐसी संधि प्राप्त होतां ॥
सोडवी जो न मातेसी व्यर्थ जन्म त्याचा ॥ ४ ॥

९४

गरुड वंदूनी मातेसी । म्हणे आणितों सुधेसी ॥ १ ॥
मार्गी जातां भक्षूं काय । मज सांगें तो उपाय ॥ २ ॥
विनता म्हणे सागरवासी । भक्षीं बाळा निषादांसी ॥ ३ ॥
परलोक नष्ट त्यांचे । कारण वधिती मत्स्यांतें ॥ ४ ॥
काळ कठिणही येतां । विप्रवध न करीं ताता ॥ ५ ॥
श्रेष्ठ सर्व वर्णांमाजी । ब्राह्मण तो राखीं राजी ॥ ६ ॥
अग्नि सूर्याहूनी ताप । ब्राह्मणांचा तो अधिक ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धन्य । ऐसे तपस्वी ब्राह्मण ॥ ८ ॥

९५

मायवो विप्रांचें स्वरूप कथावें । आचार वर्णावे पराक्रम ॥ १ ॥
माता म्हणे वत्सा टोंचेल घशातें । भक्षितां तयातें विप्र जाण ॥ २ ॥
उदरांत जातां पचेना सर्वथा । तोचि विप्र ताता जाण मनीं ॥ ३ ॥
ऐसें बोलूनियां आशीर्वाद देई । बाळा शीघ्र जाईं स्वकार्यातें ॥४॥
पंखांतें तो वायु चंद्रसूर्य पृष्ठ । अग्नि तो मस्तक रक्षो तुझें ॥ ५ ॥
करीन मी तप बैसूनियां एथें । तुझिया यशातें चिंतीन मीं ॥ ६ ॥
वीर पराक्रमी उडाला गगनीं । निषादां सेवोनी तृप्त झाला ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे जातिवंत वीर । नित्य धरी धीर मनामाजी ॥ ८ ॥

अध्याय २९ वा.

९६

निषाद भक्षितां कोणी एक द्विज । गिळिला सहज गरुडानें ॥ १ ॥
अग्नीसम झाला दाह तैं कंठाचा । बोलला तैं वाचा विनतासुत ॥२॥
येईरे बाहेरी विप्र मज वंद्य । कर्म जरी निंद्य त्याचें असे ॥ ३ ॥
विप्र म्हणे वांचो निषादि हे कांता । पुरवी विप्राचा हेतु तेव्हां ॥४॥
निषादीसह तो वांचला ब्राह्मण । सोडूनियां स्थान गेला वेगें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गरुड उडाला । पित्यासी भेटला येऊनियां ॥ ६ ॥

९७

वंदन करोनी पुढती उभा राहे । कश्यप त्या पाहे कौतुकानें ॥ १ ॥
कुशल पुसोनी म्हणे मृत्युलोकीं । अन्न तुजलागीं लाभे कीं ना ॥२॥
त्वरा करोनीयां सांग कोठें जासी । बोलला पित्यासी नम्रभावें ॥ ३॥
मातेसह असे कुशल आमुचें । परी अन्न मातें न मिळे नित्य ॥ ४ ॥
मुक्त करावया मी जातों मातेसी । आणितों सुधेसी सर्पांस्तव ॥ ५ ॥
मातेच्या वचनें निषाद भक्षिले । समाधान झालें नाहीं परी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मागतो पित्यासी । योग्य भक्ष्य त्यासी देई पिता ॥७॥

९८

सरोवरामाजी बाळा । कूर्म येवोनी राहिला ॥ १ ॥
एक हत्ती ओढी त्यातें । भांडताती पूर्वभ्राते ॥ २ ॥
पूर्वजन्मींचें तें वैर । कलह त्यांचा निरंतर ॥ ३ ॥
विभावसु मुनि एक । त्याचा बंधु सुप्रतीक ॥ ४ ॥
मागे धनाचा विभाग । विभावसूलागीं राग ॥ ५ ॥
बोले बंधूलागीं मुनि । ऐका लक्ष तें देऊनी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे जन । जाती कलहांत रंगून ॥ ७ ॥

९९

नित्य बांधवांत येई कलहाची वेळ ॥
मित्र होवोनियां शत्रु खेळती हे खेळ ॥ १ ॥
स्वार्थी मूढांमाजी नित्य भेदनीति चाले ॥
नाश पूर्ण अंतीं होई कश्यप हें बोले ॥ २ ॥
पित्यासम ज्येष्ठ भ्राता कनिष्ठ तो सुत ॥
शास्त्र हें जाणे जो त्याचें होई नित्य हित ॥ ३ ॥
तपस्वी ते एकमेकां शाप देती बाळा ॥
मत्त गज एक होई अन्य कूर्म झाला ॥ ४ ॥

भक्षीं तूं तयांसी आतां क्रोध दोष मोठा ॥
वासुदेव नित्य पाही खेळ हा जगाचा ॥ ५ ॥

१००

वंदूनी पित्यासी उडाला गगनीं । गज कूर्म दोन्ही चरणीं धरी ॥१॥
अंतरिक्षामाजी झेंप घेई वेगें । येई नभमार्गे एका तीर्थी ॥ २ ॥
कल्पवृक्ष तेथें देखियेले रम्य । कांपती भिऊन गरुडासी ते ॥ ३ ॥
वटवृक्ष एक म्हणे पक्षिराजा । आश्रय तूं माझा घेई आतां ॥ ४ ॥
विशाल शाखेतें बैसे जावोनियां । भग्न होवोनियां जाई शाखा ॥५॥
वासुदेव म्हणे शक्तीसम भार । टाकी तो चतुर जगामाजी ॥ ६ ॥

अध्याय ३० वा

१०१

वटशाखा धरी चंचूमाजी वीर । धरोनी अधर जाई पुढें ॥ १ ॥
वालखिल्यमुनि तपस्या करीत । होते अधोमुख शाखेवरी ॥ २ ॥
देवांसी दुष्कर कर्म तें पाहोनी । बोलती ते मुनि सार्थ नाम ॥ ३ ॥
शेवटीं पातला गंधमादनातें । पाहिलें पित्यातें तया ठाईं ॥ ४ ॥
पर्वतशिखरीं पुत्र पाहियेला । कश्यप बोलला तयालागीं ॥ ५ ॥
साहस तूं ऐसें करिसी कां बाळा । मुनि वालखिल्यां ताप होई ॥६॥
सूर्यकिरण जे भक्षूनी रहाती । कठिणाचि गति शाप देतां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पुत्रासी उपदेश । करोनी भाग्यास नेई पिता ॥ ८ ॥

१०२

बोध करोनी सुतासी । विनवी वालखिल्यांप्रती ॥ १ ॥
जनहितार्थ गरुड । यत्न करी अवघड ॥ २ ॥
द्यावी अनुज्ञा तयासी । ऐसें बोलतां ते ऋषि ॥ ३ ॥
शाखा सोडूनियां गेले । हिमाचलीं ते राहिले ॥ ४ ॥
कष्टें गरुड विनवी । शाखा कोठें ही ठेवावी ॥ ५ ॥
निर्मनुष्य हिमस्थान । पिता कथी तें अगम्य ॥ ६ ॥
ऐशा स्थानीं गरुड गेला । चकित वासुदेव झाला ॥ ७ ॥

१०३

शाखा टाकितां त्या रानीं । नाद कोंदला गगनीं ॥ १ ॥
कंप पावला पर्वत । उन्मळले वृक्षराज ॥ २ ॥
मग बैसोनी शिखरीं । गरुड भक्षितो शिदोरी ॥ ३ ॥
कूर्म गज ते भक्षिले । क्षुधेलागीं शांत केलें ॥ ४ ॥
अपशकुन देवांसी । उल्कापात ते आकाशीं ॥ ५ ॥
स्वच्छ आकाशीं गर्जना । रक्तवृष्टि होई जाणा ॥ ६ ॥
भयाभीत इंद्र झाला । पुशी कारण गुरूला ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे गुरु । सांगे तेंचि कथन करूं ॥ ८ ॥

१०४

बृहस्पति म्हणे देवेंद्रा तूं व्यर्थ । करोनियां दर्प वागलासी ॥ १ ॥
अपमानिलेंसी वालखिल्यांप्रति । परिणाम अति कठिण आतां ॥ २ ॥
महावीर येई गरुड युद्धासी । इच्छा अमृताची धरोनियां ॥ ३ ॥
अवघड कार्य गरुड साधील । मनांत आणील तेंचि करी ॥ ४ ॥
ऐकोनी आज्ञापि इंद्र सेवकांसी । सज्ज या क्षणासी व्हावें म्हणे ॥५॥
वासुदेव म्हणे अमृतरक्षणा । देव शस्त्रें नाना घेती करीं ॥ ६ ॥

## अध्याय ३१ वा

१०५

सौतीलागीं तेव्हां शौनक बोलले । वालखिल्य झाले क्रुद्ध कैसे ॥१॥
वृत्त तें कथावें आम्हालागीं सर्व । सौति म्हणे गर्व इंद्राचा हा ॥ २ ॥
याग करी पूर्वी पुत्रार्थ कश्यप । देव त्या यज्ञांत साह्य झाले ॥ ३ ॥
समिधा आणिती इंद्र वालखिल्य । त्याच वेळीं शल्य उगम पावे ॥४॥
समिधांचे भार इंद्र आणी वेगें । वालखिल्य अंगें सूक्ष्म होते ॥ ५ ॥
पर्वमात्र होतीं शरीरें मुनींचीं । समिधा तयांसी महावृक्ष ॥ ६ ॥
समिधा वाहोनी आणितां ते एक । बुडतां गोष्पदांत सकलहि ॥७॥

---

१ क्रोधाचें मूळ.

बाहेर यावया करिती ते यत्न । इंद्र तें पाहून हास्य करी ॥ ८ ॥
साह्य न करितां इंद्र पुढें गेला । क्रोध तदा आला मुनींलागीं ॥ ९ ॥
शतगुण बल इंद्राहूनि ज्याचें । ऐसिया वीराचें जन्म होवो ॥ १० ॥
होईल तो इंद्र वालखिल्य ऐसें । बोलतां इंद्रातें वृत्त कळे ॥ ११ ॥
वासुदेव म्हणे पश्चात्ताप होतां । शुद्धि ती उन्मत्ता होत नाहीं ॥१२॥

## १०६

इंद्र कश्यपासी जाई शरण त्या वेळीं ॥
वृत्त सर्व कश्यपाच्या कानावरी घाली ॥ १ ॥
जावोनी मुनींद्रालागीं कश्यप बोलला ॥
अन्य इंद्र प्राप्तीसी कां यज्ञ आरंभिला ॥ २ ॥
संकल्प ब्रह्मयाचा येणें असत्य होईल ॥
इंद्र पक्ष्यांचा हा होतां हेतु पुरतील ॥ ३ ॥
वालखिल्य कश्यपातें विनयें बोलती ॥
पुत्र तो तुझाची होवो योजी ऐसी युक्ति ॥ ४ ॥
सौति कथी शौनकातें वृत्त विनतेचें ॥
वासुदेव तेंची गातो वंदुनी तयांतें ॥ ५ ॥

## १०७

पुण्यवती ते विनता । पुत्रकामना धरीतां ॥ १ ॥
वदे कश्यप तियेसी । वालखिल्य जें इच्छिती ॥ २ ॥
गर्भ संरक्षीं हे दोन । पुढें होसी भाग्यवान ॥ ३ ॥
अभय देऊनी इंद्रासी । मुनि बोलले तयासी ॥ ४ ॥
विप्र अपमान ऐसा । करूं नये शचीनाथा ॥ ५ ॥
ब्रह्मवेत्त्यांची जे वाणी । तेंचि वज्र ध्यानीं आणीं ॥ ६ ॥
ऐसें पूर्वीचें हें वृत्त । पुढती झाले विनतासुत ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आतां । ऐका गरुडाची कथा ॥ ८ ॥

## अध्याय ३२ वा

### १०८

देवगरुडांसी घोर । पुढें जुंपलें समर ॥ १ ॥
एकाकी तो महाबळी । देव पाडिले भोंवतालीं ॥ २ ॥
विश्वकर्मा बलवान । करी सुधेचें रक्षण ॥ ३ ॥
मृतप्राय होउनि गेला । चंचू-नखांनीं ताडिला ॥ ४ ॥
पुढती झालें दारुण युद्ध । देव वमताती अशुद्ध ॥ ५ ॥
गरुड सुधेसन्निध गेला । तेथें पाही अग्निज्वाला ॥ ६ ॥
सहस्रमुखें धारण करी । जलवर्षी अग्नीवरी ॥ ७ ॥
सरिता उदकें त्या अग्नि । शांत होतां हर्ष मानी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वीर । धरी अल्पसें शरीर ॥ ९ ॥

## अध्याय ३३ वा.

### १०९

सुवर्णासमान पक्षीरूप त्याला । सूर्य किरणांला लाजवी तो ॥ १ ॥
आग्निज्वालेसम अग्नीमाजी जाई । पुढती तो पाही तीक्ष्ण चक्र ॥ २ ॥
सूक्ष्म मक्षिकेचे शतशः कण । करील दारुण ऐसा वेग ॥ ३ ॥
यंत्र निर्मियेलें सुधारक्षणार्थ । तेथ प्रवेशार्थ मार्ग नसे ॥ ४ ॥
सूक्ष्मरूपें पक्षी अरामार्गें गेला । दिसती तयाला क्रूर सर्प ॥ ५ ॥
अग्निरूप कांती जिव्हा विजेसम । नेत्र गुंजेसम लाल त्यांचे ॥ ६ ॥
देखतां ते सर्प शत्रु भस्म होई । गरुडातें कांहीं हानि नसे ॥ ७ ॥
धूलिक्षेपें केलें तयांलागीं अंध । ताडुनी सर्वांग पुढती गेला ॥ ८ ॥
अमृतकलश घेवोनी उडाला । हर्ष थोर झाला वासुदेवा ॥ ९ ॥

### ११०

स्वाधीन अमृत परी बिंदुही न सेवी ।
ऐशा निग्रही वीराची कीर्ति कां न व्हावी ॥ १ ॥

प्रसन्न अंतरीं झाला विष्णु भगवान ॥
भेटुनी मार्गांत म्हणे वर घे मागून ॥ २ ॥
गरुड म्हणे ध्वजावरी असो मम वास ॥
अमृतावांचोनी देई अमरपदास ॥ ३ ॥
देव बोलला तथास्तु, गरुड तयाला ॥
म्हणे सांगा काय देऊं देवा मीं तुम्हाला ॥ ४ ॥
विष्णु बोलला हांसोनी ' माझें हो वाहन ' ॥
ध्वजावरी माझ्या असो नित्य तुझी खूण ॥ ५ ॥
घेउनी अनुज्ञा वेगें पुढती चालला ॥
वासुदेव वंदी प्रेमें गरुडध्वजाला ॥ ६ ॥

१११

अमृत हरूनी पक्षिराज जातां । करी वज्राघाता इंद्र क्रोधें ॥ १ ॥
आनंदें देवांनीं जयनाद केला । प्रिय गरुडाला नसे कांहीं ॥ २ ॥
हांसोनीयां म्हणे पक्षी तो इंद्रासी । सन्मान मुनींसी असो सदा ॥३॥
वज्रासह तुझा राखितों सन्मान । पक्ष हा गळून पडे पहा ॥ ४ ॥
परी अंत याचा लागेना तुजसी । दधीचि ऋषींसी वंदितों मीं ॥ ५ ॥
सकल बोलती पंख तो पाहून । सुपर्णा, सुपर्ण हेंचि नांव ॥ ६ ॥
इंद्र म्हणे दावीं तव बल मातें । इच्छितों सख्यातें सर्वकाळ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सखा बलिवंत । व्हावा तरी नित्य बल लाभे ॥ ८ ॥

अध्याय ३४ वा

११२

पुरंदरा मैत्री होवो तुझी माझी । ख्याति स्वबलाची कैसी गाऊं ॥१॥
सज्जन आपुले गुण न वर्णिती । निंद्य आत्मस्तुति तयांलागीं ॥ २ ॥
परी तुझें माझें मित्रत्वाचें नातें । म्हणोनी बळातें कथितों तुज ॥३॥

---

१ दधीचि मुनि

वाहीन ब्रह्मांड एका पंखावरी । निश्चय अंतरीं ऐसा जाणें ॥ ४ ॥
देवेंद्र म्हणे हें शक्य तुज असे । काम अमृताचें नाहीं आतां ॥ ५ ॥
सर्पांसी तें देतां, बाधक होतील । दुर्जनांचें शील योग्य नसे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अमृताचा लाभ । शुद्ध जो स्वयंभ तयालागीं ॥ ७ ॥

११३

अंतरींचा हेतु पूर्ण । होई अमृत नेऊन ॥ १ ॥
देवराया मी कोणातें । प्राशूं न देई सुधेतें ॥ २ ॥
संतोषला शचीनाथ । म्हणे मागें जें मनांत ॥ ३ ॥
गरुड बोलला इंद्रातें । सर्प भक्ष्य करीं माझे ॥ ४ ॥
तथास्तु त्या बोलुनि गेला । विष्णूप्रति भेटुनि आला ॥ ५ ॥
गरुडालागीं म्हणे वीरा । नेईन अमृत माघारा ॥ ६ ॥
गरुड आनंदला मनीं । वंदी मातेसी येऊनी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वीर । करिती जगीं चमत्कार ॥ ८ ॥

११४

माता म्हणे बाळा जाहला संतोष । प्रिय सकलांस होसील तूं ॥ १ ॥
गरुड सर्पांसी बोलला जाऊनी । या स्नान करोनी सुधेसाठीं ॥ २ ॥
दर्भावरी असे सुधेचा कलश । माझिया मातेस मुक्त करा ॥ ३ ॥
तथेति म्हणोनी सर्प जाती स्नाना । इंद्र तया स्थाना प्राप्त होई ॥४॥
घेऊनी अमृत गेला गुप्तरूपें । कार्य गरुडाचें सिद्ध होतां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कपट करितां । अंतीं येई हाता तेंचि जनीं ॥ ६ ॥

११५

करोनियां स्नान जप । यती उत्साहानें सर्प ॥ १ ॥
दर्भावरी जों पाहती । कलश न दिसे तयांसी ॥ २ ॥
आम्हीं केलें जें कपट । गरुड चालला ती वाट ॥ ३ ॥
दर्भ चाटिले जावोनी । जिव्हा गेली दुभंगोनी ॥ ४ ॥

अमृताचा स्पर्श होतां । दर्भालागीं पवित्रता ॥ ५ ॥
सुधा हरूनी आणिली । कार्य होतां फिरुनी दिली ॥ ६ ॥
ऐसा भाग्यवंत सुत । मातेसह भोगी सुख ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पुण्य । जोडा कथा ही ऐकून ॥ ८ ॥

अध्याय ३५ वा

११६

शौनकासी सांगे सौति सर्पनामें । विचारितो प्रेमें म्हणोनीयां ॥ १ ॥
वासुकी, तक्षक, कालिया, वामन । कर्कोटक, पद्म, ऐरावत, ॥ २ ॥
धनंजय, नील, अनिल, मणिनाग, । करवीर, कुमुद, कंबलादि ॥ ३ ॥
धृतराष्ट्रादिक लक्षावधि नामें । वासुदेव प्रेमें वंदी तयां ॥ ४ ॥

अध्याय ३६ वा

११७

मातृशाप होतां नाग । काय करिती ते सांग ॥ १ ॥
ऐसें ऐकोनियां सौति । स्मरे मनीं शेषाप्रती ॥ २ ॥
त्यागूनियां निजमाता । शेष आचारितो तपा ॥ ३ ॥
क्षेत्र पुष्कर गोकर्ण । बदरिक तो आश्रम ॥ ४ ॥
अस्थिपंजर राहिले । ऐसें घोर तप केलें ॥ ५ ॥
ब्रह्मा म्हणे करीं दया । श्रमूं नको ऐसा वायां ॥ ६ ॥
सर्पश्रेष्ठ तो संयमी । वासुदेव त्यासी नमी ॥ ७ ॥

११८

म्हणे मत्सरी ते भ्राते । विटलों या सहवासातें ॥ १ ॥
सुतांसह विनतेचा । नित्य मनीं द्वेष त्यांच्या ॥ २ ॥
हाडवैर गरुडाचें । मज देवा तें न रुचे ॥ ३ ॥
देह तपानें त्यागीन । मुक्ति देवो अन्यजन्म ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे शेष । विटला नीच सहवासास ॥ ५ ॥

११९

ब्रह्मा म्हणे शेषा करूं नको दुःख । पावसील सुख निश्चयानें ॥ १ ॥
मागूनियां घेई तुजला जें इष्ट । राहीं एकनिष्ठ धर्मरत ॥ २ ॥
' धर्मबुद्धि माझी म्हणे स्थिर राहो ' । हेतु पूर्ण होवो ब्रह्मा म्हणे ॥३ ॥
पृथ्वी डळमळे भार वाहीं तिचा । आधार जनांचा तूंचि होईं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे देवांलागीं प्रिय । अलौकिक कार्य करुनी शेष ॥ ५ ॥

१२०

आज्ञा मानूनियां शेष तो विवरीं । जावूनियां धरी पृथ्वीलागीं ॥ १ ॥
मस्तकीं घेऊनी महत्कार्य केलें । ब्रह्मा म्हणे झाले पूर्ण हेतु ॥ २ ॥
सर्पश्रेष्ठ शेषा इंद्रासम होसी । आधार जगासी धर्म असे ॥ ३ ॥
सहाय्यार्थ त्याच्या कथिलें सुपर्णा । वासुदेव गाना सिद्ध होई ॥ ४ ॥

अध्याय ३७ वा

१२१

सौति म्हणे चिंती वासुकी मनांत । होऊं शापमुक्त कैसे तरी ॥ १ ॥
निवारित होती सकलहि शाप । परी मातृशाप तैसा नोहे ॥ २ ॥
ब्रह्मदेवें तिज नाहीं निवारिलें । दुर्दैव जाहलें प्राप्त आतां ॥ ३ ॥
गुप्त अग्नि पूर्वी देवांनीं शोधिला । विचारची झाला साह्य त्यांसी ॥४॥
जनमेजय यज्ञा कैसें येई विघ्न । करूं तें चिंतन सकलहि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वासुकीचें मत । जाहलें संमत सर्वांलागीं ॥ ६ ॥

१२२

विप्र होऊनियां रायापाशीं जाऊं । वचनीं गुंतवूं तयालागीं ॥ १ ॥
मंत्रि होऊं त्याचे ऐसें कोणी म्हणे । प्रीती संपादणें म्हणे कोणी ॥२॥
पुरोहितालागीं दंशचि करावा । यज्ञ विध्वंसावा येणें रीति ॥ ३ ॥
कोणी म्हणे ब्रह्महत्या करूं नये । ब्राह्मणां वंदावें ऐशा वेळीं ॥ ४ ॥

पुण्यकर्म हाचि संकटीं उपाय । कोणी म्हणे काय लाभ तेणें ॥ ५ ॥
हरूं म्हणे कोणी रायाचिया प्राणा । उपाय ते नाना कथिती ऐसे ॥६॥
वासुकी नागांचा राव तो विवेकी । गोष्ट जी हिताची तेचि करी ॥७॥
वासुदेव म्हणे थोर भाग्य त्याचें । शरण पित्यातें जावूं म्हणे ॥ ८ ॥

अध्याय ३८ वा

१२३

एलापत्र नाग म्हणे । दैवालागीं शरण जाणें ॥ १ ॥
हाचि मार्ग स्वहिताचा । ऐका निश्चय दैवाचा ॥ २ ॥
ऐका विधात्याची वाणी । स्त्रिया निर्दय या जनीं ॥ ३ ॥
कद्रूसी न,निवारिलें । सर्प घातकी जाहले ॥ ४ ॥
धार्मिकांचें त्या रक्षण । करील आस्तीक सुजाण ॥ ५ ॥
जरत्कारूचा नंदन । प्रिय वासुकीतें जाण ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे एला । सांगे ब्रह्मा जें बोलला ॥ ७ ॥

अध्याय ३९ वा

१२४

एलापत्राचें वचन । नाग तोषले ऐकून ॥ १ ॥
वासुकीसी मोद झाला । कांहीं काळ ऐसा गेला ॥ २ ॥
देव वासुकीसहित । आले ब्रह्मयाच्या सन्निध ॥ ३ ॥
ब्रह्मा म्हणे एलापत्र । वदे तेंचि माझें मत ॥ ४ ॥
जरत्कारु जन्मा आला । द्यावी भगिनी तयाला ॥ ५ ॥
म्हणे वासुकी सर्पांसी । शोधा जावोनी मुनीसी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नाग । लक्षिती तो मुनिमार्ग ॥ ७ ॥

अध्याय ४० वा

१२५

ऐका ऐका म्हणे सौति । जरत्कारूची व्युत्पत्ती ॥ १ ॥
देह कामक्रोधस्थान । कारु म्हणजे जो दारुण ॥ २ ॥

पुण्यकर्म हाचि संकटीं उपाय । कोणी म्हणे काय लाभ तेणें ॥ ५ ॥
हरूं म्हणे कोणी रायाचिया प्राणा । उपाय ते नाना कथिती ऐसे ॥६॥
वासुकी नागांचा राव तो विवेकी । गोष्ट जी हिताची तेचि करी ॥७॥
वासुदेव म्हणे थोर भाग्य त्याचें । शरण पित्यातें जावूं म्हणे ॥ ८ ॥

अध्याय ३८ वा

१२३

एलापत्र नाग म्हणे । दैवालागीं शरण जाणें ॥ १ ॥
हाचि मार्ग स्वहिताचा । ऐका निश्चय दैवाचा ॥ २ ॥
ऐका विधात्याची वाणी । स्त्रिया निर्दय या जनीं ॥ ३ ॥
कद्रूसी न निवारिलें । सर्प घातकी जाहले ॥ ४ ॥
धार्मिकांचें त्या रक्षण । करील आस्तीक सुजाण ॥ ५ ॥
जरत्कारूचा नंदन । प्रिय वासुकीतें जाण ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे एला । सांगे ब्रह्मा जें बोलला ॥ ७ ॥

अध्याय ३९ वा

१२४

एलापत्राचें वचन । नाग तोषले ऐकून ॥ १ ॥
वासुकीसी मोद झाला । कांहीं काळ ऐसा गेला ॥ २ ॥
देव वासुकीसहित । आले ब्रह्मयाच्या सन्निध ॥ ३ ॥
ब्रह्मा म्हणे एलापत्र । वदे तेंचि माझें मत ॥ ४ ॥
जरत्कारु जन्मा आला । द्यावी भगिनी तयाला ॥ ५ ॥
म्हणे वासुकी सर्पांसी । शोधा जावोनी मुनींसी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नाग । लक्षिती तो मुनिमार्ग ॥ ७ ॥

अध्याय ४० वा

१२५

ऐका ऐका म्हणे सौति । जरत्कारूची व्युत्पत्ती ॥ १ ॥
देह कामक्रोधस्थान । कारु म्हणजे जो दारुण ॥ २ ॥

त्यासी तीव्रपणें जरा । आणि नाम हें त्या नरा ॥ ३ ॥
जरत्कारु हें बोलती । कन्या त्याच नामें होती ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे मुनि । ऐसें द्यांसती ऐकोनी ॥ ५ ॥

१२६

परिक्षित राजा मृगयेसी जातां । विद्ध करी एका मृगालागीं ॥ १ ॥
नृपाळाचें तया संधान अचुक । परी योगायोग विचित्र हा ॥ २ ॥
पाठलाग बहू करीतसे परी । मृग जाई दुरी न दिसे तया ॥ ३ ॥
तृषार्त नृपाळ व्याकुळ जाहला । आश्रमीं पाहिला मुनि एक ॥ ४
धेनूगोष्ठामाजी राही तो संयमी । सेवन करूनी दुग्धफेन ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नृपाळ तो शांत । मुनीच्या सान्निध येत असे ॥ ६ ॥

१२७

अभिमन्यूचा मी सुत । नाम माझें परिक्षित ॥ १ ॥
मुनीवरा मृग कोठें । पाहिलासी कीं तूं एथें ॥ २ ॥
बहुत पुशितां न बोले । नृप नेत्र लाल झाले ॥ ३ ॥
मृतसर्प धनुष्यानें । स्कंधीं टाकिला नृपानें ॥ ४ ॥
परी मुनि राहे शांत । नृपाळासी होई खेद ॥ ५ ॥
म्हणे समाधिस्थ मुनि । राव जातसे निघोनी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे क्षमा । भूषण तें तपोधना ॥ ७ ॥

१२८

शृंगी नामें सुत मुनीलागीं होता । तपस्वी तेजाचा महाव्रती ॥ १ ॥
उपासना श्रेष्ठ करी विधात्याची । येई आश्रमासी एक्यावेळीं ॥ २ ॥
कृश नामें मित्र मार्गांत भेटला । थट्टेनें बोलला वृत्त कांहीं ॥ ३ ॥
क्रोधाकुल होई शृंगी, तें पाहोनी । मित्र म्हणे मनीं गर्व नको ॥ ४ ॥
स्कंधीं सर्पशव वाही तुझा पिता । सहज बोलतां क्रुद्ध होसी ॥ ५ ॥
सांग तुझा कोठें गेला अभिमान । अयोग्य तें कर्म खेद मज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे क्रुद्ध मुनिसुत । परिक्षित वृत्त ऐकोनियां ॥ ७ ॥

अध्याय ४१ वा

१२९

क्रोधें शापी मुनिसुत । नृपा दंशिल तक्षक ॥ १ ॥
त्वरित आश्रमांत येतां । पाहूनियां क्रोध चित्ता ॥ २ ॥
अश्रू येती नयनांतूनी । म्हणे दंश सप्तमदिनीं ॥ ३ ॥
कुरुकुळाधम राजा । भोगील हा शाप माझा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे पिता । कोपूं नको म्हणे ताता ॥ ५ ॥

१३०

शांत शमीक बोलला । बाळा क्रोध न रुचे मला ॥ १ ॥
राजा आपुल्या देशाचा । वांटेकरी तो पुण्याचा ॥ २ ॥
जरी अपराध केला । तरी क्षमावें तयाला ॥ ३ ॥
धर्म, नाशकांस नाशी । राजा आधार धर्मासी ॥ ४ ॥
पंडुसम रक्षी आम्हां । क्षुधित पातला आश्रमा ॥ ५ ॥
व्रत नसेल ठाउकें । कृत्य वाटे अज्ञानाचें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मुनि-। शापें दुःख होई जनीं ॥ ७ ॥

१३१

राष्ट्र अराजक होतां दुःख थोर । जनतेसी चोर लुबाडिती ॥ १ ॥
दंडधारी नृप नांदवितो शांति । दुर्जनांसी भीति दंडामुळें ॥ २ ॥
निर्भय सुजन करिती धर्माचार । उद्वेगें आचार न घडे कांहीं ॥ ३ ॥
राजामुळें यज्ञ, यज्ञें देव सुखी । तेणें होई वृष्टि योग्यवेळीं ॥ ४ ॥
वृष्टीमुळें अन्न तेणें सुखी जन । सकळांसी कारण राव असे ॥ ५ ॥
श्रांत क्षुधित तो धार्मिक नृपाळ । शाप व्यर्थ, बाळ तयासी हा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शृंगीसी शमीक । अराजक दुःख कथी ऐसें ॥ ७ ॥

अध्याय ४२ वा

१३२

शृंगी म्हणे ताता माझी सत्य सत्य वाचा ॥

शमीक बोलती बाळा ऐक बोध माझा ॥ १ ॥
प्रौढही सुतासी बोध पित्यानें करावा ॥
सान तूं तरी अद्यापि कोप हा त्यजावा ॥ २ ॥
क्रोध पुण्यसंचयातें हरी, क्षमा श्रेष्ठ ॥
जितेंद्रिय मुनीलागीं क्षमा ती वरिष्ठ ॥ ३ ॥
क्षमाशील मीं, रायातें कळवीन शाप ॥
धाडिला दयावंतानें शिष्य 'गौरमुख' ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे गेला हस्तिनापुरांत ॥
पाहुनी नृपानें केलें तयाचें स्वागत ॥ ५ ॥

१३३

गौरमुख म्हणे राया शांत दांत । शमीक राज्यांत वसे तुझ्या ॥१॥
पुत्रानें तयाच्या शाप तुज दिला । तक्षक दंशाला पावसी तूं ॥ २ ॥
सप्तमदिनीं हा दंश तुज होई । करीं यत्न कांहीं मुनि सांगे ॥ ३ ॥
दयाळु मुनीचा अपमान झाला । खेद अंतराला नृपाळाच्या ॥ ४ ॥
क्षमा मजवरी करो मुनिराज । बोलोनी मंत्र्यास वृत्त कथी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे एका स्तंभावरी । प्रासादीं सामग्रीसह राहे ॥ ६ ॥

१३४

श्रेष्ठतम वैद्य, विप्र मंत्रसिद्ध । तैसेंचि औषध दिव्य घेई ॥ १ ॥
ऐसे षष्ठदिन प्रासादीं लोटले । भय ते पावले सर्व जन ॥ २ ॥
तक्षकासी मार्गीं कश्यप मांत्रिक । भेटतां स्वबलास कथीतसे ॥ ३ ॥
क्रोधें दंश करीं तक्षकासी म्हणे । स्वमंत्र बलानें वांचवीन ॥ ४ ॥
विद्येचें सामर्थ्य कळेल तुजसी । वंदी त्या विप्रासी वासुदेव ॥ ५ ॥

अध्याय ४३ वा

१३५

करीं म्हणे विप्रा निर्विष हा वृक्ष । बोलोनियां दंश करीतसे ॥ १ ॥
वटवृक्ष तदा दंशदग्ध होतां । सर्प म्हणे आतां बल दावीं ॥ २ ॥
पूज्य कश्यपानें आश्चर्यचि केलें । जावदीन दिलें वृक्षालागीं ॥ ३ ॥

सर्पराज म्हणे विद्या तुझी धन्य । मागें विप्रा धन विपुल मातें ॥४॥
चिंतूनी जाणिलें, मृत्यु नृपाळातें । घेउनी धनातें विप्र गेला ॥ ५ ॥
सर्पराज पुष्पें फळें नृपा अर्पी । धाडुनी सर्पांसी विप्रवेषें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भवितव्य थोर । न टळे, निर्धार ऐसा जाणा ॥ ७ ॥

१३६

दिन सप्तम संपला । सूर्य अस्ताचळीं गेला ॥ १ ॥
राव भक्षितसे फळें । म्हणे वचन मिथ्या झालें ॥ २ ॥
फळामाजी होती कीड । स्कंधीं ठेवियेलें तिज ॥ ३ ॥
राव म्हणे करो दंश । येवो सत्यता मुनीस ॥ ४ ॥
ऐसें बोलोनी हांसला । तोंचि सर्प प्रगटला ॥ ५ ॥
दंश करी तो रायासी । वासुदेव होई दुःखी ॥ ६ ॥

अध्याय ४४ वा

१३७

तक्षकाचें विष तीक्ष्ण । गेला प्रासाद जळून ॥ १ ॥
मंत्रि बहु दुःखी झाले । और्ध्वदेहिकातें केलें ॥ २ ॥
पुत्र त्याचा जनमेजय । राज्यीं स्थापिला निर्भय ॥ ३ ॥
पुढती काशिराज कन्या । सुलक्षणी ' वपुष्टमा ' ॥ ४ ॥
राणी जाहली राजाची । हिंडती ते वनराजी ॥ ५ ॥
परस्पर अनुरूप । मनी वासुदेवा सुख ॥ ६ ॥

अध्याय ४५–४६–४७ वा

१३८

त्याचकाळीं वनीं जरत्कारु मुनि । पितरांची वाणी ऐकोनियां ॥ १ ॥
वधूस्तव दुःखी होतां घडे लाभ । अर्पी सर्पराज भगिनी तया ॥ २ ॥
वासुकीसी म्हणे तूंचि हो पालक । वागतां विरुद्ध त्यागीन मी ॥३॥
वासुकीनें देतां मान्यता मुनींसी । स्वीकारी कन्येसी आनंदानें ॥ ४ ॥
मंदिरांत गेला कांतेसी बोलला । विरुद्ध मनाला न सहे माझ्या ॥५॥

विरुद्ध वागतां जाईन निघून । घेई अनुमोदन वदवूनी ॥ ६ ॥
पुढती कांहीं दिनीं गर्भवती कांता । वासुदेव चित्ता हर्ष वाटे ॥ ७ ॥

१३९

क्रोधशील पती परी सुख देई त्याला ॥
दक्ष सर्वदा ती राहे भय मानसाला ॥ १ ॥
अंकावरी निद्रा घेतां सूर्य अस्त होई ॥
संध्या टळे, उठवूं तरी क्रोध यासि येई ॥ २ ॥
ऐसें चिंतूनियां मनीं उठवी पतीला ॥
क्रुध्द होऊनियां मुनी बोलला सतीला ॥ ३ ॥
कैसा सूर्य अस्त होई निद्रा मज येतां ॥
घोर अपराध कैसा साहूं तुझा आतां ॥ ४ ॥
शोक न करींवो कांते हेतु पूर्ण होती ॥
पुत्र तपस्वी हा म्हणुनी गेला तो वनासी ॥ ५ ॥
ज्ञातीहितालागीं ऐसे क्लेश साही कन्या ॥
वासुदेव म्हणे ऐसी कन्या जगीं धन्या ॥ ६ ॥

अध्याय ४८ वा

१४०

वासुकीसी वृत्त कळे । दुःख तया बहु झालें ॥ १ ॥
करी सांत्वन भगिनीचें । हेतु कथी अंतरींचे ॥ २ ॥
निज ज्ञातिहित केलें । दुःखीं तुजसी लोटिलें ॥ ३ ॥
भगिनि म्हणे बंधुराया । माझी पवित्र ही काया ॥ ४ ॥
सुत सूर्यासम होई । ऐसें सांगुनि पती जाई ॥ ५ ॥
ऐसें ऐकोनी वासुकी । वासुदेव म्हणे सुखी ॥ ६ ॥

१४१

योग्य दिवस लोटतां । जन्म होई आस्तीकाचा ॥ १ ॥
अस्ति उदरीं हे भाक । म्हणुनी नाम तें ' आस्तीक ॥ २ ॥
होता विशाल बुद्धिचा । जरी अल्प तो वयाचा ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे बाळ । यत्नें सांभाळी मातुल ॥ ४ ॥

अध्याय ४९ वा

१४२

ऐका वृत्त मांत्रिकाचें । कळलें जनांसी तें कैसें ॥ १ ॥
चातुर्वर्ण्याचा आधार । अभिमन्यूचा कुमार ॥ २ ॥
प्रिय बहू गोविंदाला । षष्ठ्यद्वींत तो निमाला ॥ ३ ॥
काष्ठें आणायासी कोणी । गेला होता मुनि रानीं ॥ ४ ॥
वृक्षावरी ज्या बैसला । तक्षकें त्या दंश केला ॥ ५ ॥
मंत्रबळें वृक्षासवें । झालें मनुजरूप नवें ॥ ६ ॥
कथिलें त्या मानवानें । वृत्त जनासी प्रेमानें ॥ ७ ॥
सौति म्हणे जनमेजय । क्रुद्ध ऐकूनियां होय ॥ ८ ॥
येऊं नेदी जनीं झोंप । वासुदेव म्हणे कोप ॥ ९ ॥

अध्याय ५० वा

१४३

उपहास लोकीं होईल आपुला । म्हणूनी विप्राला तोषाविलें ॥ १ ॥
व्यक्तीसाठीं केला घात नृपाळाचा । घेईन तयाचा सूड आतां ॥ २ ॥
क्रोधें सर्व अंग परितप्त झालें । नेत्रांतुनी आले अश्रू त्याच्या ॥ ३ ॥
शांत होऊनियां आचमन केलें । पुढती योजिलें कार्य एक ॥ ४ ॥
निज मंत्र्यांलागीं म्हणे, तपोधन । देई आयुर्धन, कथितो वेद ॥५॥
वासुदेव म्हणे हेतु उत्तंकाचा । पूर्ण करूं आतां म्हणे नृप ॥ ६ ॥

अध्याय ५१ वा

१४४

सांगा सांगा हो उपाय । जेणें हेतु पूर्ण होय ॥ १ ॥
जनमेजय राव बोले । ऋत्विजांनीं उत्तर दिलें ॥ २ ॥
तुझ्यासाठीं सर्पसत्र । निर्मियेलें स्वर्गीं थोर ॥ ३ ॥
विधिविधाना सहित । सत्र आम्हालागीं ज्ञात ॥ ४ ॥
राव म्हणे सिद्ध व्हावें । त्वरित सत्र आरंभावें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भूमी । सिद्ध केली ऋत्विजांनीं ॥ ६

१४५

दीक्षा घेऊनियां सिद्ध होतां राव । झाला चमत्कार तयास्थानीं ॥१॥
लोहिताक्ष नामा कोणी सूत्रधार । जाणे शिल्पशास्त्र वास्तुविद्या ॥२॥
म्हणे योजना ही ऐसी मज भासे । विप्र या सत्रातें विघ्न करी ॥ ३ ॥
ऐसें तें भविष्य बोलतां सुतार । आज्ञेविण द्वार बंद होई ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सूर्याआड हस्त । धरितां प्रकाश कैसा थांबे ॥ ५ ॥

अध्याय ५२ वा

१४६

झाला प्रारंभ यज्ञासी । कृष्णवस्त्रें ऋत्विजांसी ॥ १ ॥
अग्निमुखादिक झालें । आवाहन सर्पां केलें ॥ २ ॥
कंप पावोनियां येती । कितिक येती काकुळती ॥ ३ ॥
एकमेकां बिलगूनी । दुःखें आक्रोश करूनी ॥ ४ ॥
पटापट पडती कुंडीं । येती झुंडीमागें झुंडी ॥ ५ ॥
श्वेत कृष्ण नील कोणी । बळी नाग, भक्षी अग्नि ॥ ६ ॥
अश्वहस्तींसम देह । म्हणे नाग, वासुदेव ॥ ७ ॥

अध्याय ५३ वा

१४७

चंडभार्गव तो 'होता' । जाणा जैमिनि उद्गाता ॥ १ ॥
ब्रह्मा झाला शार्ङ्गरव । अध्वर्यूहि तो पिंगल ॥ २ ॥
शिष्यासह व्यासमुनि । झाले सदस्य त्या स्थानीं ॥ ३ ॥
श्वेतकेतु उद्दालक । असित देवल नारद ॥ ४ ॥
ऐसे सदस्य अनेक । वसा-मेदांचा तैं पाट ॥ ५ ॥
वासुदेवासी दुर्गंध । कानीं येई दीन शब्द ॥ ६ ॥

१४८

ऐकोनियां सर्पवृत्त । शरण इंद्रासी तक्षक ॥ १ ॥
तेणें अभय लाभे त्यासी । तदा व्याकुळ वासुकी ॥ २ ॥

हृदय जाहलें विदीर्ण । होई नागराज दीन ॥ ३ ॥
जरत्कारूसी बोलत । आतां पाहूं नको अंत ॥ ४ ॥
आस्तीकासी आज्ञा करीं । सोडवीं या अंतकाळीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे थोर । नागांवरी वेळ घोर ॥ ६ ॥

अध्याय ५४ वा

१४९

पाचारूनियां पुत्रासी । म्हणे जरत्कारु त्यासी ॥ १ ॥
बाळा जन्म सार्थ करीं । कुळ आपुलें उद्धरीं ॥ २ ॥
कथूनियां सकल वृत्त । म्हणे वांचवीं हे सर्प ॥ ३ ॥
मातृवचन मानूनी । जातों म्हणे यज्ञस्थानीं ॥ ४ ॥
भयविव्हल वासुकी । आस्तीक अभय देई त्यासी ॥ ५ ॥
बाळ येई यज्ञस्थानीं । आस्तीक तो महाज्ञानी ॥ ६ ॥
करी प्रशंसा रायाची । वासुदेव वृत्त कथी ॥ ७ ॥

अध्याय ५५ वा

१५०

भारताग्रणी तूं राजा, धन्य धन्य याग ॥
प्रजापती इंद्रासम श्रेष्ठ राजराज ॥ १ ॥
भाससी कुबेरासम कीं दाशरथीराम ॥
प्रिय आमुच्या जीवांचें होईल, कल्याण ॥ २ ॥
कीर्तिवंत पूर्वज जैसा होइ राव धर्म ॥
तैंवि तूं नृपाळा प्रियजनांचें कल्याण ॥ ३ ॥
ऋत्विज लाभला तुज कृष्णद्वैपायन ॥
श्रेष्ठ विप्र सकलहि येथें जीवांचें कल्याण ॥ ४ ॥
विविध प्रकारें ऐसें स्तवन करीत ॥
राजासह ऋत्विजांतें आवडे आस्तीक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जनीं स्तुति दिव्य मंत्र ॥
विश्वमोहिनी ती वाटे सिद्धिदायि यंत्र ॥ ६ ॥

70430

अध्याय ५६ वा

१५१

राव जनमेजय म्हणे । वृद्ध बाळ हा विद्वान ॥ १ ॥
झालों संतुष्ट मनांत । वर द्यावा ऐसा हेत ॥ २ ॥
विप्र म्हणती हेतु पूर्ण–। करीं, विप्र हा विद्वान ॥ ३ ॥
'होता,' म्हणे राजालागीं । तक्षक येऊं द्यावा आधीं ॥ ४ ॥
इंद्र आश्रयासी गेला । ऐसें कळलें राजाला ॥ ५ ॥
'तक्षका ये इंद्रासवें' । म्हणतां नवलाचि झालें ॥ ६ ॥
इंद्र तक्षक गगनीं । होती प्रगट त्या स्थानीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे गेला । इंद्र त्यजुनी तक्षकाला ॥ ८ ॥

१५२

तक्षक पाहोनी 'होता' संतोषला। तोष दे विप्राला आतां म्हणे ॥१॥
राव म्हणे मागें अदेयहि आतां । देईन तत्वतां तुजलागीं ॥ २ ॥
होता म्हणे येई मंत्र सामर्थ्यानें । तक्षक दुःखानें हांका मारी ॥ ३ ॥
सोडूनियां इंद्र गेला स्वस्थानासी । फिरे हा आकाशीं मंत्रबळें ॥४॥
आस्तीक बोलला सत्र होवो पूर्ण । वांचोत हे प्राण तक्षकाचे ॥ ५ ॥
खिन्न राव म्हणे अन्य मागें वर । आस्तीक निर्धार तोचि कथी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अंतीं वर दिला । संतोष जाहला सकळांसी ॥ ७ ॥

अध्याय ५७ वा

१५३

सत्रामाजी सर्प कोट्यवधि मेले । मुख्य मुख्य गेले त्यांचीं नांवें ॥१॥
शलपालादिक प्रकालन, पूर्ण, । पिच्छल, शरण, हलीमक, ॥ २ ॥
वासुकी वंशाचे नाग ऐसे गेले । सुरोम्यादि गेले तक्षकाचे ॥ ३ ॥
एरक, कुंडल, वेणी, कुमारक, । कौरव्य कुळांत नष्ट होती ॥ ४ ॥
शंकुकर्ण, दरि, कुठारमुखहि । धृतराष्ट्रगृहीं शोक त्यांचा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसे बहु नाग । गेले इहलोक सोडूनियां ॥ ६ ॥

अध्याय ५८ वा

१५४

सौति बोलला शौनका । आस्तीकाचें तेज ऐका ॥ १ ॥
येतां तक्षक गगनीं । त्रिवार तो बोले वाणी ॥ २ ॥
थांब थांब म्हणतां नभीं । राहिला तो अधोमुखी ॥ ३ ॥
वर आस्तीकासी देतां । प्राण वांचे तक्षकाचा ॥ ४ ॥
सूत्रकारासी, वचन । सत्य होतां लाभे धन ॥ ५ ॥
राव म्हणे आस्तीकासी । यावें पुढती यज्ञासी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मान । केला योग्यता जाणून ॥ ७ ॥

१५५

आस्तीक जावोनी मातेसी भेटला । नागांच्या चित्ताला हर्ष होई ॥१॥
प्राणरक्षका तूं माग वर कांहीं । उपकार पाहीं थोर केले ॥ २ ॥
मुनि म्हणे भय नसावें सर्वथा । यज्ञाचें या गातां वृत्त कोणा ॥३॥
वासुदेव म्हणे मंत्र ते कथिती । भयाची निवृत्ति करिती ऐसे ॥ ४ ॥

१५६

असित आर्तिमंत सुनीथ स्मरतां । दिवा-रात्रि चित्ता भय नसे ॥१॥
जरत्कारुपुत्र आस्तीक यशस्वी । सर्पांस वांचवी सर्पसत्रीं ॥ २ ॥
स्मरतों मी त्यासी हिंसा ऐसी माझी । सर्पहो तुम्हांसी योग्य नसे ॥३॥
सर्पा जा असावें तुझें बा कल्याण । जा जा तूं एथून विषसर्पा ॥४ ॥
जनमेजयमखीं आस्तीकवचन । स्मरुनी जो जाण न फिरे मागें ॥५॥
वासुदेव म्हणे शतधा विदीर्ण । शिंशफलसम शिर त्याचें ॥ ६ ॥

१५७

कथूनियां ऐसा मंत्र । देती मान्यता ते सर्व ॥ १ ॥
गेला आस्तीक निघोनी । झाला धन्य तो या जनीं ॥ २ ॥
सौति म्हणे शौनकासी । कथा आस्तीकाची ऐसी ॥ ३ ॥
श्रवण कीर्तन जो करी । सर्पभय जाई दुरी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे धन्य । पर्व आस्तीक संपूर्ण ॥ ५ ॥

——×——

# अंशावतरणपर्व ६

## अध्याय ५९

### १५८

म्हणे शौनक सौतीसी । सांगे आतां भारतासी ॥ १ ॥
जनमेजयाच्या सत्रांत । कथी व्यास जें जनांस ॥ २ ॥
सौति म्हणे मुनिवरा । सांगतों तें श्रवण करा ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे सौति । सांगे महाभारतासी ॥ ४ ॥

## अध्याय ६० वा

### १५९

जनमेजय करी यज्ञ । येती कृष्णद्वैपायन ॥ १ ॥
सत्यवती पराशर । माता पितरें तीं थोर ॥ २ ॥
जन्मतांचि थोर झाला । व्यास नाम असें त्याला ॥ ३ ॥
शास्त्रविद्या पारंगत । आत्मज्ञानि तो प्रसिद्ध ॥ ४ ॥
त्रिकालज्ञ मंत्रद्रष्टा । वेद विभागांचा कर्ता ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे व्यास । राखी शांतनूवंशास ॥ ६ ॥

### १६०

स्वागत व्यासांचें करी जनमेजय । म्हणे ग्रंथ 'जय' सांगा आम्हां ॥१॥
वैशंपायनासी व्यास आज्ञा देती । महाभारतासी कथावया ॥ २ ॥
मानूनियां वंद्य सद्गुरु आज्ञेसी । कथी सकलांसी जयग्रंथ ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे कौरव पांडव । नष्ट होती सर्व वैरामुळें ॥ ४ ॥

## अध्याय ६१–६२ वा

### १६१

वंदूनि मुनींसी एकाग्र मनानें । विद्वज्जन प्रेमें वंदीयेले ॥ १ ॥
संक्षेपें कथिलें सकल भारत । राव म्हणे वृत्त सर्व सांगें ॥ २ ॥
दुर्योधनादिक दुरात्मे छळितां । क्लेश धर्मादिकां सहन कैसे ॥ ३ ॥
क्रोधातें आंवरी वृकोदर केंवि । द्रौपदी न देई शाप कैसा ॥ ४ ॥

वनवास कैसा भोगिला वीरांनीं । विजय त्यां रणीं प्राप्त कैसा ॥ ५ ॥
व्यास शिष्य म्हणे धीर धरीं राया । पावन हे काया श्रवणें याच्या ॥६॥
वासुदेव म्हणे वैशंपायनानें । महत्त्व प्रेमानें कथिलें नृपा ॥ ७ ॥

१६२

रचिले व्यासांनीं लक्ष भारताचे श्लोक ॥
श्रोत्यांवक्त्यांलागीं तेणें प्राप्त ब्रह्मलोक ॥ १ ॥
प्रेम स्वधर्माचें येणें होई पापमुक्ति ।
लाभ विजयाचा घडे पुरुषार्थ प्राप्ति ॥ २ ॥
ऐकवील पितरांसी जो अक्षय्य तें श्राद्ध ॥
धर्म सकल, मोक्षहि कथिला, नीति धर्म शुद्ध ॥ ३ ॥
संकीर्तनें याच्या जाती पातकें जळून ।
वर्षत्रय श्रवणें होती सर्व इच्छा पूर्ण ॥ ४ ॥
पवित्र होवोनी गावें श्रवण करावें ।
रत्ननिधीचें या प्रेमें दान हो करावें ॥ ५ ॥
वर्षें तीन वेंचूनियां रचिलें व्यासांनीं ॥
नसे यांत तें न मिळे शोधितां अवनीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शुद्ध होवोनियां ऐका ।
चुकेल सख्यांनो जन्म मरणाचा धोका ॥ ७ ॥

## अध्याय ६३ वा

१६३

वैशंपायनाची वाणी ती रसाळ । म्हणे उपरिचर राजा होता ॥१॥
त्याग करूनियां आपुल्या राज्याचा । धारिला तपाचा मार्ग तेणें ॥२॥
पाकशासनादि देव त्या भेटले । स्वधर्मासी केलें प्रवृत्त त्या ॥ ३ ॥
इंद्र म्हणे माझा तूंचि एक सखा । या मृत्युलोकींचा जाण राया ॥४॥
चेदि देशामाजी राज्य करीं सुखें । देश तो जनांतें स्वर्गासम ॥ ५ ॥
स्फटिकाचें देतों तुजसी विमान । इंद्रमाला चिन्ह होवो तुझें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे इंद्र देई यष्टि । नृपासी वेळूची संरक्षणा ॥ ७ ॥

१६४

संवत्सरा अंतीं यष्टि रोंवियेली। भूषणें शोभलीं अन्य दिनीं ॥ १ ॥
ध्वजपूजन तें अद्यावधि चाले। उत्सवासी दिले वर बहु ॥ २ ॥
ध्वज उभारितां यशलाभ होई। चेदिदेशीं राही उपरिचर ॥ ३ ॥
पांच पुत्रांलागीं अभिषेक केला। नामें नगरांला त्यांचीं देई ॥ ४ ॥
विमानीं बैसोनी अंतरिक्षीं राहे। नाम सार्थ पाहे वासुदेव ॥ ५ ॥

१६५

शुक्तिमती सरिता वाहे नगरासमीप ॥
कोलाहल[1] पर्वतानें अडविली देख ॥ १ ॥
हाणियली लत्ता नृपें पर्वतासी जेव्हां ॥
खिंडार पडूनी वाहे नदी पुढें तेव्हां ॥ २ ॥
कोलाहल संगतीनें कन्या पुत्र होती ॥
वसुप्रदालागीं[2] करी नृप सेनापती ॥ ३ ॥
कन्या अर्पिली रायातें ' गिरिका[3] ' नदीनें ॥
योग्यकाळीं ऋतुमती होई ती स्वभावें ॥ ४ ॥
पितर आज्ञेनें नृप मृगयेसी जाई ॥
स्मरण कांतेचें तया वनामाजी होई ॥ ५ ॥
श्येनपक्षासंगें वीर्य धाडिलें नृपानें ॥
भक्ष्य मानुनी पाडियलें जळीं अन्य श्येनें ॥ ६ ॥
मत्स्यरूपिणी आद्रिका[4] सेवन करोनी ॥
गर्भवती होई उदकीं विस्मय हा जनीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे जाळें यमुनाजळांत ॥
टाकितांचि धीवरातें कन्या पुत्र प्राप्त ॥ ८ ॥

१६६

उपरिचरासी दाविली आणोनी। पुत्रासी ठेवोनी घेई राजा ॥ १ ॥

---

१ पर्वताचें नांव. २ कोलाहलाचा पुत्र. ३ कोलाहल आणि शुक्तिमती यांची कन्या. ४ मत्स्यीरूपी अप्सरा.

तोचि मत्स्यराजा धार्मिक विख्यात । आद्रिका ते मुक्त होई तदा ॥२॥
मानवी अपत्यें होतां मत्स्यदेहीं । ब्रह्मा म्हणे येई स्वर्गामाजी ॥ ३ ॥
दुर्गंधि अंगासी येई म्हणोनियां । धीवरासी कन्या देई नृप ॥ ४ ॥
सत्यवती नाम ठेविलें तियेसी । नौका यमुनेसी चालवी ते ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भाग्य तैसा योग । घडुनी सहज येई लोकीं ॥ ६ ॥

१६७

पुण्यवेळीं पराशर । यमुनेच्या तीरावर ॥ १ ॥
येतां पाहिली ती कन्या । मोह अनावर त्यांना ॥ २ ॥
नौका जळामाजीं जातां । हेतु बोलती मनींचा ॥ ३ ॥
कन्या म्हणे दोन्ही तटीं । जन दुरोनी प हाती ॥ ४ ॥
पराशर पाडी धुकें । कन्या पाहे तें कौतुकें ॥ ५ ॥
कौमार्य न भंग पावो । हेतु हाचि पूर्ण होवो ॥ ६ ॥
कन्या वासुदेव म्हणे । दुर्गंध हा घालविणें ॥ ७ ॥

१६८

गंधवती, योजनगंधा । नामें ख्यात ऐसीं जगा ॥ १ ॥
ऋतुमति ती तात्काळ । अद्वितीय तपोबळ ॥ २ ॥
पुत्र तात्काळचि होई । व्यास नामें तया ठाईं ॥ ३ ॥
स्मरण करितांचि येईन । कथुनी मुनि गांठी वन ॥ ४ ॥
द्वीपामाजी माता ठेवी । म्हणुनी द्वैपायन होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे व्यास । करी वेद विभागांस ॥ ६ ॥

१६९

कृत त्रेतादि युगांत । होई धर्माचा संकोच ॥ १ ॥
कलियुगीं एक पाद । राहियेला अवशिष्ट ॥ २ ॥
रक्षणार्थ केल्या शाखा । पाहूनियां ही अवस्था ॥ ३ ॥
ऋषि सुमंतु जैमिनि । पैल वैशंपायनमुनि ॥ ४ ॥

पुत्र महामुनि शुक । व्यासांचे हे मुख्य शिष्य ॥ ५ ॥
वेदांसह भारतासी । पढविलें त्या सर्वांसी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । अष्टवसुअंश जाण ॥ ७ ॥

१७०

आळ येई जेव्हां अणिमांडव्यासी । शूळावरी त्यासी चढविलें ॥१॥
बाळपणीं क्षुद्र पक्ष्यासी टोंचिलें । अन्य पाप झालें नाहीं कांहीं ॥२॥
ऐसें असोनियां वध हा मजसी । म्हणोनी यमासी शापियेलें ॥३॥
शूद्रयोनीमाजी जन्म पावसील । विदुर तो शील श्रेष्ठ ज्याचें ॥४॥
गवल्गणांचा तो संजय जाणावा । मोद वासुदेवा ऐकोनियां ॥ ५ ॥

१७१

सूर्यापासूनी कुंतीसी । कर्ण नाम त्या सुतासी ॥ १ ॥
सहज कवच कुंडलें । तेज तयाचें आगळें ॥ २ ॥
वासुदेव देवकीचा । बाळ आधार जगाचा ॥ ३ ॥
अंधक वृष्णींच्या वंशांत । येई धर्मरक्षणार्थ ॥ ४ ॥
सत्यकाचा तो सात्यकि । कृतवर्मा हृदिकासी ॥ ५ ॥
दोघे प्रख्यात यादव । ऐका म्हणे वासुदेव ॥ ६ ॥

१७२

भरद्वाजमुनिसुत द्रोण झाला । गौतम मुनीला कृप कृपि ॥ १ ॥
कृपि द्रोणांचा तो सुत अश्वत्थामा । धृष्टद्युम्न जाणा द्रुपदाचा ॥२॥
यज्ञवेदीमाजी द्रौपदी जन्मली । शकुनी गांधारी सुबलासी ॥ ३ ॥
विचित्रवीर्याच्या क्षेत्रामाजी दोन । कृष्ण-द्वैपायन पुत्र अर्पी ॥ ४ ॥
धृतराष्ट्र पंडु ऐसीं नामें त्यांचीं । शूद्रयोनीमाजी विदुर जन्मे ॥ ५ ॥
धर्म तो यमाचा वायूचा तो भीम । इंद्राचा अर्जुन धनुर्धारी ॥ ६ ॥
पुत्रे हे कुंतीचे, माद्रीलागीं दोन । कुमारांपासून पुत्र होती ॥ ७ ॥
नकुळ सहदेव ऐसीं त्यांचीं नामें । वासुदेव प्रेमें ग्रंथ सांगे ॥ ८ ॥

१ अश्विनीकुमार

१७३

शत पुत्र धृतराष्ट्रासी । एकादश महारथी ॥ १ ॥
युयुत्सु तो वैश्यस्त्रीचा । अभिमन्यु सुभद्रेचा ॥ २ ॥
प्रतिविंध्य, सुतसोम, । श्रुतकीर्ति श्रुतसेन ॥ ३ ॥
शतानीक ऐसे पांच । पुत्र होती द्रौपदीस ॥ ४ ॥
घटोत्कच तो भीमाचा । शिखंडीहि द्रुपदाचा ॥ ५ ॥
ऐसीं प्रमुखांचीं नामें । वासुदेव गातो प्रेमें ॥ ६ ॥

अध्याय ६४ वा

१७४

जनमेजय म्हणे वैशंपायनासी । नृप चरित्रासी सांगें मज ॥ १ ॥
येरु म्हणे गूढ रहस्य देवांचें । वंदुनी ब्रह्म्यातें कथितों तुज ॥ २ ॥
परशुरामें केली निःक्षत्रिया पृथ्वी । क्षत्रिय उत्पत्ति करिती विप्र ॥३॥
क्षत्रिय स्त्रियांसी ऋतुदान देतां । पुढें क्षत्रियांचा वंश वाढे ॥ ४ ॥
पुनरपि लोक सुखी वर्णधर्मैं । वासुदेव म्हणे गूढधर्म ॥ ५ ॥

१७५

श्रेष्ठ वर्णाशीं संगत । होतां केवळ अपत्यार्थ ॥ १ ॥
दोष न लागे स्त्रियांसी । इच्छा नसावी कामाची ॥ २ ॥
ऐसा नियम धर्माचा । काळ कठिण तो येतां ॥ ३ ॥
अधिकारें क्षत्रियांनीं । सुखी केली ही अवनी ॥ ४ ॥
जन स्वस्वधर्मीरत । पुढती भूमीवरी दैत्य ॥ ५ ॥
वासुदेव धर्मग्लानि । झगे करिती येवोनी ॥ ६ ॥

१७६

पृथ्वी जाहली संत्रस्त । ब्रह्मदेवासी विनवीत ॥ १ ॥
त्यासी मनोगत कळे । अभय भूमीसी दिधलें ॥ २ ॥

---

१ धृतराष्ट्रास त्याच्या वैश्यस्त्रीपासून झालेला पुत्र.

देव गंधर्वांसी ब्रह्मा । म्हणे निवारा दैत्यांना ॥ ३ ॥
सकल विनविती विष्णूसी । म्हणे तथास्तु तो त्यांसी ॥ ४ ॥
देव दानव भूलोकीं । म्हणे वासुदेव येती ॥ ५ ॥

---

## संभवपर्व ७

### अध्याय ६५ वा

१७७

सकळहि देव घेती अवतार । अवनीचा भार दूर होई ॥ १ ॥
विस्तार तयाचा वैशंपायनानें । कथिला क्रमानें जनमेजया ॥ २ ॥
मरीच्यादि सहा पुत्र ते ब्रह्म्याचे । मरीचि पुत्रांतें दक्ष नांव ॥ ३ ॥
त्रयोदशकन्या दक्षालागीं होती । आदित्य संतति अदितीची ॥ ४ ॥
कनिष्ठ आदित्य, विष्णु गुणवान । दितीचा हिरण्यकशिपु तो ॥ ५ ॥
प्रल्हादादि पुत्र पांच झाले त्यासी । तीन प्रल्हादासी पुत्र जाणा ॥६॥
विरोचन सुत बळी, पुत्र त्याचा- । बाण, देव ज्याचा महाकाळ ॥७॥
वासुदेव म्हणे पुत्र ते दनूस । जाहले चाळीस सुविख्यात ॥ ८ ॥

१७८

राहुप्रमुख ते पुत्र सिंहिकेसी । क्रोधेची संतती असंख्यात ॥ १
विक्षरादि चार पुत्र दनायूचे । तैसेचि कालेचे पुत्र चार ॥ २ ॥
असुर गुरूसी पुत्र होती चार । ऐसा हा विस्तार कथिला सर्व ॥३॥
अप्सरा गंधर्व तेही कथियेले । ब्राह्मणादि झाले कपिलेसी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे वंश हे ऐकतां । संतति संपदा प्राप्त होई ॥ ५ ॥

### अध्याय ६६ वा

१७९

अकरा रुद्र ते स्थाणूचे । गुरु आदि अंगिराचे ॥ १ ॥
पुत्र अनेक अत्रीसी । वेदवेत्ते शांत ऋषि ॥ २ ॥
यक्ष किन्नर वानर । राक्षस पुलस्त्याचे पुत्र ॥ ३ ॥

---

१ कामधेनु

पुलहाचे ते शलभ । सिंह ऋक्ष वृक व्याघ्र ॥ ४ ॥
वालखिल्य ते क्रतूचे । वासुदेव म्हणे साचे ॥ ५ ॥

१८०

अपसव्य अंगुष्ठाचा । दक्ष तपस्वी जो मोठा ॥ १ ॥
सव्यापासुनि मुनि कांता । पंचदश कन्या त्यांच्या ॥ २ ॥
पुत्र सर्व नष्ट झाले । पुत्रिकांसी सांभाळीलें ॥ ३ ॥
कन्या दश त्या धर्मासी । सप्तविंशति चंद्रासी ॥ ४ ॥
त्रयोदश कश्यपाला । ऐशा सर्व कन्या दिल्या ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । वंशविस्तार पूर्वीचा ॥ ६ ॥

१८१

कीर्ति लक्ष्मी धृति मेधा । पुष्टि क्रिया बुद्धि श्रद्धा ॥ १ ॥
तेंवि लज्जा आणि मति । द्वारें धर्माचीं बोलती ॥ २ ॥
चंद्रस्त्रिया तीं नक्षत्रें । अष्टवसु ते ऐकावे ॥ ३ ॥
प्रजापतीचे तनय । धर ध्रुव सोम अह ॥ ४ ॥
अनिल अनल प्रत्यूष । प्रभास हे ऐसे आठ ॥ ५ ॥

१८२

भेदूनियां दक्षिण स्तन । ब्रह्मयासी तो झाला धर्म ॥ १ ॥
काम शम हर्ष, सुतां । स्त्रिया रति प्राप्ति नंदा ॥ २ ॥
सूर्यभार्येतें अश्विनी । लाभले ते सुत दोन्ही[1] ॥ ३ ॥
वसु[2] आदित्य[3] ते रुद्र[4] । प्रजापति[5] वषट्कार[6] ॥ ४ ॥
ऐसे तेहेतीस कोटी । देव जाणावे या लोकीं ॥ ५ ॥
हृदय विदारुनी जन्मे । पुण्यवंत भृगु नामें ॥ ६ ॥
पापमुक्ति संकीर्तनें । त्याच्या वासुदेव म्हणे ॥ ७ ॥

१८३

जाणा कवि भृगुपुत्र । त्याचा सुत ग्रह-शुक्र ॥ १ ॥

---

१ अश्विनीकुमार, २ वसु आठ, ३ आदित्य बारा, ४ रुद्र अकरा, ५ प्रजापति एक, ६ वषट्कार एक.

दोन रूपें धरी तोची । गुरुदेव असुरांसी ॥ २ ॥
त्रैलोक्याच्या योगक्षेमा । केली तयाची योजना ॥ ३ ॥
पुढें भृगूसी च्यवन । झाला सद्गुणसंपन्न ॥ ४ ॥
जाणे और्वाचा ऋचिक । जमदग्नि त्याचा सुत ॥ ५ ॥
त्याचा राम जनीं ख्यात । चारी पुत्रांमाजी श्रेष्ठ ॥ ६ ॥
सृष्टि त्रिविध ते जाण । धर्माधर्म साधारण ॥ ७ ॥
साधारण सृष्टि आतां । वासुदेव ह्मणे ऐका ॥ ८ ॥

१८४

धाता विधात्यांचें औदासिन्य थोर । ब्रह्मदेव पुत्र ख्यात जनीं ॥१॥
कमलालया लक्ष्मी तयांची भगिनी । अश्व जे गगनीं लक्ष्मी सुत॥२॥
वरुण पुत्र बल, सुरा कन्या त्याची । सौख्य ती देवांसी देई सदा ॥३॥
परस्परांलागीं भक्षि प्रजा जेव्हां । अधर्म हा तेव्हां प्रगटला ॥ ४ ॥
निर्ऋति तयाची भार्या तीन सुत । भय, महाभय, मृत्यु, त्यांचे ॥५॥
संपाति जटायू अरुणाचे पुत्र । ऐसा हा विस्तार कथियेला ॥ ६ ॥
वासुदेव ह्मणे शुक कपि मृग । व्याघ्र सिंह गज कथिले येथें ॥ ७ ॥

अध्याय ६७ वा

१८५

ह्मणे जनमेजय जन । देव दानव ते कोण ॥ १ ॥
मुनि म्हणे ‘ विप्रचित्ति ’ । जरासंध जाणे चित्तीं ॥ २ ॥
शिशुपाल तो उन्मत्त । पिता तयाचा प्रल्हाद ॥ ३ ॥
जाणे शल्य तो संह्लाद । धृष्टकेतु अनुह्लाद ॥ ४ ॥
शिबि द्रुमराजा झाला । बाष्कल भगदत्त बोला ॥ ५ ॥
स्वभानु तो उग्रसेन । महासुर अशोक जाण ॥ ६ ॥
दीर्घप्रज्ञ वृषपर्वा । शाल्व असुर अजक झाला ॥ ७ ॥
म्हणे वासुदेव कंस । झाला कालनेमि दैत्य ॥ ८ ॥

१८६

बृहस्पतिअंशें द्रोणाचार्य होती । कुलाची ते कीर्ति वाढवाया ॥१॥
महादेव यम क्रोध तेंवि काम । अश्वत्थामा जाण अंश त्यांचा ॥ २ ॥

वसिष्ठ शापानें वसु भीष्म होती । कृपाचार्य होती रुद्रगण ॥ ३ ॥
द्वापर तो जाणा शकुनी नामें नृप । सात्यकी द्रुपद मरुद्गण ॥ ४ ॥
विराट कृतवर्मा तेही मरुतांचे । धृतराष्ट्र पंडु ते गंधर्वांचे ॥ ५ ॥
दुर्योधन जाणे कलीचा तो अंश । पुलस्त्याचे पुत्र बंधु त्याचे ॥ ६ ॥
शतपुत्र तैसी दुःशला भगिनी । युयुत्सु मिळोनी दुहोत्तर ॥ ७ ॥
अभिमन्यु तोचि सोमपुत्र वर्चा । वासुदेव वाचा साधारही ॥ ८ ॥

१८७

अल्प वयामाजी येईल लढोनी । ऐसें त्या देवांनीं वचन दिलें ॥ १ ॥
अर्ध दिनामाजी अर्धपाद सैन्य । बाळ निर्दळून निघुनी गेला ॥ २ ॥
अग्नीचा तो अंश धृष्टद्युम्न वीर । शिखंडी असुर एक होता ॥ ३ ॥
विश्वेदेवांचे ते द्रौपदी तनय । म्हणे वासुदेव वृत्त ऐका ॥ ४ ॥

१८८

शूरसन होता वासुदेव पिता । कन्या नाम पृथा होतें तिचें ॥ १ ॥
पितृभगिनीचा पुत्र कुंतिभोज । पृथा त्या अपत्य शूरें दिलें ॥ २ ॥
पालक पित्याची आज्ञा मान्य करी । विप्रसेवा करी पृथा प्रेमें ॥ ३ ॥
दुर्वास संतोषें देती दिव्य मंत्र । जपतां जे पुत्र लाभ घडे ॥ ४ ॥
प्रयोगार्थ जपे पृथा एक मंत्र । सूर्यासम पुत्र प्राप्त होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भयाकुल पृथा । सोडोनी उदकामाजी देई ॥ ६ ॥

१८९

नळीं लाभे अधिरथा । देई करांत राधेच्या ॥ १ ॥
वसुषेण नाम त्यासी । ठेऊनियां वाढविती २ ॥
वसुषेण करितां जप । देई यथेच्छ दानास ॥ ३ ॥
कवच कुंडलें सहज । मागे त्यासी देवराज ॥ ४ ॥
करुनी कर्तन तीं देई । वैकर्तन संज्ञा येई ॥ ५ ॥
इंद्र पावोनी संतोष । अर्पी वासवी शक्तीस ॥ ६ ॥
तोचि पुढती ख्यात नाम । दुर्योधन मित्र कर्ण ॥ ७ ॥
शेष बळिभद्र झाला । वासुदेव वंदी त्याला ॥ ८ ॥

१९०

सोळा सहस्र कृष्ण कांता। अप्सरांचा गण साचा ॥ १ ॥
रुक्मिणी ते कमलादेवी,। 'कृष्णा' इंद्रअंशें झाली ॥ २ ॥
नीलकमलासम गंध। वैडूर्यचि जिचें अंग ॥ ३ ॥
कुंति माद्रि सिद्धि धृति। गांधारी ते देवी मति ॥ ४ ॥
श्रवणें वासुदेव म्हणे। संकटांत धैर्य येणें ॥ ५ ॥

अध्याय ६८–६९ वा

१९१

कौरवांचा मूळ पूर्वज दुष्यंत। राव भाग्यवंत सुलक्षणी ॥ १ ॥
पालक पृथ्वीचा वर्ण आश्रमांचा। अद्भुत शक्तीचा शांतिशील ॥२॥
मृगयेसी गेला गहन वनांत। सैन्य चतुरंग संगें त्याच्या ॥ ३ ॥
तया वनीं थोर व्याघ्र सिंह मृग। करीत त्यां वेध जाई पुढें ॥ ४ ॥
असंख्यात व्याघ्र सिंह गज मेले। कित्येक पळाले सैरावैरा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सैनिक तोषले। यथेच्छ भक्षिलें मृग मांस ॥ ६ ॥

अध्याय ७० वा

१९२

राव पाठलाग करी एक्या हरिणाचा ॥
सहज शोध लागे त्यासी रम्य आश्रमाचा ॥ १ ॥
वायु मंद मंद वाहे सुगंध त्या स्थानीं ॥
भूमी आच्छादूनी गेली कोंवळ्या तृणांनीं ॥ २ ॥
पुष्पफळांनीं तरुवेली वांकुनियां जाती ॥
पक्षी मंजुळ स्वरानें कूजन करीती ॥ ३ ॥
सुखावह तेथें होती घनगर्द छाया ॥
भ्रमर गुंजती किती तपोवनीं तया ॥ ४ ॥
जागजागीं पुष्पवृष्टि होई राजावरी ॥
आश्रम दुरूनी एक पाही नदीतीरीं ॥ ५ ॥

वासुदेव म्हणे राजा प्रसन्न मनांत ॥
दुरूनीच आश्रमासी जोडीतसे हात ॥ ६ ॥

१९३

रम्य सरिता मालिनी । वहातसे तया वनीं ॥ १ ॥
स्फटिकासमान तें नीर । आश्रमांनीं नटलें तीर ॥ २ ॥
यज्ञशाला त्या बहुत । हर्षे नृपाळाचें चित्त ॥ ३ ॥
वाटे सकळांचें जीवन । मालिनीसी त्या पाहून ॥ ४ ॥
वाळवंटी चक्रवाक । पुष्पें, फेंस प्रवाहांत ॥ ५ ॥
ऋक्ष वानर त्या स्थानीं । ऐकूं येई वेदध्वनि ॥ ६ ॥
होता महात्म्याकण्वाचा । पावन तो आश्रम साचा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐका । मत्त मयूरांच्या केका ॥ ८ ॥

१९४

आश्रमाबाहेरी तळ देऊनियां । म्हणे मुनीपायां वंदीन मीं ॥ १ ॥
तपोवन त्याची क्षुधा तृषा हरी । राजचिन्हें करी राजा दूर ॥ २ ॥
मंत्री पुरोहित घेवोनी चालला । कण्वशिष्य त्याला दिसती मार्गीं ॥३॥
ऋग् यजुः सामाचें पठण चाललें । पारायण चाले जटा घन ॥ ४ ॥
शास्त्रचर्चा तैसी शिक्षादिक अंगें । ऐकूं येई मार्गें जातां हेंचि ॥ ५ ॥
न्याय वेदान्ताचे होती पूर्वपक्ष । मुनि ते व्रतस्थ सकलहि ॥ ६ ॥
जप होमामाजी तत्पर ते कोणी । देवतापूजनीं कोणी रत ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे संरक्षित स्थान । ब्रह्मलोकासम पाही राजा ॥ ८ ॥

अध्याय ७१ वा

१९५

अपूर्व आश्रमीं राजा प्रवेशतां । मंत्रि पुरोहितां ठेवी बाहि ॥ १ ॥
आश्रमीं न दिसे कण्वमुनि त्यासी । कोण या स्थळासी म्हणे नृप ॥२॥
गंभीर ध्वनीनें आश्रम निनादे । कोणीतरी पुढें कन्या येई ॥ ३ ॥
कमलेसमान होती रूपमती । स्वागत राजासी असो म्हणे ॥ ४ ॥

आसन तैं पाद्य अर्घ्यही देवोनी । कुशल पुसोनी संतोषवी ॥ ५ ॥
विस्मयें नृपासी म्हणे काय काज । करूं महाराज कथावें तें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कण्वदर्शनासी । आलों आश्रमासी राव सांगे ॥ ७ ॥

१९६

फळें आणावयालागीं । पिता गेला वनामाजी ॥ १ ॥
थांबा म्हणे कांहीं वेळ । भेट त्वरित होईल ॥ २ ॥
शोभे कांति तप दमें । मंदस्मित यौवनानें ॥ ३ ॥
राव म्हणे सुंदरीसी । सांगें कोण तूं कोणाची ॥ ४ ॥
वनामाजी काय काज । कां हा तापसीचा वेष ॥ ५ ॥
अलौकिक कैसें रूप । दर्शनेंचि हरिलें चित्त ॥ ६ ॥
वासुदेव ह्मणे राव- । चित्तीं उदेला संदेह ॥ ७ ॥

१९७

उर्ध्वरेता कण्वमुनि । परमपूज्य अखिल जनीं ॥ १ ॥
साक्षात् धर्महि ढळेल । मुनिव्रत न टळेल ॥ २ ॥
संशय जो मम अंतरीं । त्वांचि करावा हा दुरी ॥ ३ ॥
शकुंतला ह्मणे राजा । ऐकें वृत्तांत तो माझा ॥ ४ ॥
पिता सांगतां मुनींस । कथिन ऐकिलें तें तुज ॥ ५ ॥
वासुदेव ह्मणे वृत्त । सांगे कन्या नृपाळास ॥ ६ ॥

१९८

विश्वामित्रमुनि तीव्र करी तप । इंद्रालागीं धाक वाटे त्याचा ॥ १ ॥
मेनकेसी ह्मणे माझें करीं हित । कल्याणी तूं श्रेष्ठ अप्सरांत ॥ २ ॥
सूर्यासम मुनि तप करी घोर । अजिंक्य तो उग्र ऋषि असे ॥ ३ ॥
विघ्न तयालागीं करीं तूं जावोनी । अढळ या स्थानीं राखीं मज ॥ ४ ॥
स्मित यौवनानें लुब्ध करीं त्यासी । वासुदेव साची युक्ती ह्मणे ॥ ५ ॥

१९९

भ्याली अंतरीं अप्सरा । विनयानें बोले इंद्रा ॥ १ ॥
तेजस्वी हा महाक्रोधी । वसिष्ठाचे पुत्र वधी ॥ २ ॥

तपोबळें विप्र झाला । केलें कौशिकी नदीला ॥ ३ ॥
पितृशापें होई व्याध । त्रिशंकु तो नरराज ॥ ४ ॥
साह्य मुनिकुटुंबासी–। झाला, अवर्षणामाजी ॥ ५ ॥
कळतां वृत्त तें मुनीला । त्रिशंकु तो उद्धरिला ॥ ६ ॥
प्रतिसृष्टि ते निर्मूनी । त्रिशंकूसी केलें स्वामी ॥ ७ ॥
मेनकेसी त्याचें भय । वासुदेवातें विस्मय ॥ ८ ॥

२००

भस्म करील विश्वातें । धरा कांपविल पदें ॥ १ ॥
मेरूलागीं झुगारिल । दिशा एक तो करील ॥ २ ॥
स्पर्श कैसा करूं त्यासी । अग्नीसम तेज ज्यासी ॥ ३ ॥
कनीनिका त्या नेत्रींच्या । सूर्यचंद्रासम ज्याच्या ॥ ४ ॥
जिव्हा कालासम ज्याची । करूं स्पर्श केंवि त्यासी ॥ ५ ॥
यम सोमां धाक ज्याचा । तेथें पाड काय माझा ॥ ६ ॥
मान्य आज्ञा देवा तुझी । परी संरक्षीं मजसी ॥ ७ ॥
वायुदेव वस्त्र नेवो । काम मज साह्य होवो ॥ ८ ॥
इंद्र देतसे मान्यता । दुःख वासुदेव चित्ता ॥ ९ ॥

अध्याय ७२ वा

२०१

कौशिकाच्या आश्रमासी । फेरी आली अप्सरेची ॥ १ ॥
तपोधनासी वंदूनी । क्रीडा करीं ते त्या स्थानीं ॥ २ ॥
चंद्रधवल तें वस्त्र । उडूनियां जाई दूर ॥ ३ ॥
लज्जायुक्त हास्य करी । वस्त्रामागें धांवे नारी ॥ ४ ॥
मुग्ध मोहक त्या लीला । मोहविती तपस्व्याला ॥ ५ ॥
पाचारण करितां गेली । पुढती आश्रमीं राहिली ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मोह । विषयांचा अनावर ॥ ७ ॥

२०२

दीर्घकाल क्षणासम । जातां शकुंतला जन्म ॥ १ ॥
मालिनीच्या या तीरासी । टाकी मेनका तियेसी ॥ २ ॥
तया निर्जनवनांत । तिजसी रक्षिती शकुंत ॥ ३ ॥
जातां स्नानासी देखिलें । प्रेमें आश्रमीं आणिलें ॥ ४ ॥
जन्म, प्राण, अन्नदाता । त्रिविध शास्त्र म्हणे पिता ॥ ५ ॥
कण्व सांगती मुनींतें । नाम शकुंतला हिचें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वृत्त । सकल कथियेलें तेथ ॥ ७ ॥

अध्याय ७३ वा

२०३

स्वस्थचित्त होवोनियां ऐकिला वृत्तांत ॥
हर्षभरें कन्येलागीं बोलला दुष्यंत ॥ १ ॥
स्पष्ट होइ, तूं कल्याणी कन्या क्षत्रियाची ॥
राव जाणसी तूं मजला भार्या होइं माझी ॥ २ ॥
शोभने तुला मी देतों मागसील तें तें ॥
राज्य सर्व हें तव, करुंदे गांधर्व विधीतें ॥ ३ ॥
शकुंतला म्हणे राया येऊंद्या पित्यासी ॥
मानीन पती मी ज्यातें अर्पील तो त्यासी ॥ ४ ॥
बालपणीं पिता रक्षी, यौवनांत भर्ता ॥
वार्धक्यांत स्त्रियांलागीं आधार सुताचा ॥ ५ ॥
समर्पण कैसें करूं अधर्मानें तुज ॥
अग्नि सूर्यतेज, राजदंड विप्रक्रोध ॥ ६ ॥

२०४

म्हणे जाणतों मीं राव । कण्वमुनीचा स्वभाव ॥ १ ॥
मुनीलागीं क्रोध नसे । ऐकें माझ्या वचनातें ॥ २ ॥

आप्त आपुले आपण । करीं स्वयें निज दान ॥ ३ ॥
ब्राह्म दैव आणि आर्ष । प्राजापत्य तैं आसुर ॥ ४ ॥
गांधर्व राक्षस पैशाच । ऐसे विवाह ते आठ ॥ ५ ॥
प्रथम चार ते विप्रांसी । सहा योग्य क्षत्रियांसी ॥ ६ ॥
आसुर तो वैश्य शूद्रां । राक्षसहि तो राजेंद्रां ॥ ७ ॥
तीन धर्म्य, निंद्य दोन, । त्याज्य दोन्हीं ते अंतिम ॥ ८ ॥
गांधर्व तो क्षत्रियांसी । शकुंतले होई माझी ॥ ९ ॥
म्हणे राक्षस गांधर्व । उक्त नृपां, वासुदेव ॥ १० ॥

## २०५

शकुंतला म्हणे धर्ममार्ग जरी । असेल हा तरी ऐकें, एक ॥ १ ॥
मम पुत्र होई युवराज ज प्रतिज्ञा हे तरी, प्राप्ति माझी ॥ २ ॥
तथास्तु म्हणोनी राव एकाएकीं । पट्टराणी माझी तूंचि म्हणे ॥ ३ ॥
नेईन नगरीं बोलूनियां ऐसें । पाणिग्रहणातें करीतसे ॥ ४ ॥
हेतु पुरवोनी म्हणे पुनः पुनः । नेईन स्वस्थाना मिरवित ॥ ५ ॥
ऐसें बोलूनियां चिंतीत मुनीतें । जाई त्या स्थळातें सोडूनियां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सुजनांचे योग । तेचि होती मार्ग दुर्जनांचे ॥ ७ ॥

## २०६

जातां दुष्यंत निघोनी । मुनी येती वनांतूनी ॥ १ ॥
शकुंतला आश्रमांत । लाजे, होई खिन्नचित्त ॥ २ ॥
दिव्यदृष्टिनें जाणोनी । म्हणती ‘ नसे कोप ’ मुनी ॥ ३ ॥
न घडेल धर्महानी । दुष्यंताची कीर्ति जनीं ॥ ४ ॥
चक्रवर्ती पुत्रलाभ । शकुंतले होई तुज ॥ ५ ॥
अजिंक्य तो सर्व जनां । हर्ष कन्यकेच्या मना ॥ ६ ॥
करी स्वागत मुनीचें । क्षमा याचिते पित्यातें ॥ ७ ॥
मुनि म्हणे तुझ्यासाठीं । रायावरी माझी प्रीती ॥ ८ ॥

धर्मनिष्ठा राज्य नित्य । श्रेष्ठपद स्वकुळांत ॥ ९ ॥
ऐसें मागे शकुंतला । म्हणे वासुदेव कण्वा ॥ १० ॥

अध्याय ७४ वा

२०७

तीन वर्षें ऐसा काळ तो लोटला । पुत्रलाभ झाला कन्येलागीं॥ १ ॥
जातकर्मादिक विधि मुनि करी । तेजस्वी शरीरी बाळ वाढे ॥ २ ॥
यष्टि सिंहासम दंत टोंकदार । रेखामय कर चक्रयुक्त ॥ ३ ॥
विशाल मस्तक सुलक्षणी बाळ । श्वापदांशीं खेळ नित्य करी ॥ ४ ॥
व्याघ्रसिंह बांधी आश्रमीं आणूनी। 'सर्वदमन' मुनि म्हणती त्यासी ॥५॥
वासुदेव म्हणे जें जें अलौकिक । तयांचें कौतुक किती गावें ॥ ६ ॥

२०८

शकुंतले तुझा तान्हा भाग्यवंत । युवराज पदास योग्य झाला ॥ १ ॥
ऐसें कण्वमुनि सांगती कन्येसी। पोंचवा शिष्यांसी म्हणती हिज ॥२॥
पितृगृहीं वास बहुत नसावा । काळिमा कीर्तीला आणील तो ॥३॥
बाळ सूर्यासम सुतासह बाला ।पाही दुष्यंताला येवोनियां ॥ ४ ॥
स्वाधीन करोनी मुनिशिष्य जातां । नृपाळासी कांता म्हणे प्रेमें ॥५॥
निजपुत्रालागीं यौवराज्य देईं । प्रतिज्ञा ते पाहीं कण्वाश्रमीं ॥ ६ ॥
स्मरूनी संकल्प सत्य करीं आतां । ऐकवी ते कथा वासुदेव ॥ ७ ॥

२०९

राव म्हणे दुष्टे कोण तूं कोणाची । संबंध तुझ्याशीं नसे माझा ॥ १ ॥
म्हणसी तें कांहीं न स्मरे मजसी । दहाही दिशांसी सुखें राहें ॥ २ ॥
शकुंतला मन लज्जित तैं झालें । भान हरपलें उद्वेगानें ॥ ३ ॥
सहन न होई मिथ्या तें वर्तन । नेत्र अग्नीसम होती तिचे ॥ ४ ॥
ओष्ठ थरारले कटाक्ष ते तीव्र । फेंकोनियां वक्र दृष्टि करी ॥ ५ ॥
आंवरूं पाहे ती जरी सर्व राग । थरारलें अंग क्रोधभरें ॥ ६ ॥

वासुदेव म्हणे आंवरोनी तेज। म्हणे महाराज वृत्त स्मरा॥ ७॥

२१०

कां रे करिसी अवज्ञा। हृदयस्थाची तूं हे प्राज्ञा॥ १॥
जाणोनी जो उलट बोले। नाहीं काय तेणें केलें॥ २॥
आत्मवंचक तस्कर। कैसा होई नृपवर॥ ३॥
कोणी न पाहे मजसी। ऐसें आणीं न मानसीं॥ ४॥
सूर्यचंद्र वायु अग्नि। द्युलोक तो यम भूमी॥ ५॥
जल अहोरात्र संध्या। धर्म, हृदय हे वंद्या॥ ६॥
गुप्तकर्मे हीं जाणती। हृदयस्थ सर्व साक्षी॥ ७॥
वासुदेव मिथ्याभाषि। म्हणे यमलोक त्यासी॥ ८॥

२११

राजसभेसी बैसोनी। नृपा मज नावमानीं॥ १॥
स्वयें पातल्यें मी जरी। ऐसी तुच्छता न करीं॥ २॥
काय प्राकृत मानिसी। जाणें पतिव्रता सती॥ ३॥
आहे तुझ्या मी सभेंत। नाहीं शून्य अरण्यांत॥ ४॥
रूदन हें नायकसी। कां रे प्रातिज्ञा विसरसी॥ ५॥
त्यागिसील सत्य जरी। शिरोभंग होई तरी॥ ६॥
वासुदेव म्हणे कोप। नव्हे सात्विक संताप॥ ७॥

२१२

निजभार्येचिये ठाई। पती स्वयें जन्म घेई॥ १॥
जायापण तें दारेचें,। पितरांसी उद्धरी तें॥ २॥
तारी पित्यासी नरकीं।। तोचि सुपुत्र या लोकीं॥ ३॥
पुत्रवती दक्ष कार्या। तेचि शास्त्र म्हणे भार्या॥ ४॥
भार्येलागीं प्रिय पती। भार्या पतिव्रता सती॥ ५॥
अर्ध शरीर तें नरा। तोचि सखा जनीं खरा॥ ६
भार्या धर्म, अर्थ, काम। नेई संसारीं तारून॥ ७॥
वासुदेव म्हणे भार्या। आधार या जनीं आर्या॥ ८॥

२१३

श्रौतस्मार्तधर्म करी भार्यावंत। म्हणताती गृहस्थ भार्यावंता ॥ १ ॥
भार्यावंत नर वैभवसंपन्न। आनंद भोगून सुखी राहे ॥ २ ॥
गुप्तकार्य करी अधर्म निवारी। पित्यासम करी हित भार्या ॥ ३ ॥
संकटांत भ्राता विश्रांति वनांत। विश्वासासी पात्र भार्या नरा ॥ ४ ॥
नरकीं उद्धरी मागोनियां जातां। पूर्वी मृत होतां वाट पाहे ॥ ५ ॥
सद्गति पतीसी एकमेव भार्या। वासुदेव आर्यां महती सांगे ॥ ६ ॥

२१४

पाणिग्रहणाचा हेतु थोर असे। कल्याण नराचें होई तेणें ॥ १ ॥
पुत्ररूपें घेई जन्म जिच्या ठाईं। जन्मभूमी पाहीं मानावी ते ॥ २ ॥
आदर्शांत मुख जनालागीं जैसें। पुत्रमुख तैसें पित्यालागीं ॥ ३ ॥
आतपतप्तासी जल किंवा छाया। तेंवि नरा 'जाया' शांत करी ॥४॥
दुःखपीडित कीं व्याधिग्रस्त जन। समाधान जाण पावती ते ॥ ५ ॥
रति प्रीति धर्म भार्येच्या आधीन। क्रोधयुक्त जन जरी झाला ॥ ६ ॥
अप्रिय तियेचें करूं नये कोणी। सनातन भूमी स्वजन्माची ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऋषि मुनि तेही। स्त्रियांवीण पाहीं जन्मतीना ॥ ८ ॥

२१५

दुष्यंता धुळीनें माखिलेला बाळ। अंगावरी खेळ करी जेव्हां ॥१॥
पितृहृदयासी तेंचि परमसुख। अन्य तें न देख लाभे कोठें ॥ २ ॥
स्वीकारार्थ स्वयें सन्निध जो आला। कां रे ऐसा त्याला अव्हेरिसी ॥३॥
पिपीलिका त्याही अंड्यांसी रक्षिती। धर्माची तूं मूर्ती पुत्रत्यागी ॥४॥
मृदु वस्त्र, शीत जल, युवा नारी। पुत्र स्पर्श सरी नाहीं त्यांसी ॥५॥
मानवांत विप्र, धेनु पशूंमाजी। स्पर्शवंतांमाजी पुत्रश्रेष्ठ ॥ ६ ॥
प्रियदर्शनासी आलिंगूनी आतां। अनुभव साचा घेईं वेगें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पुत्रप्रेमाहूनी। श्रेष्ठ प्रेम जनीं नाहीं दुजें ॥ ८ ॥

२१६

तीन वर्षें तीं लोटतां। पुत्रलाभ हा तत्वतां ॥ १ ॥
होतां नभोवाणी झाली। भूषण हा पौरकुळीं ॥ २ ॥

शत अश्वमेध कर्ता । आधार हा स्वकुळाचा ॥ ३ ॥
जन ग्रामाहूनी येती । अंकीं स्वसुतासी घेती ॥ ४ ॥
हतभाग्या कां रे ऐसा । लोटितोसी स्वयें सुता ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चित्तीं । होई शकुंतला दुःखी ॥ ६ ॥

२१७

अंगा अंगापासूनियां । जन्मसी हे पुत्रराया ॥ १ ॥
मूळस्थान तें हृदय । पुत्र माझा आत्मा होय ॥ २ ॥
बाळा होईं शतायुषि । ऐसें बोलतसे श्रुति ॥ ३ ॥
नित्य संतान जीवित । तेंचि माझें या जनांत ॥ ४ ॥
चिरंजीव म्हणुनी होईं । वर्षशत सुखी राहीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राया । स्मरण ऐकें देई जाया ॥ ६ ॥

२१८

शुद्ध सरोवरामाजी प्रतिबिंब जैसें ॥
नृपा स्पष्ट तैसें पाही सादृश्य सुताचें ॥ १ ॥
आहवनीया तो जैसा गार्हपत्य होई ॥
जन्म तेंवि या बाळाचा तुझ्यामुळें पाहीं ॥ २ ॥
योग्यासमान तूं राजा द्विरूप झालासी ॥
मृगयेसी जातां वनीं वरिलें मजसी ॥ ३ ॥
विश्वामित्र मेनकेची कन्या मज जाण ॥
हिमाचलीं मालिनीचें तीर जन्मस्थान ॥ ४ ॥
स्नेहशून्यमातेसम त्यागूनियां गेली ॥
काय पाप माझें, तूंहि टाकिसी या वेळीं ॥ ५ ॥
जाईन आपुल्या दुःखें आश्रमीं नृपाळा ॥
परी टाकूं नको राजा आपुलिया बाळा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कांहीं रायासी स्मरेना ॥
म्हणे स्त्रिया करिती जनीं असत्य भाषणा ॥ ७ ॥

२१९

राव म्हणे शकुंतले । कोण विश्वासे या बोलें ॥ १ ॥
माता वेश्या ती निर्दय । लुब्ध मुनीचें हृदय ॥ २ ॥
थोर जरी माता पिता । कैसी त्यागिली दुहिता ॥ ३ ॥
दुराचारिणीसमान । कां वो करिसी भाषण ॥४॥
लाज वाटेना ती कैशी । बोलसी तूं या सभेसी ॥ ५ ॥
कोठें मेनका, तो ऋषि । कोठें कृपण तापसी ॥६॥
दुःखाकुल वासुदेव । बोले ऐका काय राव ॥७॥

२२०

उंच बाळ हा बळवंत दिसतो मजला ॥
अल्पावधीमाजी कैसा तालवृक्ष झाला ॥१॥
हीन जातीची तूं वाटे चिंतितां मनासी ॥
व्यभिचारिणीसम ऐसें काय तूं बोलसी ॥ २ ॥
शकुंतला म्हणे राजा दोष तूं दुजांचे ॥
सूक्ष्मही गिरीसम बघसी आपुले न कैसे ॥ ३ ॥
भूमीवरी फिरसी, गगनीं संचार तो माझा ॥
प्रिय देवांलागीं माझी माता ते मेनका ॥ ४ ॥
श्रेष्ठ कोण उमजे येणें मानसीं राजेंद्रा ॥
शक्य मजलागीं भेटी कुबेरमहेंद्रां ॥ ५ ॥
दृष्टांत तुजसी देतें ऐकूनियां घेई ॥
वासुदेव म्हणे तिच्या मनीं द्वेष नाहीं ॥ ६ ॥

२२१

दर्पणांत मुख जोंवरी, न पाहे । तोंवरीच आहे कुरुप चारु ॥ १ ॥
प्रतिबिंबानें त्या भेद ध्यानीं येई । निंदी न कोणाही रूपवंत ॥ २ ॥
दुष्ट वचनाची हौस जया मनीं । निंदा रात्रंदिनीं तोचि करी ॥ ३ ॥

शत अश्वमेध कर्ता । आधार हा स्वकुळाचा ॥ ३ ॥
जन ग्रामाहूनी येती । अंकीं स्वसुतासी घेती ॥ ४ ॥
हतभाग्या कां रे ऐसा । लोटितोसी स्वयें सुता ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चित्तीं । होई शकुंतला दुःखी ॥ ६ ॥

२१७

अंगा अंगापासूनियां । जन्मसी हे पुत्रराया ॥ १ ॥
मूळस्थान तें हृदय । पुत्र माझा आत्मा होय ॥ २ ॥
बाळा होईं शतायुषि । ऐसें बोलतसे श्रुति ॥ ३ ॥
नित्य संतान जीवित । तेंचि माझें या जनांत ॥ ४ ॥
चिरंजीव म्हणुनी होईं । वर्षशत सुखी राहीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राया । स्मरण ऐकें देई जाया ॥ ६ ॥

२१८

शुद्ध सरोवरामाजी प्रतिबिंब जैसें ॥
नृपा स्पष्ट तैसें पाही सादृश्य सुताचें ॥ १ ॥
आहवनीया तो जैसा गार्हपत्य होई ॥
जन्म तेंवि या बाळाचा तुझ्यामुळें पाहीं ॥ २ ॥
योग्यासमान तूं राजा द्विरूप झालासी ॥
मृगयेसी जातां वनीं वरिलें मजसी ॥ ३ ॥
विश्वामित्र मेनकेची कन्या मज जाण ॥
हिमाचलीं मालिनीचें तीर जन्मस्थान ॥ ४ ॥
स्नेहशून्यमातेसम त्यागूनियां गेली ॥
काय पाप माझें, तूंहि टाकिसी या वेळीं ॥ ५ ॥
जाईन आपुल्या दुःखें आश्रमीं नृपाळा ॥
परी टाकूं नको राजा आपुलिया बाळा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कांहीं रायासी स्मरेना ॥
म्हणे स्त्रिया करिती जनीं असत्य भाषणा ॥ ७ ॥

२१९

राव म्हणे शकुंतले । कोण विश्वासे या बोलें ॥ १ ॥
माता वेश्या ती निर्दय । लुब्ध मुनीचें हृदय ॥ २ ॥
थोर जरी माता पिता । कैसी त्यागिली दुहिता ॥ ३ ॥
दुराचारिणीसमान । कां वो करिसी भाषण ॥४॥
लाज वाटेना ती कैशी । बोलसी तूं या सभेसी ॥ ५॥
कोठें मेनका, तो ऋषि । कोठें कृपण तापसी ॥६॥
दुःखाकुल वासुदेव । बोले ऐका काय राव ॥७॥

२२०

उंच बाळ हा बळवंत दिसतो मजला॥
अल्पावधीमाजी कैसा तालवृक्ष झाला ॥१॥
हीन जातीची तूं वाटे चिंतितां मनासी ॥
व्याभिचारिणीसम ऐसें काय तूं बोलसी ॥ २ ॥
शकुंतला म्हणे राजा दोष तूं दुजांचे ॥
सूक्ष्मही गिरीसम बघसी आपुले न कैसे ॥ ३ ॥
भूमीवरी फिरसी, गगनीं संचार तो माझा ॥
प्रिय देवांलागीं माझी माता ते मेनका ॥ ४ ॥
श्रेष्ठ कोण उमजे येणें मानसीं राजेंद्रा ॥
शक्य मजलागीं भेटी कुबेरमहेंद्रां ॥ ५ ॥
दृष्टांत तुजसी देतें ऐकूनियां घेई ॥
वासुदेव म्हणे तिच्या मनीं द्वेष नाहीं ॥ ६ ॥

२२१

दर्पणांत मुख जोंवरी, न पाहे । तोंवरीच आहे कुरुप चारु ॥ १ ॥
प्रतिबिंबानें त्या भेद ध्यानीं येई । निंदी न कोणाही रूपवंत ॥ २ ॥
दुष्ट वचनाची हौस जया मनीं । निंदा रात्रंदिनीं तोचि करी ॥ ३ ॥

मलग्राहक तो सूकरासमान । सज्जनाचें मन खिन्न होई ॥ ४ ॥
निंदितां संतोषे दुर्जनाचें चित्त । सज्जना अपशब्द मूर्ख देती ॥ ५ ॥
निंद्य असोनी जे निंदिती सज्जना । दोष दृष्टि जाणा तयांप्रती ॥ ६ ॥
पूज्यांसी पूजूनी सज्जन तोषती । दोष न देखती इतरांचे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सज्जना दुर्जन । निंदितो याहून नवल काय ॥ ८ ॥

२२२

सत्यभ्रष्टाचें त्या नास्तिकाही भय । क्रुद्ध सर्प होय क्रूर जैसा ॥ १ ॥
आपुल्या पुत्रासी पुत्र जो म्हणेना । दरिद्री त्या जना करिती देव ॥२॥
उत्तम ते गती तयालागीं नसे । निज तनयातें त्यागूं नये ॥ ३ ॥
प्राप्त, संस्कृत जे, पाळिलें जयांसी, । जे अन्य स्त्रियांसी स्वपत्नीचे ॥४॥
ऐसें पंचविध पुत्र मनु कथी । वासुदेव तेचि वाणी सांगे ॥ ५ ॥

२२३

सत्याचें धर्माचें । करीं पालन आत्म्याचें ॥ १ ॥
शोभेना हें कपट तुज । अगा श्रेष्ठ राजराज ॥ २ ॥
शतकूपाहूनी थोर । जाण एक सरोवर ॥ ३ ॥
शत सरोवरें न्यून । राजा एका यज्ञाहून ॥ ४ ॥
शतयज्ञाहूनी श्रेष्ठ । धर्मपत्नीचा जो सुत ॥ ५ ॥
ऐसे शत पुत्र तुच्छ । अधिक तयांहूनी सत्य ॥ ६ ॥
सहस्र ते अश्वमेध । सत्य त्याहूनी वरिष्ठ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । तुलितां निर्णय देवांचा ॥ ८ ॥

२२४

सर्व वेदज्ञान सर्व तीर्थस्नान । सत्याचें महिमान तयाहूनी ॥ १ ॥
सत्यासम धर्म साधन तें अन्य । नाहीं सत्याहून श्रेष्ठ जगीं ॥ २ ॥
सत्याचि तें ब्रह्म श्रेष्ठ तो नियम । दुष्ट अधमाधम असत्य तें ॥ ३ ॥
असत्याचि तुज आवडेल जरी । सहवास तरी नको तुझा ॥ ४ ॥

तुझ्या वांचूनी ही सागरान्त भूमी। संरक्षील गुणी बाळ माझा॥ ५ ॥
ऐसें बोलूनियां आश्रमीं निघाली। नभोवाणि झाली तेचि ऐका ॥६॥
वासुदेव म्हणे सत्याचा विजय। अंतीं हा निश्चय धरा मनीं ॥ ७ ॥

२२५

राया चर्मकोश माता। स्वामी स्थापक बीजाचा ॥ १ ॥
करूं नको अपमान। करीं सुताचें पालन ॥ २ ॥
पिता पुत्र एक जाणें। पितर उद्धरती त्या गुणें ॥ ३ ॥
सांगे सत्य शकुंतला। राया स्वीकारीं तिजला ॥ ४ ॥
पुत्रत्याग तें मरण। भाग्यहीनाचें लक्षण ॥ ५ ॥
भरण करिसी तूं याचें। तेणें 'भरत' नाम साचें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दिव्य। वाणी ऐकती ते सर्व ॥ ७ ॥

२२६

ऐका ऐका सर्व जन। राजा म्हणे, हें वचन ॥ १ ॥
पुत्र माझाचि हा असे। शंका न येवो कोणातें ॥ २ ॥
व्हावी संदेहनिवृत्ति। म्हणुनी केली ऐसी कृति ॥ ३ ॥
मग अनुज्ञा घेऊन। स्वीकारिला तो नंदन ॥ ४ ॥
कांतेसह सुखी झाला। आलिंगिलें सुपुत्राला ॥ ५ ॥
अवघ्राण मस्तकाचें। लाभे अपूर्व सौख्यातें ॥ ६ ॥
विप्र आशीर्वाद देती। बंदी स्तुति–गीतें गाती ॥ ७ ॥
केले संस्कार सुताचे। करी सांत्वन कांतेचें ॥ ८ ॥
म्हणे वासुदेव मनीं। कठिण थोरपण जनीं ॥ ९ ॥

२२७

लोकपरोक्ष हा विवाह आपुला। कारण जाहला संशयासी ॥ १ ॥
मानिती हे जन अशुद्ध तुजसी। स्त्रीजित मजसी पुत्रहीना ॥ २ ॥
म्हणोनी तुझ्याशीं निष्ठुर वागलों। संतुष्ट जाहलों तुझ्या लाभें ॥३॥
विशाललोचने अप्रिय ते वाणी। हेतु ओळखूनी क्षमिली तुज ॥ ४ ॥
ऐसें बोलूनियां भूपवी कांतेसी। यौवराज्य अर्पी भरतालागीं ॥ ५ ॥

अजिंक्य तो बाळ धर्ममार्गीरत । अलौकिक यश मेळवीलें ॥ ६ ॥
शतकोटि दिली दक्षिणा कण्वासी । ‘गोवितत’ यागीं भरतानें ॥७॥
नाम तेंचि लाभे तयाच्या कुळासी । विख्यात नृपांसी जन्म तेथें ॥८॥
वासुदेव म्हणे तया नृपाळाचें । वृत्त तें स्फूर्तीचें ऐका आतां ॥ ९ ॥

अध्याय ७५ वा

## २२८

दक्ष प्रजाप्रति वैवस्वत मनु । भरत, कुरु, पूरु, अजमीढ तो ॥ १ ॥
यादव कौरव वंश तो ऐकावा । संपादावा ठेवा कल्याणाचा ॥ २ ॥
प्राचीनबर्हीच्या मुखांतूनी अग्नि । प्रगट होवोनी वृक्ष जाळी ॥ ३ ॥
तया प्राचेतसा पुत्र दक्ष झाला । तेथूनी वाढला विस्तार हा ॥ ४ ॥
दक्ष–वीरिणीसी[1] पुत्र जे सहस्र । मुक्त मोक्षशास्त्र अभ्यासूनी ॥ ५ ॥
पुढती निर्मिल्या कन्या पंचशत । तयांचा वृत्तांत कथिला पूर्वी ॥६॥
वासुदेव म्हणे परिसा वृत्तांत । समाधान चित्त होई तेणें ॥ ७ ॥

## २२९

सूर्यपुत्र मनु बंधु त्याचा यम । ब्राह्मणादि वर्ण मनूचे ते ॥ १ ॥
पुत्र नऊ त्याचे कन्या इला नामें । पुरूरवा जाणे पुत्र तिचा ॥ २ ॥
बुधाचा तो[2] पुत्र महापराक्रमी । सिंधूसह भूमी पाळीतसे ॥ ३ ॥
गार्हपत्यादिक त्रिविध ते अग्नि । गंधर्वांपासोनी आणियेले ॥ ४ ॥
उन्मत्त तो होतां सनत्कुमारांनीं । शाप त्या देवोनी नष्ट केलें ॥ ५ ॥
तया उर्वशीचे आयुषादि सुत । आयूचा नहुष पुत्र ज्येष्ठ ॥ ६ ॥
नहुष विप्रांसी वाहन तो करी । इंद्रपद वरी पराक्रमें ॥ ७ ॥
यति ययाति ते सहा पुत्र त्याला । यति योगी झाला सम्राट् दुजा ॥
यदु तुर्वसु ते देवयानी पुत्र । द्रुह्यु अनु पूरु शर्मिष्ठेचे ॥ ९ ॥
यौवन सुतांसी द्या म्हणे ययाति । कामना मनींची अपूर्ण हे ॥१०॥
वासुदेव म्हणे पूरु सिद्ध होई । नृप जरा देई पूरूलागीं ॥ ११ ॥

---

१ दक्षाची स्त्री. २ पुरूरवा.

२३०

वृद्ध पूरु राजा झाला । विषयीं ययाति रमला ॥ १ ॥
पुढती अनुभव जनां । सांगे ययाति तो राणा ॥ २ ॥
उपभोगें कामशांति । होणें शक्य न कल्पांतीं ॥ ३ ॥
हविर्द्रव्यें अग्नीसम । सेवितांचि वाढे काम ॥ ४ ॥
पृथ्वी सकलरत्नपूर्णा । स्त्रिया सर्व चंद्रानना ॥ ५ ॥
अपुरेंचि कामी नरा । जाणुनी हें शांति वरा ॥ ६ ॥
न करी कोणाचें अनहित । शुद्धक्रियावाचाचित्त ॥ ७ ॥
ज्याचें भय नसे कोणा । निर्भय तो मुक्त जाणा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पूरु । झाला वंशाचा आधारू ॥ ९ ॥

२३१

विवेकें आपुलें मन आंवरिलें । क्षुद्रत्व जाणिलें विकारांचें ॥ १ ॥
अतृप्तचि राव राहिला तो अंतीं । तारुण्य पुत्रासी अर्पीतसे ॥ २ ॥
तुजमुळें म्हणे पुत्रवंत झालों । संतोष पावलों तुझ्या गुणें ॥ ३ ॥
वंश तुझ्या नामें विख्यात होईल । कथूनी नृपाळ तपा जाई ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे भार्या सहव्रती । राव तो ययाति गति पावे ॥ ५ ॥

अध्याय ७६ वा

२३२

जनमेजय म्हणे ययाति रायासी । कन्या ते शुक्राची कैसी लाभे ॥ १ ॥
वैशंपायनानें वृत्त जें कथिलें । तेंचि प्रतिपादिलें पुढती आतां ॥ २ ॥
वैभवार्थ देव-दानव भांडती । विद्या ते शुक्राची साह्य त्यांसी ॥ ३ ॥
मृत असुरांतें शुक्र उठविती । तेणें इंद्र चित्तीं दुःख पावे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे गुरुपुत्र कच । त्यासि इंद्रादिक शरण येती ॥ ५ ॥

२३३

जारे कचा संजीविनी । विद्या सत्वरी तूं आणीं ॥ १ ॥
वृषपर्व्याच्या सान्निध । विप्र भेटेल तो तुज ॥ २ ॥
असे पूर्ववय तुझें । हित करीं तूं देवांचें ॥ ३ ॥

शील दाक्षिण्य मृदुवाणी । सदाचारी तूं संयमी ४ ॥
*तुष्ट देवयानी तेणें । हेतु पुरती निश्चयानें ॥ ५ ॥*
सत्कारूनियां कचास । पाठविलें स्वकार्यास ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गेला । वृषपर्व्याच्या नगरीला ॥ ७ ॥

२३४

गुरुपुत्र म्हणे वंदूनी शुक्रासी । अंगिरस ऋषि पितामह ॥ १ ॥
देवगुरु माझा पिता बृहस्पति । शरण तुजसी पातलों मीं ॥ २ ॥
मजलागीं द्यावी सेवेची अनुज्ञा । शुक्र म्हणे आज्ञा राहीं सुखें ॥ ३ ॥
बृहस्पतीचाहि सत्कार त्या असो । स्वागत करितों कचा तुझें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे शिष्यभावें कच । राही आश्रमास विवेकानें ॥ ५ ॥

२३५

कच गुणवंत देवयानीप्रती । नृत्य वाद्य गीतीं तोष देई ॥ १ ॥
पुष्पफळें आणी करी अन्य कार्यें । व्यवहार चातुर्यें वागतसे ॥ २ ॥
देवयानी तेही आश्रमीं कचाली । तोषवी मानसीं नृत्य–गीतें ॥ ३ ॥
ऐसीं पांच शत वरुषें लोटलीं । गोष्ट ध्यानीं आली असुरांच्या ॥४॥
क्रुद्ध दानवांनीं धेनूंसी चारितां । केलें कचघाता गुप्तपणें ॥ ५ ॥
वृक जंबूकांसी भक्ष्य तें दिधलें । चित्त स्वस्थ झालें असुरांचें ॥ ६ ॥
रक्षकावांचोनी धेनु गृहीं आल्या । सायंकाळीं झाला शोध त्याचा ॥७
देवयानी म्हणे सूर्य अस्त झाला । अद्यापि न आला कच कैसा ॥ ८ ॥
कचावीण माझें व्यर्थ हें जीवित । सांगतसें सत्य ताता तुज ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे बाहोनी कचातें । आणी आश्रमातें शुक्रगुरु ॥ १० ॥

२३६

देवयानी म्हणे कां रे वेळ तुज झाला ॥
ऐका कच कन्येलागीं सांगे वृत्तांताला ॥ १ ॥
कुश समिधा आणाया गेलों मी माध्यान्हीं ॥
धेनूही सुखानें माझ्या चरती त्या रानीं ॥ २ ॥
धेनूसह पुढती आलों वटछायेखालीं ॥
दुष्ट असुरांची तेथें येई एक टोळी ॥ ३ ॥

नांव विचारूनी मज छिन्नभिन्न केलें ॥
मांस वनामाजी मम वृकांसी चारिलें ॥ ४ ॥
प्रसादें गुरूच्या आलों भेटलों तुजसी ॥
वासुदेव म्हणे विद्या संजीविनी ऐसी ॥ ५ ॥

२३७

छेदूनियां पुन्हा सागरीं टाकिती । देवयानीप्रती दुःख होई ॥ १ ॥
कन्येसाठीं पिता उठवी कचासी । वृत्त असुरांसी कळतां क्रोध ॥२॥
जाळोनी कचासी रक्षा मदिरेंत । घालोनी शुक्रास पाजिती ते ॥ ३ ॥
कच न दिसतां देवयानी रडे । जाई पित्यापुढें विनवी त्यासी ॥ ४ ॥
शुक्र म्हणे मुली उठवूं किति वेळां । मृत्यु तो मर्त्याला अटळ जनीं ।५।
कन्या म्हणे ताता बृहस्पतिसुत । विप्रांमाजी श्रेष्ठ कच असे ॥ ६ ॥
आंगिरामुनीच्या पौत्रास्तव जरी । दुःख मज तरी चूक काय ॥ ७ ॥
तपस्वी तो दक्ष ब्रह्मचारी कच । अतिप्रिय मज तोचि ताता ॥ ८ ॥
अन्नत्यागार्थ ती सिद्ध देवयानी । वासुदेव मनीं तोष पावे ॥ ९ ॥

२३८

शुक्र होई क्रोधयुक्त । म्हणे असुर करिती द्वेष ॥ १ ॥
हिंसा करिती शिष्याची । ब्रह्मद्वेष या दुष्टांसी ॥ २ ॥
ब्राह्मण रहित अवनी । व्हावी हीच इच्छा मनीं ॥ ३ ॥
ब्रह्महत्या ते तृणासी-। अग्नीसम, इंद्रा ग्रासी ॥ ४ ॥
एकांतांत हांक मारी । उत्तर येतसे उदरीं ॥ ५ ॥
शुक्र म्हणे सांगे कचा । कैसा उदरीं तूं माझ्या ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐका । रम्य भारताची कथा ॥ ७ ॥

२३९

कच म्हणे गुरुप्रसादें ही स्मृति । नष्ट नच माझी कथितों ऐका ॥१॥
उदर फोडितां तपक्षय होई । म्हणोनी हे साहीं उदरीं क्लेश ॥ २ ॥
जाळोनियां मज रक्षा सुरेंतून । पाजिली ते जाण गुरो तुज ॥ ३ ॥
ब्राह्मी दैवी तेंवि आसुरी मायेसी । पाय हे जाणती गुरो तुझे ॥ ४ ॥

पाचारिसी मज परी गुरुवरा। भेदूनी उदरा कैसा येऊं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐकुनी हें कवि। कन्येसी विनवी काय करूं ॥ ६ ॥

२४०

वधाविण माझ्या कच लाभ नोहे। विदारील पाहे कुक्षी मम ॥ १ ॥
कन्येसी या परी बोले शुक्रमुनि। कन्या म्हणे दोन्ही प्रिय मज ॥२॥
कच सुख माझें जीवित तूं जाण। व्याकुळ हे प्राण दोघांमुळें ॥ ३ ॥
शुक्र म्हणे कचा सिद्ध तुझें तप। जरी तूं शचीनाथ नससी तरी ॥४॥
इंद्र कच वेषें पातलासी जरी। तरी या उदरीं जिरुनी जासी ॥ ५ ॥
देवयानी तुज प्रसन्न म्हणोनी। विद्या संजीविनी घेईं आतां ॥ ६ ॥
उपकार ध्यानीं आणोनी कृतघ्न। होऊं नको, जाण गुरू मातें ॥ ७ ॥
वासुदेव ह्मणे बोलूनियां ऐसें। अर्पी तो विद्येतें कचालागीं ॥ ८ ॥

२४१

विदारूनियां उदर। कच पातला बाहेर ॥ १ ॥
सूर्य अस्तासी तो जातां। पौर्णिमेचा चंद्र जैसा ॥ २ ॥
शुक्रकन्येसी तो कच। तेंवि देतसे आल्हाद ॥ ३ ॥
मृत गुरूसी उठविलें। भावें तयासी वंदिलें ॥ ४ ॥
म्हणे गुरु माता पिता। कर्णीं अमृत सिंचितां ॥ ५ ॥
अथवा ब्रह्मविद्या सांगे। जाईन मी त्याच्या मागें ॥ ६ ॥
अनादर जे गुरूचा। करिती, विनाश तयांचा ॥ ७ ॥
ऐका वासुदेव वाचा। द्रोह न करावा गुरूचा ॥ ८ ॥

२४२

वैशंपायन तो म्हणे जनमेजया। मदिरेच्या पायां घात ऐसा ॥ १ ॥
असुरगुरूचा बुद्धिनाश झाला। कुलीन कचाला प्राशियेलें ॥ २ ॥
सावध तो होतां क्रोध येई त्यासी। मदिरापानासी तिरस्कारी ॥३॥
वासुदेव म्हणे विप्रहितालागीं। मर्यादा ते जगीं घालीतसे ॥ ४ ॥

२४३

आजपासूनी जो मंदबुद्धि विप्र। घेई सुरापात्र भ्रष्ट तोचि ॥ १ ॥
प्राशील सुरा त्या ब्रह्महत्या ग्रासी। इहपरलोकीं निंद्य जनां ॥ २ ॥

मर्यादा ही ऐसी ब्राह्मण धर्मांची। सकळ विप्रांसी ऐकूं येवो ॥३॥
वासुदेव म्हणे ब्रह्मचारी गृही। विप्र सकलहि बद्ध येणें ॥ ४ ॥

२४४

असुरांसी पाचारूनी। क्रोधें तयां ह्मणे मुनि ॥ १ ॥
मूर्ख दानव हो ऐका। मतिभ्रंश हा तुमचा ॥ २ ॥
हिंसा कचाची करोनी। विघ्न घेतलें ओढोनी ॥ ३ ॥
संजीविनी प्राप्त त्याला। कच आतां शुक्र झाला ॥ ४ ॥
झालें देवकार्य जाणा। भवितव्य न टळे कोणा ॥ ५ ॥
पश्चात्ताप असुरांसी। गेले निज भवनासी ॥ ६ ॥
वर्षसहस्र राहूनी। कच चालला स्वस्थानीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अंतीं। दुष्ट नाशाची पावती ॥ ८ ॥

अध्याय ७७ वा

२४५

समावर्तनातें करोनी कचासी। जा देवलोकासी म्हणती कवि ॥१॥
शील, कुल, विद्या, तप, दमें साचा। शोभसी तूं कचा कन्या म्हणे॥
सावधानचित्त होवोनियां ऐकें। हेतु व्रत तुझें पूर्ण होई ॥ ३ ॥
भक्त मीं अनन्य स्वीकारीं मजसी। पूज्य तूं मजसी कच ह्मणे ॥ ४ ॥
शुक्र गुरूसम मजसी तूं मान्य। योग्य न भाषण ऐसें तुज ॥ ५ ॥
देवयानी ह्मणे प्रीति स्मरे माझी। कचा तुज मीचि वांचविलें ॥ ६ ॥
उत्कट ते भक्ति जाणसी तूं कचा। त्याग अबलेचा करूं नको ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसा मोहपाश। साह्य प्रभु ज्यास तोचि तोडी ॥ ८ ॥

२४६

सहोदरी माझी होसी। कच म्हणे कां विसरसी ॥ १ ॥
नको बोलूं ऐसें कांहीं। मज अनुज्ञा तूं देई ॥ २ ॥
सहवासें सुखी झालों। कार्यसिद्धीतें पावलों ॥ ३ ॥
देई आशीर्वाद आतां। धर्ममार्ग तो हिताचा ॥ ४ ॥

खिन्न झाली देवयानी । वदे शापमय वाणी ॥ ५ ॥
जासी अव्हेरूनी जरी । संजीविनी व्यर्थ तरी ॥ ६ ॥
म्हणे वासुदेव कच । बोले राहूनियां शांत ॥ ७ ॥

२४७

गुरुकन्या मज भगिनीसमान । निषेधितों जाण म्हणोनीयां ॥ १ ॥
गुरु आज्ञा नसे तैसी मज पाहीं । दोष अन्य कांहीं नसे तुज ॥ २ ॥
सोदरांत नसे विवाह, हा धर्म । तुझें शाप कर्म योग्य नसे ॥ ३ ॥
काममोहित तूं मज शाप देसी । इच्छा पूर्ण तुझी कदा नोहे ॥ ४ ॥
ऋषीसुत कोणी वरीना तुजसी । शिकवीन ज्यासी विद्या त्यातें ॥५॥
ऐसें बोलूनियां देवलोकीं गेला । विबुधांसी झाला तोष बहु ॥ ६ ॥
सत्कार प्रेमानें करिती तयाचा । म्हणती तूं यज्ञाचा वांटेकरी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अक्षय्य ते कीर्ति । वर्णू तरी किती सांगा मज ॥ ८ ॥

अध्याय ७८ वा

२४८

मुनिराजाची ते विद्या प्राप्त होतां । येई कृतार्थता देवांलागीं ॥ १ ॥
आतां पुरंदरा करीं रे विक्रम । म्हणती जाणून काल साह्य ॥ २ ॥
मान्य तें करोनी चित्ररथवनीं । अंतरीं धरोनी हेतु आला ॥ ३ ॥
जलक्रीडेमाजी रंगल्या युवती । वस्त्रें त्यांचीं होतीं तीरावरी ॥ ४ ॥
कलहार्थ इन्द्र वायुरूप घेई । उडवून जाई वस्त्रें सर्व ॥ ५ ॥
हातीं लागे तेंचि वस्त्र कन्या घेती । जलक्रीडा त्यांची पूर्ण होतां ॥६॥
देवयानी म्हणे शर्मिष्ठेलागूनी । वस्त्र दे सोडोनी, माझें असे ॥ ७ ॥
शिष्या तूं आमुची गोष्ट न हिताची । वासुदेव चित्तीं म्हणे क्रोध ॥८॥

२४९

क्रुद्ध शर्मिष्ठा ते म्हणे । पिता तुझा याचक जाणें ॥ १ ॥
स्तावक तो स्तुत्य राजा । वृषपर्वा पिता माझा ॥ २ ॥
विप्रकन्या तूं याचकी । दाता राव हें ओळखीं ॥ ३ ॥

वक्षस्थल घे पिटोनी । धूली सर्वांगीं माखोनी ॥ ४ ॥
होईं क्रुद्ध तूं यथेच्छ । मज नसे तुझा धाक ॥ ५ ॥
अंतीं येशील पायांशीं । सशस्त्रा मी, तूं याचकी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे खूळ । तेंचि कलहांचें मूळ ॥ ७ ॥

## २५०

देवयानी वस्त्र धरी । तिज शर्मिष्ठा निवारी ॥ १ ॥
अंतीं कूपांत लोटूनी । जाई शर्मिष्ठा निघूनी ॥ २ ॥
मृत्यु जाणोनियां तिचा । मार्ग धरी स्वगृहाचा ॥ ३ ॥
नहुषपुत्र तो ययाति । आला तेथें मृगयेसी ॥ ४
तृषाक्रांत तो कूपांत । जातां कन्या पाही तेथ ॥ ५ ॥
म्हणे कोण तूं कोणाची । उष्ण श्वास कां सोडिसी ॥ ६ ॥
कोमलांगी कूपामाजी । कैसी पडलीस आजी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कन्या । सांगे वृत्तांत राजन्या ॥ ८ ॥

## २५१

संजीविनीयोगें दैत्यांसीं उठवी । तोचि ज्ञाता कवि पिता माझा ॥१॥
संकटीं मीं ऐसें न कळे तयासी । उध्दरीं मजसी जळांतूनी ॥ २ ॥
रक्तोत्पलासम दक्षिण करातें । धरोनी कन्येतें उध्दरिलें ॥ ३ ॥
घेवोनी अनुज्ञा कुलवंत गेला । दासी-घूर्णिकेला वदे कन्या ॥ ४ ॥
पित्यालागीं कथीं जावोनी वृत्तांत । दैत्य नगरांत वास नको ॥ ५ ॥
घूर्णिका जावोनी कथिते पित्यासी । ताडिलें कन्येसी शर्मिष्ठेनें ॥ ६॥
वासुदेव म्हणे ऐकुनी तें वृत्त । शुक्र खिन्नचित्त वनीं धांवे ॥ ७ ॥

## २५२

कन्येसी भेटूनी मुनी करी शांत । पूर्वकर्मे दुःख होई म्हणे ॥ १ ॥
भिकाऱ्याची कन्या तूं स्तुतिपाठक । शर्मिष्ठा सदर्प म्हणे मज ॥२॥
ऐसें देवयानी सांगे स्वपित्यासी । ऐकतां तयासी खेद वाटे ॥ ३ ॥
इंद्र ययाति ते जाणती मजसी । अचिंत्य या लोकीं भाग्य माझें ॥४॥

भाग्यवंताची तूं कन्या न दीनाची । पोषितों जगासी मीचि जाणें ॥५॥
वासुदेव म्हणे मुनि कन्यकेसी । म्हणे या निंदेसी सहन करीं ॥ ६ ॥

अध्याय ७९ वा

२५३

जेणें सोशिलें निंदेसी । तेणें जिंकिलें जगासी ॥ १ ॥
क्रोध क्रुद्धअश्वासम । जिंकी जाणे जो संयम ॥ २ ॥
निरसी क्षमेनें क्रोधासी । तेणें जिंकिलें जगासी ॥ ३ ॥
सर्प टाकी जैसी कांत । जिंकी क्रोधा तो पुरुष ॥ ४ ॥
करी सहन जो निंदा । संधी साधूं न दे क्रोधा ॥ ५ ॥
सकारणही, न कोपे । पाय वंद्य जनीं त्याचे ॥ ६ ॥
यज्ञकर्ता क्रोधजेता । दुजा श्रेष्ठ तिन्हीं लोकां ॥ ७ ॥
बलाबलाचें अज्ञान । जयां भांडती ते जन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे प्राज्ञ– । अज्ञ न म्हणा समान ॥ ९ ॥

२५४

कन्या म्हणे ताता क्षमेचा महिमा । तेंवि धर्माधर्मा जाणतें मीं ॥ १ ॥
सदाचार कुल निंदिती जे जन । सर्वथा कल्याण नसे त्यांचें ॥ २ ॥
शिष्यभाव ज्यासी नसे ऐसे शिष्य । अपात्र क्षमेस जाणावे ते ॥३ ॥
वृत्त कुल ताता वसावें तेथेंची । कन्या वृषपर्व्याची त्याज्य मज॥४॥
मंथनें अरणी तैसें माझें चित्त । होई अती क्षुब्ध भाषणें त्या ॥ ५ ॥
उन्मत्त धनिकां, धनि संबोधणें । त्याहुनी मरणें वरिती ज्ञाते ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे समृद्ध कीं अरी । यांच्या उपकारीं पडूं नये ॥ ७ ॥

अध्याय ८० वा

२५५

मग क्रुद्ध शुक्रमुनि । जाई नृपाच्या भुवनीं ॥ १ ॥
म्हणे रायासी, अधर्म– । फल न लभे धेनूसम ॥ २ ॥
हळू हळू पाळें–मुळें । खणितां पुत्रपौत्रां कळे ॥ ३ ॥

कटु फल तें पापाचें । दीर्घकाळें उदित होतें ॥ ४ ॥
कच विप्रासी वधिलें । कन्येलागीं अवमानिलें ॥ ५ ॥
ऐसा सहवास तुझा । नको निर्धार हा माझा ॥ ६ ॥
नम्र जनीं वासुदेव । दैत्य धरी गुरुपाय ॥ ७ ॥

२५६

गुरूलागीं वृषपर्वा । म्हणे दास हा जाणावा ॥ १
कदाकाळीं अवमानिलें । ऐसें मजसी न स्मरे ॥ २ ॥
जरी आम्हातें त्यागिसी । जवळी करूं सागरासी ॥ ३ ॥
मुनि बोलला असुरा । जगा अथवा तुम्ही मरा ॥ ४ ॥
चालवितों योगक्षेमा । जाणीव ती नसे तुम्हां ॥ ५ ॥
जरी दैत्यांचा मी स्वामी । तोषवा ती देवयानी ॥ ६ ॥
वासुदेव ह्मणे धन्य । वृषपर्वा करी मान्य ॥ ७ ॥

२५७

वृत्त कळवितां देवयानी म्हणे । त्या वृषपर्व्यानें सांगावें हें ॥ १ ॥
येवोनियां दैत्य जोडोनियां कर । म्हणे मागें वर अदेयाहि ॥ २ ॥
शर्मिष्ठेनें व्हावें दासींसह दासी । म्हणे दैत्येंद्रासी देवयानी ॥ ३ ॥
समर्पण माझें होईल ज्या स्थानीं । यावें तया स्थानीं शर्मिष्ठेनें ॥ ४ ॥
पाठवोनी दासी वृत्तांत कन्येतें । कथितां स्थानातें येई तया ॥ ५ ॥
अकार्यहि म्हणे दानवगुरूचें । करीन मी साचें ज्ञातीस्तव ॥ ६ ॥
देवयानीलागीं वंदूनी शर्मिष्ठा । म्हणे 'जी' शिरसामान्य आज्ञा ॥७॥
क्रोधाकुल कन्या म्हणे शर्मिष्ठेसी । कैसी याचकींची दासी होसी ॥८॥
वासुदेव म्हणे आर्त ज्ञातीसाठीं । शर्मिष्ठा ते दासी होई सुखें ॥९॥

२५८

देवयानी म्हणे ताता । तोष आतां माझ्या चित्ता ॥ १ ॥
जाऊं सुखें नगरांत । तुझी विद्या ते अमोघ ॥ २ ॥
शुक्रालागीं समाधान । असुर करिताती पूजन ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे येती । सर्व आनंदें नगरीसी ॥ ४ ॥

## अध्याय ८१ वा

### २५९

ऐसे दिन बहू लोटतां त्या कन्या । पातल्या ज्या वना पूर्वी आल्या॥
त्याच स्थानीं जेथें कलह जाहला। क्रीडती त्या बाला तया स्थानीं ॥२॥
इतुक्यांत तेथें ययाति पातला। पाहोनी तयांला पुढती येई॥ ३ ॥
म्हणे युवतींनो नाम गोत्र सांगा। कन्या म्हणे राजा वृत्त येकें ॥४ ॥
शुक्रगुरूंची मी कन्या देवयानी। शर्मिष्ठा वचनीं नत माझ्या ॥ ५ ॥
जाईन मी जेथें तेथें ही येईल । नित्य सन्मानील मजलागीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बोलला ययाति । कैसी दासी तुझी शर्मिष्ठा हे ॥ ७ ॥

### २६०

म्हणे देवयानी वीरा। दैव नाचवीतें नरा ॥ १ ॥
दैवयोगें झाली दासी। नसो आश्चर्य मानसीं ॥ २ ॥
बोलसी तूं वेदवाणी। राववेषेंची येऊनी॥ ३ ॥
कोण कोणाचा तूं सांगे॥ पातलासी कोण्या मार्गें॥ ४ ॥
राव म्हणे नहुषाचा। पुत्र ययाति मी साचा॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राणा। आलों मृगयेसी वना॥ ६ ॥

### २६१

होऊनी तृषार्त आलों या स्थानासी । जलप्राशनासी अनुज्ञा दे ॥ १ ॥
देवयानी म्हणे भर्ता होई माझा। अधिकार न तैसा राव म्हणे ॥२ ॥
मनूपासूनी ते होती सर्व वर्ण । बोलली वचन देवयानी ॥ ३ ॥
राव म्हणे वर्ण एकाच देहाचे। धर्म भिन्न त्यांचे श्रेष्ठ विप्र ॥४ ॥
कन्या म्हणे पूर्वी ग्रहण त्वां केलें। म्हणोनी वरिलें तुजलागीं॥ ५ ॥
अन्य कोण आतां वरील मजसी। वेळ विचारासी नसे आतां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भय ययातीसी। जाणे तो विप्रांसी अग्नीसम॥ ७ ॥

२६२

राव म्हणे देवयानी। विप्रभय सर्पाहूनी॥१॥
सर्प दंशितो एकासी। विप्र बाधा ते राष्ट्रासी॥ २॥
पिता अर्पील तो जरी। स्वीकारीन तुज तरी॥ ३॥
देवयानी शुक्रालागीं। त्वरें आणवी त्या जागीं॥ ४॥
घेऊनियां अनुज्ञेसी। पट्टराणी होई त्याची॥ ५॥
राव बोलला शुक्रास। नसो संकराचें पाप॥ ६॥
शुक्र म्हणे होवो तैसें। वासुदेव कथी साचें॥ ७॥

२६३

पुनरपि शुक्र कथितो रायासी। मानी शर्मिष्ठेसी पूज्य राया॥ १॥
संबंध तिजसी परी होऊं नये। एवढी ही पाहे इच्छा माझी॥ २॥
राव प्रदक्षिणा घाली भार्गवासी। विपुल धनासी अर्पूनीयां॥ ३॥
वृषपर्वा तोही करितो सन्मान। ययाति निघून नगरीं जाई॥ ४॥
वासुदेव म्हणे देवयानी सांगे। विवाह या मार्गे ययातीचा॥ ५॥

अध्याय ८२ वा

२६४

देवयानीसह निज नगरासी। पातला ययाति इंद्रासम॥ १॥
अंतःपुरामाजी राही देवयानी। शर्मिष्ठा ते वनीं दासींसह॥ २॥
राजकन्येसाठीं स्थान एकांतांत। अशोकवनांत बांधियेलें॥ ३॥
ऐसा देवासम सुखांत राहिला। पुत्रलाभ झाला तयालागीं॥ ४॥
देवयानीलागीं पुत्र प्राप्त होतां। शर्मिष्ठेच्या चित्ता तळमळ॥ ५॥
वासुदेव म्हणे होतां ऋतुप्राप्ति। शर्मिष्ठा ते चिंती ययातीसी॥ ६॥

२६५

यदृच्छेनें राजा अशोकवनांत। त्याचवेळीं प्राप्त होई सुखें॥ १॥
एकाकी पाहोनी मधुर हास्यानें। वंदूनी प्रेमानें विनवी नृपा॥ २॥
पाहसी नृपाळा मजकडे जैसा। हेतु अंतरींचा जाणें तेंवी॥ ३॥

इंद्र सोम विष्णु यम तो ययाति । परस्त्रीतें चित्तीं आणीती ना ॥ ४ ॥
मंदिरीं तयांच्या परस्त्रीसी पाहे । ऐसा कोण आहे जगामाजी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मागे ऋतुदान । प्रार्थना करून रायालागीं ॥ ६ ॥

२६६

अनिंदिते दोषहीन तुझें रूप शील ॥
उशना कवीसी परी विरोध होईल ॥ १ ॥
म्हणे शर्मिष्ठा रायातें वागतां स्त्रियांसी ॥
तेंवि नर्म वचनें तैसें प्राण संकटासी ॥ २ ॥
होतां धनाचा अपहार विवाह समयं ॥
ऐशावेळीं मिथ्यावचनें दोष लागे काय ॥ ३ ॥
दीन अनाथा धेनूचे प्राण वांचवितां ॥
दोष असत्याचा नसे होतां विप्र हिंसा ॥ ४ ॥
हिंसाकारी सत्य तेंही पाप होइ राया ॥
असत्यहि पुण्य होई वांचवितां जीवां ॥ ५ ॥
दोघींही तुजसी राया प्रेमें आराधितां ॥
दोष लवही न माझा स्वीकार करितां ॥ ६ ॥
प्रमाण भूतांसी जरी जनीं असे राव ॥
सखीसह दासी कांता म्हणे वासुदेव ॥ ७ ॥

२६७

भार्या दास तेंवि पुत्र । जनीं होती परतंत्र ॥ १ ॥
ज्याचे हातीं त्याचें धन । मजलागीं दासी जाण ॥ २ ॥
तेणें आम्ही दोघी तुझ्या । करीं स्वीकार तूं माझा ॥ ३ ॥
राव होई निरुत्तर । सुखवी शर्मिष्ठाअंतर ॥ ४ ॥
शर्मिष्ठा ते गर्भवती । योग्यकाळीं पुत्रवती ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पुरा । आतां अनर्थ जाहला ॥ ६ ॥

अध्याय ८३ वा

२६८

पुत्रवृत्त शर्मिष्ठेचें । कळतां दुःख अंतरातें ॥ १ ॥

तिजसी म्हणे देवयानी । रमसी केंवि पापकर्मी ॥ २ ॥
म्हणे शर्मिष्ठा तियेसी । प्रार्थिलें मीं धर्मात्म्यासी ॥ ३ ॥
तया ऋषीचें अपत्य । नव्हे पाप मानीं सत्य ॥ ४ ॥
देवयानी म्हणे नाम । गोत्र कुल त्याचें कोण ॥ ५ ॥
म्हणे शर्मिष्ठा तियेसी । पुशिलें नाहीं तेजस्व्यासी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वृत्त । मानी देवयानी सत्य ॥ ७ ॥

२६९

यदु तुर्वसू ते देवयानीपुत्र । द्रुह्यु अनु पूरु शर्मिष्ठेचे ॥ १ ॥
दीर्घकाल ऐसा लोटला तयांसी । वेळ परीक्षेची येई पुढें ॥ २ ॥
देवपुत्रांसम बालक देखिले । देवयानी बोले नृपाळासी ॥ ३ ॥
अंगकांती यांची राया तुझ्यासम । कोणाचे हे कोण नकळे कांहीं ॥ ४ ॥
बाळांलागीं म्हणे पितृनाम कथा । हाचि जाणे पिता म्हणती बाळें ॥ ५ ॥
माता ते शर्मिष्ठा म्हणुनी जवळी येती । राव दूर लोटी जाणूनियां ॥ ६ ॥
ध्यानीं येवोनियां म्हणे देवयानी । मम भय मनीं नसे काय ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे योग्य वेळ येतां । गुप्त तेंचि लोकां कळे सर्व ॥ ८ ॥

२७०

म्हणे शर्मिष्ठा हा ऋषि । कथिलें सत्य मी तुजसी ॥ १ ॥
न्यायें वागतां न भय । होई सत्याचा विजय ॥ २ ॥
वरिलें तेव्हांचि रायासी । स्वीकारिलें जैं तुजसी ॥ ३ ॥
ज्येष्ठ श्रेष्ठ तूं ब्राह्मणी । वंद्य राव तुझ्याहूनी ॥ ४ ॥
म्हणे देवयानी राया । जातें पित्याच्या आश्रया ॥ ५ ॥
जाई पित्याच्या सदनीं । अश्रुप्रवाह लोचनीं ॥ ६ ॥
राव करी समाधान । मागोमागचि जाऊन ॥ ७ ॥
म्हणे वासुदेव कन्या । वंदी पित्याच्या चरणां ॥ ८ ॥

२७१

ताता अधर्मानें धर्मासी जिंकिलें । उत्तम नासलें नीच वाढे ॥ १ ॥
राजकन्येलागीं पुत्र होती तीन । केलें उलंघन ययातीनें ॥ २ ॥
मजलागीं मात्र पुत्रद्वय झालें । सत्य तें कथिलें चरणीं तुझ्या ॥ ३ ॥
शुक्र म्हणे राया धार्मिक तूं कैसा । होसी अधर्माचा वांटेकरी ॥ ४ ॥
जराजर्जर तूं होईरे सत्वरी । राव चरण धरी, वृत्त सांगे ॥ ५ ॥
ऋतुदान मागे परस्त्री नसोनी । तिज अव्हेरूनी पाप माथां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शुक्रासी पुसोनी । वागतां नरमणी मुक्त होता ॥ ७ ॥

२७२

वृद्ध होऊनीयां ययाति बोलला । मुनिश्रेष्ठा तुला दया येवो ॥ १ ॥
मुनि दयावंत म्हणे दे अन्यासी । राव म्हणे ऐसी कृपा असो ॥ २ ॥
पांच पुत्रांमाजी जो जरा घेईल । कीर्ति त्या लाभेल वैभवही ॥ ३ ॥
कनिष्ठहि जरी होवो तोचि राजा । दोषही न माझा घडो तेणें ॥ ४ ॥
मुनि म्हणे देई यौवन जो तुज । साम्राज्याचा लाभ होवो त्यासी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे बोलले तैं मुनि । पुत्र पौत्र जनीं लाभोत त्या ॥ ६ ॥

अध्याय ८४ वा

२७३

ऐसा वृद्ध राजा नगरासी येई । विचारूनि पाही ज्येष्ठ सुता ॥ १ ॥
यदु म्हणे ताता नको जरा मज । कैसें हें अयोग्य वचन तुझें ॥ २ ॥
वलि-पलित हें शिथिल शरीर । कर्ण दन्त नेत्र क्षीण होती ॥ ३ ॥
विरूपता येई सौख्य दूर जाई । प्रिय अन्य पाहीं पुत्र तुझे ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे क्रुद्ध होई राजा । वंश म्हणे तुझा अनधिकारी ॥ ५ ॥

२७४

तुर्वसूसी सांगे जरा घ्यावयासी । नाकारितां त्यासी शाप देई ॥ १ ॥
संततीचा तुझ्या होईल उच्छेद । राव तूं विरुद्ध-जन त्यांचा ॥ २ ॥
पापी पशूसम म्लेच्छ तुझी प्रजा । तुर्वसूसी राजा ऐसें म्हणे ॥ ३ ॥
द्रुह्युही न घेई वार्धक्य तयाचें । राव म्हणे तुझे क्षुद्र देश ॥ ४ ॥

नाविकावांचूनी वाहन न दुजें । तेथें राज्य तुझें क्षुद्र देशीं ॥ ५ ॥
नाकारितां अनु राव म्हणे त्यासी । नास्तिका मरती पुत्र तुझे ॥ ६ ॥
अकालीं तुजसी ग्रासील ते जरा । वासुदेव नरां वृत्त सांगे ॥ ७ ॥

२७५

पूरुलागीं म्हणे राजा । लाडका तूं पुत्र माझा ॥ १ ॥
शुक्रशापें जरा आली । साह्य होई तूं या वेळीं ॥ २ ॥
वर्षं सहस्र लोटतां । जरा घेईन तत्वतां ॥ ३ ॥
पूरु आज्ञा मान्य करी । राव संतुष्ट अंतरीं ॥ ४ ॥
म्हणे पुत्रा भाग्यवंता । राज्य लाभो पुत्र-पौत्रां ॥ ५ ॥
ऐसें बोलूनी पुत्रासी । स्मरे ययाति शुक्रासी ॥ ६ ॥
जरा संक्रमण पाही । वासुदेव चकित होई ॥ ७ ॥

अध्याय ८५ वा

२७६

भोगूनियां तृप्ति न होई चित्ताची । अंतीं हें ययाति वदला जनां ॥१॥
तयाचें कथन पूर्वी वर्णियेलें । पूरुलागीं दिलें पुढती राज्य ॥ २ ॥
पौरजनांलागीं कारण कथूनी । तपालागीं वनीं जाई नृप ॥ ३ ॥
यदूचे यादव तुर्वसा यवन । भोज म्लेच्छ जाण द्रुह्यु अनु ॥ ४ ॥
पौरव पूरुचे जनमेजया तूंही । वासुदेव गाई ऐसें वृत्त ॥ ५ ॥

अध्याय ८६ वा

२७७

वानप्रस्थ स्वीकारूनी । ययाति तो राही वनीं ॥ १ ॥
ऐसा वनामाजी जाई । कांहीं काळ सुखें राही ॥ २ ॥
वृत्ति शिलोंच्छ तयाची । तोष देई अतिथींसी ॥ ३ ॥
अब्द सहस्र तो ऐसा । पुढती जिंकी मन वाचा ॥ ४ ॥
तीस वर्षें जलपान । वर्ष एक वायु जाण ॥ ५ ॥
पंचाग्नि तो वर्ष एक । चरणीं एकाचि षण्मास ॥ ६ ॥

मास षट्क वायु भक्षी । पुढती जाई स्वर्गलोकीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । महिमा त्या ययातीचा ॥ ८ ॥

अध्याय ८७ वा

२७८

स्वर्गलोकीं राव मान्यता पावला । इंद्र म्हणे त्याला एके वेळीं ॥ १ ॥
पूरुलागीं बोध काय तुवां केला । सांगे तो मजला सत्य सत्य ॥२॥
राव म्हणे गंगा यमुना प्रदेश । पूरूचें तें राज्य कथिलें त्यासी ॥३॥
प्रत्यंत ते देश इतर सुतांचे । सन्मान विधेतें देई नित्य ॥ ४ ॥
अक्रोधन श्रेष्ठ क्रोधी नराहूनी । असहिष्णूहूनी सहनशील ॥ ५ ॥
तारतम्य ऐसें नित्य ध्यानीं आणीं । अपशब्द जनीं बोलूं नये ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐकावा हा बोध । जनांत प्रमोद वाढे तेणें ॥ ७ ॥

२७९

मर्मभेदी वाचा कोणी । येऊं न द्यावी वदनीं ॥ १ ॥
दग्ध करिते तितिक्षा । दुष्ट पापी प्रतिपक्षा ॥ २ ॥
कठिण शब्दें नित्य जनां । टोंचिती ते हीन जाणा ॥ ३ ॥
अंतर्बाह्य सत्कारावें । सज्जनांनीं ऐसें व्हावें ॥ ४ ॥
दया सर्वभूतांवरी । मित्रभाव तो अंतरीं ॥ ५ ॥
दान सत्पात्रीं मधु वाणी । श्रेष्ठ साधन त्रिभुवनीं ॥ ६ ॥
सदा समाधान दान । नको लोभयुक्त मन ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पूजा । पूज्यांची तो सांगे राजा ॥ ८ ॥

अध्याय ८८ वा

२८०

इंद्र म्हणे तप कोणासम तुझें । राव म्हणे माझें श्रेष्ठ बळ ॥ १ ॥
पाहूनी तो गर्व इंद्र म्हणे राजा । त्वरित या स्वर्गा सांडिसील ॥२॥
पतनें संतांचा संग घडो मातें । ऐसें मघव्यातें मागे राव ॥ ३ ॥

तथास्तु म्हणतां पावला पतन । 'अष्टक' भेटून विनवी त्यासी ॥४॥
सूर्यचंद्रासम कोणरे तूं सांग । पतनाचा मार्ग भंगो तुझ्या ॥ ५ ॥
सुखभ्रष्ट संतां संतचि आधार । सज्जन तो थोर अतिथि माना ॥६॥
प्रतापांत अग्नि संग्रहांत भूमी । प्रकाशक स्वामी सूर्यश्रेष्ठ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे उपदेश थोर । परी ऐकणार जनीं थोडे ॥ ८ ॥

## अध्याय ८९ वा

### २८१

अवमानें हें पतन । ययाति हें माझें नाम ॥ १ ॥
तुज वंदन न केलें । वडिलपण आड आलें ॥ २ ॥
विद्या तप आणि जन्म । वृद्ध तोचि द्विजां मान्य ॥ ३ ॥
म्हणे अष्टक नृपाळा । जन्म न पुरे सन्मानाला ॥ ४ ॥
गर्वें पुण्य नष्ट होई । राव म्हणे अनुभव येई ॥ ५ ॥
परी गर्व नच सुटे । तेणें फसती मोठमोठे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गर्व । नष्ट करी वैभव सर्व ॥ ७ ॥

### २८२

हानी ही पाहोनी बोध जे घेतील । तेचि जिंकितील कामादिकां ॥१॥
तपस्या विद्वत्ता संपादावी यत्नें । परी अभिमानें भरूं नये ॥ २ ॥
म्हणसील कैसा मज अभिमान । दैव बलवान नित्य लोकीं ॥ ३ ॥
मूढासही पुण्य पंडितासी पाप । घडवितें देख दैव जनीं ॥ ४ ॥
जाणूनी हें हर्ष शोक न करावा । विवेक धरावा सर्वकाल ॥ ५ ॥
सावधानचित्त संतापाचा त्याग । करितों मी नित्य राव सांगे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पुशितो अष्टक । भोगिले ते लोक सांगे सर्व ॥ ७ ॥

### २८३

यज्ञयागादिकीं स्वर्ग तें जिंकिले । तेथूनी गांठिले श्रेष्ठ स्वर्ग ॥ १ ॥
शतयोजन ती पुरी अमरावती । पुढें प्रजापतीलोकीं गेलों ॥ २ ॥

---

१ ययातीचा दौहित्र.

देवाधिदेवाच्या लोकीं तेथूनियां। जातां पूजिती या नृपा देव ॥३॥
अप्सरांसहित नंदनवनांत। राहिलों सुखांत दीर्घकाल ॥ ४ ॥
पुढती एक दूत मजपुढें आला। जा ऐसें वदला क्रोधें मज ॥ ५ ॥
पतन पावतां शोकाकुल देव। लाभला हा ठाव भाग्यें मज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अष्टकासी ऐसें। बोलतां रायातें हर्ष होई ॥ ७ ॥

अध्याय ९० वा

२८४

राव ह्मणे अष्टकासी। स्वजन जैसे निर्धनासी ॥ १ ॥
तैसे देव ही तत्क्षणा। त्यजिताती पुण्यहीना ॥ २ ॥
' न स[1] पुनः ' अष्टकातें। श्रुतिवाक्य वांयां दिसे ॥ ३ ॥
राव म्हणे कंक गृध्र। भक्षिताती जें शरीर ॥ ४ ॥
त्याचा लोभ धरूनियां। कर्म करितां जन्म वांयां ॥ ५ ॥
ऐशा कर्मे अधःपात। होई जीवा नर्कवास ॥ ६ ॥
निंद्य जारण-मारण। तैसें निषिद्ध तें काम्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्रश्न। करी अष्टक चिंतून ॥ ८ ॥

२८५

म्हणे अष्टक नृपाळा। अन्य देह तो कोणाला ॥ १ ॥
राव म्हणे देह नासे। आत्मा अमर तो असे ॥ २ ॥
अकृताचा लाभ होई। कृतकर्म व्यर्थ जाई ॥ ३ ॥
ऐसा दोष नसे एथें। भिन्न देह ते आत्म्याचे ॥ ४ ॥
वर्षे असंख्य अज्ञानी। वांयां घालविती प्राणी ॥ ५ ॥
परी भान नसे त्यांसी। विषयीं रंगूनियां जाती ॥ ६ ॥
आप्तगोत ते राक्षस। मूढ मानी तेंचि सुख ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे क्लेश। आवडती ते पाप्यास ॥ ८ ॥

२८६

छिन्न भिन्न कैसे न होती पतनें। अष्टक तो म्हणे रायालागीं ॥ १ ॥

---

१ न स पुनरावर्तते.

राव म्हणे जैसे गेले तैसे येती । प्रथम आकाशीं पुढती वायु ॥ २ ॥
धूम मेघ तैसे जल होऊनियां । भूलोकाचे ठायां पुढती येती ॥ ३ ॥
अन्नरूपें जाती पुरुष शरीरीं । मातेच्या उदरीं तैसे पुढें ॥ ४ ॥
पुण्यवंता पुण्ययोनी प्राप्त होई । पापी तोचि घेई पापयोनी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे स्थूल सूक्ष्म भिन्न । आत्मा, हेंचि ज्ञान सुदुर्लभ ॥६॥

२८७

मातेच्या उदरीं जीव स्वयें जाई । अथवा तो घेई अन्यरूप ॥ १ ॥
देहरूप जरी जीव, त्या संसार । घडे निरंतर देहयोगें ॥ २ ॥
देहावीण जातां मातेच्या उदरीं । मलादिकां तरी इंद्रिय लाभो ॥३॥
व्यष्टिलिंगोपाधि जीव गर्भस्थानीं । वीर्यासी घेवोनी प्रवेशे तो ॥४॥
सूक्ष्म भूतांसवें गर्भवृद्धि करी । अहंकार धरी शरीराचा ॥ ५ ॥
त्या त्या इंद्रियांनीं विषय सेवितो । आशय जाणतो मानसानें ॥ ६ ॥
स्थूल सूक्ष्मद्वारें विषयसेवन । करी आत्मा जाण भास ऐसा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अष्टकाचा प्रश्न । ऐकोनियां सूक्ष्म देह जाणा ॥ ८ ॥

२८८

स्थूल सूक्ष्म दग्ध करितां नष्ट होती । जीवाची वसती पुढती कैंवि ॥१॥
पापपुण्यासवें सूक्ष्मदेहधारी । जीव तो भरारी मारीतसे ॥ २ ॥
मरण तें जाण स्थूल देह नाश । सूक्ष्म देह मोक्ष होतां नासे ॥ ३ ॥
नैष्कर्म्य सिद्धीतें मेळवीन आतां । जाऊनी भूलोका चुकती जन्म ॥४॥
शम दम तप दान तेंवि लज्जा । भूतअनुकंपा आर्जव तें ॥ ५ ॥
ऐसीं सप्तद्वारें स्वर्गाचीं जाणोनी । अभिमान त्यागोनी ज्ञानी राहे ॥६॥
दुष्ट फल देती आश्रमांचीं कर्मे । एका अभिमानें आचरीतां ॥ ७ ॥
द्वंद्व साहोनियां दंभ तो त्यजावा । तेणें वासुदेवा मोक्ष लाभे ॥ ८ ॥

अध्याय ९१ वा

२८९

सेवेमाजी रत ब्रह्मचारी धन्य । गुरूसी अनन्य शरण जातां ॥ १ ॥

न्यायप्राप्त धनें यज्ञयाग करी । गृहस्थ तो वरी पुण्यलोक ॥ २ ॥
कष्टें संपादित फलमूल भक्षी । विरक्त तापसी सिद्धि पावे ॥ ३ ॥
शांति क्षमाशील निर्जन स्थलासी । राहे तो संन्यासी मुख्य जाणा ॥४॥
हृदयस्थ ब्रह्म परब्रह्मीं लीन । करी जो चिंतन यतिश्रेष्ठ ॥ ५ ॥
परिग्रहशून्य एकाकी हिंडतो । एकविंशति तो पिढया तारी ॥६॥
वासुदेव म्हणे संन्यासेंचि मोक्ष । अथवा अन्य मार्ग प्रश्न ऐसा ॥७॥

२९०

म्हणे अष्टका ययाति । ग्रामीं वनवास ज्यासी ॥ १ ॥
अथवा वनीं ग्राम ज्याला । मुनि नाम त्या दोघांला ॥ २ ॥
योगाभ्यासी वनामाजी । ग्राम्य वस्तूसी जो त्यागी ॥ ३ ॥
समीप त्या ग्राम वनीं । विवेकानें वन ग्रामीं ॥ ४ ॥
योगमार्ग कीं विवेक । अवलंबी तोचि सिद्ध ॥ ५ ॥
तन मन नित्य शुद्ध । तोचि जगामाजी वंद्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मुनि । आदरासी पात्र जनीं ॥ ७ ॥

२९१

मंद अधिकारी तप उपोषणें । जिंकी वैराग्यानें स्वर्गलोका ॥ १ ॥
मध्यम तो द्वंद्वें साही, उपासना । करोनियां जन्मा सार्थ करी ॥ २ ॥
उत्तम तो सर्व परिग्रहशून्य । पश्वादिकांसम संग्रह त्यागी ॥ ३ ॥
पाहूनी न पाही अनासक्त चित्तें । विश्व आत्मरूपें जाणूनियां ॥ ४ ॥
यति आत्मनिष्ठ मोक्षसुख पावे । वासुदेव धांवे मागें त्याच्या ॥ ५ ॥

अध्याय ९२ वा

२९२

म्हणे अष्टक तो राया योगी ज्ञानी । कोण ब्रह्मज्ञानी प्रथम होई ॥ १ ॥
निष्काम व्यवहारीं ध्यान समाधींत । मग्न जो गृहस्थ योगरत ॥२॥
तैसा ज्ञानी भिक्षु ऐसे दोन्ही मुक्त । परी जीवन्मुक्त होई ज्ञानी ॥३॥
जगन्मिथ्या ऐसा निश्चय तयाचा । मोक्ष योगियाचा श्रमसाध्य ॥४॥

ज्ञाननिष्ठेविण सुटलां साधन । योगभ्रष्ट जाण तया नांव ॥ ५ ॥
ज्ञानी तो निर्लेप कर्म करूनियां । सकाम ते वांयां श्रमती जनीं ॥ ६ ॥
अजितेंद्रियाचें धन तो अनर्थ । धर्म तो मोक्षार्थ अनासक्ति ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे, अष्टक रायासी । म्हणे तूं आलासी कोठूनियां ॥ ८ ॥

२९३

क्षीण पुण्य मी होऊन । आलों राया स्वर्गातून ॥ १ ॥
येरु म्हणे पुण्यलोक । मज असती कीं सांग ॥ २ ॥
राव म्हणे असंख्यात । तुझ्या पुण्याईचे लोक ॥ ३ ॥
म्हणे अष्टक ते राया । अर्पितों मी तुझ्या पायां ॥ ४ ॥
राव म्हणे तुझे तुज । लाभोत ते पुण्यलोक ॥ ५ ॥
याचना ते वीरपत्नी । सेवी विप्र महाज्ञानी ॥ ६ ॥
दौहित्रांसी तो ययाति । म्हणे वीर न याचिती ॥ ७ ॥
प्रतिग्रह न घे राव । धन्य म्हणे वासुदेव ॥ ८ ॥

अध्याय ९३ वा

२९४

वसुमान शिबि तेहि पुण्य देती । बोलला ययाति तयांलागीं ॥ १ ॥
केलें न तयाचें फल नको मज । रथ इतुक्यांत प्राप्त होई ॥ २ ॥
सर्वही त्या रथीं वैसूनियां जाती । दूत शिबीलागीं पुढती नेती ॥३॥
अमर्याद पुण्य असे त्या शिबीचें । फल हें तयाचें राव म्हणे ॥ ४ ॥
मातामह म्हणे राव मी ययाति । अष्टका तूं अती पुण्यवंत ॥ ५ ॥
पुण्याविण स्वर्ग न लाभे कोणासी । नृपाळ ययाति सांगे ऐसें ॥६॥
वासुदेव म्हणे दौहित्रांनीं त्याला । उद्धरूनी नेला स्वर्गामाजी ॥७॥

अध्याय ९४ वा

२९५

जनमेजयासी सांगे व्यासशिष्य । पूरुवंशवृत्त सकल ऐका ॥ १ ॥
प्रवीर ईश्वर रौद्राश्व हे तीन । वीरपुत्र जाण पूरुलागीं ॥ २ ॥

रौद्राश्वासी पुत्र ऋचेयु जाहला। मतिनार त्याला 'तंसु' त्यासी ॥३॥
ईलिन पुढती दुष्यंत, तयाचा। पिता भरताचा ख्यात जनीं ॥ ४ ॥
भरतासी तीन भाग्यवती स्त्रिया। नवपुत्र तया, तयां ठाईं ॥ ५ ॥
पुत्र नऊ गेले व्यर्थ भरताचे। 'भूमन्यु' तयातें पुढती झाला ॥ ६ ॥
सुहोत्र तयासी सुपुत्र लाभला। अजमीढ भला पुत्र त्यासी ॥ ७ ॥
ऋक्षसुत त्याचा संवरण त्यासी। पांचाल नृपती जिंकी तया ॥ ८ ॥
सिंधुतटीं बांधी दुर्ग गिरीवरी। राहिला त्या स्थळीं दीर्घकाल ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे वसिष्ठ भेटती। राज्यलाभ देती करूनियां १० ॥

२९६

कुरु संवरणाचा सुत। त्याचे नावें कुरुक्षेत्र ॥ १ ॥
अश्ववान पुत्र त्याचा। परिक्षितीचा तो पिता ॥ २ ॥
सप्त परिक्षिती सुत। जनमेजय तो विख्यात ॥ ३ ॥
तयालागीं धृतराष्ट्र। पांडु बाल्हिकादि पुत्र ॥ ४ ॥
धृतराष्ट्राचा प्रतीप। शांतनु तो पुढती देख ॥ ५ ॥
ऐसे राजऋषि झाले। भरतकुल भूषविलें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसा। सर्व विस्तार मनूचा ॥ ७ ॥

अध्याय ९५ वा

२९७

यदूचे यादव पूरूचे पौरव। वृत्त त्यांचें सर्व कथिलें नृपा ॥ १ ॥
गोवासनकन्या 'देविका' धर्माची–। पत्नी 'यौधेयासी' प्रसवली
काशिराजकन्या 'बलंधरा' भीमा। 'सर्वग' त्यां जाणा पुत्र एक ॥३॥
कृष्णभगिनी ते सुभद्रा पार्थाची–। राणी अभिमन्यूसी जन्म देई ॥४॥
चेदिराजकन्या 'करेणु' नकुला। 'निरामित्र' झाला पुत्र तयां ॥५ ॥
द्युतिमंताची ते 'विजया' 'सहदेवा'। सुहोत्र' जाणावा पुत्र त्यांचा
उत्तरेचा सुत राया परिक्षिति। जनमेजय त्यासी सुत होइ ॥ ७ ॥

---

१ भरताला अनुरूप नसल्यामुळें त्यांच्या मातांनीं त्यांस मारिलें.

राया शतानीक शंकुकर्ण तुझे। वीरपुत्र दोघे, पौत्रही तो ॥ ८॥
ऐसें वंशवृत्त ऐकती तयांसी। द्रव्य धन कीर्ति लाभतसे ॥ ९॥
वासुदेव म्हणे संक्षेपें कथिलें। भारतीं वर्णिलें विस्तृत हें ॥ १० ॥

अध्याय ९६ वा

२९८

महाभिष नामें राजा। थोर इक्ष्वाकु कुळींचा ॥ १ ॥
महापुण्यें स्वर्गलाभ। पाही एकदां स्वयंभ ॥ २ ॥
ब्रह्मा बैसतां सभेसी। गंगा येतां त्या स्थानासी ॥ ३ ॥
वस्त्र वायुनें उडविलें। सर्व अधोमुखी झाले ॥ ४ ॥
महाभिष तो निःशंक। पाही, ब्रह्मा तैं संक्रुद्ध ॥ ५ ॥
उभयांसी देई शाप। तुम्हां प्राप्त मृत्युलोक ॥ ६ ॥
क्रुद्ध गंगेवरी होतां। राया येसी स्वर्गलोका ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे झाला। आतां प्रारंभ कथेला ॥ ८ ॥

२९९

राव चिंती व्हावें प्रतीपाचा सुत,। गंगा खिन्नचित्त मार्गे चाले ॥१॥
अष्टवसु पाही मार्गांत निस्तेज। कारण सहज पुशिलें त्यांसी ॥ २ ॥
म्हणती वसिष्ठधेनूसी हरिलें। तयांनीं शापिलें आम्हालागीं ॥ ३ ॥
मानवयोनीतें जाणें प्राप्त असे। माता तूं आम्हातें गंगे होई ॥ ४ ॥
शांतनूचे सुत होऊं, गंगा त्यांसी। म्हणे मी तुम्हासी साह्य असें ॥५॥
जन्मतांचि आम्हां टाकावे उदकीं। तेणें स्वस्थळासी येऊं वेगें ॥ ६ ॥
आमुच्या अंशानें पुत्र नृपाळासी। होईल तयासी पुत्र नसो ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें। पुढील कार्यातें जाती सर्व ॥ ८ ॥

अध्याय ९७ वा

३००

गंगाद्वारीं राव प्रतीप तपासी। बैसतां तयासी गंगा भेटे ॥ १ ॥

---

१ शतानीकपुत्र 'अश्वमेधदत्त' २ ब्रह्मदेव.

वेष घेऊनियां पातली युवती । अपसव्य अंकीं बैसतसे ॥ २ ॥
राव म्हणे भद्रे काय तुझी आज्ञा । भर्ता होईं प्राज्ञा म्हणे देवी ॥ ३ ॥
राव म्हणे स्थान असे हें स्नुषेचें । तेंवि व्रत माझें न भंगेचि ॥ ४ ॥
यास्तव हे देवी स्नुषा होईं माझी । वचन गंगेसी मान्य तदा ॥ ५ ॥
म्हणे मीं वागेन कांहीं नियमानें । विचार पतीनें करूं नये ॥ ६ ॥
कल्याण सुताचें होईल म्हणोनी । अदृश्य त्या स्थानीं पावे गंगा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शांतनु जन्मला । प्रतीप तोषला पुत्रलाभें ॥ ८ ॥

३०१

राव शांतनूसी बोले योग्य समयास ॥
दिव्य कन्या तुजपाशीं येतां एकांतांत ॥ १ ॥
नको प्रश्न करूं कांहीं ऐक जें सांगे तें ॥
करूंदे सुखानें तिजसी करील ती जें जें ॥ २ ॥
आज्ञा मान्य करुनी माझी स्वीकारीं तियेस ॥
राव पुत्रालागीं ऐसा करी उपदेश ॥ ३ ॥
पुढें एकेवेळीं गंगातटाकीं शांतनु ॥
हिंडतां वनीं मृगयेसी पाही गौरतनु ॥ ४ ॥
मोह परस्परां होई शांतनु हांसोनी ॥
म्हणे भार्या होईं माझी सुंदरी कल्याणि ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसें वृत्त हें पूर्वीचें ॥
वैशंपायन तें सांगे जनमेजयातें ॥ ६ ॥

अध्याय ९८ वा

३०२

होईन मी राजा, महिषी आनंदें । परी मज छंदें वागूं द्यावें ॥ १ ॥
मान्यता लाभतां राहिली सुखानें । परस्पर प्रेमें आनंदती ॥ २ ॥
चातुर्य सद्गुण सुस्वर गायन । नृपाळाचें मन तेणें रमे ॥ ३ ॥
संवत्सर ऐसे लोटले बहुत । देवांसम सुत अष्ट होती ॥ ४ ॥
मानवी देहेंसी होईं या नियुक्त । बोलूनी गंगेंत बुडवी त्यांसी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राव असंतुष्ट । परी भोगी कष्ट लोभें तिच्या ॥ ६ ॥

१०४३०

३०३

पुत्र आठवा तो नेतां । दुःख नृपाळाच्या चित्ता ॥ १ ॥
म्हणे थांब नांव सांग । कांवो करिसी पुत्रवध ॥ २ ॥
क्रोधयुक्त ऐसी वाणी । गंगा म्हणे ती ऐकुनी ॥ ३ ॥
तुज पुत्रलाभ होवो । संकल्पही सिद्धि पावो ॥ ४ ॥
जन्हुकन्या मीं या स्थानी । देव कार्य माझ्या मनीं ॥ ५ ॥
अष्टवसु मुक्त केले । आपव शापें पतन झालें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे गंगा । वदे सांभाळीं हा तुझा ॥ ७ ॥

अध्याय ९९ वा

३०४

राव म्हणे आपव कोण । काय अपराध दारुण ॥ १ ॥
गंगा म्हणे वरुणसुत । वसिष्ठ तो हा आपव ॥ २ ॥
दक्षकन्या सुरभीसी । कन्या नंदिनी नांवाची ॥ ३ ॥
वसिष्ठाची होमधेनु । सामर्थ्यासी काय वानूं ॥ ४ ॥
वसु एकदां त्या ठायां । लुब्ध, धेनु पाहूनियां ॥ ५ ॥
झाली 'द्यु' वसूची कांता । म्हणे आपुलीया नाथा ॥ ६ ॥
'जितवती' राजकन्या । सखी मृत्युलोकीं मान्या ॥ ७ ॥
तिज अमर करावें । हेतु माझे पुरवावे ॥ ८ ॥
कांतावचन ऐकोनी । नेलें धेनूसी हरूनी ॥ ९ ॥
कळतां शाप देई मुनि । वासुदेव त्यासी नमी ॥ १० ॥

३०५

वृत्त कळतां वसूंसी । मुनीलागीं शरण येती ॥ १ ॥
संवत्सराच्या अंतरें । मुक्त व्हाल तुम्हीं बारे ॥ २ ॥
ज्याचा अपराध थोर । राहील तो दीर्घकाल ॥ ३ ॥
संयमी तो शास्त्रवेत्ता । राजपुत्र ऊर्ध्वरेता ॥ ४ ॥
तोचि पुत्र देवव्रत । होई जगीं हा विख्यात ॥ ५ ॥

कथुनी वृत्तांत त्या वेळीं । पुत्रासह गुप्त झाली ॥ ६ ॥
वासुदेव कथी वृत्त । राव व्याकुळ चित्तांत ॥ ७ ॥

अध्याय १०० वा

३०६

शांतनु नृपाळ होता क्षमाशील । प्रजेचा सांभाळ प्रेमें करी ॥ १ ॥
सुलक्षणी राजा धर्माचें निधान । करी यज्ञ दान संतोषानें ॥ २ ॥
वर्णआश्रमांचे धर्म सांभाळूनी । प्रजा तुष्ट मनीं सर्वकाळ ॥ ३ ॥
ऋणत्रयमुक्त व्हावयासी जन । करिताति यज्ञ त्रैवर्णिक ॥ ४ ॥
सूर्य वायु भूमी यमासम गुण । ब्रह्मचारी तीन तपें राही ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे हस्तिनापुरांत । भूमी सागरान्त सांभाळा तो ॥ ६ ॥

३०७

मृगयेसी राव जातां पाहिलें नवल ॥
आटलें कसें हो नकळे भागीरथी जळ ॥ १ ॥
तीरातीरानें तो जातां कोणी सुकुमार ॥
शूर तेजःपुंज ऐसा पाहिला कुमार ॥ २ ॥
अस्त्रप्रयोगें आपुल्या अडविली गंगा ॥
अतिमानुषकृतीनें पाही वनीं राजा ॥ ३ ॥
पाहतां पाहतां होई अदृश्य तो बाळ ॥
विस्मयचकित होई पाहुनी नृपाळ ॥ ४ ॥
शंकित होऊनी मनीं विनवी गंगेसी ॥
बाळ दाखवीं ग माझा जान्हवी मजसी ॥ ५ ॥
गंगा दिव्यरूपें आली घेऊनी सुतातें ॥
ओळख देऊनी म्हणे नेई स्वगृहातें ॥ ६ ॥
शुक्र बृहस्पति तेंवि परशुरामासम ॥
पराक्रमी तनय तुझ्या करितें स्वाधीन ॥ ७ ॥

सूर्यासम पुत्रलाभें राजा पूर्णकाम ॥
वासुदेव म्हणे जाई नगरीं घेऊन ॥ ८ ॥

३०८

चार संवत्सर राजा । कंठी काळ आनंदाचा ॥ १ ॥
यमुनातीरीं एक्या वेळीं । कथा अद्‌भुत वर्तली ॥ २ ॥
राव हिंडतां वनांत । सुटला अपूर्व सुगंध ॥ ३ ॥
काय म्हणोनी शोधितां । पाही धीवरकन्यका ॥ ४ ॥
पाहोनियां दिव्यरूप । राजा जाहला मोहित ॥ ५ ॥
म्हणे कोण तूं या स्थळीं । दाशकन्या मी बोलली ॥ ६ ॥
धर्मनौका हांकीतसे । वासुदेव म्हणे सुखें ॥ ७ ॥

३०९

राव जाऊनियां भेटला पित्यासी । म्हणे दे कन्येसी दाशा मज ॥ १ ॥
येरु म्हणे राजा पुत्र युवराज । होतां ही सहज प्राप्त होई ॥ २ ॥
पुत्रप्रेमें राजा मूकपणें गेला । धीवरकन्येला स्मरे मनीं ॥ ३ ॥
कांहीं काळ ऐसा लोटतां रायासी । पाहिलें एकांतीं देवव्रतें ॥ ४ ॥
म्हणे ताता मनीं चिंता कासयाची । उद्विग्नता ऐसी कांहो सांगा ॥५॥
उत्साह न दिसे कृशता शरीरीं । कारण सत्वरी कळो मज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बोल सत्पुत्राचे । ऐकतां पित्याचें हृदय द्रवे ॥ ७ ॥

३१०

म्हणे शांतनु सुतासी । एकलाचि तूं मजसी ॥ १ ॥
एक सुत जया नरा । पुत्रहीनचि तो खरा ॥ २ ॥
हेचि चिंता माझ्या मनीं । पुत्र थोर सर्वांहूनी ॥ ३ ॥
अग्निहोत्र विद्या कला । तुलना ते न पुत्राला ॥ ४ ॥
होऊं नये वंशाच्छिन्न । इच्छा भार्येची म्हणून ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वृत्त । ऐके सर्व देवव्रत ॥ ६ ॥

३११

चिंतूनियां मनीं भेटे अमात्यांसी । वृत्त तें सुतासी कळलें सर्व ॥ १ ॥
तात्काळ तो जाई दाशराजापाशीं । वृद्ध क्षत्रियांसी घेऊनियां ॥ २ ॥
सत्कारूनी त्यासी दाशराज म्हणे । श्रेष्ठ सर्वगुणें विवाह हा ॥ ३ ॥
विरोध श्रेष्ठासी हाचि दोष यांत । अजिंक्य युध्दांत सकलांसी तूं ॥ ४ ॥
कन्यादानास्तव हाचि दोष असे । सद्गुण कन्येचे किती वर्णूं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे देवव्रत ज्ञानी । हेतु ओळखूनी हृष्ट झाला ॥ ६ ॥

३१२

देवव्रत म्हणे दाशा । ऐकें निर्धार हा माझा ॥ १ ॥
सत्यवतीचा नंदन । राजा होईल तो जाण ॥ २ ॥
गांगेयासी तो धीवर । म्हणे दानाचा ईश्वर ॥ ३ ॥
सत्यशील देवव्रता । वचनीं विश्वास या माझा ॥ ४ ॥
परी चिंता मानसासी । तुझ्या भावी अपत्याची ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धूर्त । नित्य पाहे निज स्वार्थ ॥ ६ ॥

३१३

ऐका ऐका सर्व जन । माझें प्रतिज्ञावचन ॥ १ ॥
देवव्रत सभेमाजी । म्हणे होऊनियां राजी ॥ २ ॥
चिंता मानसीं न करीं । ब्रह्मचारी जन्मभरी ॥ ३ ॥
पुत्रावांचुनियां स्वर्ग । मेळवीन मीं अभंग ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे जगीं । पित्यास्तव सर्व त्यागी ॥ ५ ॥

३१४

ऐकूनियां ती वैखरी । उभे रोमांच शरीरीं ॥ १ ॥
दाश आनंदित झाला । म्हणे अर्पिली कन्येला ॥ २ ॥
देव पुष्पें वर्षिताती । 'भीष्म' ऐसें त्या बोलती ॥ ३ ॥
म्हणे भीष्म रथावरी । माते बैस या सत्वरी ॥ ४ ॥
आला हस्तिनापुरासी । वृत्त निवेदी पित्यासी ॥ ५ ॥
'भीष्म' 'भीष्म' म्हणती जन । राव संतुष्ट होऊन ॥ ६

म्हणे इच्छामरण तुज । अद्वितीय तूं जगास ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । पितृइच्छा करी पूर्ण ॥ ८ ॥

अध्याय १०१ वा

३१५

सत्यवतीसह विवाह नृपाचा । चित्रांगद त्याचा पुत्र गुणी ॥ १ ॥
विचित्रवीर्य तो पुत्र दुजा होई । कालवश होई पुढती नृप ॥ २ ॥
कुरुक्षेत्रामाजी चित्रांगद वीर । चित्रांगदावर चाल करी ॥ ३ ॥
गंधर्वें रायाचा वध रणीं केला । सरस्वतीतीरा समर झालें ॥ ४ ॥
शांतनव भीष्में सर्वक्रिया कर्म । करूनी स्वधर्म आचरीला ॥ ५ ॥
विचित्रवीर्यासी राज्य अर्पियेलें । वय तें कोवळें जरी त्याचें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे रक्षी बांधवासी । हर्ष सत्यवती मानीतसे ॥ ७ ॥

अध्याय १०२ रा

३१६

विचित्रवीर्याचें राज्य चालविलें । अज्ञानाचें केलें संगोपन ॥ १ ॥
विवाह करावा ऐसें चित्तीं येतां । स्वयंवर वार्ता ऐकीयेली ॥ २ ॥
काशिराजकन्या उपवर तीन । तयांस्तव भीष्म सिध्द होई ॥ ३ ॥
स्वयंवरालागीं एकाकी तो जाई । थट्टा त्याची होई युवकांत ॥ ४ ॥
क्रुध्द होऊनीयां घेऊनी कन्यांसी । निघाला वेगेंसी निजस्थळा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राक्षस विवाह । करिती क्षत्रिय ऐशारीती ॥ ६ ॥

३१७

कन्या नेतों बलात्कारें । कोणी समरासी यारे ॥ १ ॥
भुजा थोपटिती वीर । काढूनियां अलंकार ॥ २ ॥
घालिताती शिरस्त्राणें । सिद्ध कवच धनुर्बाणें ॥ ३ ॥
घोर संगर जाहलें । वीर असंख्यात मेले ॥ ४ ॥

---

१ एक गंधर्व

एकाकी तो वीर भीष्म । करी अघटित कर्म ॥ ५ ॥
अंगावरी शाल्वराज । येई मदोन्मत्त गज ॥ ६ ॥
केला सूत अश्वहीन । परी वांचविले प्राण ॥ ७ ॥
भीष्म अक्षत शरीर । गांठीं आपुलें नगर ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कन्या । अर्पी भ्रात्यासी वदान्या ॥ ९ ॥

३१८

अंबा बोलली भीष्मासी । वरिलें शाल्व नृपाळासी ॥ १ ॥
करूनियां विचारणा । दिली अंबेसी अनुज्ञा ॥ २ ॥
कन्या अंबा अंबालिका । भ्रात्यालागीं अर्पी देखा ॥ ३ ॥
होत्या लावण्यसुंदरी । सुख राजाच्या अंतरीं ॥ ४ ॥
क्षयरोगानें पीडला । अल्पायु तो स्वर्गी गेला ॥ ५ ॥
खिन्न होई गंगासुत । करी सकल प्रेतकृत्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे रोग । सेवितांचि अति भोग ॥ ७ ॥

अध्याय १०३ रा

३१९

शोकाकुल माता हीनदीन होई । स्नुषांसी समजावी धर्मज्ञानें ॥ १ ॥
श्राद्धतर्पणादि करूनियां कर्म । बोलली स्वधर्म भीष्मालागीं ॥ २ ॥
कुलभूषणा हे सुता शांतनूचें । यश, वंश तुझे हातीं असे ॥ ३ ॥
आयुष्याची वृद्धी सत्यशुभकर्मे । संक्षेप–विस्तारें धर्मज्ञ तूं ॥ ४ ॥
कुलाचार तैसा सर्व आपद्धर्म । बृहस्पतीसम जाणसी तूं ॥ ५ ॥
धर्मवंतश्रेष्ठा महिषी राजाच्या । पुत्राची त्यां इच्छा कुलास्तव ॥ ६ ॥
अधिकार तुझा पुत्रदान त्यांसी । करोनी कुळासी उद्धरावें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे माता सत्यवती । कुळास्तव चित्तीं तळमळे ॥ ८ ॥

३२०

मातेचें वचन ऐकूनीयां भीष्म । म्हणे मज धर्म वदसी सत्य ॥ १ ॥
परी माते माझी प्रतिज्ञा स्मरावी । मग मज द्यावी योग्य आज्ञा ॥ २ ॥
पंचमहाभूतें सोडितील धर्म । परी तुझा भीष्म तैसा नोहे ॥ ३ ॥

माता म्हणे बाळा अधिकार तुझा । जाणतें मी साचा शंका नको ॥४॥
परी आपद्धर्म संकटीं स्वीकारीं । उद्धार तूं करीं पूर्वजांचा ॥ ५ ॥
भीष्म म्हणे माते ऐकें माझी मात । वासुदेव चित्त स्थिर करी ॥६॥

अध्याय १०४ था

## ३२१

पितृवधास्तव सकोप भार्गव । क्षत्रिय ते सर्व संहारिले ॥ १ ॥
नियोग विधीनें वंश ते वाढले । सदय ते झाले विप्र तेव्हां ॥ २ ॥
क्षेत्रपतीची ते संतती जाणावी । वेदआज्ञा घ्यावी ध्यानीं हेचि ॥ ३ ॥
कल्माषपादाची मदयंती राणी । वसिष्ठापासोनी पुत्रवती ॥ ४ ॥
विप्रांपासूनी तो क्षत्रियांचा वर्ण । कथा पुरातन ऐकें माते ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भीष्म सांगे कथा । जनहो, ती ऐका एकचित्तें ॥ ६ ॥

## ३२२

बृहस्पतिबंधु 'उतथ्याची' कांता । प्रसिद्ध 'ममता' नाम तिचें ॥१॥
गर्भवती होती ममता एकाकी । जाई बृहस्पति कामनेनें ॥ २ ॥
कथितां न ऐके बृहस्पति कामें । गर्भस्थ पुत्रानें अडवीलें ॥ ३ ॥
दीर्घतमामाजी होशील प्रविष्ट । ऐसा देई शाप बृहस्पति ॥ ४ ॥
पुत्र 'दीर्घतमा' नामें तो प्रसिद्ध । ज्ञानी परी अंध पुण्यशील ॥५॥
वासुदेव म्हणे वृत्त त्याचें ऐका । विस्मयचि लोकां होई तेणें ॥६॥

## ३२३

'प्रद्वेषी' ते कांता उतथ्यसुताची । पुत्र गौतमादि प्रसवली ॥ १ ॥
कामधेनुपुत्रें कथितां गोधर्मा । मुनि दीर्घतमा सिद्ध होई ॥ २ ॥
आश्रमस्थ मुनि तेणें क्रुद्ध होती । कांताही 'प्रद्वेषी' रुष्ट होई ॥३॥
म्हणे अंधा मज श्रम बहु होती । सांभाळ पुढती न घडे तुझा ॥४॥
विप्र म्हणे नेई क्षात्रिय सदनीं । धन संपादूनी आणी सुखें ॥ ५ ॥
कांता म्हणे नको द्रव्य तुझें मज । अन्य भर्तालाभ होवो आतां ॥६॥
वासुदेव म्हणे अधर्म्य भाषणें । मुनि क्रुद्धमनें वदला ऐका ॥ ७ ॥

---

१ दीर्घतमाची. २ पशुसम लोकांसमोर ग्राम्य व्यवहार करणें.

३२४

आजपासूनी मर्यादा । कथितों मी सर्व जगा ॥ १ ॥
पती एकचि स्त्रियांसी । आज्ञा जाणा ही शास्त्राची ॥ २ ॥
मृत जिवंत वा पती । परपुरुषसंगती ॥ ३ ॥
तेणें स्त्रियांसी पातित्य । राहूं नये अविवाहित ॥ ४ ॥
मोडिताती ज्या नियम । त्यांचें निंद्य जनीं नाम ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कांता । शापवचनें त्या क्रुद्धा ॥ ६ ॥

३२५

पुत्रालागीं म्हणे यासी । टाका गंगेच्या उदकीं ॥ १ ॥
क्रूर बांधोनी नौकेंत । त्यासी सोडिती गंगेत ॥ २ ॥
'बळी' नामें धार्मिक नृप । येतां गंगेसी स्नानार्थ ॥ ३ ॥
प्रारब्धानें एका देशीं । नौका येई त्याजपाशीं ॥ ४ ॥
सर्व वृत्तांत ऐकूनी । राव नेई त्या सदनीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राजा । विनवी पुत्रार्थ त्या अंधा ॥ ६ ॥

३२६

राव म्हणे सुदेष्णेसी । पुत्रार्थ जा मुनीपाशीं ॥ १ ॥
अंध पाहूनीयां त्यासी । राणी पाठविते दासी ॥ २ ॥
पुत्र होती एकादश । संतोषला बलराज ॥ ३ ॥
परी मुनि म्हणे राजा । हेतु अपूर्णचि तुझा ॥ ४ ॥
ऐकुनी हें सुदेष्णेसी । राव आज्ञापि पुनरपि ॥ ५ ॥
येतां केवळ स्पर्शानें । पुत्र दिधले मुनीनें ॥ ६ ॥
अंग वंग कलिंग पुंड्र । सुह्म असे पंच पुत्र ॥ ७ ॥
तींच नामें त्या देशांसी । भीष्म कथी वृत्तांतासी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे माता । चिंती आपुलिया चित्ता ॥ ९ ॥

अध्याय १०५ वा

३२७

सत्यवती म्हणे होऊनी लज्जित । बाळा ऐक वृत्त कथितें तुज ॥१॥

कानीन सुताचा वृत्तांत कथोनी । म्हणे व्यास मुनि बंधु तुझा ॥२॥
भीष्म संतोषूनी बोलला मातेसी । पाचारीं मुनीसी संकटीं या ॥३॥
स्मरतांचि व्यास उदक सिंचूनी । मातेसी वंदूनी पुढती उभे ॥ ४ ॥
यथाविधि पूजा केली पुरोहितें । व्यास म्हणे माते काय आज्ञा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अश्रुपूर्ण नेत्रें । माता म्लान वक्त्रें भेटे पुत्रा ॥ ६ ॥

३२८

सत्यवती म्हणे बालका सुपुत्रा । देईं दिव्यपुत्रा भ्रात्यालागीं ॥ १ ॥
सत्यप्रतिज्ञ हा देवव्रत माझा । बांधव तूं त्याचा दयावंत ॥ २ ॥
व्यास म्हणे माते पुरातन धर्म । तेणें आज्ञा मान्य करितों तुझी ॥३॥
एक वर्ष त्यांसी राहूंदे व्रतस्थ । येतील सन्निध शुद्ध मनें ॥ ४ ॥
माता म्हणे बाळ, राजा कोणी नसे । अनाथ प्रजेतें धीर देईं ॥ ५ ॥
व्यास म्हणे रूप वेष साहोनियां । सिद्ध होवोनियां राहोत त्या ॥६॥
वासुदेव म्हणे मातेसी वंदून । व्यास अंतर्धान पावती तैं ॥ ७ ॥

३२९

सत्यवती अंबिकेसी । करी प्रवृत्त धर्मासी ॥ १ ॥
म्हणे खडतर दैव । नाश आपुला हा सर्व ॥ २ ॥
कथिला उपाय भीष्मानें । भरतवंश वाढे जेणें ॥ ३ ॥
असे तुझ्या हें आधीन । देईं सुपुत्रासी जन्म ॥ ४ ॥
इच्छा नसतां तियेसी । करी सिद्ध सत्यवती ॥ ५ ॥
अर्पी द्विजांसी भोजन । वासुदेव चिंती धर्म ॥ ६ ॥

अध्याय १०६ वा

३३०

काशिराजकन्या कौसल्या सुवेळीं । शयनी पहुडली ऋतुस्नात ॥१॥
सत्यवती सांगे तिजसी येऊन । आज सावधान राहीं सुखें ॥ २ ॥
व्यासदर्शनें ती अंबिका मनांत । भिऊनियां नेत्र झांकी वेगें ॥ ३ ॥

---

१ विवाहापूर्वी झालेला कन्यापुत्र. २ अंबिका.

जाहला तिजसी धृतराष्ट्र अंध । अंबालिका होत पांडुवर्ण ॥ ४ ॥
तिजलागीं पुत्र पांडुचि जाहला । जा म्हणे स्नुषेला पुनरपि ॥ ५ ॥
अंबिका भिऊनी पाठवी दासीतें । होई विदुराचें जन्म तेव्हां ॥ ६ ॥
धर्मऋणांतुनी व्यास मुक्त झाला । भेटूनी मातेला गुप्त होई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसे पुत्र तीन । कुळासी भूषण होती पुढें ॥ ८ ॥

अध्याय १०७–१०८ वा

३३१

कैसा यमधर्मा[1] सांगें शाप झाला । कदा कोणी दिला विनवी राव ॥
मुनि[2] म्हणे विप्र मांडव्य धर्मज्ञ । आश्रमीं तो मौनव्रत घेई ॥ २ ॥
तस्कर घेवोनी धन कोणी एक । आश्रमासमीप प्राप्त होई ॥ ३ ॥
राजदूत पाही समीप ते आले । आश्रमीं सांडिलें द्रव्य तेव्हां ॥ ४ ॥
दूत विचारिती तस्करांची वाट । मुनि तो तटस्थ राहीयेला ॥ ५ ॥
शोधितां आश्रमीं मिळाले तस्कर । वासुदेव थोर दुःख पावे ॥ ६ ॥

३३२

मुनीसह तस्कारांसी । नेती दूत ते सभेसी ॥ १ ॥
शूळावरी चढवी राव । ऐसा गेला दीर्घकाल ॥ २ ॥
होती असह्य वेदना । वेदपठन सुटेना ॥ ३ ॥
पक्षिरूपें मुनि येती । दोष कायरे म्हणती ॥ ४ ॥
मुनि म्हणे कर्म माझें । दोष नसे हा कोणातें ॥ ५ ॥
दूत कथिती राजासी । मृत्यु न येई मुनीसी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पाही । शरण नृपाळ त्या जाई ॥ ७ ॥

३३३

उतरिलें शूलाखालीं । नये शूलाग्र वाहेरी ॥ १ ॥
भग्न झालें शरिरांत । मुनि गुंतला जपांत ॥ २ ॥
‘ अणिमांडव्य ’ हें नाम । सहज पाही यमसदन ॥ ३ ॥

---

१ जनमेजय. २ वैशंपायन.

पुशिलें कारण शिक्षेचें । पाप कळलें त्या पूर्वीचें ॥ ४ ॥
पतंगासी काडी टोंची । बालपणीं पाप हेंचि ॥ ५ ॥
मुनि झाला रुष्ट मनीं । म्हणे भोगीं शूद्रयोनी ॥ ६ ॥
वर्षं चतुर्दश बाळा । पाप न जडो अज्ञाला ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे थोर-। शापें यम तो विदुर ॥ ८ ॥

अध्याय १०९ वा

२३४

झाले धृतराष्ट्रादि सुत । हर्ष जनांच्या मनांत ॥ १ ॥
होई उत्कर्ष देशाचा । काळ सर्वां आनंदाचा ॥ २ ॥
जणु कृतयुग येई । येती सुखार्थी त्या ठाईं ॥ ३ ॥
केलें पालन भीष्मानें । पारंगत ते शिक्षणें ॥ ४ ॥
गदायुद्ध धनुर्वेद । शिकले नीतिशास्त्र, वेद ॥ ५ ॥
महाबळी धृतराष्ट्र । पांडु थोर धनुर्धर ॥ ६ ॥
विदुर ज्ञाता तो विख्यात । वासुदेव तया नत ॥ ७ ॥

अध्याय ११० वा

२३५

स्वकुळवृध्दीचा विचार करूनी । वीर भीष्म मनीं चिंतीतसे ॥ १ ॥
सुबलाची कन्या गांधारी उपवर । प्रसन्न शंकर तिजलागीं ॥ २ ॥
पुत्र शत व्हावे वर हा तिजसी । कांता धृतराष्ट्रासी योग्य असे ॥३॥
मागतां नृपासी अंधत्वाची शंका । जाणुनी लौकिका मान्य करी ॥४॥
शकुनी पातला भगिनीसमेत । विवाह थाटांत पुढती झाला ॥५॥
गांधारी निर्मल घेऊनियां वस्त्र । बांधूनियां नेत्र सुखें राहे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पतिपरायण । विख्यात सद्गुण गांधारीचे ॥ ७ ॥

अध्याय १११–११२ वा

३३६

वैकर्तन कर्ण वृत्त । पूर्वी कथिलें समस्त ॥ १ ॥
कुंतिभोजकन्या पृथा । रूप-सद्गुण-मंडिता ॥ २ ॥
झालें तिचें स्वयंवर । निवडिला पांडु वर ॥ ३ ॥
आला कुंतीतें घेऊन । करिती सेवक स्तवन ॥ ४ ॥
विप्र वडिलां वंदिलें । भवनांत प्रवेशले ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धन्य । झाला पाहुनी तें भीष्म ॥ ६ ॥

अध्याय ११३ वा

३३७

मद्रपतीची भगिनी । माद्री उपवर जाणोनी ॥ १ ॥
पांडूसाठीं भीष्म मागे । शल्य कुलाचार सांगे ॥ २ ॥
मान्य करोनी तें भीष्म । शुल्क सुवर्ण अर्पून ॥ ३ ॥
माद्री पांडूसी अर्पिली । जाया द्वितीय शोभली ॥ ४ ॥
मास एक सुखें राही । दिग्विजया पुढती जाई ॥ ५ ॥
देती अनुज्ञा त्या सर्व । कथितो वृत्त वासुदेव ॥ ६ ॥

३३८

चतुरंगसेना घेऊनी निघाला । जिंकी दशार्णाला प्रथम बळें ॥ १ ॥
लुटालूट त्याची तात्काळ राहिली । प्रजा सुखी झाली तेणें योगें ॥२॥
मगधाधिप 'दीर्घ' गांजी जो लोकांसी । वधिलें तयासी बाहूबळें ॥३॥
विदेह तो पुंड्र काशिराज सुह्म । वीर ते जिंकून स्ववश करी ॥ ४ ॥
हरिलीं तीं राष्ट्रें मेळवी फिरोनी । लौकिक हा जनीं थोर केला ॥५॥
अजिंक्य तो वीर नगरीं पातला । स्वागतार्थ गेला भीष्म पुढें ॥६॥
आनंदाश्रू त्याच्या नयनीं लोटती । वासुदेव चित्तीं संतोषला ॥ ७ ॥

अध्याय ११४ वा

३३९

संपादित धन अर्पी सकलांसी । अंबिका ते चित्तीं संतोषली ॥१॥

अश्वमेध यज्ञ करी धृतराष्ट्र । वनांत विहार पांडु करी ॥ २ ॥
दक्षिण विभागीं हिमाद्रीच्या राही । मृगयेंत होई दंग सदा ॥ ३ ॥
कुंती माद्री दोन्ही राहिल्या वनांत । वनवासी लोक म्हणती देव ॥४॥
भोग्यवस्तु येती नित्य वनामाजी । पुष्पें फळें ताजीं नगरांतूनी ॥५॥
'पारसवी' कन्या ती देवराजाची । कांता विदुराची शोभली ते ॥६॥
वासुदेव म्हणे विदुर सुजाण । पुत्र गुणवान तयालागीं ॥ ७ ॥

## अध्याय ११५ वा

### ३४०

ऐका वृत्त गांधारीचें । पुत्र शत तिज कैसे ॥ १ ॥
येतां क्षुधाकुल व्यास । करी संतुष्ट तयांस ॥ २ ॥
शतपुत्र मागे त्यांसी । वर लाभला तियेसी ॥ ३ ॥
पुढती गर्भही राहिला । वर्षद्वय काळ गेला ॥ ४ ॥
कैसी न होई प्रसूती । चित्तीं गांधारी हें चिंती ॥ ५ ॥
इकडे वनांत कुंतीला । भाग्यवंत सुत झाला ॥ ६ ॥
हेवा वाटे गांधारीसी । वृत्त वासुदेव कथी ॥ ७ ॥

### ३४१

कुंतीसी लाभलें पुत्ररत्न बाई । न कळे तें कांहीं दैव माझें ॥ १ ॥
ऐसें बोलोनियां पिटी उदरासी । मांसमय पेशी पडली तेव्हां ॥ २ ॥
त्यागावी ते ऐसें मनामाजी येई । इतुक्यांत पाही व्यास पुढें ॥ ३ ॥
वृत्तांत कळतां व्यास होई खिन्न । सौबले न मम वचन मिथ्या ॥४॥
घृतपूर्ण पात्रें सुस्थळीं ठेवोनी । उदक सिंचूनी पेशी रक्षीं ॥ ५ ॥
मान्य करूनियां आज्ञा, तैसें केलें । विभाग तैं झाले शतसंख्य ॥६॥
घृतकुंभामाजी टाकितां वाढती । ऐसी पुत्रप्राप्ति गांधारीतें ॥ ७ ॥

---

१ शूद्रस्त्रीचे ठिकाणीं ब्राह्मणास झालेली कन्या. २ गांधारी

वासुदेव म्हणे कुंती त्याचवेळीं । वनीं प्रसवली भीमालागीं ॥ ८ ॥

३४२

जन्मा येतां दुर्योधन । रडे गर्दभासमान ॥ १ ॥
काक गृध्र ते गर्दभ । संगें करिताती ओरड ॥ २ ॥
दुश्चिन्हें तीं पाहूनियां । भीष्मादिक तया ठाया ॥ ३ ॥
येतां धृतराष्ट्र म्हणे । युवराज व्हावें येणें ॥ ४ ॥
कुळासाठीं त्यागीं एक । कुलत्याग तो ग्रामार्थ ॥ ५ ॥
दुष्ट ग्राम देशासाठीं । आत्म्यास्तव सर्व त्यागीं ॥ ६ ॥
ऐसें बोलला विदुर । टाकीं, नव्हे हा सुपुत्र ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे नृप । पुत्रलोभें राही स्वस्थ ॥ ८ ॥

३४३

हळु हळु पुत्र शत । होती लोटतांचि मास ॥ १ ॥
कन्या एक भाग्यवती । लाभे तया गांधारीसी ॥ २ ॥
संगोपन अपत्याचें । करितां संवत्सर लोटे ॥ ३ ॥
वैश्यकन्या राजदासी । होई युयुत्सु तिजसी ॥ ४ ॥
परिवार धृतराष्ट्राचा । वासुदेव म्हणे ऐसा ॥ ५ ॥

अध्याय ११६, ११७ व ११८ वा

३४४

करितां विभाग पेशींचे । चित्त द्रवे गांधारीचें ॥ १ ॥
म्हणे कन्यालाभ व्हावा । माझा हेतु पुरवावा ॥ २ ॥
व्यास आणविती कुंभ । म्हणती होवो कन्यालाभ ॥ ३ ॥
ऐसी दुःशला ती जन्मे । कथिलीं सूतें पुत्रनामें ॥ ४ ॥
इकडे 'किंदम'[1] मृगरूप । वनीं भोगितां मृगीस ॥ ५ ॥
वधिलें पांडूनें तयासी । 'ऐसाचि तूं दुःखी होसी'[2] ॥ ६ ॥
शाप पांडूसी दिधला । वासुदेव दुःखी झाला ॥ ७ ॥

---

१ एक मुनि. २ स्त्रीसमागमकाळीं मृत्यु पावशील.

## अध्याय ११९ वा

### ३४५

ऐकोनियां घोरशाप । म्हणे रुचे यतिमार्ग ॥ १ ।
पुत्रास्तव वनीं आलों । ऐशा शापें दुःखी झालों ॥ २ ॥
पुत्राविण स्वर्ग नसे । नको पुत्र तो मोक्षातें ॥ ३ ॥
द्वंद्वें साहीन सकळ । ब्रह्म चिंतीन निर्मळ ॥ ४ ॥
विप्रद्वारा पुत्र होई । परी नको याचना ही ॥ ५ ॥
कुंती-माद्रीलागीं सांगे । जातों आतां यतिमार्गें ॥ ६ ॥
सांगा आतां सकलांसी । पांडु गेला वनामाजी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । परिणाम उद्वेगाचा ॥ ८ ॥

### ३४६

कुंती माद्री तेव्हां बोलती तयासी । आम्हीहि तपासी साह्य होऊं ॥१
वानप्रस्थाश्रम स्वीकारूनी राहूं । अंतीं स्वर्गी जाऊं पतीसवें ॥ २ ॥
तयांचा निर्धार ऐकोनियां ऐसा । राजा विरक्तीचा मार्ग धरी ॥ ३ ॥
अलंकार सर्व अर्पी विप्रांलागीं । राही शतशृंगीं जावोनियां ॥ ४ ॥
धृतराष्ट्रालागीं वृत्त तें कळतां । शोक होई चित्ता बहु त्याच्या ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कठिण प्रसंगीं । सुजन सन्मार्गी राहे सदा ॥ ६ ॥

## अध्याय १२० वा

### ३४७

सदाचारें पांडु शतशृंगावरी । मुनींसी अंतरीं तोष देई ॥ १ ॥
मुनि एक्या वेळीं स्वयंभूदर्शना । निघाले तैं राणा सिद्ध होई ॥ २ ॥
राव सुस्वभावें प्रिय सकलांसी । परी मुनि त्यासी म्हणती नको ॥३॥
कारण जाणूनी अंतरीं नृपाळ । म्हणे तळमळ पुत्रास्तव ॥ ४ ॥
वंदूनी मुनींतें म्हणे मार्ग सांगा । जेणें त्या पूर्वजां गति लाभे ॥ ५ ॥

---

२ हिमालयांतील एक स्थान.

म्हणती मुनि राया सुपुत्र तुजसी । होतील आम्हासी स्पष्ट दिसे ॥६॥
वासुदेव म्हणे पांडु चिंतामग्न । एकांतीं चिंतन करीतसे ॥ ७ ॥

३४८

कुंतीलागीं म्हणे राजा । हेतु पुरवीं हा माझा ॥ १ ॥
देतों अनुज्ञा मी तुज । अवलंबी योग्य मार्ग ॥ २ ॥
'शारदंडायनी' वृत्त । प्रिये घेई तूं ध्यानांत ॥ ३ ॥
रात्रौ चतुष्पथामाजी । विप्र पातला जो मार्गी ॥ ४ ॥
त्याचा घेऊनी आधार । मेळवीले तीन पुत्र ॥ ५ ॥
वासुदेव ऐसें म्हणे । वृत्त काथिलें नृपानें ॥ ६ ॥

अध्याय १२१ वा

३४९

कुंती विनवी नृपासी । न सहे बोध हा मनासी ॥ १ ॥
व्युषिताश्व पूरुवंशीं । क्षयें गेला परलोकासी ॥ २ ॥
कांता 'भद्रा' शोकमग्न । असतां वाणी गगनांतून ॥ ३ ॥
होई, शोक न करावा । पुत्र मंजपासूनी घ्यावा ॥ ४ ॥
तीन शाल्व मद्र चार । ऐसे होती तिजसी पुत्र ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कुंती । ऐसें बोलली पतीसी ॥ ६ ॥

अध्याय १२२ वा

३५०

देवतुल्य होता व्युषिताश्व कांते । सांगतो तें ऐकें पूर्ववृत्त ॥ १ ॥
यथेष्ट व्यवहार होता पूर्वकाळीं । मर्यादा हे आली सकारण ॥ २ ॥
उद्दालक पुत्र श्वेतकेतु मुनि । क्रुद्ध होई मनीं समयीं एका ॥ ३ ॥
कर धरूनियां विप्र कोणी एक । मातेसी एकांत मागे जेव्हां ॥ ४ ॥
क्रोधें श्वेतकेतु म्हणे पापिणी जे । परपुरुषातें तोष देई ॥ ५ ॥
भ्रूणहत्या घोर पीडील तियेसी । उल्लंघी सतीसी तोही पापी ॥ ६ ॥

---

१ मृत व्युषिताश्व राजापासून.

पतिनियुक्त जी पुत्रास्तव कांता । वचन मोडितां तेंही पाप ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पांडूनें आपुलें । वृत्त कथियेलें कुंतीलागीं ॥ ८ ॥

३५१

पतिवचनासी सन्मानावें नित्य । अधर्म्यहि कृत्य कथितां तेणें ॥ १ ॥
विशेषें करूनी पुत्रेच्छु पतीचे । मनोगत साचे पुरवावे ॥ २ ॥
असमर्थ झालों प्रिये मुनिशापें । जोडितों करांतें पुत्रास्तव ॥ ३ ॥
तळमळ ऐसी पाहूनी पतीची । सेवा दुर्वासाची कथिली तिणें ॥ ४ ॥
आवाहन करूं कोणाचें वदान्या । करा मज आज्ञा पतिदेवा ॥ ५ ॥
धर्मासी पाचारीं म्हणे पांडु कांते । सुपुत्र आम्हातें अर्पी तोचि ॥६॥
वासुदेव म्हणे वंदूनी पतीसी । सिद्ध होई कुंती तयावेळीं ॥ ७ ॥

अध्याय १२३ वा

३५२

समर्पूनी वली विनयें धर्मासी । मंत्र यथाविधि जपीयेला ॥ १ ॥
धर्म सूर्यासम पातला त्या स्थानीं । म्हणे काय मनीं हेतु असे ॥ २ ॥
कुंती म्हणे देवा देईं पुत्रदान । मनोरथ पूर्ण होती भाग्यें ॥ ३ ॥
अश्विन पंचमी शुक्लपक्षीं ज्येष्ठ । मध्यान्हीं वरिष्ठ पुत्र जन्मे ॥ ४ ॥
'युधिष्ठिर सत्यवक्ता हा नृमणि' । ऐसी होई वाणी गगनीं तेव्हां ॥५॥
वासुदेव म्हणे मंत्रसामर्थ्याचा । अनुभव ऐसा घ्यावा जनीं ॥ ६ ॥

३५३

वायु महाबळी प्रार्थितां पावला । पुत्र एक दिला बळिश्रेष्ठ ॥ १ ॥
' बलवंतामाजी सुपुत्र हा श्रेष्ठ ' । नभीं वाणी स्पष्ट तदा होई ॥ २ ॥
एके दिनी कुंती अंकीं घेई भीमा । करी तैं गर्जना व्याघ्र वनीं ॥ ३ ॥
ऐकोनी तो शब्द उठली भयानें । बालक वेगानें पडला खालीं ॥ ४ ॥
पर्वतशिलेचें होई तेव्हां चूर्ण । पाहूनियां मन थक्क होई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे त्याच दिनीं पाहीं । गांधारीतें होई पुत्रलाभ ॥ ६ ॥

३५४

महा खडतर व्रत । करी पांडु वर्ष एक ॥ १ ॥
उदयापासोनी अस्तान्त । राव आचरितो तप ॥ २ ॥
धनुर्धारी पुत्रप्राप्ति । इच्छा मानसीं ते ऐसी ॥ ३ ॥
झाला प्रसन्न देवेंद्र । म्हणे होईल वीरेंद्र ॥ ४ ॥
मग जपोनी तेधवां । केला देवेंद्राचा धांवा ॥ ५ ॥
इंद्र येवोनी त्वरित । अर्पी महावीर सुत ॥ ६ ॥
झाली तेव्हां देववाणी । 'अजिंक्य हा होई जनीं' ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे देव । सुखी पाहूनी पांडव ॥ ८ ॥

३५५

पांडूलागीं पुत्रलोभ । म्हणे कांते करीं जप ॥ १ ॥
कुंती म्हणे पुत्रत्रय । धर्म्य ऐसा जगीं न्याय ॥ २ ॥
पुढती होईन स्वैरिणी । बंधकी त्यापुढें जनीं ॥ ३ ॥
कैसें कथिसी अनवधानें । जाणूनी हें वागें धर्में ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे स्त्रिया । विवेकी त्या जनीं आर्या ॥ ५ ॥

अध्याय १२४ वा

३५६

पुत्रवंत धृतराष्ट्र । कुंतीलागीं तीन पुत्र ॥ १ ॥
सहज कामना माद्रीसी । प्रेमें बोलली पांडूसी ॥ २ ॥
म्हणे आनंद मनाला । पुत्रलाभ सर्वां झाला ॥ ३ ॥
मज उपाय कळेल । तरी दैन्य हें संपेल ॥ ४ ॥
करी प्रेरणा कुंतीसी । इच्छा पुरवीं ही माझी ॥ ५ ॥
इच्छा जाणूनी माद्रीची । म्हणे कथितो कुंतीसी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कुंती । माद्रीलागीं युक्ति कथी ॥ ७ ॥

३५७

सकृत् करींवो चिंतन । पुत्रलाभ होई जाण ॥ १ ॥

चिंती अश्विनी कुमार । लाभे पुत्रद्वय थोर ॥ २ ॥
वाणी होतसे नभांत । 'पुत्र महा रूपवंत' ॥ ३ ॥
नकुळ सहदेव नामें । विख्यात ते रूपगुणें ॥ ४ ॥
युधिष्ठिर भीम ख्यात । अर्जुन हे पृथासुत ॥ ५ ॥
सर्वांसी ते प्रिय झाले । शतशृंगासी राहिले ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मुनि । आनंदित त्यां पाहोनी ॥ ७ ॥

३५८

अन्य अपत्यें माद्रीला । व्हावीं ऐसा यत्न केला ॥ १ ॥
कुंती म्हणे माद्री धूर्त । होईन मी पराभूत ॥ २ ॥
पाचारूनी जुळ्यां देवां । मिळवी पुत्रद्वय ठेवा ॥ ३ ॥
माझा असे भोळा भाव । आला दुष्ट अनुभव ॥ ४ ॥
कृपा करीं पतिदेवा । ऐसा आग्रह न व्हावा ॥ ५ ॥
होते पराक्रमी वीर । सिंहासम त्यांचा धीर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसे । आधार ते कुरुवंशाचे ॥ ७ ॥

अध्याय १२५–१२६ वा

३५९

पातला वसंत वृक्ष प्रफुल्लित । पलाश चंपक पारिभद्र ॥ १ ॥
जलाशयामाजी कमळें शोभती । लतिका डोलती वृक्षांवरी ॥ २ ॥
कामोद्भव होई पांडूच्या अंतरीं । सन्निध ते माद्री एकाकिनी ॥ ३ ॥
टाळितांहि दैवयोग तो न टळे । कर्म ओढवलें पुढती घोर ॥ ४ ॥
शापवचन तें प्रत्ययासी आलें । आकाश कोसळे कुंतीवरी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे माद्रीसी निंदिलें । परी वृत्त कळे पुढती सर्व ॥ ६ ॥

३६०

माद्रीलागीं कुंती म्हणे । योग्य मीचि सती जाणें ॥ १ ॥
ज्येष्ठ पत्नी मी नृपाची । सांभाळीं तूं बालकांसी ॥ २ ॥
माद्री म्हणे वासनांची । जाहली न माझ्या पूर्ती ॥ ३ ॥
तुझ्यासम समानत्वें । न वागवीं मी बाळांतें ॥ ४ ॥

माझी धरोनी कामना । स्वर्गामाजी गेला राणा ॥ ५ ॥
आणूनी हें सर्व ध्यानीं । पतीसवें जाईन मी ॥ ६ ॥
करीं सांभाळ पुत्रांचा । अधिक काय कथूं आतां ॥ ७ ॥
गेली पतिसमागमें । माद्री वासुदेव म्हणे ॥ ८ ॥

३६१

वैशंपायन तो सांगे जनमेजया । पातले त्या ठायां सकल मुनि ॥१॥
कर्तव्य जाणूनी बाळांसवें कुंती । घेऊनी सांगाती अस्थींसह– ॥ २ ॥
हस्तिनापुरासी पातले त्वरित । विस्मय जनांस वाटे बहु ॥ ३ ॥
हिमालयवासी मुनिदर्शनासी । येती सुप्रभातीं जन सर्व ॥ ४ ॥
भीष्म धृतराष्ट्र विदुरादि येती । नगरद्वारासी पुत्रादिक ॥ ५ ॥
पूजिलें भीष्मानें सकल मुनींसी । वंदी चरणांसी वासुदेव ॥ ६ ॥

३६२

म्हणे वृद्ध तपोधन । पांडु पावला निधन ॥ १ ॥
युधिष्ठिरादि हे पुत्र । ख्यात होतील सर्वत्र ॥ २ ॥
पतीसवें गेली माद्री । त्यांच्या आणिल्या या अस्थी ॥ ३ ॥
आजि सतरावा दिन । करा त्यांचें उत्तर कर्म ॥ ४ ॥
ऐसें कथूनियां मुनि । होती अदृश्य त्या स्थानीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गुप्त । होतां मुनि, जन विस्मित ॥ ६ ॥

अध्याय १२७ वा

३६३

म्हणे धृतराष्ट्र दुःखें विदुरासी । सर्व यथाविधि व्हावें कृत्य ॥ १ ॥
साध्वी माद्रीलागीं अर्पा पशुधन । लवही तें न्यून करूं नका ॥ २ ॥
उत्तमगतीतें गेला पांडु माझा । उचित न आतां शोक आम्हां ॥ ३ ॥
अग्निहोत्र त्याचें आणिलें बाहेरी । चौऱ्या अस्थींवरी ढाळिताती ॥४॥
रत्नें उधळित आणिलें सुस्थानीं । आक्रोश जनांनीं मांडियेला ॥ ५ ॥
अंबिकेचें दुःख कुंतीचें रूदन । त्यांचें शान्तवन कोण करी ॥ ६ ॥
तिलोदक देती आप्तजन त्यांसी । वासुदेव दुःखी जनांसह ॥ ७ ॥

## अध्याय १२८ वा

### ३६४

पांडूस्तव करिती दानें । अर्पिताती रत्नें ग्रामें ॥ १ ॥
सत्यवतीलागीं व्यास । म्हणे ऐकें या वचनास ॥ २ ॥
भयानक पुढती दिन । भूमी फल मूल शून्य ॥ ३ ॥
आतां कपटकृत्यें बहू । माते एथें नको राहूं ॥ ४ ॥
नाश होईल वीरांचा । मार्ग धरीं तूं योगाचा ॥ ५ ॥
पुत्र दुष्ट धृतराष्ट्राचे । विध्वंसक हे धर्माचे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वनीं । जाई व्यासांची जननी ॥ ७ ॥

### ३६५

सत्यवतीसवें अंबा अंबालिका । ऐकूनी वृत्तांता वनीं जाती ॥ १ ॥
आचरूनी वनीं खडतर तप । अंतीं इहलोक सोडिताती ॥ २ ॥
पितृगृहीं झाले पांडव ते थोर । वैदिक संस्कार सकल होती ॥ ३ ॥
कौरवांसवें ते उत्साहें खेळती । श्रेष्ठत्व पावती सर्वकाल ॥ ४ ॥
' पांसुविकर्षण ' तेविं तें भोजन । क्रीडेमाजी भीम हरवी त्यांसी ॥५॥
वृक्षारूढांलागीं वृक्ष हालवूनी । क्षणार्धेंचि भूमी दावी भीम ॥ ६ ॥
स्पर्धेमाजी कोणी न टिके त्यासवें । दुःख कां न व्हावें कौरवांसी ॥७॥
वासुदेव म्हणे चिंती दुर्योधन । उपाय शोधून सौख्य पावे ॥ ८ ॥

### ३६६

मृदु कार्पास ऊर्णांचीं । गृहें निर्मियेलीं साचीं ॥ १ ॥
उदकगृहें तयामाजी । प्रेक्षकांतें करिती राजी ॥ २ ॥
गंगेवरी ' प्रमाणकोटी ' । क्रीडागृहें तेथें मोठीं ॥ ३ ॥
भक्ष्य, भोज्य, पेय, चोष्य । ऐसे त्या स्थळीं पदार्थ ॥ ४ ॥

---

१ एक खेळ

ऐसी करोनी सिद्धता । पाचारिती पांडुसुतां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आते । गेले सर्व त्या स्थळातें ॥ ६ ॥

३६७

खेळ खेळती आनंदें क्रीडा मंदिरांत ॥
भक्ष्य भोज्य एकमेकां देती एकमेक ॥ १ ॥
दुष्ट दुर्योधन मनीं दुष्ट हेतु धरी ॥
हालाहल भीमालागीं नकळत चारी ॥ २ ॥
सायंकाळवरी ऐसे खेळ बहू केले ॥
विश्रांती घ्यावयालागीं तेथेंचि राहीले ॥ ३ ॥
कृतार्थता मानी स्वयें दुर्योधन मनीं ॥
श्रांत बहू भीम घेई झोंप तया स्थानीं ॥ ४ ॥
भ्रांत मोहित त्या भीमा बांधिलें लतांनीं ॥
दुर्योधन जळामाजीं लोटी स्वकरांनीं ॥ ५ ॥
खेळ दुर्जनांचा ऐसा सज्जना कळेना ॥
वासुदेव विनवी व्हावें सावध जनांना ॥ ६ ॥

३६८

भीम बुडाला जैं तळीं । नागबाळें चेंगरलीं ॥ १ ॥
नाग धांवोनियां आले । दंश तया बहू केले ॥ २ ॥
विष उतरे विषानें । बंध तोडिले भीमानें ॥ ३ ॥
सर्पांवरी चाल केली । गोष्ट नागेंद्रा कळली ॥ ४ ॥
नागकन्यासुत 'शूर' । पौत्र त्याचा भीम वीर ॥ ५ ॥
ओळखूनी त्या वासुकी । सुप्रसन्न होई चित्तीं ॥ ६ ॥
पाजियेला दिव्य रस । अष्टकुंडें केलीं रिक्त ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे घेई । भीम विश्रांती त्या ठाईं ॥ ८ ॥

अध्याय १२९ वा

३६९

हस्तिनापुरासी बांधव ते येती । दुर्योधन चित्तीं हर्ष पावे ॥ १ ॥

मानिती पांडव पुढती भीम गेला । न भेटतां झाला खेद मनीं ॥ २ ॥
युधिष्ठिर कथी कुंतीतें वृत्तांत । विदुरासी वृत्त पुढती कळे ॥ ३ ॥
मारीलहि माझ्या भीमासी दुरात्मा । पृथा म्हणे मना सौख्य नाहीं ॥४॥
क्षत्ता म्हणे ऐसें न वदेंवो कदा । तेणें भय सदा पुत्रां होई ॥ ५ ॥
दीर्घायुषि तुझे पुत्र, हो निश्चिंत । येईल त्वरित वृकोदर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सावधान चित्तें । बोलली सुतांतें कुंती वागा ॥ ७ ॥

३७०

नागलोकीं भीम उठे अष्टमदिनीं । निद्रा संपवोनी आनंदानें ॥ १ ॥
दशसहस्र त्या येई नागबळ । सुस्नात निर्मळ जळें होई ॥ २ ॥
वस्त्र अलंकार पुष्पमाळा त्याला । दिव्यान्नें तोषला औषधींनीं ॥३॥
पोंचविती नाग तया क्रीडास्थानीं । पातला स्वस्थानीं भीम सुखें ॥४॥
पाहूनी तयासी कुंती आनंदली । पुण्यवेळ झाली बांधवांसी ॥ ५ ॥
वृत्त सकलहि कथिलें भीमानें । युधिष्ठिर प्रेमें वदला त्यासी ६ ॥
घडलेंचि नाहीं कांहीं राहूं ऐसे । पुनरपि हर्षें पचवी विष ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे योजी धृतराष्ट्र । गुरु कृपाचार्य पुत्रांस्तव ॥ ८ ॥

## अध्याय १३० वा

३७१

' शरद्वान ' सुत गौतममुनींचा । धनुर्वेद त्याचा आवडता ॥ १ ॥
अस्त्रें संपादितां इंद्र भयग्रस्त । ' जानपदी ' येत देवकन्या ॥ २ ॥
पाहोनी तियेसी मुनि मोह पावे । अनावर धांवे काम त्याचा ॥ ३ ॥
काननीं त्या होती कन्या-पुत्र जुळीं । शांतनु सांभाळी तयालागीं ॥४॥
कृपेनें पाळिलीं म्हणूनी कृपकृपी । नामें हीं तयांचीं ठेवी राव ॥ ५ ॥
' शरद्वान ' पुढें येवोनी सुतासी । पढवी कृपेंसी धनुर्वेद ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृप शास्त्रवेत्ता । गुरु बालकांचा नेमियेला ॥ ७ ॥

३७२

भरद्वाज गंगाद्वारीं । स्नान करितां सुंदरी ॥ १ ॥

पाही घृताची अप्सरा । रूपवती आर्द्रवस्त्रा ॥ २ ॥
कामपीडित तो मुनि । पुत्र वाढविला द्रोणीं ॥ ३ ॥
भरद्वाजालागीं मित्र । होता नामें तो 'पृषंत'[1] ॥ ४ ॥
द्रुपद नामें सुत तया । खेळे द्रोणासवें राया ॥ ५ ॥
द्रोण कांता होई कृपी । अश्वत्थामा सुत त्यांसी ॥ ६ ॥
द्रोण विनवी भार्गवा । मजसी धनलाभ व्हावा ॥ ७ ॥
तेणें अस्त्रदान दिलें । धन पूर्वींच वांटिलें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे द्रोण । मागे द्रुपदासी धन ॥ ९ ॥

अध्याय १३१ वा

३७३

पृषतामागोनी द्रुपद तो राजा । पांचाल देशाचा भाग्यवंत ॥ १ ॥
द्रोण म्हणे त्यासी पातलों मी मित्र । क्रुद्ध नरेश्वर ऐकूनियां ॥ २ ॥
काल, क्रोध, हरी स्नेहभाव जनीं । आणोनी हें मनीं वागें विप्रा ॥३॥
लवही न दिसे संस्कार तुजसी । मित्रत्व कथिसी सभेमाजी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे क्रोधाकुल राव । म्हणे जनीं सर्व सहेतुक ॥ ५ ॥

३७४

धनहीन धनवंताचा । तेंवि मूढ विद्वानाचा ॥ १ ॥
मित्र भ्याडाचा न शूर । नित्य जनीं हा व्यवहार ॥ २ ॥
सम-समां होई सख्य । नको सांगूं पूर्ववृत्त ॥ ३ ॥
ऐकूनी हे मत्त वाणी । द्रोण चिंती कांहीं मनीं ॥ ४ ॥
हरण करावया दर्प । गेला हस्तिनापुरांत ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दर्प । आणी सुजनासही कोप ॥ ६ ॥

३७५

गुप्तपणें द्रोण राही गजपुरा । शिकवी राजपुत्रां अश्वत्थामा ॥ १ ॥

---

१ एक राजा.

द्रोणपुत्र ऐसें न कळे तयांसी । शिकवी कृपासी न सांगतां ॥ २ ॥
पुढती एकेदिनीं खेळतां खेळतां । विटी न कळतां पडली कूपीं ॥
यत्न करोनीही न निघे कोणासी । लज्जा सकलांसी वाटतसे ॥ ४ ॥
इतुक्यांत विप्र शामवर्ण कृश । पाहूनी मनास धीर वाटे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे विप्राच्या भोंवतीं । एकत्रित होती राजपुत्र ॥ ६ ॥

३७६

विप्र म्हणे क्षात्रवृत्ति । व्यर्थ भासते तुमची ॥ १ ॥
पुत्र भूषण कुळासी । विटी न निघे तुम्हासी ॥ २ ॥
ऐसें बोलूनियां द्रोण । निज मुद्रिका काढून ॥ ३ ॥
म्हणे फेकितां कूपांत । वरी येईल त्वरित ॥ ४ ॥
तृणशलाका या आतां । विटीसह ही मुद्रिका ॥ ५ ॥
आणितील जवळी पहा । वाटे आश्चर्यचि महा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे द्रोण । करी नवलचि जाण ॥ ७ ॥

३७७

जलरहित त्या कूपामाजी तृण । टाकी अभिमंत्रून द्रोणमुनि ॥ १ ॥
एक शलाका ती दुजीयेचा भेद । करूनी सहज पुढती भेदी ॥ २ ॥
क्षणामाजी ऐसा चमत्कार होई । विटी हातीं येई बालकांच्या ॥ ३ ॥
मुद्रिकेचा भेद शराघातें करी । शरासह करीं मुद्रिका तैं ॥ ४ ॥
पाहोनियां होती विस्मित सकळ । अंतरीं नवल नाहीं द्रोणा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वंदूनी द्रोणासी । म्हणती आम्हासी नाम कथा ॥६॥

३७८

द्रोण म्हणे सांगा माझें रूप गुण । गंगेचा नंदन ओळखील ॥ १ ॥
ऐसें ऐकतांचि धांवलीं बालकें । वृत्त निवेदिलें भीष्मालागीं ॥ २ ॥
ओळखूनी भीष्म म्हणती हा द्रोण । देईल शिक्षण योग्य बाळां ॥ ३॥
चिंतूनियां ऐसें सत्कारूनी गृहीं । आणि लवलाहीं द्रोणालागीं ॥४॥
वासुदेव म्हणे संधी ही भाग्याची । द्रोण वृत्त कथी भीष्मालागीं ॥५॥

३७९

दुग्धासाठीं अश्वत्थामा । रडतां क्लेश होती नाना ॥ १ ॥

देती कुमार धनिकांचे । पिष्ट कालवोनी साचें ॥ २ ॥
तया दुग्धावरी वाळ । संतोषूनी खेळे खेळ ॥ ३ ॥
होई थट्टेचा विषय । पाहूनियां दुःखी जीव ॥ ४ ॥
पिष्टदुग्ध वालकासी । देई, धिक्कार तयासी ॥ ५ ॥
ऐसें वोलताती जन । वाळासाठीं दुःखी मन ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे द्रोण । करी वृत्तांत कथन ॥ ७ ॥

### ३८०

पांचाळाधिपती वालमित्र माझा । विश्वास तयाचा मनीं होता ॥१॥
तयाच्या सभेसी जाऊनी वोललों । भेटावया आलों मित्रा तुज ॥२॥
विसरला राव पूर्ववृत्त सारें । अभिमानें बोले मजलागीं ॥ ३ ॥
समसमां मैत्री धनिक–भिकारी । कैसे मित्र तरी होती म्हणे ॥ ४ ॥
तोचि पूर्वीं मज वोलला जें माझें । सर्वहि तें तुझें मित्रा जाणें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे संकटाची वेळ । विसरे तत्काळ कृतघ्न तो ॥ ६ ॥

### ३८१

ऐकूनी नृपाची दर्पयुक्त वाणी । प्रतिज्ञा स्वमनीं केली एक ॥ १ ॥
त्वरित ती भीष्मा करीन मी पूर्ण । सद्गुणसंपन्न शिष्य लाभो ॥२॥
याचसाठीं आलों हस्तिनापुरांत । मजसी कां एथ पाचारिलें ॥ ३ ॥
भीष्म म्हणे होई पूज्य कुरुकुळा । अस्त्रविद्या वाळां शिकवीं सर्व ॥४॥
इच्छा पूर्ण तुझी एथ सर्व जाण । वासुदेव मन संतोषलें ॥ ५ ॥

## अध्याय १३२ वा

### ३८२

सन्मानूनी भीष्म अर्पी गृह धन । अंतरीं प्रसन्न द्रोण होई ॥ १ ॥
कांहीं दिन पूर्ण पावतां विश्रांती । कांती ते देहाची पालटली ॥ २ ॥
पूर्वी राजपुत्रां गुरु कृपाचार्य । पुढती द्रोणाचार्य गुरु झाले ॥ ३ ॥
नम्रभावें शिष्य वंदिती द्रोणासी । इच्छा द्रोण माझी पुरवा म्हणे ॥४॥
स्वस्थ होती सर्व ऐकूनी वचन । बोलला अर्जुन नम्रभावें ॥ ५ ॥

विद्यापूर्ण होतां कराल ते आज्ञा । पाळीन हे प्राज्ञा तुम्हास्तव ॥ ६ ॥
आनंदाश्रु तेव्हां द्रोणांच्या नयनीं । वासुदेवा मनीं मोद वाटे ॥ ७ ॥

३८३

आले अन्य राजपुत्र । वृष्णि–अंधककुमार ॥ १ ॥
अस्त्रलालसेनें कर्ण । तोहि राहिला येऊन ॥ २ ॥
शिष्य बहुत ते जरी । पार्थाची न कोणा सरी ॥ ३ ॥
अस्त्रप्रयोग चापल्य । लक्ष्यवेध, तो विनय ॥ ४ ॥
अर्जुनाचे श्रेष्ठ गुण । पाहूनियां तुष्ट द्रोण ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे द्रोण । अर्पी पुत्रा अधिक ज्ञान ॥ ६ ॥

३८४

जल आणावया पाठवी शिष्यांसी । सानुल्या मुखाचीं पात्रें देई ॥ १ ॥
अश्वत्थामा याचा त्वरित ही इच्छा । कमंडलु त्याचा सुलभ असे ॥२॥
मनामाजी पार्थ आशय तो जाणी । वारुणास्त्रें पाणी त्वरित भरी ॥३॥
ऐशा रीति दोघे त्वरित ते येतां । उभयांसी विद्या गुप्त सांगे ॥४॥
अंतरींचा ध्यास पार्थाचा जाणूनी । सूदांसी[1] गुरूंनीं आज्ञा केली ॥५॥
अंधारीं कदापि वाढूं नको यासी । परी वायु त्यासी संधी देई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐकावें नवल । अभ्यासाचें बळ थोर असे ॥ ७ ॥

३८५

वेळ पार्थाच्या भाग्याची । येतां, बैसे भोजनासी ॥ १ ॥
दीप वाऱ्यानें विझाला । पार्थ जेवीत राहिला ॥ २ ॥
ग्रांस न चुकतां मुखांत । जातां गोष्ट ध्यानीं येत ॥ ३ ॥
म्हणे यश अभ्यासांत । शर सोडी अंधारांत ॥ ४ ॥
ऐकूनियां टणत्कार । द्रोण भेटले सत्वर ॥ ५ ॥
प्रेमें हृदयीं धरिलें । पट्टशिष्य त्यासी केलें ॥ ६ ॥

---

१ स्वयंपाकी

नाहीं होणार तुजसम । ऐसें बोलले वचन ॥ ७ ॥
करिती पार्थाचा गौरव । वृत्त कथी वासुदेव ॥ ८ ॥

३८६

अश्वावरी किंवा स्यंदनीं बैसोनी । चालतांहि रणीं कैसें यश ॥ १ ॥
गदा खड्गादिक प्रयोग ते कैसे । सर्व शस्त्रास्त्रांचें कथिलें ज्ञान॥२॥
द्रोणगुरूंचा तो लौकिक ऐकूनी । निषाद जो वनीं राज्य करी ॥ ३ ॥
हिरण्यधनूचा पुत्र एकलव्य । धरूनियां भाव प्राप्त होई ॥ ४ ॥
शिष्यत्वें तयाचा न करितां स्वीकार । वंदूनी सत्वर वनीं गेला ॥५॥
मृत्तिकेचा द्रोण करूनी राहिला । सेवूनी गुरूला विद्येस्तव ॥ ६ ॥
कुशल जाहला केवळ निष्ठेनें । वासुदेव प्रेमें वृत्त कथी ॥ ७ ॥

३८७

मृगयेसी आले कौरव वनांत । बैसोनी रथांत एकेवेळीं ॥ १ ॥
श्वान एक त्यांचा, कोणी जटाधारी । पाहोनी त्यावरी भुंकतसे ॥२॥
सप्तशर त्याच्या वदनीं सोडिले । भुंकणें थांबलें तात्काळचि ॥ ३ ॥
श्वान तो धांवोनी कौरवां समीप । येतां अर्जुनास नवल वाटे ॥ ४ ॥
शोध घेतां कळे शिष्य तो द्रोणाचा । पराक्रम त्याचा अलौकिक ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अर्जुन द्रोणासी । वृत्तांत एकांतीं कथी सर्व ॥ ६ ॥

३८८

पूज्य गुरुवरा कांहो । मजहूनी अन्या लाहो ॥ १ ॥
द्रोण विस्मित होवोनी । जाती पार्थासवें वनीं ॥ २ ॥
एकलव्य वंदी त्यांसी । म्हणती देरे दक्षिणेसी ॥ ३ ॥
शिष्य म्हणे मागा काय । अर्पू, न कांहीं अदेय ॥ ४ ॥
द्रोण मागती तयासी । अपसव्य अंगुष्ठासी ॥ ५ ॥
अर्पी तत्काळ छेदूनी । धन्य एकलव्य जनीं ॥ ६ ॥
व्हावा आजिंक्य अर्जुन । हेचि इच्छा करी द्रोण ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । फल दुर्लभ विद्येचें ॥ ८ ॥

३८९

गदायुद्धामाजी भीम दुर्योधन। श्रेष्ठ, स्पर्धा अन्य नकरी त्यांची ॥१॥
अश्वत्थामा मंत्र-अस्त्रशास्त्रवेत्ता। युग्म खड्गयुद्धामाजी श्रेष्ठ ॥ २ ॥
रथयुद्धामाजी युधिष्ठिर श्रेष्ठ। पार्थ तो वरिष्ठ सर्व कर्मी ॥ ३ ॥
कौरव करिती पांडवांचा द्वेष। परीक्षा वनांत घेती गुरु॥ ४ ॥
शिल्पकाराकरीं पक्षी निर्मियेला। वृक्षाग्रीं ठेविला नेवोनियां ॥ ५ ॥
लक्ष्यवेधालागीं सिद्ध होतां द्रोण। म्हणे कोण कोण दिसतें सांगा॥६॥
पक्ष्यासह सर्वां दिसती सकळ। द्रोण तिरस्कार करिती त्यांचा ॥७॥
वासुदेव म्हणे अंतीं अर्जुनाची। परीक्षा ते घेती द्रोणगुरु ॥ ८ ॥

अध्याय १३३ वा

३९०

द्रोण हांसोनीयां पार्था। म्हणती सिद्ध होईं आतां ॥ १ ॥
ओढी प्रत्यंचा क्षणांत। आम्हीं दिसतों कीं रे तुज ॥ २ ॥
पार्थ म्हणे गुरुराया। पक्षी केवळ त्या ठाया ॥ ३ ॥
आनंदूनी म्हणती द्रोण। सत्य सांगें वा फिरून ॥ ४ ॥
कोण कोण तुजसी दिसे। मजला तें सत्य सांगें ॥ ५ ॥
पार्थ म्हणे केवळ शीर। भासपक्ष्याचें समोर ॥ ६ ॥
पक्षी वृक्ष कोणी नसे। गुरु प्रहर्षित चित्तें ॥ ७ ॥
आज्ञा करितां सुटला शर। तुटलें पक्ष्याचें त्या शीर ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे तदा। द्रोण आलिंगिती पार्था ॥ ९ ॥

३९१

गंगेवरी स्नानालागीं गुरुशिष्य जाती ॥
नक्र एक क्रूरपणें धरी गुरूलागीं ॥ १ ॥
सामर्थ्य असोनी स्वयें बोलती शिष्यांतें ॥
कोणीतरी वांचवारे प्रसंगीं या मातें ॥ २ ॥

गुरुवचन ऐकोनी भय सकलांसी ॥
पार्थ त्वरितचि सोडी प्रखर शरांसी ॥ ३ ॥
वासूनी वदन जळीं नक्र मृत्यु पावे ॥
प्रसन्न त्या वेळीं पार्था द्रोण कां न व्हावे ॥ ४ ॥
अर्पिती सुखानें त्यासी ब्रह्मशिरोस्त्रातें ॥
अमानुष पीडा होतां योजीं मात्र यातें ॥ ५ ॥
अन्य अल्प कार्यासाठीं करितां प्रयोग ॥
भस्म तत्काळचि होई म्हणती सर्व जग ॥ ६ ॥
ग्रहण करोनी पार्थ संतुष्ट जाहला ॥
वासुदेव म्हणे वीर एकमेव बोला ॥ ७ ॥

अध्याय १३४ वा

३९२

होतां विद्या पूर्ण राजकुमारांची । परीक्षा तयांची दावूं जनां ॥ १ ॥
ऐसें चिंतूनियां भीष्म धृतराष्ट्रासी । आपुल्या हेतूसी कथीतसे ॥ २॥
धृतराष्ट्र म्हणे द्रोणाचार्यांप्रती । रंगभूमी कैसी सिद्ध करूं ॥ ३ ॥
द्रोण म्हणे भूमी वृक्ष गुल्महीन । प्रमाणें मापून घ्यावी सर्व ॥ ४ ॥
उत्तरदिशेसी उतार असावा । विक्रम दिसावा सर्वांलागीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सिद्धता ती सर्व । करूनियां राव हर्ष मानी ॥ ६ ॥

३९३

प्रेक्षकगृहांनीं सिद्ध होई स्थान । स्त्रियांसाठीं रम्य शिबिका तेथ ॥१॥
नियोजित दिनीं जन सर्व येती । भीष्मादिक चित्तीं संतोषले ॥ २ ॥
धृतराष्ट्र वैसे रत्नमय स्थानीं । मौक्तिक माळांनीं सजले वीर ॥ ३॥
कुंती गांधारी त्या सर्व राजस्त्रिया । पातल्या त्या ठाया आनंदानें ॥४॥
प्रक्षुब्ध सागरासम वहु जन । द्रोणासी पाहून हृष्ट होती ॥ ५ ॥
शुभ्र वस्त्र शुभ्र तें यज्ञोपवीत । केश स्मश्रु शुभ्र पुष्पमाळा ॥ ६ ॥
चंदनाची उटी ऐसी दिव्य मूर्ती । वंदी गुरूंप्रती वासुदेव ॥ ७ ॥

३९४

बळी समर्पूनी कुमार पातले । युधिष्ठिर चाले पुढती त्यांच्या ॥ १ ॥

पाहतां पाहतां प्रारंभ जाहला । विस्मय वाटला सकळांसी ॥ २ ॥
अश्व गज गती खड्गांचीं मंडळें । शौर्य धैर्य केलें प्रगट लोकीं ॥ ३॥
भीम दुर्योधन दिग्गजांसमान । युद्धार्थ येऊन पुढती ठेले ॥ ४ ॥
गदायुद्धास्तव पातले पुढती । गांधारीसी कुंती सांगतसे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सह्य विंध्य जैसे । पातले युद्धातें म्हणती लोक ॥६॥

अध्याय १३५ वा

३९५

एकमेकांवरी वेगें । करिती आघात ते दोघे ॥ १ ॥
पक्षपाती त्यांचे जन । देती गर्जून स्फुरण ॥ २ ॥
क्षुब्ध जाहले प्रेक्षक । प्रकोपाचा वाटे धाक ॥ ३ ॥
अश्वत्थामा त्यां आंवरी । पुढती पार्थ ये सत्वरी ॥ ४ ॥
द्रोणाचार्य म्हणती पहा । विष्णुतुल्य वीर महा ॥ ५ ॥
कनककवच चमकलें । वासुदेव चित्त धालें ॥ ६ ॥

३९६

वाद्यें वाजलीं आपार । पुढती आला कुंतीपुत्र ॥ १ ॥
हर्ष मावेना गगनीं । उठला महान तो ध्वनि ॥ २ ॥
केलें अस्त्र निदर्शन । आग्नेयादि तें वारुण ॥ ३ ॥
अंतर्धान पावे क्षणीं । रूपें थोर सान क्षणीं ॥ ४ ॥
स्वस्थानींचि घट फोडी । सूक्ष्म वस्तुलागीं वेधी ॥ ५ ॥
लोहवराह मुखांत । बाण सोडियेले पांच ॥ ६ ॥
आंदोलित शृंगामाजी । एकविंशति शर सोडी ॥ ७ ॥
थक्क करितां सर्व जना । बाहुनाद तया स्थाना ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे मूळ । कलहाची हीच वेळ ॥ ९ ॥

अध्याय १३६ वा

३९७

पुढती कोणी वीर आला । सहज कवच अंगाला ॥ १ ॥
कर्णीं कुंडलें शोभती । महाधनुष्य तें हातीं ॥ २ ॥

चंद्रासम ज्याची कांती। तालवृक्षाचि आकृति ॥ ३ ॥
गर्वें वंदूनी गुरूतें। वीर बोलला पार्थातें ॥ ४ ॥
नको मानूं धन्य जनीं। शौर्य दावितों या स्थानीं ॥ ५ ॥
ऐसें बोलूनियां जें जें। पार्थें केलें दावी तें तें ॥ ६ ॥
हृदयीं धरी दुर्योधन। म्हणे साधिलासी क्षण ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कर्ण। प्रिय कौरवांलागून ॥ ८ ॥

३९८

मजसह कुरुराज्याचा। कर्णा लाभ घेईं साचा ॥ १ ॥
ऐसें बोले दुर्योधन। मित्र होई म्हणे कर्ण ॥ २ ॥
राव म्हणे घे उपभोगा। वांकवावें अरिमस्तका ॥ ३ ॥
ऐकूनी हे बोल त्यांचे। क्रोध येई अर्जुनातें ॥ ४ ॥
म्हणे मरुनी हस्तें माझ्या। अनाहूतांच्या लोकीं जा ॥ ५ ॥
कर्ण म्हणे क्रोधें पार्था। वध करीन मी तुझा ॥ ६ ॥
रंगभूमी ही सर्वांची। काय तुझें या स्थानासी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे पार्थ। सज्ज जाहला युध्दार्थ ॥ ८ ॥

३९९

रंगभूमीवरी घोर वेळ आली। कृप तया वेळीं म्हणती कर्णा ॥ १ ॥
माता पितरांचें कथूनियां नांव। युद्धालागीं धांव घेईं पुढें ॥ २ ॥
लाजूनी तें कर्ण मान घाली खालीं। क्रुद्ध तयावेळीं दुर्योधन ॥ ३ ॥
म्हणे जो कुलीन, शूर, सेनाधिप। तयालागीं नृप शास्त्र म्हणे ॥४॥
अंगदेशींचा हा राजा होवो कर्ण। समर दारुण होवो आतां ॥ ५ ॥
ऐसें बोलूनियां अभिषेक केला। यावज्जीव झाला मित्र कर्ण ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सद्गुणांचा द्वेष। तोचि जनीं नाश मूर्तिमंत ॥ ७ ॥

अध्याय १३७ वा

४००

अधिरथ[१] प्रेमें पुढती पातला। आलिंगी कर्णाला हर्षभरें ॥ १ ॥

---

१ कर्णाचा पालनकर्ता पिता.

ओळखूनि त्यासी बोले वृकोदर । कर्णा, सूतपुत्र रथीं बैसे ॥ २ ॥
तुजसी न सूता युद्धाची पात्रता । कर्णाचिया चित्ता क्षोभ वाटे ॥३॥
वटारूनी नेत्र सूर्याकडे पाही । दुर्योधन होई क्रुद्ध मनीं ॥ ४ ॥
मत्त गजासम पुढती धांवला । भीमासी बोलला कोधभरें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वेळ विनाशाची । परावे भासती स्वजन जेव्हां ॥ ६ ॥

४०१

दुर्योधन म्हणे भीमा । तुज भाषा ही शोभेना ॥ १ ॥
अस्थिपासूनी तें वज्र । कार्तिकेय पिता रुद्र ॥ २ ॥
विश्वामित्र क्षत्रियाचा । गुरुद्रोण कलशाचा ॥ ३ ॥
जाणितों मी तुमचें जन्म । पहा पराक्रमी कर्ण ॥ ४ ॥
केवळ न अंगराज । पृथ्वी भोगील सहज ॥ ५ ॥
न सहे तेणें पुढती यावें । मारावें कीं मरुनी जावें ॥ ६ ॥
दिवट्या मशाली पेटल्या । रात्र जाहली त्या स्थळा ॥ ७॥
पक्ष उद्भवले तेथें । लोक गेले स्वस्थळातें ॥ ८ ॥
नाहीं कर्णासम वीर । ऐसें मानी युधिष्ठिर ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे दोन्हीं । पक्ष मान्य होती जनीं ॥ १० ॥

अध्याय १३८ वा

४०२

शिष्यांलागीं गुरु मागती दक्षिणा । काय द्यावें द्रोणा म्हणती वीर॥१॥
जितचि धरूनी पांचाल राजासी । आणा मजपाशीं म्हणती द्रोण ॥२॥
आज्ञा मानूनियां कौरव धांवले । नगर वेढिलें द्रुपदाचें ॥ ३ ॥
मी पुढें, मी पुढें म्हणोनी धांवले । युद्ध आरंभिलें द्रुपदानें ॥ ४ ॥
कर्ण-दुर्योधनां पळवी पांचाळ । कुंतीचे ते बाळ दूर होते ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शौर्य पांडवांचें । सिद्ध होई साचें सहज आतां ॥६॥

४०३

गदाघातें भीमसेन । करी दारुण संग्राम ॥ १ ॥
वीर वीरांसी भिडले । युद्ध घोर तदा झालें ॥ २ ॥

पार्थ शरवृष्टि करी । द्रुपद धांवला सत्वरी ॥ ३ ॥
सृंजयाचें साह्य त्याला । पार्थ खवळूनी गेला ॥ ४ ॥
घुसे द्रुपदासमीप । अडवी त्यासी सत्यजित ॥ ५ ॥
त्यासी वधूनी सत्वरी । द्रुपदाच्या रथावरी ॥ ६ ॥
उडी मारूनियां पार्थ । करी त्यासी पाशबद्ध ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीमा । पार्थ सांगे रक्षीं सेना ॥ ८ ॥

४०४

पार्थ मंत्र्यांसवें बांधितो पांचाळा । द्रोणापुढें केला उभा त्यासी ॥ १ ॥
द्रोण म्हणे राया जिंकिलें मी तुज । परी अर्धराज्य घेईं तुझें ॥ २ ॥
लाभोत हे तुझे प्राण तुजलागीं । क्षमावंत जगीं विप्र आम्हीं ॥ ३ ॥
समसमां मैत्री आतां तरी होवो । संशय न येवो मनामाजी ॥ ४ ॥
लाजूनियां म्हणे राव शूरालागीं । अशक्य न जगीं कांहीं एक ॥ ५ ॥
'काम्पील' नगरीं राही खिन्न मनें । क्षत्रबल सानें मानूनियां ॥ ६ ॥
अर्जुन गुरूसी 'अहिच्छत्रापुरी' । अर्पी, सौख्य वरी वासुदेव ॥ ७ ॥

## अध्याय १३९ वा

४०५

युधिष्ठिरालागीं विद्यापूर्ण होतां । यौवराज्य पदा स्थापियेलें ॥ १ ॥
शील सद्गुणांनीं प्रिय तो जनांस । पांडूचेंही यश मागें पडे ॥ २ ॥
महाबळी भीम धनुर्धारी पार्थ । धर्माच्या आज्ञेंत वागताती ॥ ३ ॥
ब्रह्मशिरोस्त्रातें अर्पूनी पार्थासी । द्रोण दक्षिणेसी मागताती ॥ ४ ॥
पार्थ म्हणे गुरो मागा आवडे तें । गुरु म्हणे मातें भिडें रणीं ॥ ५ ॥
तुजहूनी जनीं अन्य नाहीं वीर । वासुदेव धीर धरी मनीं ॥ ६ ॥

४०६

द्रोणांची अपेक्षा करूनियां मान्य । पावला सन्मान पार्थ जनीं ॥ १ ॥
अलौकिक वीर पार्थ होई लोकीं । सर्व क्षत्रियांसी धाक त्याचा ॥२॥
सौवीराचा वध यौवनाधिपासी । जिंकूनी तयासी दीन केलें ॥ ३ ॥
'दत्तामित्र' जनीं अजिंक्य जो होता । हरिला तयाचा दर्प वेगें ॥४॥

दक्षिण जिंकूनी आणीतसे धन । धृतराष्ट्र खिन्न होई मनीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे निद्रा न रायासी । कीर्ति पांडवांची ऐकूनियां ॥ ६ ॥

## अध्याय १४० वा

### ४०७

चिंताकुळ राजा कणिकासी बोले । पांडव पावले लौकिकासी ॥ १ ॥
उत्कर्ष तयांचा न सहे मजसी । सांग या क्षणासी वागूं कैसा ॥ २ ॥
निर्दय तो विप्र, दंडनीतिशास्त्र । जाणूनियां घोर बोध करी ॥ ३ ॥
अनावर वैर जाणूनी कथितों । दोष मज नको देऊं राया ॥ ४ ॥
हीनांची उपेक्षा समसमां युद्ध । प्रबलांशीं नित्य दक्ष व्हावें ॥ ५ ॥
छिद्र शोधूनियां प्रहार करावा । मार्ग वासुदेवा कठिण वाटे ॥ ६ ॥

### ४०८

छिद्र आपुलें रक्षावें । कार्य शेवटासी न्यावें ॥ १ ॥
कंटकाचा अवशेष । देई जनां बहु क्लेश ॥ २ ॥
त्याचा करावा निःपात । शत्रु जाणावा कंटक ॥ ३ ॥
बलिष्ठासी आपत्तींत । झोडपितां येई यश ॥ ४ ॥
सोशी दुर्बल अवमान । समर्थी जाळी अग्नीसम ॥ ५ ॥
व्याध जैसा हरिणासी । शत्रु संधी साधी तैसी ॥ ६ ॥
राहूनियां सेवाधर्मे । करील तो घोर कर्मे ॥ ७ ॥
त्यासी विश्वास दावावा । संधी येतांचि मारावा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दया । दावूं नये तया ठायां ॥ ९ ॥

### ४०९

आक्रमणें तें ऐश्वर्य । हेरद्वारा भेदीं-मंत्र ॥ १ ॥
आप्तवचनें उत्साहासी । तेजोभंग करुनी नाशी ॥ २ ॥
राष्ट्र, दुर्ग, कोश, सैन्य । अमात्यांहि जातां, दैन्य ॥ ३ ॥
जाणूनी हें पांडवांस । करीं राज्यपदभ्रष्ट ॥ ४ ॥
सामादिक, गळफांस । अथवा देऊनियां विष ॥ ५ ॥
किंवा योजूनियां अग्नि । शत्रुनाश व्हावा जनीं ॥ ६ ॥

अन्नपानें भृत्य वश । करुनी व्हावा अरिनाश ॥ ७ ॥
मूलच्छेदें वृक्षनाश । वासुदेव म्हणे सत्य ॥ ८ ॥

४१०

अजिन जटा भगवीं वस्त्रें । दांभिकही अग्निहोत्रें ॥ १ ॥
कार्यसिद्धीचें तें बळ । लाभे जैसें पक्व फळ ॥ २ ॥
सेवा करोनी सुखानें । अंतीं वध निर्दयतेनें ॥ ३ ॥
घट स्कंधावरी घ्यावा । योग्यकाळीं तो फोडावा ॥ ४ ॥
जरी झाला दीनवाणा । तरी करूं नये क्षमा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे ऐसे । मार्ग शत्रु जिंकण्याचे ॥ ६ ॥

४११

साम दानादिक कैसे ते योजावे । वृत्त ध्यानीं घ्यावें धृतराष्ट्रा ॥ १ ॥
स्वार्थि बुद्धिमंत जंबुक वनांत । व्याघ्र तो मूषक नकुल वृक ॥ २ ॥
ऐसे मित्र त्याचे वनांत राहिले । मृगासी पाहिलें एकावेळीं ॥ ३ ॥
निद्रिस्थ मृगाचे मूषकें चरण । भक्षितांचि प्राण हरिले व्याघ्रें ॥ ४ ॥
स्नानार्थ पाठवी जंबुक सर्वांसी । तोंवरी संरक्षी मृगालागीं ॥ ५ ॥
स्नान आटोपूनी व्याघ्र जैं पातला । जंबुक पाहिला चिंताकुल ॥ ६ ॥
कारण पुशितां जंबुक व्याघ्रासी । म्हणे मूषकासी गर्व झाला ॥ ७ ॥
सांगे मजमुळें व्याघ्र पुष्ट होई । ऐकतांचि जाई व्याघ्र क्रोधें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे व्याघ्र पराक्रमी । ऐसी क्षुद्रवाणी न सहे त्यासी ॥ ९ ॥

४१२

मूषक मागूनी येतां त्यासी म्हणे । नकुल सौख्यानें भक्षी तुज ॥ १ ॥
मृगाचें हें मांस भक्ष्य तें व्याघ्राचें । न पचे आम्हातें ऐसें वदे ॥ २ ॥
ऐकतांचि गेला मूषक बिळांत । इतुक्यांत वृक येई तेथें ॥ ३ ॥
जंबुक तयासी म्हणे क्रुद्ध व्याघ्र । घेऊनी परिवार येत असे ॥ ४ ॥
ऐकूनियां वृक पळाला काननीं । नकुळ त्या स्थानीं प्राप्त होई ॥ ५ ॥
जंबुक तयासी म्हणे करीं युध्द । गेले वृक व्याघ्र पळूनियां ॥ ६ ॥
नकुलहि गेला ऐकूनी ते वाणी । भेद मनीं आणी वासुदेव ॥ ७ ॥

४१३

शूरासी नमावें लोभ्या धन द्यावें। न्यून सम व्हावे स्वबळें वश ॥१॥
आप्त पुत्र गुरु वैर ते करितां। घातार्थ सर्वथा योग्य जाणा ॥ २ ॥
समबल वीर संशयीं पडतां। मार्ग हा हिताचा त्यांसी असे ॥ ३ ॥
वलिष्ठासी कैसें जिंकावें तें ऐक। होऊं नये क्रुध्द तयापुढें ॥ ४ ॥
सहेतुकपणें माधुर्य वरावें। मधुर बोलावें वधितांहि ॥ ५ ॥
प्रहार करोनी दयेतें वरावें। शोकाकुल व्हावें रडावेंहि ॥ ६ ॥
धर्म-अर्थें त्यांचें करावें सांत्वन। चुकतां शासन ताकाळचि ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अपराधी घोर। कवच धर्माचार होई त्याचें ॥ ८ ॥

४१४

त्वरित साधन गृहासी तो अन्न। वरी धर्मप्रेम दाखवावें ॥ १ ॥
विश्वास दावूनी प्रहार करावा। ऐसा शत्रु न्यावा रसातळीं ॥ २ ॥
सावधान नित्य असावें साशंक। उलटतां मित्र सर्वनाश ॥ ३ ॥
ढोंगी ते करावे शत्रुदेशीं हेर। उद्यानें विहार शोधिती जे ॥ ४ ॥
मंत्री, पुरोहित, युवराज, तैसा। अधिप चमूचा, द्वारपाल ॥ ५ ॥
अंतःपुररक्षी, कारागाराधिप। कोश व्ययाधिप, मार्गदर्शी ॥ ६ ॥
नगरपती तैं योजक कार्याचा। धर्माध्यक्ष तैसा सभापति ॥ ७ ॥
दंड, दुर्गपाल, सीमा-वनपाल। हेर सर्वांवर नित्य योजीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐसे अष्टादश। अधिकारी राज्यास आधार ते ॥ ९ ॥

४१५

वैभवेच्छु नरें नम्रता धरावी। अंतरीं असावी क्षुरधारा ॥ १ ॥
नित्य दुर्जीयासी आशा दाखवावी। पूर्ण न करावी कदाकाळीं ॥२॥
रमणीय दिसे पुष्पतरु जैसा। लाभ न फळाचा कदाकाळीं ॥ ३ ॥
तैसी शत्रूलागीं आशा दाखवावी। विघ्नें नित्य नवीं आणवोनी ॥ ४ ॥
प्राप्त वस्तूतेही अप्राप्तासमान। होई ऐसें विघ्न पुढती करा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शत्रूचें पोषण। वेंचूनी स्वधन करूं नये ॥ ६ ॥

४१६

धर्म अर्थ काम अविरुध्द व्हावे । तज्जन्य टाकावें दुःख सदा ॥ १ ॥
केवळ धर्मानें अर्थकामपीडा । अर्थमात्रें बाधा इतरांसी ॥ २ ॥
सावधानचित्तें सर्व हें जाणावें । संकेत करावें ज्ञात्यासवें ॥ ३ ॥
कोणाही उपायें दैन्य निवारावें । मग आचरावें स्वधर्मासी ॥ ४ ॥
आपत्तींत ऐसी नीति आचरावी । सर्वथा टाळावी अन्य वेळीं ॥ ५ ॥
साहसावांचोनी कल्याण न होई । सिध्द होतां पाही वैभवातें ॥ ६ ॥
पराभूत बुध्दि इतिहासें शांत । पुढील आशेंत रमतां बरें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे संधि करूनियां । स्वस्थ वैसूनियां राहूं नये ॥ ८ ॥

४१७

दंडप्रधान ते जनीं । राजनीति ध्यानीं आणीं ॥ १ ॥
मर्मच्छेद दारुणकर्म । केल्यावीण न मिळे धन ॥ २ ॥
मत्स्यघाती करुनी हत्या । लाभ घेई वैभवाचा ॥ ३ ॥
महालक्ष्मीची ते प्राप्ति । अन्यथा न या जगतीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे धूर्त । पूर्ण न करी कांहीं कृत्य ॥ ५ ॥

४१८

आरंभिलें कार्य शेवटासी न्यावें । प्रत्यया आणावें शौर्य जनीं ॥ १ ॥
अनागतभया भिऊनी वागावें । प्राप्त होतां जावें निवारूनी ॥ २ ॥
दंडवश जनां धन मान देतां । मृत्युचि तत्वतां वरिला तेणें ॥ ३ ॥
भूत-भविष्य तें जाणोनी वागावें । अज्ञानें न व्हावें अनहित ॥ ४ ॥
उत्साह धरावा नित्य निरंतर । आळस तो दूर झुगारावा ॥ ५ ॥
धर्म अर्थ काम तेंवि तें प्राक्रम । देशादि जाणून विभागावें ॥ ६ ॥
देशकाल ज्ञानें गुप्त सामर्थ्यानें । शत्रूच्या नाशानें शांत व्हावें ॥ ७ ॥
धन पुत्र ज्याचे कुलशील त्यासी । प्रसंग वीरांसी असे जाण ॥ ८ ॥
ऐसी कणिकाची नीति ऐके राव । चित्तीं वासुदेव चिंतीतसे ॥ ९ ॥

—— ० ——

# जतुगृहपर्व ८

## अध्याय १४१ वा

### ४१९

दुर्योधन ऐके नीति कणिकाची । कर्ण शकुनींसी मंत्र करी ॥ १ ॥
उत्कर्ष रुचेना पांडवांचा त्यासी । जनता प्रशंसी युधिष्ठिरा २ ॥
राज्यलाभ होवो पांडवां ही इच्छा । क्रोध कौरवांचा वाढे तेणें ॥३॥
धृतराष्ट्रालागीं दुर्योधन म्हणे । उपाय योजणें कांहींतरी ॥ ४ ॥
अंधत्वानें राज्य पांडूसी लाभलें । हीनत्व तें आलें आम्हालागीं ॥५॥
वासुदेव म्हणे ऐसें दुर्योधन । पित्यासी वचन बोलतसे ॥ ६ ॥

## अध्याय १४२ वा

### ४२०

धृतराष्ट्र म्हणे बाळा दुर्योधना । पांडूचिया प्रेमा काय वर्णू ॥ १ ॥
प्रेम अनिवार त्याचें माझ्यावरी । प्रजा तयावरी प्रेम करी ॥ २ ॥
तैसा युधिष्ठिर धर्मपरायण । प्रजेचा तो प्राण जाहलासे ॥ ३ ॥
दुर्योधन म्हणे दोष हा आमुचा । पुढती अमात्यांच भेद केला ॥४॥
वारणावतासी मृदु उपायानें । पाठवीं त्वरेनें पांडवांसी ॥ ५ ॥
तेणें राज्य माझ्या स्वाधीन होईल । भयहि संपेल सहजपणें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धृतराष्ट्रा भय । ऐसा हा अन्याय करितां वाटे ॥ ७ ॥

### ४२१

दुर्योधन म्हणे भीष्म तो उदास । द्रोणपुत्र मज साह्य करी ॥ १ ॥
पुत्र तेथें पिता द्रोण तेथें कृप । क्षत्ता मात्र एक साह्य त्यांसी ॥ २ ॥
जाणूनी हें सर्व वारणावतासी । पाठवितां त्यांसी निद्रा मज ॥ ३ ॥
घोर शल्य माझ्या हृदयीं हें टोंचे । शांत शोकाग्नीतें करीं ताता ॥४॥
वासुदेव म्हणे स्वार्थाचें पिशाच्च । करीतसे नाच कैसा पहा ॥५॥

अध्याय १४३ वा

४२२

धनमानें मंत्री केले आपुलेसे। वारणावतातें वर्णिताती ॥ १ ॥
पशुपतीचें तें रमणीय स्थान। झालें कारस्थान पूर्ण आतां ॥ २ ॥
पांडवांसी वाटे पहावें नगर। म्हणे धृतराष्ट्र जा वाळांनो ॥ ३ ॥
भृत्य-आप्तजनांसवें जा सुखानें। तोषवा धनानें गुणि जनां ॥ ४ ॥
पाहूनी नगर यावें परतूनी। येईल जें मनीं तुमच्या सुखें ॥ ५ ॥
भ्रातृ पुत्र व्हावे सुखी हीच इच्छा। ऐकतां धर्माचा ठरला बेत ॥६॥
वंदूनी वडिलां वारणावतासी। गेले मनीं चिंती वासुदेव ॥ ७ ॥

अध्याय १४४ वा

४२३

आनंदित दुर्योधन। पुरोचनासी भेटून ॥ १ ॥
कर धरूनियां त्याचा। म्हणे पुरवीं हेतु माझा ॥ २ ॥
मिला माझें कार्य साधीं। दुःखाचें या मूळ छेदीं ॥ ३ ॥
जाई वारणावतासी। निर्मीं चौसोपी गृहासी ॥ ४ ॥
लाक्षा, धृत, तैल, वसा। उपयोग या वस्तूंचा ॥ ५ ॥
करुनी, पांडवांचा वास। होई ऐसें करीं तेथ ॥ ६ ॥
अंतीं जाळूनी तयांसी। हर्ष देई मन्मनासी ॥ ७ ॥
गुप्तरूपें साधीं कार्य। मान्य करी तो अनार्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे गेला। साधी आपुल्या कार्याला ॥ ९ ॥

अध्याय १४५ वा

४२४

अश्व जोडूनियां पांडव निघाले। मागूनी चालले बहुत लोक ॥ १ ॥
धृतराष्ट्र वागे विषम दृष्टीनें। पांडव धर्मानें वागताती ॥ २ ॥
कपटबुद्धीनें पाठवितो यांसी। कैसें हें भीष्मासी न कळे तरी॥ ३ ॥
पांडूसम आम्हा युधिष्ठिर त्राता। सहवास याचा हितकर ॥ ४ ॥
त्यागूनी वैभव राहूं याच्या संगें। जातां जातां मागें म्हणती जन ॥५॥

युधिष्ठिर म्हणे प्रेम सकलांसी । आपुल्या स्थळासी जावें सुखें ॥६॥
वासुदेव ऐसी पाही जनरीति । धार्मिक नृपति सकलां रुचे ॥ ७ ॥

४२५

जाती नागरिक जन । युधिष्ठिरातें वंदून ॥ १ ॥
अवलंबूनी म्लेच्छभाषा । प्रेमें बोलतसे क्षत्ता ॥ २ ॥
ज्वालाग्राही तें सदन । वास करावा जपून ॥ ३ ॥
पुरोचन जो सन्निध । करील तो जाणे घात ॥ ४ ॥
अन्य मार्ग कांहीं नसे । वास करा तुम्ही तेथें ॥ ५ ॥
संरक्षणासी योजून । व्हावें नित्य सावधान ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे क्षत्ता । दावी पांडवांसी पंथा ॥ ७ ॥

४२६

करा बिलाचा आश्रय । तेणें होई तुमचें कार्य ॥ १ ॥
कोंडूनियां धूम्रज्वाला । प्राण तेथें होई गोळा ॥ २ ॥
ऐसें न म्हणावें, बीळ । असावें तें आरपार ॥ ३ ॥
तेणें अन्य स्थळीं जावें । नगरीं परतूनी न यावें ॥ ४ ॥
क्रोध येईल खलांसी । करितील आघातांसी ॥ ५ ॥
जाणीवहि देऊं नका । धैर्यें प्राप्त व्हाल सुखा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्म । करी मान्य तें भाषण ॥ ७ ॥

४२७

कथूनियां ऐसें विदुर तो गेला । कुंती म्हणे बाळा युधिष्ठिरा ॥ १ ॥
म्लेच्छभाषेमाजी कायरे कथिलें । योग्य तरी सारें सांगें मज ॥ २ ॥
मातेलागीं प्रेमें वृत्तांत कथिला । मार्ग निवेदिला पुढचा सर्व ॥ ३ ॥
फाल्गुन अष्टमी रोहिणी नक्षत्र । सोडूनी नगर पुढती गेले ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे वारणावतासी । येतां जन त्यांसी सत्कारिती ॥ ५ ॥

अध्याय १४६ वा

४२८

येतां वारणावतासी । हर्ष वाटला जनांसी ॥ १ ॥

गुढया तोरणें शोभलीं । भेट घेती अधिकारी ॥ २ ॥
सत्कारांत दशदिन । गेले, पुढती पुरोचनें ॥ ३ ॥
अशुभ त्या स्थानीं नेई । नांव 'शिव' तया ठेवी ॥ ४ ॥
परीक्षूनी तें पाहतां । येई प्रत्यय नाशाचा ॥ ५ ॥
भीम म्हणे अन्य स्थळीं । जाऊं चला योग्यवेळीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्म । बोले सावध वचन ॥ ७ ॥

४२९

मंदबुद्धि पुरोचन । ऐके कौरववचन ॥ १ ॥
नाहीं तया धर्म चिंता । नच बाधे लोकनिंदा ॥ २ ॥
योजितील मारेकरी । जाऊं आपण भुयारीं ॥ ३ ॥
अन्यस्थळीं गुप्तरूपें । जाऊनियां राहूं तेथें ॥ ४ ॥
वासुदेव कारागीर । म्हणे पाठवी विदुर ॥ ५ ॥

अध्याय १४७ वा

४३०

म्लेच्छभाषेची ते देऊनियां स्मृति । विश्वास तो चित्तीं प्रगट करी
सुरुंगकर्मांत कुशल तो होता । झाला हितकर्ता पांडवांचा ॥ २ ॥
लाक्षागृहांतूनी गुप्तद्वार केलें । खंदकीं आणिलें कौशल्यानें ॥ ३ ॥
तेथूनी तें पुढें खोदिलें विवर । निमित्त चतुर सांगे त्यांसी ॥ ४ ॥
स्वच्छ करीतसें खंदक म्हणोनी । पुरोचन मनीं तोष पावे ॥ ५ ॥
अंतरी ते क्षुब्ध वरिवरी शांत । धर्म भीमादिक राहियेले ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शस्त्रास्त्रें ते सिद्ध । राहिले सावध रात्रंदिन ॥ ७ ॥

अध्याय १४८ वा

४३१

ऐसें जातां एक वर्ष । पुरोचन मानी हर्ष ॥ १ ॥
युधिष्ठिर म्हणे भीमा । करूं आतां पलायना ॥ २ ॥
आयुधांचें हें आगर । हळुच हालवील क्रूर ॥ ३ ॥
व्हावें सावध त्या पूर्वी । आश्रय ही देवो उर्वी ॥ ४ ॥

कुंती विप्रांसी भोजन । देई सुवेळ पाहून ॥ ५ ॥
येतां अन्नार्थी बहुत । जाती होऊनी संतुष्ट ॥ ६ ॥
आली अन्नार्थ निषादी । मदिरेची तिज धुंदी ॥ ७ ॥
होते तिजसी पुत्र पांच । रात्रीं राहियेली तेथ ॥ ८ ॥
काळ पातला तियेचा । वासुदेव म्हणे साचा ॥ ९ ॥

४३२

पुरोचन निजला जेथें । अग्नि लावियेला तेथें ॥ १ ॥
अग्नि लावोनी सर्वत्र । कुंतीसवें कुंतीपुत्र ॥ २ ॥
विवरामाजी शिरले जाण । नगरीं जागृत ते जन ॥ ३ ॥
येती धांवोनी त्या स्थानीं । हाय हाय करिती मनीं ॥ ४ ॥
दोष देती दुर्योधना । सहज शिक्षा पुरोचना ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे भीम । नेई सकलां उचलून ॥ ६ ॥

अध्याय १४९ वा

४३३

सांकेतिक स्थळीं पातले पांडव । सिद्ध करी नाव क्षत्ता तेथें ॥ १ ॥
विश्वासार्थ सांगे नावाडी तो खूण । पूर्वीचें भाषण विदुराचें ॥ २ ॥
बैसोनियां गेले पैलतीराप्रती । नावाडी तो मार्गीं सांगे तयां ॥ ३ ॥
विदुरानें बहु आशीर्वाद दिले । अभय कथिलें वारंवार ॥ ४ ॥
सर्वकाळ आज्ञा मान्य वडिलांची । पांडव विदुरासी म्हणती सांगें ॥५॥
वासुदेव म्हणे गुप्तवेषें गेले । नाहीं उमगलें इतरां कांहीं ॥ ६ ॥

अध्याय १५० वा

४३४

अन्यदिनीं नारीनर । शोक करिती अपार ॥ १ ॥
लाक्षारस दिसे त्यांसी । कपट उमगे सर्वांसी ॥ २ ॥
पांडवांचा ऐसा घात । म्हणती केला सहेतुक ॥ ३ ॥
धिक्कारिती भीष्म-द्रोणां । कळवूं हेतु म्हणती त्यांना ॥ ४ ॥

चतुर दुःखाकुलचित्त । विवर बुझवी खनक ॥ ५ ॥
धृतराष्ट्रा वृत्त कळे । हृदय त्याचें कळवळे ॥ ६ ॥
केलें सर्व उत्तरकर्म । बहुत झाले दानधर्म ॥ ७ ॥
शोकमग्न गजपुर । रडला जाणूनी विदुर ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीम । नेई श्रांतांसी उचलून ॥ ९ ॥

## अध्याय १५१ वा

### ४३५

वायुवेगें चाले काननांत भीम । मातेसी घेऊन पृष्ठभागीं ॥ १ ॥
वृक्ष गुल्म मोडी मार्गांत जे येती । करिती वसती एकास्थानीं ॥ २ ॥
उत्पात-वायूनें घाबरले पक्षी । वृक्षही वांकती लता गुल्म ॥ ३ ॥
तृषार्त तैं माता श्रांत होई वनीं । बैसती त्या स्थानीं पार्थादिक ॥ ४ ॥
मातृस्नेहें भीम उदकार्थ गेला । सारसध्वनीला ऐकूनियां ॥ ५ ॥
बांधवांसी ठेवी वटछायेमाजी । वंदूनी भ्रात्यासी वनीं गेला ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पाही सरोवर । प्राशूनियां जळ स्नान करी ॥ ७ ॥

### ४३६

स्नान करूनियां संतुष्ट जाहला । क्षणही थांवला नाहीं तेथें ॥ १
उत्तरीयामाजी घेऊनियां जल । पातला सत्वर पूर्व स्थळीं ॥ २ ॥
मातेसह भ्राते जाहले निद्रिस्थ । पाहूनियां चित्त कळवळे ॥ ३ ॥
म्हणे मी अभागी काय पहातसें । कष्टप्रद दुजें असे काय ॥ ४ ॥
माता हे आमुची वसुदेव भगिनी । हाय पहा वनीं पहुडली ॥ ५ ॥
नरव्याघ्र बंधु काननीं झोंपले । अंबर हें झालें पांघरूण ॥ ६ ॥
कुलांगार दुष्ट बांधव आमुचे । फळ हें तयाचें भोगीतसों ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वटवृक्षातळीं । तळमळ करी भीमसेन ॥ ८ ॥

### ४३७

ज्याचे बांधव धार्मिक । पावती ते जनीं सुख ॥ १ ॥
एकमेकां साह्य होतीं । वनीं जैसी वृक्षराजी ॥ २ ॥

आम्हालागीं घालविलें । सुदैवानें वांचविलें ॥ ३ ॥
आतां जावें कोणीकडे । राजा पूर्ण हेतु तुझे ॥ ४ ॥
अनुज्ञा न लाभे मज । म्हणुनी वांचलासी आज ॥ ५ ॥
दांत ओंठ चावी भीम । आंवरी तो यत्नें मन ॥ ६ ॥
ध्वनि पहारेकऱ्यांचा । येई कानावरी त्याच्या ॥ ७ ॥
म्हणे सन्निध नगर । पाहूं उदयीक सत्वर ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वनीं । कंठी जागृत रजनी ॥ ९ ॥

## हिडिंबवधपर्व ९

### अध्याय १५२ वा

४३८

तया वनामाजी शाल्ववृक्षाश्रित । हिडिंब नामक निशाचर ॥ १ ॥
भक्षी नरमांस कृष्णवर्ण बळी । रक्तवर्ण शिरीं केश त्याच्या ॥ २ ॥
पांडुपुत्रांवरी दृष्टि त्याची जाई । अंतरांत होई सौख्य तया ॥ ३ ॥
भगिनीसी म्हणे बहुकाळ मातें । लाभलें न ऐसें रुचिर भक्ष्य ॥४॥
मारूनी तयांसी आणीं जा सत्वरी । इच्छा पूर्ण करीं त्वरित माझी ॥
तृप्त होऊनियां नृत्य करूं प्रेमें । वासुदेव गाणें पुढती गाई ॥ ६ ॥

४३९

पाहूनियां भीमसेना । मोह वाटे तिच्या मना ॥ १ ॥
भ्रातृवचनें पातली । पतीभावें बद्ध झाली ॥ २ ॥
सिंहासम भीमसेन । वधितां सुख एक क्षण ॥ ३ ॥
परी म्हणे नित्य सुख । पति लाभतां अनुरूप ॥ ४ ॥
चिंतूनियां पुढती येई । रुचिर रूप क्षणीं घेई ॥ ५ ॥
म्हणे कोण तुम्ही सांगा । पातलां कां ऐशा मार्गा ॥ ६ ॥
वसती एथें निशाचर । करितील ते संहार ॥ ७ ॥

निर्भयपणें पहुडली। वनीं कोण ही माउली ॥ ८ ॥
म्हणे वासुदेव काम। हिडिंबाचें सांगे नाम ॥ ९ ॥

४४०

कामविव्हला मी वीरा वरीं मज। रक्षीन मी तुज संकटीं या ॥ १ ॥
अनुपम सुखें भोगूं सुस्थळातें। इच्छेसम असे गति माझी ॥ २ ॥
भीम म्हणे माझे बंधु तेंवि माता। सोडूनियां कैसा कोठें जाऊं ॥ ३ ॥
उठवीं सकळां म्हणे ती राक्षसी। भीम म्हणे यांसी भय नसे ॥ ४ ॥
जाईं राहीं किंवा कल्याणि तूं एथें। बांधव येऊंदे अथवा कोणी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पाहोनी भीमासी। मोहित राक्षसी होई मनीं ॥ ६ ॥

अध्याय १५२–१५४ वा

४४१

हिडिंबेसी वेळ झाला। म्हणुनी हिडिंब निघाला ॥ १ ॥
म्हणे पाहूनी तयासी। तुम्हा नेतें सुस्थळासी ॥ २ ॥
भिऊं नको म्हणे भीम। क्षणीं दैत्यासी वधीन ॥ ३ ॥
करूं नको अवमान। मज मानूनी सामान्य ॥ ४ ॥
म्हणे हिडिंबा तयास। महाक्रूर हा हिडिंब ॥ ५ ॥
येई धांवोनियां दैत्य। भाषा ऐकूनी ती क्रुद्ध ॥ ६ ॥
भगिनीची निंदा करी। सिद्ध युद्धासी सत्वरी ॥ ७ ॥
भीम म्हणे दोष नसे। काम पीडी सकलांतें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वीर। मग भिडले परस्पर ॥ ९ ॥

४४२

एकमेकां करिती युद्ध। जुंपे शेवटीं तें द्वंद्व ॥ १ ॥
धके-चपेटे मारिती। घोर गर्जना करिती ॥ २ ॥
कुंती धर्म तें जागृत। अवलोकिती हिडिंबेस ॥ ३ ॥
कुंती म्हणे मृदु शब्दें। कोण कोणाची तूं शुभे ॥ ४ ॥

येरी म्हणे माझें वन । बंधु माझा हा दारुण ॥ ५ ॥
पाहूनियां तव पुत्रातें । काम बाधला गे मातें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसें । वृत्त सर्वही ती सांगे ॥ ७ ॥

४४३

ऐकूनी हें सर्व युधिष्ठिर वेगें । उठतांचि मागें पार्थ त्याच्या ॥ १ ॥
नकुळ सहदेव तेहि होती सिद्ध । सिंहाचें त्या युद्ध पुढती दिसे॥ २ ॥
होऊनियां पुढें पार्थ म्हणे भीमा । घेऊं नको श्रमा वधितों मीचि ॥३॥
भीम म्हणे वत्सा न करीं रे घाई । क्षणभरी पाहीं बळ माझें ॥ ४ ॥
होतां अरुणोदय कटिप्रदेशासी । मोडूनी खळासी पाडियेला ॥ ५ ॥
दुमदुमे वन तयाच्या आक्रोशें । बांधव भीमातें प्रशंसिती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सन्निध नगर । जाणूनी सत्वर पुढती जाती ॥ ७ ॥

अध्याय १५५ वा

४४४

मागोमाग येतां हिडिंबा पाहिली । भीम तया वेळीं क्रुध्द होई ॥ १ ॥
म्हणे सूड घेती राक्षस सर्वदा । यास्तव हिडिंबा मृत्यु पावो ॥ २ ॥
आंवरूनी त्यासी धर्म, धर्म कथी । म्हणे ही आम्हासी काय करी ॥३॥
वंदूनी कुंतीसी बोलली हिडिंबा । जाणसी तूं बाधा कामाची हे ॥ ४ ॥
स्वधर्म, स्वजन, सुहृद टाकिले । भीमासी वरिलें प्रेमभावें ॥ ५ ॥
मूढ अनुचरी भक्त मज जाण । वांचवीं हे प्राण कृपा करीं ॥ ६ ॥
स्मराल त्यावेळीं करीन साह्यासी । इच्छित स्थळासी पोंचवीन ॥७॥
वासुदेव म्हणे ऐकूनी वचन । बोलला तैं धर्म तिजप्रती ॥ ८ ॥

४४५

धर्म म्हणे दिनभरी । न्यावें, पोंचवावें रात्रीं ॥ १ ॥
ऐसें जरी मान्य तुज । स्वीकारील बंधुराज ॥ २ ॥

भीम म्हणे पुत्रलाभ । होतां पूर्ण हा संबंध ॥ ३ ॥
करी सर्वही तें मान्य । पुढती हिंडे वनोवन ॥ ४ ॥
तीर्थक्षेत्रें रम्यवनें । हिममय उच्चस्थानें ॥ ५ ॥
पुढती पुत्र एक झाला । घटोत्कच नाम त्याला ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पुत्र । होता शस्त्रास्त्रकुशल ॥ ७ ॥

४४६

त्वरित प्रसव राक्षसस्त्रियांचा । धारण करितां प्रसवती ॥ १ ॥
पुत्र केशहीन[1] वंदी भीमाप्रती । उत्कच–घटेंसी घटोत्कच ॥ २ ॥
माता म्हणे यांसी साह्य त्वां करावें । येरु म्हणे व्हावें स्मरण माझें ॥३॥
इंद्रजितासम बल वीर्य माझें । स्मरतां पित्यातें भेटेन मी ॥ ४ ॥
ऐसें बोलूनियां उत्तरेसी गेला । यथेच्छ राहिला बळिवंत ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वासवशक्तीचा । होई हा संहर्ता इंद्ररूपें ॥ ६ ॥

अध्याय १५६ वा

४४७

स्वैरपणें वनीं हिंडती ते वीर । वेद नीतिशास्त्र अभ्यासिती ॥ १ ॥
अकस्मात व्यास भेटती तयांसी । पांडव वंदिती तयांलागीं ॥ २ ॥
मानूं नका तुम्ही विषाद म्हणती । संकट मजसी कळलें सर्व ॥ ३ ॥
दीन बाळांवरी प्रेम मानवांचें । तुम्हावरी तैसें प्रेम माझें ॥ ४ ॥
नगरी समीप निरामय असे । ‘ एकचक्रा ’ तिचें नाम जनीं ॥ ५ ॥
नेलें नगरासी विप्राच्या सदनीं । मास एक तुम्ही म्हणती कंठा ॥६॥
मार्गांत कुंतीसी धीर बहु दिला । पावा वैभवाला पुढती म्हणे ॥७॥
वासुदेव म्हणे पुनर्भेटीसाठीं । कथूनियां जाती व्यास तदा ॥ ८ ॥

———०———

१ केशहीन मस्तक.

# बकवधपर्व १०

## अध्याय १५७ वा

४४८

अल्पकाळ वास विप्रसदनांत । हिंडती वनांत आनंदानें ॥ १ ॥
भिक्षान्न सेवूनी संतोष पावती । विभागूनी कुंती अन्न देई ॥ २ ॥
अर्धभिक्षा देई केवळ भीमासी । अर्ध इतरांसी वांटीतसे ॥ ३ ॥
एके दिनीं आर्त स्वर सदनांत । म्हणे काय दुःख न कळे कुंती ॥ ४ ॥
भीमालागीं म्हणे उपकार यांचे । दिवस सुखाचे एथें गेले ॥ ५ ॥
व्यर्थ उपकार न घेई कोणाचे । धन्य त्या नराचें जिणें जगीं ॥ ६ ॥
अल्प उपकारें संत ऋणी होती । विप्रासी संकटीं साह्य व्हावें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्रतिज्ञावचन । बोलतांचि भीम सुखी माता ॥ ८

४४९

उभयांचा आर्त स्वर । फिरुनी येई कानावर ॥ १ ॥
वत्सालागीं धेनु जैसी । कुंती धांव घेई तैसी ॥ २ ॥
कन्या पुत्र भार्या पति । पाही दुःखाकुल सती ॥ ३ ॥
कोणी पाहिलासे मोक्ष । अर्थें बहुत अनर्थ ॥ ४ ॥
असो धिक्कार मजसी । विप्र बोलला कांतेसी ॥ ५ ॥
स्थानत्याग मी इच्छिला । तुझा मोह आड आला ॥ ६ ॥
तुझ्या पित्याचें हें स्थान । गेला इहलोक सोडून ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दिसे । मृत्यु प्रत्यक्ष विप्रातें ॥ ८ ॥

४५०

भोजनसमयीं मजलागीं माता । शीलवती कांता पुण्यवती ॥ १ ॥
इहपरमित्र देवानें जो दिला । पुत्रलाभ झाला जिच्या योगें ॥ २ ॥
गृहस्थधर्मासी पात्र, मंत्रपूत । साध्वी ते मृत्यूस कैसी अर्पूं ॥ ३ ॥
पुत्र तरी कैसा त्यजूं प्राण माझा । घात बालिकेचा कैसा करूं ॥ ४ ॥

मरतां मी, तुम्हीं सर्वही मराल । काय घोर वेळ प्राप्त झाली ॥५॥
वासुदेव म्हणे सकलां मृत्युभय । संकटीं भूदेव इच्छि मृत्यु ॥ ६ ॥

## अध्याय १५८ वा

### ४५१

कांता म्हणे पतिदेवा । शोक सत्वरीं त्यजावा ॥ १ ॥
मरण न टळे कोणासी । सिद्ध व्हावें भवितव्यासी ॥ २ ॥
भार्या पुत्र कन्या जन । सुखार्थेचि अवघे जाण ॥ ३ ॥
सोडीं अंतरींची व्यथा । मृत्यु वरीन मी आतां ॥ ४ ॥
भर्ता सर्वस्व स्त्रियांचें । कल्याणहि तेंचि त्यांचें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धर्म । सांगे विप्रस्त्री गहन ॥ ६ ॥

### ४५२

कन्या-पुत्र-दानें फिटलें मम ऋण । तूंचि संरक्षण बाळांचें या ॥ १ ॥
प्राणधन माझें तूंचि पतिदेवा । वियोगें विधवा कैसी राहूं ॥ २ ॥
शिक्षण पालन कैसें मज शक्य । कन्येसी या दुष्ट याचितील ॥ ३ ॥
आमिषासी पक्षी तैसे दुष्ट जन । विधवेसी पाहून हृष्ट होती ॥ ४ ॥
विद्या, विनयादि सद्गुणविहीन । तेविं दुष्टाधीन कन्या होई ॥ ५ ॥
येणें परी नाश आम्हा सकळांचा । वासुदेव ऐसा बोध ऐके ॥ ६ ॥

### ४५३

आपत्तीचें निवारण । व्हावें याचसाठीं धन ॥ १ ॥
धन त्यागूनी पत्नीचें । रक्षण हें योग्य दिसे ॥ २ ॥
आत्म्यापुढती तुच्छ पत्नी । ऐसें बोलताती ज्ञानी ॥ ३ ॥
कुल कुलपती दोन्ही । तुळितां पति श्रेष्ठ जनीं ॥ ४ ॥
अवध्य या जनीं स्त्रिया । क्वचित् सोडिल जाणूनियां ॥ ५ ॥
पाठवावें मजलागीं । कृतार्थ मी झाल्यें जगीं ॥ ६ ॥
अन्य भार्यालाभ धर्म्य । कैसा करूं मी अधर्म ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कांता । करी मृत्यूची सिद्धता ॥ ८ ॥

अध्याय १५९ वा

४५४

कन्या म्हणे वो जननी। ऐक ऐक माझी वाणी ॥ १ ॥
काय अनाथासमान। रडतां दुःखार्त होऊन ॥ २ ॥
देय तेंचि द्यावें जनीं। धर्म आणावा हा मनीं ॥ ३ ॥
संरक्षणार्थ अपत्य। इच्छिताती सर्व लोक ॥ ४ ॥
दुःखसागरीं या नौका। जाणूनियां मज त्यागा ॥ ५ ॥
दौहित्राची इच्छा व्यर्थ। सोडवीतें मी तुम्हास ॥ ६ ॥
पुत्र, आत्मा, मित्र, भार्या। कन्या, संकटाचि आर्या ॥ ७ ॥
सफल तेणें माझा जन्म। अमर होईन मरून ॥ ८ ॥
दुःख सकलां ऐकूनी। वासुदेव खिन्न मनीं ॥ ९ ॥

४५५

बाळ म्हणे ' आई बाबा। आक्का तुम्ही लर्लू नका ' ॥ १ ॥
जवळी प्रत्येकाच्या जाई। तृण करामाजी घेई ॥ २ ॥
म्हणे ' लाक्षसा मालीन '। हंसती सर्व तें ऐकून ॥ ३ ॥
ऐसी दुःखाची ते वेळ। कुंती अंतरीं व्याकुळ ॥ ४ ॥
संधि ओळखूनी आली। अमृत वचन बोलली ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दया। तोचि ईश्वर या ठायां ॥ ६ ॥

अध्याय १६० वा

४५६

कुंती विप्रालागीं विचारी कारण। म्हणे निवारीन शक्य जरी ॥ १ ॥
सद्गदित कंठें विप्र तैं बोलला। मजवरी घाला दैत्याचा हा ॥ २ ॥
तीस हो खंडीचा भात, रेडे दोन। मनुष्य, वेतन नित्य त्याचें ॥ ३ ॥
आळी–पाळीनें हें नागरीक देती। टाळितां पावती नष्ट सर्व ॥ ४ ॥
वेत्रंकीयगृहीं राव नगरीचा। मार्ग रक्षणाचा न करी कांहीं ॥ ५ ॥
सुराज्यांत भार्या होतसे सुखद। लंघितां सिद्धांत खेद होई ॥ ६ ॥

---

१ या नांवाचें एक स्थान.

धन वांधवहि मज कोणी नाहीं । वारितां सर्वांहि मृत्यु आतां ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे उद्विग्न तो द्विज । पाहूनी कुंतीस खेद वाटे ॥ ८ ॥

अध्याय १६१ वा

४५७

कुंती म्हणे विप्रा पांच पुत्र मातें । एक मी तुम्हातें अर्पीतसें ॥ १ ॥
गर्हिवरें म्हणे विप्र हें अकार्य । कुलीन जो आर्य कैंवि करी ॥ २ ॥
अकुलीन तेहि न वागती ऐसें । विप्र मी तुम्हातें कैंवि वधूं ॥ ३ ॥
सर्वस्वाचा त्याग व्हावा विप्रासाठीं । विप्र मी तुम्हासी कैंवि वधूं ॥४॥
आत्मघाताहूनी ब्रह्महत्या मोठी । विप्र मी तुम्हासी कैंवि वधूं ॥ ५ ॥
वधितां बक मज पाप न आम्हासी । विप्र मी तुम्हासी कैंवि वधूं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विप्र तो सुजाण । कुंती म्हणे प्राण विप्रास्तव ॥ ७ ॥

४५८

कुंती म्हणे पुत्र शत । मातेसी न ते अधिक ॥ १ ॥
महाबळी माझा पुत्र । जाईल त्या दैत्यावर ॥ २ ॥
मंत्रसिद्धि तयापाशीं । वधिलें बहु राक्षसांसी ॥ ३ ॥
सांगूं नये मात्र कोणा । कळतां विघ्न विद्यार्जना ॥ ४ ॥
विद्या गुरुआज्ञेवीण । निष्फळ हें ध्यानीं आण ॥ ५ ॥
ऐकूनी हे कुंतीवाणी । विप्र आनंदला मनीं ॥ ६ ॥
म्हणे वासुदेव भीम । बोले कार्य हें करीन ॥ ७ ॥

अध्याय १६२ वा

४५९

भिक्षेहूनी येतां भीमाचें वचन । ऐकतांचि मन भय पावे ॥ १ ॥
युधिष्ठिर म्हणे एकांतीं मातेसी । काय या भीमासी कथिलें कार्य ॥२॥
कुंती सर्व वृत्त सांगे तयाप्रती । युधिष्ठिर चित्तीं क्रुद्ध होई ॥ ३ ॥
म्हणे माते भीम आधार आमुचा । त्याग तूं तयाचा करिसी कैसा ॥
आजवरी जेणें रक्षिलें आम्हासी । कैंवि त्या लोटिसी दूर माते ॥ ५ ॥

कुंती म्हणे बाळा शोक न करावा । कृतघ्न नसावा जन लोकीं ॥ ६ ॥
विप्रकार्य करी सहज हा भीम । भीम-पराक्रम सकल त्याचे ॥ ७ ॥
अंकावरूनी जो पडतां शिळाचूर्ण । तोचि माझा भीम न करीं दुःख ॥
विप्ररक्षण तैं कृतज्ञता घडे । पुण्यलोक जोडे तेणें तुम्हां ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे जनांचें रक्षण । हेंचि पुण्यकर्म क्षत्रियांसी ॥ १० ॥

अध्याय १६३ वा

४६०

कुंतीच्या वचनें पावे धर्म सौख्य । संपतांचि रात्र सिद्ध भीम ॥ १ ॥
अन्न घेऊनियां काननीं पातला । अन्नार्थ बकाला हांका मारी ॥ २ ॥
पाहोनी तें धार्ष्ट्य क्रुद्ध होई बक । त्रिकराल मुख विस्फारी तो ॥३॥
दांत ओंठ खात धांवोनी तो येई । भीम अन्न सेवी पाही ऐसें ॥ ४ ॥
गर्जना करूनी ताडीतसे भीमा । परी तो न अन्ना त्यजुनी उठे ॥ ५ ॥
ढेंकर देऊनी करी आचमन । युद्ध तें दारुण पुढती होई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वृक्ष शिळा फेंकी । भीमासी न त्याची बाधा कांहीं ॥

४६१

पुढती झालें द्वंद्वयुद्ध । भुजपाशें वीर बद्ध ॥ १ ॥
आपटिती एकमेकां । धैर्य न धरवे बका ॥ २ ॥
वेगें भूमी हादरली । बका भीम पाडी खालीं ॥ ३ ॥
मोडी कंबर तयाची । वाहे रुधिर दैत्यमुखीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे क्रूरा । क्रूर होऊनियां मारा ॥ ५ ॥

अध्याय १६४ वा

४६२

आक्रोश करूनी मृत्युसमयासी । गेला परलोकासी बकासुर ॥ १ ॥
परिवार त्याचा धांवोनियां आला । पाहोनी भीमाला भय पावे ॥२॥
भीम म्हणे नका करूं नरहिंसा । नाहीं तरी दशा हेचि जाणा ॥ ३ ॥
राक्षस या पुढें उपद्रवशून्य । पाहूनियां जन विस्मितचि ॥ ४ ॥

नगरद्वारामाजी वकाचें शरीर । टाकूनियां वीर सदनीं गेला ॥ ५ ॥
अपार ते जन प्रेत पहावया । पातले त्या ठाया आश्चर्यानें ॥ ६ ॥
विप्रासी पुशितां मजसी मांत्रिक । पातला साह्यार्थ म्हणे दैवें ॥ ७ ॥
विप्र तो दयाळु यश हें तयाचें । दैन्य नगरीचें दूर केलें ॥ ८ ॥
उत्सव तैं केला सकलजनांनीं । गेले निजस्थानीं हर्षभरें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे पांडव सुखांत । राहियेले तेथ कांहीं दिन ॥ १० ॥

## चैत्ररथपर्व ११

### अध्याय १६५–१६६ वा

४६३

विप्र सदनीं त्या एकचक्रेमाजी । होते बहु राजी पांडव ते ॥ १ ॥
अध्ययनें काळ कंठिती आपुला । कोणी एक आला विप्र तेथें ॥ २ ॥
वस्तीसी राहिला महाव्रतधारी । कथा तया रात्रीं कथिल्या तेणें ॥३॥
क्षत्रिय वर्णिले अनेक तयानें । तीर्थक्षेत्रें स्थानें कथिलीं बहु ॥ ४ ॥
शिखंडी, द्रौपदी धृष्टद्युम्न कैसे । जन्मले तयांचें कथिलें वृत्त ॥ ५ ॥
स्वयंवर योजी नृपाळ कन्येचें । वृत्त तें संक्षेपें विप्र कथी ॥ ६ ॥
द्रुपद-द्रोणांचें वृत्त कथियेलें । विस्तृत पुशिलें पांडवांनीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे द्रोणांचें तें वृत्त । कथिलें समस्त पांडवांसी ॥ ८ ॥

### अध्याय १६७ वा

४६४

विप्र म्हणे ऐका समग्र ती कथा । द्रुपदाच्या चित्ता खेद वाटे ॥ १ ॥
सूड कैसा घ्यावा द्रोणाचा हें मनीं । हिंडतसे वनीं द्रुपद नित्य ॥ २ ॥
विद्यमान सुतां निंदी सर्व काल । नसे तयां बळ इच्छेसम ॥ ३ ॥
गंगा यमुनातीरीं आश्रमांत आला । याज-उपयाजांला पाही तेथें ॥४॥

१ या नांवाचे मुनि.

सेवा उपयाजाची केली बहुत दिन । द्विज तो निष्काम नायकेचि ॥५॥
निर्धारें द्रुपद सेवा करी त्याची । उपयाज बंधूची कथा सांगे ॥६॥
वासुदेव म्हणे स्वभावाचें ज्ञान । वर्तनावरून सहज होई ॥ ७ ॥

४६५

मुनि म्हणे द्रुपदराजा । हेतु पुरवी बंधु माझा ॥ १ ॥
अशुद्धही भूमीवरी । पडलें फळ तो उचली ॥ २ ॥
करितां आम्हीं विद्यार्जन । भक्षी उच्छिष्ट तो अन्न ॥ ३ ॥
फलार्थी तो तर्क माझा । हेतु पुरवील तुझा ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे राव । गेला ठेवूनियां भाव ॥ ५ ॥

४६६

ऐंशी सहस्र धेनूंसी । घेउनी गेला याजापाशीं ॥ १ ॥
म्हणे पुरवा हेतु माझा । सूड उगवील द्रोणाचा- ॥ २ ॥
ऐसा पुत्र देई मज । दशकोटी धेनूलाभ ॥ ३ ॥
याज संतोषला मनीं । रतला तैसा यागकर्मी ॥ ४ ॥
घेई उपयाजाचें मत । आरंभिला पुढती याग ॥ ५ ॥
अंतीं पाचारी राज्ञीसी । येरी म्हणे मी अशुचि ॥ ६ ॥
मुखमार्जन तें स्नान । करूनी सत्वरि येईन ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आतां । मुनि साहीना अवकाशा ॥ ८ ॥

४६७

क्षेत्र रेतः सेकाविण । पुत्र होईल निर्माण ॥ १ ॥
ऐसें हव्याचें सामर्थ्य । न करी मुनि कालक्षेप ॥ २ ॥
हवि अर्पितां अग्नींत । प्रगटे एक दिव्य सुत ॥ ३ ॥
कवच कुंडलें तयासी । शोभला तो उग्ररूपी ॥ ४ ॥
खड्ग सशर धनुष्य । करी वेगें सिंहनाद ॥ ५ ॥
बैसे श्रेष्ठ रथावरी । हृष्ट पांचाल अंतरीं ॥ ६ ॥
'बाळ द्रोण वध कर्ता' । शब्द घुमवी अंबरा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आली । तैंचि पांचाली बाहेरी ॥ ८ ॥

४६८

दर्शनीय अंगें नेत्र काळेभोर । कुरळे कुंतल शोभताती ॥ १ ॥
रेखीव भुंवया नखें रक्तवर्ण । अंगकांति शाम-सुंदर ती ॥ २ ॥
नीलकमलाचा सुगंध अंगासी । व्यापी तो दिशांसी कोश एक ॥ ३ ॥
' क्षत्रियांचा क्षय करील ही तैसें । विघ्न कौरवांतें प्राप्त होई ' ॥ ४ ॥
ऐसी दिव्यवाणी ऐकावया आली । नभांत त्या वेळीं सर्व लोकां ॥५॥
द्रुपदाची कांता विनवी व्याजातें । समजोत मातें माता बाळें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे द्रोण धृष्टद्युम्ना । दैव जाणूनियां शिकवी विद्या ॥ ७ ॥

अध्याय १६८ वा

४६९

ऐकूनियां सर्व वृत्त । खिन्न पांडव मनांत ॥ १ ॥
कुंती म्हणे युधिष्ठिरा । जाऊं आतां रम्य स्थळा ॥ २ ॥
देश पांचाळ तो रम्य । राहूं तेथेंचि जाऊन ॥ ३ ॥
हेतु जाणूनी सुतांचा । ऐसें कथी तया माता ॥ ४ ॥
आज्ञा घेऊनी विप्राची । निघती पांचाळ देशासी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जन । निवडी स्थान हेतुसम ॥ ६ ॥

अध्याय १६९ वा

४७०

योग्य समय जाणूनी । प्राप्त होती व्यासमुनि ॥ १ ॥
करूनियां कुशल प्रश्न । कथा ऐकवीती रम्य ॥ २ ॥
ऋषिकन्या गुणवती । एक अभागिनी होती ॥ ३ ॥
लाभ पतीचा न होई । शंकरासी शरण जाई ॥ ४ ॥
होतां प्रसन्न पशुपति । म्हणे ' दे पति दे पति ' ॥ ५ ॥
पांच वेळां पति मागे । पुरले हेतु ते मनींचे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पांच । पति ऐसा वरलाभ ॥ ७ ॥

४७१

मागितला म्हणे देवा एक पति । कां ऐसें मजसी बोलसी तूं ॥ १ ॥

शिव म्हणे वाळे वदसी पांच वेळां । तोचि पूर्ण केला हेतु तुझा ॥ २ ॥
अन्य जन्मीं लाभ होईल पतीचा । तोचि योग आतां म्हणती मुनि ॥
पांडव हो जावें पांचाल पुरासी । स्वयंवरामाजी लाभ तुम्हा ॥ ४ ॥
ऐसें कथूनियां व्यासमुनि जाती । वासुदेव चित्तीं संतोषला ॥ ५ ॥

## अध्याय १७० वा

### ४७२

आज्ञा घेऊनियां निघाले विप्राची । गंगेच्या तीरासी प्राप्त झाले ॥१॥
अहोरात्र केला प्रवास तयांनीं । 'सोमाश्रयायणीं' येती वेगें ॥ २ ॥
मशाल घेऊनी पार्थ पुढें जाई । गंधर्व त्या येई आड तेव्हां ॥ ३ ॥
म्हणे मानवांनीं हिंडूं नये रात्रीं । किंवा उदकासी स्पर्शू नये ॥ ४ ॥
'अंगारपर्ण' मी माझेंचि हें स्थान । गंधर्व तूं जाण मजलागीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वाणी गंधर्वाची । पांडव ऐकती शांतपणें ॥ ६ ॥

### ४७३

विकरालरूपी तुम्ही राक्षस न वाटे ॥
शृंग कपालादि चिन्हें नाहींत तुम्हातें ॥ १ ॥
नसा कापालीक दिव्यदृष्टिचे ते देव ॥
आकाशगमन माळा घालिती गंधर्व ॥ २ ॥
मानव असोनी कांरे येतां या स्थळासी ॥
पार्थ म्हणे लवही तुमचें भय न आम्हासी ॥ ३ ॥
नलिनी, पावनी, सीता, चक्षु, सिंधु, गंगा ॥
वस्वौकसारादि रूपें सप्त अलकनंदा ॥ ४ ॥
ऐशीं रूपें घेऊनियां सागरासि भेटे ॥
अथवा मानिती कोणी अन्य सरितांतें ॥ ५ ॥
सरस्वती गंगा तैसी यमुना रथस्था ॥
सरयू गोमती तैसी गंडकीहि लोकां ॥ ६ ॥
मुक्त सर्वकाळ ऐशा पावन सरिता ॥
वासुदेव म्हणे सांगे बाळ तो कुंतीचा ॥ ७ ॥

४७४

देव म्हणती अलकनंदा। वैतरणी पितृलोकां ॥ १ ॥
अस्पृश्य तें नसे जळ। पातल्याहि वर्षाकाळ ॥ २ ॥
ऐसें असतां अडविसी। कोण जुमानी तुजसी ॥ ३ ॥
म्हणतां ऐसें युद्ध झालें। अग्निअस्त्रें कार्य केलें ॥ ४ ॥
बांधूनियां गंधर्वासी। आणी युधिष्ठिरापाशीं ॥ ५ ॥
शरण येतां मुक्त केलें। 'दग्धरथ' नाम झालें ॥ ६ ॥
तोष वाटे गंधर्वासी। विद्या अर्पिली चाक्षुषि ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे बळ। वाढे असतां अंगीं बळ ॥ ८ ॥

४७५

षण्मास जो उभा एका पायावरी। तयासी सत्वरी लाभो विद्या ॥१॥
शत शत अश्व गंधर्वलोकींचे। अर्पीन तुम्हातें संतोषोनी ॥ २ ॥
दधीचीच्या अस्थि तोंचि होई वज्र। वृत्राशिरावर भंग पावे ॥ ३ ॥
अनेक विभाग आराधिती देव। जें जें स्पृहणीय वज्र तें तें ॥ ४ ॥
हविप्रद हस्त विप्राचें तें वज्र। क्षत्रियाचें वज्र रथ जाणा ॥ ५ ॥
शूरासम अश्व बोलला गंधर्व। वासुदेव सर्व निवेदी तें ॥ ६ ॥

४७६

अश्व गंधर्वलोकींचे। साह्य होतील तुम्हातें ॥ १ ॥
स्मरतां येवोनी जवळी। पोंचविती इष्टस्थळीं ॥ २ ॥
विनामोल म्हणे पार्थ। नको मजसी कांहीं एक ॥ ३ ॥
परस्परां द्यावें घ्यावें। गुह्य कथावें ऐकावें ॥ ४ ॥
भोजन करावें करवावें। प्रीतिचिन्ह हें जाणावें ॥ ५ ॥
म्हणे गंधर्व पार्थासी। अग्निअस्त्र दे आम्हासी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसा। स्नेह दृढ होई त्यांचा ॥ ७ ॥

४७७

पार्थ म्हणे रे गंधर्वा। रोधिलेंसी कां आम्हाला ॥ १ ॥
येरु म्हणे अनाश्रमी। धर्पणासी योग्य जनीं ॥ २ ॥
कुरुकुळासी जाणितों। द्रोणासी मी ओळखितों ॥ ३ ॥

कांतेसमोर अवमान । कोण करील सहन ॥ ४ ॥
म्हणूनियां हे तापत्या । क्रोध येई मन्मानसा ॥ ५ ॥
श्रेष्ठ ब्रह्मचर्यधर्म । आचरीसी तूं संपूर्ण ॥ ६ ॥
पराभव तेणें माझा । वासुदेव म्हणे ऐका ॥ ७ ॥

४७८

विवाहित रजनीमाजी । युद्ध करी जो आम्हासी ॥ १ ॥
नाश तयाचा सत्वरी । तापत्या हें चित्तीं धरीं ॥ २ ।
पुरोहितें जो रक्षित । जिंकी नक्तंचरांसी तो ॥ ३ ॥
तापत्या तूं पुरोहित । योजीं तेणें होई हित ॥ ४ ॥
वक्ता धर्मशील शुचि । पुरोहित ज्या रायासी ॥ ५ ॥
इहपर सौख्य त्याला । केवळ न शौर्य-कुळा ॥ ६ ॥
विप्रप्रमुख जें राज्य । तापत्या तें चिर भोग्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विप्र । ऐसा सर्वांसी तो थोर ॥ ८ ॥

अध्याय १७१ वा

४७९

पार्थ म्हणे गंधर्वासी । कां रे तापत्य बोलसी ॥ १ ॥
यथार्थता सांगे त्याची । साध्वी कुंती माता माझी ॥ २ ॥
म्हणे गंधर्व विख्यात । सांगतों ती कथा एक ॥ ३ ॥
सूर्य द्युलोकाचा धनि । कन्या त्याची रूपखनी ॥ ४ ॥
नाम ‘ तपती ’ तियेसी । न मिळे अनुरूप पति ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे चिंता । होई आदित्याच्या चित्ता ॥ ६ ॥

४८०

कुरुश्रेष्ठ संवरण । करी आदित्याचें ध्यान ॥ १ ॥
जप पूजा उपवास । करुनी आराधी तयास ॥ २ ॥
पाहूनियां त्याचें शील । म्हणे जामात शोभेल ॥ ३ ॥
आणी ऐसें सूर्य मनीं । इकडे राव जाई वनीं ॥ ४ ॥
मृगयेसी तो हिंडतां । अश्व गेला परलोका ॥ ५ ॥

पुढती हिंडे तो एकाकी। पाही एक रम्य मूर्ती ॥ ६ ॥
मोह पावला अंतरीं। म्हणे कोण तूं सुंदरी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे गुप्त। होतां जाहला मूर्छित ॥ ८ ॥

अध्याय १७२ वा

४८१

संवरणदुःख पाहूनी तपती। येऊनी पुढती म्हणे राया ॥ १ ॥
कामव्यथा ऐसी शोभेना कुरूंसी। कन्या पितृमति जाणीं मज ॥ २ ॥
दर्शनेंचि तुझ्या मोह मी पावलें। व्याकुळ जाहलें अंतरांत ॥ ३ ॥
परी मी स्वाधीन नसें हे राजेंद्रा। विनवी त्या सूर्या मजसाठीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे ' तपती ' बोल ते। पाळीन आज्ञेतें नृपश्रेष्ठा ॥ ५ ॥

अध्याय १७३ वा

४८२

सांगूनियां ऐसें अंतरिक्षीं गेली। राव तैं भूतलीं पडला दुःखें ॥ १ ॥
मंत्री येऊनियां उठवी तयासी। राव तैं तपासी आरंभितो ॥ २ ॥
द्वादश दिन तो उभा ऊर्ध्वमुख। दयाळु वसिष्ठ येती तेथें ॥ ३ ॥
जाणूनी वृत्तांत सूर्यलोकीं गेले। सूर्यासी कथिलें वृत्त सर्व ॥ ४ ॥
तपतीसवें ते आले रायापाशीं। इच्छा तैं रायाची पूर्ण झाली ॥५॥
वर्षें द्वादश तो राहिला वनांत। कांतेसवें सुख भोगी वनीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे राज्यकारभार। वसिष्ठ उदार पहातसे ॥ ७ ॥

४८३

कामासक्त राव राहिला काननीं। हाहाःकार जनीं होई सर्व ॥ १ ॥
दैवही न पडे पर्जन्य कोठूनी। तृणा-बीज भूमी रुक्ष होई ॥ २ ॥
क्षुधाकुल जन वधिती एकमेकां। दुःखें दाहीदिशा हिंडताती ॥ ३ ॥
वसिष्ठ दयाळु नृपासी आणिती। धन-धान्यवृद्धि होई तेव्हां ॥ ४ ॥
तपतीचा पुत्र कुरु पुण्यवंत। तयाचे वंशज पार्था तुम्ही ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे तापत्य हें नाम। ऐसें अर्थपूर्ण आणा मनीं ॥ ६ ॥

अध्याय १७४ वा

४८४

पार्थ म्हणे सांगे वसिष्ठांचें वृत्त । तपोधन श्रेष्ठ कोण होते ॥ १ ॥
येरु म्हणे मुनि ब्रह्मदेव पुत्र । मुनि विश्वामित्र पीडी त्यांसी ॥ २ ॥
इंद्रियें त्यां वश म्हणोनी वसिष्ठ । कौशिकाचा सूड न घेती ते ॥ ३ ॥
इक्ष्वाकुकुळाचे श्रेष्ठ पुरोहित । नृपाळ अनेक सुखी केले ॥ ४ ॥
सामर्थ्यसंपन्न पुरोहित करा । पुरुषार्थ वरा येणें मार्गें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पुरोहिताविण । रायाचे ते शीण व्यर्थ सर्व ॥ ६ ॥

अध्याय १७५ वा

४८५

पार्थ म्हणे कैसें वैर दोघांमाजी । आश्रमीं वसती करितां होई ॥१॥
गंधर्व पार्थासी म्हणे ऐकें वृत्त । कथितों समस्त वसिष्ठाचें ॥ २ ॥
नृपाळ कुशिक कान्यकुब्ज देशीं । पुत्र त्याचा गाधी कीर्तिवंत ॥३॥
रिपुनाशकर्ता तयालागीं पुत्र । राव विश्वामित्र हिंडे वनीं ॥ ४ ॥
मरुप्रदेशीं तो तृषाक्रांत होई । आश्रमांत येई वसिष्ठाच्या ॥ ५ ॥
कामधेनूलागीं बोलला वसिष्ठ । रायाचें इच्छित पूर्ण करीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ससैन्य रायासी । विविध अन्नेंसी तोष होई ॥ ७ ॥

४८६

मान मस्तक तियेचें । पृष्ठ कटी उंच दिसे ॥ १ ॥
पोळी नासिकाही तैसी । पुष्ट मांड्या तेंवि कुशी ॥ २ ॥
दीर्घ ललाटप्रदेश । कर्ण नेत्र तेही दीर्घ ॥ ३ ॥
नेत्र जैसे मंडूकाचे । पुष्ट ओंटी ते विराजे ॥ ४
गोंडा सुंदर पुच्छाचा । रम्य आकार शृंगाचा ॥ ५ ॥
कर्ण दीर्घ टोंकदार । सुलक्षणी धेनु थोर ॥ ६ ॥
धेनु पाहूनी तो राव । तुष्ट म्हणे वासुदेव ॥ ७ ॥

४८७

म्हणे धेनु द्या मजसी। देतों धेनु दश कोटी॥ १॥
अथवा राज्यही अर्पीन। राव बोलला वंदून॥ २॥
मुनि म्हणे आश्रमातें। आधार ही, नच मागें॥ ३॥
राव म्हणे शांत दान्ता। करितों बलात्कार आतां॥ ४॥
मुनि म्हणे हे धार्मिका। करीं जैसी तुझी इच्छा॥ ५॥
वासुदेव म्हणे पाश। बांधी राव नंदिनीस॥ ६॥

४८८

करीं घेऊनियां दंड। दूत मारितो प्रतोद॥ १॥
हंबरडा फोडी गाय। पुढती न टाकी ती पाय॥ २॥
हिसडा मारुनी पळाली। मुनि पुढती उभी ठेली॥ ३॥
मुनि बोलती द्रवूनी। कर्ण विदारी हा ध्वनि॥ ४॥
काय करूं मी ब्राह्मण। असें नित्य क्षमावान्॥ ५॥
धेनु म्हणे फुटलें अंग। करिसी उपेक्षा कां सांग॥ ६॥
वासुदेव म्हणे माता। वाहे मुनीसी अनाथा॥ ७॥

४८९

महामुनि शांत अचल व्रतस्थ। लवही न क्षुब्ध होई तदा॥ १॥
म्हणे माते तेज क्षात्रियांचें बळ। ब्राह्मण अचल क्षमावंत॥ २॥
घोरही अपराधें क्षमा न त्यागवे। येई तरी जावें मनीं तुझ्या॥ ३॥
धेनु म्हणे त्याग मानूं काय माझा। क्षुद्रचि हा राजा मज पुढें॥ ४॥
अत्यादरें मुनि म्हणती जननी। राहीं या आश्रमीं शक्य जरी॥ ५॥
पहा वत्सालागीं बांधूनियां नेती। आज्ञाचि ते चित्तीं मानी धेनु॥ ६॥
क्रुद्ध होऊनियां हंबरडा फोडी। पळतां भूमी थोडी सैनिकांसी॥ ७॥
वासुदेव म्हणे प्रदीप्त होऊनी। वर्षीतसे वन्ही पुच्छाग्रेंसी॥ ८॥

४९०

पल्हव, द्राविड, शक ते यवन। अंगा-अंगातून निर्मियेले॥ १॥
शबर, सिंहल, पौंड्र, खस, भिल्ल। किरात, वर्बर, हूण, चीन॥ २॥

पुलिंद, केरल, म्लेच्छ निर्मियेले । सैन्य पिटाळिलें नृपाळाचें ॥३॥
विश्वामित्र ऐसें सामर्थ्य पाहूनी । अंतरीं लाजूनी खिन्न होई ॥ ४ ॥
असो क्षत्रियांच्या बळासी धिक्कार । म्हणे श्रेष्ठ बळ ब्राह्मणाचें ॥५॥
तपासम बल दुजें न मानूनी । तप आचरूनी सिद्धि पावे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ब्राह्मण्य लाभलें । सोमपान केलें विश्वामित्रें ॥ ७ ॥

अध्याय १७६ वा

४९१

वैशंपायन जनमेजया । म्हणे पुढती ऐकें राया ॥ १ ॥
सांगे गंधर्व पार्थासी । कथा कल्माषपादाची ॥ २ ॥
राव इक्ष्वाकु-कुळींचा । होता दक्ष निज काजा ॥ ३ ॥
आला मृगया करोनी । मार्गी भेटे शक्तिमुनि ॥ ४ ॥
अति अरुंद त्या मार्गे । येती एकमेकां पुढें ॥ ५ ॥
मागें होईना कोणीच । ताडी राव त्या मुनीस ॥ ६ ॥
केलें राक्षसी तें कृत्य । मुनि जाहला संतप्त ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शाप । देई होईरे राक्षस ॥ ८ ॥

४९२

शरण मुनीलागीं जाई । तोंचि विश्वामित्र पाही ॥ १ ॥
प्रवेशवी शरीरांत । नामें ‘ किंकर ’ राक्षस ॥ २ ॥
झाला मोहित नृपाळ । कोणी विप्र क्षुधाकुल ॥ ३ ॥
मागे भोजन तयासी । राव अर्पी नरमांसासी ॥ ४ ॥
ज्ञानी विप्र क्रुद्ध झाला । शापवचन बोलला ॥ ५ ॥
होईं नरमांसासक्त । करीं भयद भ्रमणास ॥ ६ ॥
ऐसा होवोनी राक्षस । भक्षी जावोनी शक्तीस ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दैन्य । होतां नर पराधीन ॥ ८ ॥

१ वसिष्ठाचा पुत्र.

४९३

गाधिज प्रेरणा करितां दैत्यासी। शतही पुत्रांसी भक्षीतसे ॥ १ ॥
वसिष्ठ हें जाणी परी प्रतिकार। न करीच थोर तितिक्षा ते ॥ २ ॥
परी अनावर पुत्रशोक होतां। सिद्ध आत्मघाता होई मुनि ॥ ३ ॥
शिखरावरूनी मेरूच्या तो पडे। परी जैसा उडे कार्पास कीं ॥ ४ ॥
अग्नि शांत होई प्रवेश करितां। मृत्यु महाव्रता न शिवेचि ॥ ५ ॥
शिळा बांधूनियां सागरीं पडतां। फेंकिती त्या लाटा तीरावरी ॥६॥
वासुदेव म्हणे होऊनियां खिन्न। अंतीं स्वआश्रम गांठी मुनि ॥ ७ ॥

अध्याय १७७ वा

४९४

पुत्ररहित आश्रम। पाहूनियां शोकमग्न ॥ १ ॥
क्षणही न थांबे तेथें। आला सरिता तीरातें ॥ २ ॥
होता वर्षाकाल, नदी। भरूनी वाहे ती दुथडी ॥ ३ ॥
बांधूनियां हस्त-पाद। उडी घेतसे जळांत ॥ ४ ॥
परी झाला चमत्कार। पाशमुक्त पाही तीर ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे तीर्थ। तेंचि 'विपाशा' प्रसिद्ध ॥ ६ ॥

४९५

शोकमग्न महामुनि। हिंडे नित्य वनोवनीं ॥ १ ॥
'भीमा' हिमगिरीवरी। पाहूनियां पडला पार्ती ॥ २ ॥
नदी शतधा विभागली। 'शतद्रु' ते नाम त्याली ॥ ३ ॥
भूमीवरी उभा मुनि। होई विस्मित तो मनीं ॥ ४ ॥
मरण अशक्य जाणून। वेड्यासम हिंडे वन ॥ ५ ॥
स्नुषा 'अदृश्यंती' पाही। मागोमाग त्याच्या जाई ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मुनि। ऐके मार्गे वेदध्वनि ॥ ७ ॥

४९६

कोण येतसे मागूनी। म्हणतां बोले तपस्विनी ॥ १ ॥
अदृश्यंती तव स्नुषा। नाद उदरीं पुत्राचा ॥ २ ॥

गर्भ शक्तीचा हा असे । उदरीं द्वादश वरुषें ॥ ३ ॥
ऐकतां हे मंगल वाणी । आनंदित होई मुनि ॥ ४ ॥
आला आशेचा अंकुर । गेली निराशा ते दूर ॥ ५ ॥
फिरतां माघारी वसिष्ठ । मार्गी आला कल्माषपाद[1] ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे स्नुषा । विनवी मुनिचरणरजां ॥ ७ ॥

४९७

भयभीत स्नुषा पाहूनियां मुनि । हुंकार करूनी रक्षी तिज ॥ १ ॥
मंत्रजलें केलें मुक्त नृपाळासी । राव वसिष्ठासी वंदीतसे ॥ २ ॥
सुदासाचा पुत्र म्हणे मी मुनींद्रा । मुनि म्हणे पुत्रां भक्षिलेंसी ॥ ३ ॥
होणार तें झालें क्षमिलें तुजसी । आतां अयोध्येसी राज्य करीं ॥ ४ ॥
अवमानूं नको कोणाही विप्रातें । शिरसा आज्ञेतें मानी राजा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राव त्या विनवी । पुत्रप्राप्ती व्हावी कुळास्तव ॥ ६ ॥

४९८

योग्यकाळीं गेले मुनि अयोध्येसी । सन्मानिती त्यांसी प्रजाजन ॥ १ ॥
पुत्रलाभें होई ‘ मदयंती ’ तुष्ट । ‘ पौदन्य ’ ‘अश्मक’ नांवें त्यांचीं ॥२॥
प्रसूती न होई दीर्घकाल तिची । द्वादश वर्षेसी पुत्रलाभ ॥ ३ ॥
निज उदर ते पिटी अश्माघातें । म्हणोनी तयातें तेंचि नाम ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे गोष्टी या अद्भुत । महाभारतांत वर्णियेल्या ॥ ५ ॥

अध्याय १७८ वा

४९९

इकडे प्रसवे अदृश्यंती । शक्तीसम पुत्रप्राप्ति ॥ १ ॥
जातकर्मादिक सर्व । करीतसे मुनिराव ॥ २ ॥
असु पुनः दिधले पर[2] । म्हणुनी नामें पराशर ॥ ३ ॥
पिता मानूनी मुनींस । बाळ म्हणे तात तात ॥ ४ ॥
पुढती कळतां सर्व वृत्त । पराशर होई क्रुद्ध ॥ ५ ॥

१ कल्माषपाद २ श्रेष्ठ

सिध्द होई सकल नाश । वसिष्ठासी हें कळतां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बोध । करिती मुनि स्वपौत्रास ॥ ७ ॥

५००

वसिष्ठ निवेदी कृतवीर्यकथा । अद्भुत ते ऐका शांत चित्तें ॥ १ ॥
सोमयागीं तेणें केलें बहु दान । स्वर्गीं योग्य स्थान मेळविलें ॥ २ ॥
त्याच्या वंशजांनीं कांहीं निमित्तानें । मागीतलीं धनें भार्गवांसी ॥३॥
भूमीमाजी कोणी पुरूनी ठेविलें । कोणी दान केलें जाणूनियां ॥ ४ ॥
खणितां एकाचें गृह, धन लाभे । क्षत्रिय तैं क्रोधें तप्त होती ॥ ५ ॥
गर्भस्थहि भृगुवंश उच्छेदिला । स्त्रियाहि पळाल्या हिमाचलीं ॥ ६ ॥
ऊरूमाजी गर्भ लपविला कोणी । वृत्तांत भिऊनी कथिती स्त्रिया ॥७॥
क्रोधें अंगावरी येतां नष्ट दृष्टि । शरण ते येती विप्रस्त्रीतें[1] ॥ ८ ॥
म्हणती हे माते देई दृष्टिदान । तपोबल धन वासुदेवा ॥ ९ ॥

अध्याय १७९ वा

५०१

माता म्हणे नसे तुम्हावरी क्रोध । अथवा मी अंध नाहीं केलें ॥१ ॥
ऊरूमाजी गर्भ ठेविला भयानें । त्याचिया तेजानें दृष्टि गेली ॥ २ ॥
गर्भस्थ भृगूंचा नाश तुम्ही केला । तेणें क्रोध आला बालकासी॥३॥
'और्व' हा तुमचें करील रक्षण । क्षत्रिय शरण जाती त्यासी ॥४॥
संतुष्ट बालक देई तयां दृष्टि । 'और्व'नाम अंकीं जन्मयोगें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जनसंहारार्थ । करी उग्र तप बाळ झणीं ॥ ६ ॥

५०२

देव-मानवांसी संत्रस्त पाहूनी । पितर येऊनी भेटती त्या ॥ १ ॥
म्हणती उपेक्षा केली जाणूनियां । विटूनी आयुष्या त्यजिले देह॥२॥
निमित्त क्षत्रिय, इच्छा ते आमुची । प्रतिकारशक्ति असूनियां ॥ ३ ॥
लवही तो लोभ नव्हता धनाचा । न करी आमुचा नाश मृत्यु ॥४॥

---

१ भृगकुलांतील विप्रांस.

आत्महत्या निंद्य म्हणोनी उपाय । योजिला अपूर्व बाळा ऐसा ॥५॥
आंवरूनी क्रोधा संरक्षीं हे जन । वासुदेव मन हर्ष पावे ॥ ६ ॥

अध्याय १८० वा

५०३

पराशरालागीं बोलला वसिष्ठ । न सोडीचि हट्ट और्व परी ॥ १ ॥
निष्फळ हा क्रोध जाळील मजसी । तेंवी त्रिवर्गासी[1] नष्ट करी ॥२॥
सकारण क्रोध जाऊं नये वांयां । शिष्ट रक्षणींया योजावाची ॥ ३ ॥
आक्रोश मातांचा कानांत घुमतो । गर्भांमाजी होतों तया वेळीं ॥ ४ ॥
पितर म्हणती क्षत्रियांचा दोष । न बाधो जनांस व्यर्थ ऐसा ॥ ५ ॥
बाळ म्हणे नाहीं रक्षियेलें कोणी । सामर्थ्य असोनी मातांलागीं ॥६॥
काय सांगूं माता असहाय माझी । रक्षी ऊरूमाजी तदा मज ॥ ७ ॥
शासन न होतां पापी वळावती । रुचली हे नीति वासुदेवा ॥ ८ ॥

५०४

शक्तिवंत जेव्हां न करी नियमना । तोचि लिप्त जाणा पातकीं त्या ॥१॥
समर्थेही भ्याले जे जे जीवितार्थ । तयांच्या नाशार्थ सिद्ध झालों ॥ २ ॥
आज्ञा ही तुमची वंद्य मज असे । परी दोष लागे न शासितां ॥ ३ ॥
क्रोधाग्नि हा व्यर्थ न होतां जनांचें । हित जें साधे तें करा कांहीं ॥४॥
आपोमय जग जाणूनियां बाळा । क्रोध हा सोडावा जळामाजी ॥५॥
कारण नाशानें कार्यहि नासेल । प्रतिज्ञा होईल पूर्ण तुझी ॥ ६ ॥
तोचि वडवानळ जाळितो सागरा । शांत पराशरा करी मुनि ॥७॥
वासुदेव म्हणे और्वाचें हें वृत्त । सांगोनी वसिष्ठ बोध करी ॥ ८ ॥

अध्याय १८१ वा

५०५

ऐकोनियां ऐसा बोध । पराशर सांडी क्रोध ॥ १ ॥
परी राक्षससंहार । करी आरंभूनी सत्र ॥ २ ॥
पुढती मुनि बहू येती । दुःख होई पुलस्त्यासी ॥ ३ ॥

---

१ धर्म, अर्थ, काम

म्हणे पराशरा शम । हाचि ब्राह्मणांचा धर्म ॥ ४ ॥
शाप कारण शक्तीचा । शक्ति बंधूसह स्वर्गा ॥ ५ ॥
सुख भोगी हें जाणून । सत्र करावें हें पूर्ण ॥ ६ ॥
तेणें कल्याण होईल । रुचले सकलां हे बोल ॥ ७ ॥
दग्ध करी तोचि अग्नि । अद्यापीहि हिमवनीं– ॥ ८ ॥
अग्नि टाकिला ज्या ठाया । नवल वाटे वासुदेवा ॥ ९ ॥

अध्याय १८२ वा

५०६

गंधर्वासी म्हणे पार्थ कथीं वृत्त । कल्माषपादास पुत्र कैसा ॥ १ ॥
कारण कथावें नियोगाचें मज । गंधर्व तें सर्व कथितो ऐका ॥ २ ॥
राक्षस तो राजा काननीं हिंडतां । ब्राह्मण दांपत्या अवलोकी ॥ ३ ॥
विषयसुखीं तीं रंगलीं पाहोनी । विप्रासी ओढोनी नेई दैत्य ॥ ४ ॥
विप्रस्त्री विनवी परी तो न मानी । सहज शापवाणी वदनीं येई ॥५॥
'अकृतार्थैलागीं वैधव्य त्वां दिलें । भोगितांचि आलें समजें दुःख' ॥
शापमुक्त होतां राणी देई स्मृति । वसिष्ठमुनींसी विनवी राव ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विप्रस्त्रीवचना । स्मरूनी याचना सुपुत्राची ॥ ८ ॥

अध्याय १८३ वा

५०७

पार्थ म्हणे गंधर्वासी । सकल विप्रां तूं जाणिसी ॥ १ ॥
वेदवेत्ता पुरोहित । सांगें आम्हा अनुरूप ॥ २ ॥
म्हणे गंधर्व पार्थासी । विनवा जावोनी धौम्यासी ॥ ३ ॥
देवलाचा सान भ्राता । राही 'उत्कोचक' तीर्था ॥ ४ ॥
अग्निअस्त्र गंधर्वासी । अर्पी पार्थ त्या स्थळासी ॥ ५ ॥
अश्व अर्पितां गंधर्व । पार्थ म्हणे रक्षीं ठेव ॥ ६ ॥
ऐसें कथितां गंधर्व । करुनी मान्य गेला सर्व ॥ ७ ॥
पुरोहित झाले धौम्य । स्वयंवरा जाती मान्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे धर्म । देवासम मानी धौम्य ॥ ९ ॥

———०———

# स्वयंवरपर्व १२

## अध्याय १८४ वा

### ५०८

मातेसह वीर पांचाळमार्गासी । चालतां विप्रांसी बघती मार्गी ॥ १ ॥
वृत्त एकमेकां कथिलें परस्पर । समारंभ थोर म्हणती पाहूं ॥ २ ॥
कन्या सुकुमार द्रुपद राजाची । जन्मभू तियेची यज्ञभूमी ॥ ३ ॥
स्वयंवर तिचें मांडिलें रायानें । पवित्र महात्मे येती तेथें ॥ ४ ॥
राव राजपुत्र येतील अनेक । भक्ष्य भोज्यादिक लाभतील ॥ ५ ॥
अपार दक्षिणा वांटितील विप्रां । संतुष्ट सर्वत्रां करितील ॥ ६ ॥
वरीलहि तुम्हां विजयनियुक्त । संपादील वित्त मध्यम हा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विप्रांच्या सांगाती । पांडवहि जाती आनंदानें ॥ ८ ॥

## अध्याय १८५ वा

### ५०९

मार्गांत भेटले व्यास महामुनि । आशीर्वाद त्यांनीं दिधले बहु ॥ १ ॥
पांचालनगरामाजी ते पातले । नगर पाहिलें हिंडूनियां ॥ २ ॥
विप्रवेषें वास कुलालसदनीं । भिक्षान्न सेवोनी सुख तयां ॥ ३ ॥
अर्जुनचि व्हावा जामात ही इच्छा । म्हणूनी रायाचा पण घोर ॥ ४ ॥
वेगवान यंत्र अंतरिक्षामाजी । योजना लक्ष्याची तयापुढें ॥ ५ ॥
महादृढ धनु सूक्ष्मछिद्र यंत्रा । भेदील त्या वीरा कन्यालाभ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसा पण केला । राजपुत्र मेळा तयास्थानीं ॥ ७ ॥

### ५१०

पांचाळपुरीच्या ईशान्य दिशेसी । शोभा मंडपाची काय वर्णूं ॥ १ ॥
सभोंवार होते उत्तुंग प्रासाद । खंदक तैं तट सभोंवतीं ॥ २ ॥
तोरणालंकृत द्वारें मंडपाचीं । विचित्र छतांची शोभा बहु ॥ ३ ॥

मंगल वाद्यांचा सुमधुर नाद । अगरु सुगंध पसरला ॥ ४ ॥
चंदनोदकाचे सडे शिंपियेले । पुष्पमाला डोले जागोजागीं ॥ ५ ॥
शिखरें गगनीं सुवर्ण गवाक्षें । रत्नजडित ते भूमी जाणा ॥ ६ ॥
सुलभ सोपान हंसवर्ण त्यासी । शय्या आसनेंसी सुशोभित ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राजांचे नंदन । मंडपीं येऊन बसले वीर ॥ ८ ॥

## ५११

प्रतिदिनीं ऐसे वीर सभास्थानीं । वैसती येवोनी आनंदानें ॥ १ ॥
थोर थोर दानें अमूल्य रत्नांचीं । प्रतिदिनीं होती प्रेक्षणीय ॥ २ ॥
उगवतां ऐसा षोडश तो दिन । सुस्नात होऊन कन्या तदा- ॥ ३ ॥
सुवर्णाची माला घेऊनी करांत । पातली सभेंत तेजस्विनी ॥ ४ ॥
यथाविधि झालें पवित्र हवन । वाद्यनाद पूर्ण शांत झाला ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे निःशब्द तें स्थान । बोले धृष्टद्युम्न सभेमाजी ॥ ६ ॥

## ५१२

क्षत्रिय वीरांनो ऐका ऐका पण । ठेवियेले बाण चाप येथें ॥ १ ॥
अंतरिक्षामाजी यंत्र फिरे वेगें । पंच सूक्ष्म मार्गें बाण जावे ॥ २ ॥
वेधील जो लक्ष्य कुलरूपवंत । तयातें वरील भगिनी माझी ॥ ३ ॥
ऐसें बोलूनियां नांवें त्या वीरांचीं । सांगे भगिनीसी गुणांसह ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे स्वयंवरारंभ । जाहल तें स्तब्ध स्थान सर्व ॥ ५ ॥

## अध्याय १८६ वा

## ५१३

धृष्टद्युम्न म्हणे याज्ञसेनीलागीं । जमले अग्रभागीं राजपुत्र ॥ १ ॥
दुर्योधन, कर्ण, शकुनी, सौबल । तैसा बृहद्बल पातलासे ॥ २ ॥
भोज ते कांबोज राजपुत्र आले । यादव शोभले सकल पहा ॥ ३ ॥
शिशुपाल शूर कोसलाधिपती । तैसा सिंधुपती जयद्रथ ॥ ४ ॥
जरासंधादिक अनेक देशींचे । राव या स्थळातें प्राप्त झाले ॥ ५ ॥

लक्ष्याचा या वेध जो कोणी करील । तो तुज लाभेल वीर पति ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे स्वयंवर ऐसें । ऐका द्रौपदीचें आनंदानें ॥ ७ ॥

## अध्याय १८७ वा

### ५१४

याज्ञसेनी माझी, याज्ञसेनी माझी । होऊनियां राजी म्हणती सर्व ॥१॥
सर्व स्नेहभाव विसरूनि गेला । भास ज्याला त्याला मीचि श्रेष्ठ ॥ २ ॥
अंतरिक्षामाजी देवही पातले । गंधर्व ठाकले नभामाजी ॥ ३ ॥
बळिभद्र वृष्णि अंधक श्रीकृष्ण । योग्यतेसमान बसले तेथें ॥ ४ ॥
इतुक्यांत त्यांसी विप्रसमूहांत । गजेंद्र ते मत्त दिसले पांच ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पाहोनी सांवळा । दावी बळिरामाला पांडव ते ॥ ६ ॥

### ५१५

वीरामागें वीर चापापाशीं येती । पाहूनीच जाती कितीएक ॥ १ ॥
कितीएक झाले स्पर्शानेंचि थंड । कार्य अवघड म्हणती कोणी ॥ २ ॥
हालविलें कोणी तोंचि पडे खालीं । अशक्य जाणूनी फिरती मागें ॥३॥
अस्ताव्यस्त कोणी पडती होऊनी । राजपुत्र मनीं खिन्न होती ॥ ४ ॥
विद्युद्वेगें कर्ण पुढती पातला । क्षणीं धनुष्याला बाण जोडी ॥ ५ ॥
'वरणार नाहीं मी सूतपुत्रासी' । ऐसें कृष्णा तोंचि वदली क्रोधें ॥६॥
वासुदेव म्हणे लाजूनियां कर्ण । धनुष्य टाकून होई मागें ॥ ७ ॥

### ५१६

दमघोषाचा नंदन । शिशुपाल यमासम ॥ १ ॥
चाप उचलावया गेला । गुडघे टेंकून परतला ॥ २ ॥
जरासंध तो निश्चिल । तोंडघशीं पडला शल्य ॥ ३ ॥
मगधपती तो लाजून । गेला स्थान तें त्यागून ॥ ४ ॥
पाहूनियां तैशी स्थिति । भ्याले सकल भूपती ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । आणी विचार मनांत ॥ ६ ॥

## अध्याय १८८ वा

### ५१७

तालवृक्षासम वीर । उठला, पाहूनियां विप्र–॥ १ ॥
म्हणती नव्हे सोपें कर्म । आम्हा होईल लांछन ॥ २ ॥
कोणी म्हणती सर्व शक्य । विप्रसामर्थ्य अतर्क्य ॥ ३ ॥
इतुक्यामाजी पार्थवीर । येई धनुष्यासमोर ॥ ४ ॥
घालूनियां प्रदक्षिणा । वंदी शिवा आणि कृष्णा ॥ ५ ॥
क्षणीं चाप वांकवून । पांच बाण सोडी तीक्ष्ण ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । पण जिंकी तो क्षणांत ॥ ७ ॥

### ५१८

झाला जयजयकार जनीं । वाजे दुंदुभि गगनीं ॥ १ ॥
पुष्पवृष्टि पार्थावरी । विप्र तोषले अंतरीं ॥ २ ॥
फडकाविती निजवस्त्रें । वीर खेंचिताती शस्त्रें ॥ ३ ॥
इंद्रतुल्य कुंतीसुता । माळ घाली द्रुपदात्मजा ॥ ४ ॥
सर्वांसमक्ष चालला । मागें जाई नृपबाला ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वीर । म्हणती अवमान थोर ॥ ६ ॥

## अध्याय १८९ वा

### ५१९

स्वयंवरामाजी क्रुद्ध वीर सारे । म्हणती उठा रे क्षत्रियांनो ॥ १ ॥
विप्रालागीं कन्या अर्पितो हा नृप । नसे हें उचित क्षत्रियांसी ॥२॥
स्वयंवर नसे विहित विप्रांतें । लोटावें कन्येतें अग्नीमाजी ॥ ३ ॥
विप्र हा अवध्य शासन नृपासी । अवश्य आम्हासी करणें असे॥४॥
शस्त्रास्त्रें घेऊनी वीर रणीं ठेले । त्यांसी आड झाले भीम पार्थ ॥५ ॥
वृक्ष उपटूनी भीम झोडी नृपां । प्रत्यंचा ती चापा चढवी पार्थ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बळिरामा कृष्ण । म्हणे हा अर्जुन खचित वाटे ॥ ७॥

### ५२०

दादा भीम पार्थ न होती हे जरी । वासुदेव तरी म्हणूं नको ॥ १ ॥

कमलनयन सिंहगति कृश । नासिका ते उंच शुकासम ॥ २ ॥
बांधवांसमेत गेला जो निघून । जाण तोचि धर्म पुण्यशील ॥ ३ ॥
ऐकिलें मी पूर्वी पांडव जिवंत । गेले सुखरूप दाहांतूनी ॥ ४ ॥
बळिभद्र म्हणे सत्य तुझा तर्क । वासुदेव चित्त मोद पावे ॥ ५ ॥

## अध्याय १९० वा

### ५२१

प्रक्षुब्ध क्षत्रिय युद्धार्थ सज्जले । विप्र ते बोलले पार्थालागीं ॥ १ ॥
भिऊं नका आम्ही साह्य होऊं तुम्हां । पार्थ म्हणे रणा पहा सुखें ॥२॥
तेंचि चाप करीं घेऊनी सज्जला । भीम तया झाला साह्य वेगें ॥३॥
दुर्योधन शल्य करिती द्वंद्वयुद्ध । शस्त्रास्त्रेंसी सज्ज होई कर्ण ॥४॥
पाहतां पाहतां घोर युद्ध झालें । कर्णासी नावरे पार्थवीर ॥ ५ ॥
कर्ण म्हणे विप्रा शौर्य हें पाहून । संतोषलें मन नाम सांगें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कर्ण ब्रह्मबल । जाणूनी अचल शस्त्र ठेवी ॥ ७ ॥

### ५२२

महावीर शल्य पराभूत झाला । भीमें आपटिला भूमीवरी ॥ १ ॥
विप्रवीरांचा हा पाहूनी विक्रम । सकलहि जन चकित होती ॥ २ ॥
क्षत्रिय बोलती न करावें युद्ध । दोघेही तें स्तब्ध क्षणभरी ॥ ३ ॥
यदुनाथ म्हणे ओळखूनी वीरां । पण जिंकियेला शौर्यें येणें ॥ ४ ॥
भूपाल हो युध्द करूं नये ऐसें । वचन हरीचें रुचलें वीरां ॥ ५ ॥
जयजयकार थोर जाहला विप्रांचा । याज्ञसेनी त्यांच्या मागें जाई ॥६॥
वासुदेव म्हणे चिंता करी कुंती । विप्रांसह येती सदनीं तोंचि ॥७॥

## अध्याय १९१ वा

### ५२३

आणियेली भिक्षा म्हणती मातेसी । कुलालशाळेसी येवोनीयां ॥१॥
पाठमोरी कुंती म्हणे घ्या वांटूनी । पाहतांचि मनीं खेद पावे ॥ २ ॥
युधिष्ठिरालागीं वृत्तांत कथिला । म्हणे कैसें बाळा वचन सत्य ॥३॥
चिंतन करूनी धर्म म्हणे पार्था । स्वीकार कृष्णेचा करीं सुखें ॥ ४ ॥

पार्थ म्हणे नको आज्ञा करूं ऐसी। अर्पितों तुजसी वधूलागीं ॥ ५ ॥
युधिष्ठिर व्यासवचन आठवी। म्हणे ही लाभावी वधू सर्वां ॥ ६ ॥
इतुक्यांत कृष्ण–बळिराम येती। वासुदेव वंदी चरण त्यांचे ॥ ७ ॥

५२४

युधिष्ठिरालागीं वंदिती ते दोघे। तैसेंचि कुंतीतें प्रेमभावें ॥ १ ॥
धर्म म्हणे आम्ही गुप्तवेषधारी। कळलें कैसें तरी तुजलागीं ॥ २ ॥
कृष्ण म्हणे अग्नि लपवितां न लपे। तुम्हाविण ऐसे बळी कोण ॥३॥
समाधान बहु पाहोनी तुम्हासी। होवो अभिवृध्दि सर्वकाळ ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे श्रीकृष्ण सांवळा। गुप्तपणें गेला बंधूसह ॥ ५ ॥

अध्याय १९२ वा

५२५

गुप्तरूपें धृष्टद्युम्न। राही त्या स्थळीं येऊन ॥ १ ॥
धर्मापुढें भिक्षाझोळी। ठेविताती सायंकाळीं ॥ २ ॥
कुंती म्हणे याज्ञसेनी। बळी ठेवीं ग काढूनी ॥ ३ ॥
भिक्षा घालींवो विप्रांसी। तैसे येती जे अन्नार्थी ॥ ४ ॥
उरलियाचे भाग दोन। पुढती सहा एकांतून ॥ ५ ॥
एक अर्पावा भीमासी। उरले भाग दे सकलांसी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धाले। अन्न सेवूनी त्या वेळे ॥ ७ ॥

५२६

भूमीवरी दर्भ पसरी सहदेव। आजिनें त्यांवर अंथरिलीं ॥ १ ॥
शिर दक्षिणेसी करूनी झोंपती। उशाकडे कुंती चरणीं कांता ॥ २ ॥
शस्त्रास्त्रांच्या कथा ऐके धृष्टद्युम्न। भेटला येऊन द्रुपदासी ॥ ३ ॥
पिता म्हणे बाळा कृष्णा कोणी नेली। नाहीं कीं जिंकिली हीनें कोणी॥४
हर्षित दिससी सुपुत्र तूं माझा। संशय पार्थाचा येई मज ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कथिती सद्गुण। ज्ञात्यालागीं नाम सहज लोकीं ॥६॥

——०——

# वैवाहिकपर्व १३

## अध्याय १९३ वा

### ५२७

धृष्टद्युम्न म्हणे ताता ऐक मात । मागोमाग गुप्तरूपें गेलों ॥ १ ॥
कुलालसदनीं उतरले वीर । वृत्तांत सकळ ऐकवीला ॥ २ ॥
लाक्षागृहांतूनी कुरुकुलवीर । वांचले सर्वत्र ऐसी भाषा ॥ ३ ॥
पुरोहितालागीं ऐकूनी तें वृत्त । कुलालगृहांत धाडियेलें ॥ ४ ॥
येऊ येऊनियां म्हणे ज्ञाति कुळ । सांगावें सकळ आम्हालागीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पांडूचा तो मित्र । द्रुपदराजेंद्र विप्र सांगे ॥ ६ ॥

### ५२८

द्रुपदाची कन्या स्नुषा ते पांडूची । व्हावी इच्छा ऐसी राव करी ॥१॥
महापुण्य जरी वरी पार्थवीर । नृपाळ विचार करीतसे ॥ २ ॥
पुरोहितालागीं वंदूनी बोलती । शंकालव चित्तीं धरूं नये ॥ ३ ॥
असामान्य यश शूराविणें कोणा । लाभेल हें आणा मनामाजी ॥ ४ ॥
इतुक्यांत एक ' अधिकारी ' आला । भोजनार्थ चला विनवी ऐसें॥५
वासुदेव म्हणे थोरहि संकटीं । दुर्जन त्यां होती वैरी यदा ॥ ६ ॥

## अध्याय १९४ वा

### ५२९

कुंती आणि याज्ञसेनी । बसल्या एकाचि स्यंदनीं ॥ १ ॥
भिन्न भिन्न रथीं वीर । बसुनी चालले सत्वर ॥ २ ॥
येतां द्रुपदसदना । परीक्षेची तैं योजना ॥ ३ ॥
त्रिविध वस्तुप्रदर्शन । रम्य मांडियेलें जाण ॥ ४ ॥
यज्ञपात्रें, धेनु, शस्त्रें । विविध शिल्पाचीं हत्यारें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे याचा । हेतु, कळावी योग्यता ॥ ६ ॥

### ५३०

वैभव पाहूनी विस्मित न होती । राव अवलोकी आनंदानें ॥ १ ॥

उत्तरीयासम अजिनें अंगावरी। तेजस्वी शरीरी वीर पांच ॥ २ ॥
भोजन करिती सुवर्णाच्या ताटीं। तांबूल भक्षिती सुवासिक ॥ ३ ॥
पदार्थसंग्रह पाहूनी तोषले। चित्त गुंग झालें शस्त्रांमाजी ॥ ४ ॥
निश्चयें हे वीर मानी तैं नृपाळ। कुंतीचे 'हे बाळ' तर्क ऐसा ॥५॥
वासुदेव म्हणे आवड मनींची। योग्यता नराची सिध्द करी ॥ ६ ॥

अध्याय १९५ वा

५३१

सन्मान तयांचा करूनी नरेंद्र। क्षत्रिय कीं विप्र सांगा म्हणे ॥ १ ॥
सत्य कथूनियां जोडावें पुण्यासी। प्रेमें संदेहासी दूर करा ॥ २ ॥
कन्येचा विवाह व्हावा ऐसी इच्छा। हेतु हा मनींचा पूर्ण करा ॥ ३ ॥
युधिष्ठिर म्हणे आम्ही पांडूसुत। संदेह मनांत धरूं नका ॥ ४ ॥
जलाशयांतूनी सरोवरीं जैसी। कमलिनी तैसी कन्या जाण ॥ ५ ॥
क्षत्रियांची कन्या क्षत्रियांसी देतां। खेद न सर्वथा होवो तुज ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विनवी युधिष्ठिर। पांडूसम धीर तूंचि आम्हां ॥ ७ ॥

५३२

ऐकूनियां धर्मवाणी। हर्ष न समावे गगनीं ॥ १ ॥
द्रुपद झाला सद्गदित। पुशिला सकल वृत्तांत ॥ २ ॥
मातेसह बांधवांसी। नेलें निजभवनामाजी ॥ ३ ॥
राव म्हणे युधिष्ठिरा। हेतु होवो माझा पुरा ॥ ४ ॥
धर्म म्हणे या कन्येसी। अर्पी आम्हा सकलांसी ॥ ५ ॥
राव म्हणे अवैदिक। कर्म घडेल हा धाक ॥ ६ ॥
करूं उद्यांक विचार। धर्म म्हणे गहन शास्त्र ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे व्यास। सहज येती त्या स्थळास ॥ ८ ॥

अध्याय १९६ वा

५३३

मुनीलागीं सन्मानूनी। बैसविलें उच्चस्थानीं ॥ १ ॥
द्रुपद प्रश्न करी तयां। म्हणे द्यावें जी निर्णया ॥ २ ॥

पुत्रांसह न रुचे मज । धर्म न कळे हा गूढ ॥ ३ ॥
सप्तऋषींची ते भार्या । 'जटिला' धर्म म्हणे आर्या ॥ ४ ॥
दश भ्राते प्रचेतस । 'वार्क्षी' कांता तयां एक ॥ ५ ॥
मातृवचन प्रमाण । कुंती देई अनुमोदन ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे व्यास । नेती एकांतीं रायास ॥ ७ ॥

अध्याय १९७–१९८ वा

५३४

द्वैपायनमुनि रायासी सांगती । सत्र आरंभिती देव मोठें ॥ १ ॥
नैमिषारण्यांत वैवस्वत यम । क्षत्रियांचें कर्म करीतसे ॥ २ ॥
दीक्षाबद्ध होतां मृत्यु न ये कोणा । अमरत्व जनां सहज तेणें ॥ ३ ॥
प्रजापतीलागीं देव ते शरण । सत्रोत्तर यम वधिल म्हणे ॥ ४ ॥
सत्रामाजी आले देव तें ऐकोनी । बैसले स्वस्थानीं स्वस्थचित्त ॥५॥
गंगाजळीं दिसे सुवर्णकमल । विस्मित सकळ होती तेव्हां ॥ ६ ॥
शूर इंद्र तदा जाई शोधास्तव । म्हणे वासुदेव गंगोत्रीसी ॥ ७ ॥

५३५

अग्निज्वालेसम देखिली रमणी । अश्रु नेत्रांतूनी वाहताती ॥ १ ॥
बिंदुबिंदूचें त्या सुवर्णकमळ । पाहोनी नवल इंद्रालागीं ॥ २ ॥
सन्निध जावोनी कारण विचारी । म्हणे ती सुंदरी येई मागें ॥ ३ ॥
पर्वतशिखरीं चढोनियां गेली । इंद्रहि त्या स्थळीं जाई सुखें ॥ ४ ॥
पुढती देखिला सिंहासनीं एक । खेळतो युवक सारीपाट ॥ ५ ॥
खेळांतचि गुंग पाहूनी तयासी । इंद्र म्हणे त्यासी कां रे मत्त ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वज्र उगारितां । हास्य त्या युवका सहज येई ॥ ७ ॥

५३६

युवक तो रुद्र कौतुकानें पाही । हालचाल राही देवेंद्राची ॥ १ ॥
ऐशास्थितीमाजी देवेंद्र तो उभा । संपे अक्षक्रीडा शंकराची ॥ २ ॥
रुदन जी करी तया भगिनीसी । रुद्र म्हणे त्यासी जवळी आणीं ॥३॥

न करील दर्प कदाकाळीं ऐसा । करीन व्यवस्था तयाची ते ॥ ४ ॥
ऐकूनी ते वाणी स्पर्श तिनें केला । तत्काळ पडला इंद्र खालीं ॥ ५ ॥
रुद्र म्हणे इंद्रा दर्प करूं नये । गुहेमाजी पाहें ऐसे चार ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे इंद्र गुहाद्वार । उघडितां वीर दुःखी पाहे ॥ ७ ॥

५३७

शिव म्हणे इंद्रालागीं । त्वरित जाई गुहेमाजी ॥ १ ॥
इंद्र जोडोनियां कर । म्हणे तूंचि सर्वाधार ॥ २ ॥
शिव म्हणे उन्मत्तांसी । कृपा न लाभेचि माझी ॥ ३ ॥
जावें मनुष्य योनींत । कर्मैं करा असंख्यात ॥ ४ ॥
पुढती इंद्रलोकीं यावें । सर्व बोलती विनयें ॥ ५ ॥
देवा यमादिक आम्हा । शोभोत ते पितृस्थाना ॥ ६ ॥
तथास्तु त्या म्हणे शिव । वृत्त सांगे वासुदेव ॥ ७ ॥

५३८

प्रथम 'विश्वभुक्' दुजा 'भूतधामा' । शिवि शांति जाणा इंद्रही तो ॥१॥
दिव्य स्त्री तयांची कांता ते योजिली । अनुमती दिली नारायणें ॥ २ ॥
शुक्ल कृष्ण केश अंश ते विष्णूचे । बलराम कृष्णाचें रूप घेती ॥ ३ ॥
रोहिणी देवकी तयांच्या त्या माता । वर्णहि सुतांचा शुक्ल कृष्ण ॥ ४ ॥
इंद्र ते पूर्वीचे पांडव जाहले । रूप स्त्रीसी आलें द्रौपदीचें ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे व्यास द्रुपदासी । देती दिव्य दृष्टि तया वेळीं ॥ ६ ॥

५३९

पूर्वरूपें पांडवांची । मुनि दाविती नृपासी ॥ १ ॥
विप्रकन्येची ते कथा । वरहि कथिला शिवाचा ॥ २ ॥
हरली द्रुपदाची चिंता । अर्पी वीरांसी दुहिता ॥ ३ ॥
पाहूनियां मंगल दिन । करी द्रौपदीचें दान ॥ ४ ॥
पंच दिन तो विवाह । लाभे प्रतिदिनि कौमार्य ॥ ५ ॥
राव अर्पी बहु धन । अश्व गज ते स्यंदन ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वास । पुढती राजसदनांत ॥ ७ ॥

---

१ आदिपर्व १६९ अध्यायांतील कथा पहा.

अध्याय १९९ वा

५४०

द्रुपदाच्या स्त्रिया वंदिती कुंतीसी । कथिती तियेसी निज नामें ॥१॥
दिव्य महावस्त्र केलें परिधान । स्नुषा ते वंदून हात जोडी ॥ २ ॥
प्रेमभरें देई आशीर्वाद कुंती । इंद्रा जैसी शची तैसी होईं ॥ ३ ॥
स्वाहा ते अग्नीसी नळा दमयंती । लक्ष्मी शोभे जैसी नारायणा ॥४॥
तैसी पतींसी तूं प्रिय हो सर्वदा । दीर्घजीवी सुतां जन्म देईं ॥ ५ ॥
यज्ञपत्नी होईं अर्पी महादानें । अहेर श्रीकृष्णें केला बहु ॥ ६ ॥
वस्त्रें रत्नपात्रें दासी गज रथ । अपार तें वित्त अर्पीयेलें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कृष्णसंतोषार्थ । स्वीकारिती वित्त पांडव तें ॥ ८ ॥

---

## विदुरागमन—राज्यलंभपर्व १४

अध्याय २०० वा

५४१

हेरद्वारें वृत्त कळे सकळ नृपां । दैवाची हे कृपा म्हणती सर्व ॥१॥
दुःशासन म्हणे यत्न मानवांचे । व्यर्थ दैवापुढें वाटे मज ॥ २ ॥
अवघे नृपाळ कौरवां निंदिती । स्वगृहासी जाती आनंदानें ॥ ३ ॥
धृतराष्ट्रालागीं वृत्त कथी क्षत्ता । तयाचिया चित्ता मोद वाटे ॥४॥
धन्यवाद देई ऐकूनी विदुर । म्हणे बुद्धि स्थिर राहो ऐसी ॥ ५ ॥
शत्रूच्या नाशाचा उपाय शोधावा । भय वासुदेवा वाटतसे ॥ ६ ॥

अध्याय २०१ वा

५४२

धृतराष्ट्र म्हणे काय करूं बाळा । सांगावा मजला मार्ग कांहीं ॥ १ ॥
दुर्योधन म्हणे ताता हेरमार्गें । भेद या क्षणातें तारी आम्हां ॥ २ ॥
जामात द्रुपद बंधु परस्पर । पतिपत्नि दूर भेदें करूं ॥ ३ ॥

विक्रम करोनी तेथेंचि रहावें । ऐसें त्यां कथावें हेरमार्गें ॥ ४ ॥
वृकोदरालागीं वधावें युक्तीनें । दुर्बल त्या गुणें पार्थ होती ॥ ५ ॥
सदनांत येतां मारूं उर्वरितां । मोहितील चित्ता रम्य स्त्रिया ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धृतराष्ट्रालागीं । दुर्योधन ऐसी युक्ति सांगे ॥ ७ ॥

अध्याय २०२ रा

५४३

कर्ण म्हणे दुर्योधना । मार्ग माझा आणीं मना ॥ १ ॥
असतां सन्निध जें तुज । असाध्य तें कैसें आज– ॥ २ ॥
साध्य मानिसी नृपाळा । व्यर्थ जाण त्या भेदाला ॥ ३ ॥
दंडावीण मार्ग नाहीं । युद्धालागीं सिद्ध होई ॥ ४ ॥
धृतराष्ट्र म्हणे कर्णा । सत्य वदसी बुद्धिवाना ॥ ५ ॥
पाचारूनी भीष्मादिकां । मंत्र ऐकूनी घ्या त्यांचा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे मंद । स्वार्थामाजी होई धुंद ॥ ७ ॥

अध्याय २०३ रा

५४४

कर्णाचें वचन भीष्मासी कथितां । खेद होई चित्ता गांगेयाच्या ॥ १ ॥
म्हणे कुंती तैसी गांधारी आम्हासी । युद्ध हें चित्तासी मान्य नसे ॥२॥
वत्सा दुर्योधना राज्य पांडवांचें । ऐसें कां तयांतें वाटू नये ॥ ३ ॥
अर्धराज्य त्यांसी द्यावें संतोषानें । कीर्ति हित तेणें वाढवाल ॥ ४ ॥
कीर्ति हेंचि वल वत्सा ध्यानीं आणी । कीर्ति तोचि जनीं सफल जन्म ।
लाक्षागृह वृत्त घोर तें ऐकून । मुखावलोकन करवेचि ना ॥ ६ ॥
स्वधर्म, मत्प्रिय, स्वहिता जाणूनी । अर्धराज्य धनि त्यांसी करीं ॥७॥
वासुदेव म्हणे सत्य आणि बळ । विजयी ठरेल परिणामी ॥ ८ ॥

अध्याय २०४ था

५४५

द्रोण म्हणे धृतराष्ट्रा । ऐकें बोध हा उदारा ॥ १ ॥
परम सत्य भीष्मवाणी । स्वहित साधीं तें ऐकोनी ॥ २ ॥

द्रुपदाचें अभिनंदन । करुनी पांडवां दे धन ॥ ३ ॥
सत्कारूनी द्रौपदीसी । अर्धराज्य दे धर्मासी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे द्रोण–। वचनें क्रुद्ध होई कर्ण ॥ ५ ॥

५४६

कर्ण म्हणे राया सन्मान तूं यांचा । केलासी तयाचा लाभ हाची ॥१॥
अनहित तेंचि हित भासविती । प्रच्छन्न तयांसी शत्रू लेखा ॥ २ ॥
उत्कर्षापकर्ष दैवाधीन लोकीं । सुखदुःखप्राप्ति अटळ सर्वां ॥ ३ ॥
'अंबुवीच' नामें होता मगधराज । एक श्वासमात्र अंगहीन ॥ ४ ॥
' महाकर्णि ' त्याचा अमात्य लोभानें । राज्य महायत्नें मिळवूं पाहे ।५।
परी दैवयोगें झाला पराभूत । स्वहित मनांत चिंती राया ॥ ६ ॥
द्रोण म्हणे क्रोधें कर्णा ध्यानीं धरीं । विनाश सत्वरी बोधें तुझ्या ॥७॥
वासुदेव म्हणे बोधें मतिमंद । होई बहु क्रुद्ध नियम जनीं ॥ ८ ॥

अध्याय २०५ वा

५४७

विदुर म्हणे भीष्म–द्रोण । दाशरथी रामासम ॥ १ ॥
त्यांचें वचन तें हित । पांडवांसी समजें सुत ॥ २ ॥
दुष्ट आशय मनींचा । प्रगट करितील तुझा ॥ ३ ॥
हित मंत्र्यांसी न कळे । अजिंक्य ते पांडव बळें ॥ ४ ॥
कृष्ण द्रुपद त्यां साह्य । धर्माचरणें अभय ॥ ५ ॥
मूर्ख दुर्बुद्धि हे भ्रष्ट । कर्ण शकुनी सुत ज्येष्ठ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कथी । विदुर धृतराष्ट्रा मति ॥ ७ ॥

अध्याय २०६ वा

५४८

धृतराष्ट्र म्हणे विदुरासी तदा । ऐकूनियां बोधा मोद वाटे ॥ १ ॥
जावोनी त्वरित पांडवांसी आणीं । प्रेमें सन्मानूनी नगरामाजी ॥ २ ॥
ऐकोनी विदुर आनंदें निघाला । भेटे द्रुपदाला जावूनियां ॥ ३ ॥

कुशल पुसोनी म्हणे पांडवांसी । हस्तिनापुरासी पाठवावें ॥ ४ ॥
कौरवांसी हर्ष वृत्तांत ऐकोनी । जनताहि मनीं तोष पावे ॥ ५ ॥
भार्येसह यावें मजसमवेत । अनुज्ञा दे, दूत पुढती जाती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अमोलिक धन । अहेर करून विदुर सुखी ॥ ७ ॥

अध्याय २०७ वा

५४९

विदुरवचनें द्रुपदासी तोष । म्हणे पांडवांस नेई सुखें ॥ १ ॥
श्रीकृष्ण तयांसी देई अनुमोदन । निश्चय करून नगरीं जाती ॥ २ ॥
गजपुर तेव्हां हर्षाकुल झालें । भेटीलागीं आले सकळ लोक ॥ ३ ॥
सकळहि पुण्य अर्पिती वीरांसी । म्हणती शतायुषि होवोत हे ॥ ४ ॥
धृतराष्ट्र-भीष्मा वंदूनी आदरें । मंगलमंदिरें शोभविलीं ॥ ५ ॥
पाचारूनी म्हणे धृतराष्ट्र राव । तेंचि वासुदेव कथितो आतां ॥ ६ ॥

५५०

खांडवप्रस्थासी रहावें जाऊन । वैरानवारण तेणें होई ॥ १ ॥
अर्धराज्य तुम्ही भोगा आनंदानें । पार्थसंरक्षणें निर्भय व्हा ॥ २ ॥
नृपाचें वचन आदरें मानिती । खांडवप्रस्थासी जाती सुखें ॥ ३ ॥
ओसाड प्रदेश स्वर्गासम केला । आनंद जाहला सकल जनां ॥ ४ ॥
शतघ्नि नलिका बहु पुरद्वारीं । जैसे नाग पुरीं राहियेले ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे गुणवंत जन । सद्गुण पाहून धांव घेती ॥ ६ ॥

५५१

अपूर्व ते नगरकांती । रम्य उद्यानें भोंवतीं ॥ १ ॥
आम्र कदंब फणस । वकुल चंपक पारिजात ॥ २ ॥
ताल तमाल केतकी । वृक्षलता त्या शोभती ॥ ३ ॥
मधुर गाती पक्षीगण । करिती कोकिळा कूजन ॥ ४ ॥
मत्त मयूरांच्या केका । तोष देती सर्व लोकां ॥ ५ ॥

ऐशा अपूर्व त्या स्थानीं । पांडव राहिले येऊनी ॥ ६ ॥
भेटूनियां जाई कृष्ण । तुष्ट वासुदेव मन ॥ ७ ॥

अध्याय २०८ वा

५५२

जनमेजय म्हणे तपोधना सांग । पूर्वजांनीं मार्ग क्रमिला कैसा ॥ १ ॥
धर्मपत्नी एक पांचांची असोनी । प्रेमभाव मनीं कैसा राहे ॥ २ ॥
मुनि म्हणे वीर जिंकूनी अरीला । त्या इंद्रप्रस्थाला राहियेले ॥ ३ ॥
एक्या दिनीं येती नारद त्या स्थानीं । आदरें सन्मानी धर्म तयां ॥४॥
नववधूसी ते आशीर्वाद देती । तिजसी धाडिती अंतःपुरीं ॥ ५ ॥
पुढती धर्मासी बोलले नारद । सुंद उपसुंद वीर भ्राते ॥ ६ ॥
तिलोत्तमेसाठीं कलह करिती । अंतीं नष्ट होती ध्यानीं आणा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दैत्यांचा वृत्तांत । कथिती नारद तोचि ऐका ॥ ८ ॥

अध्याय २०९ वा

५५३

सुंद उपसुंद निकुंभाचे सुत । दोघे सहमत कशिपुंवंशीं[1] ॥ १ ॥
जिंकावें त्रैलोक्या धरूनी हे इच्छा । विंध्यवनीं तपा आरंभिती ॥२॥
चरणांगुष्ठावरी राहूनियां उभे । खडतर दोघे करिती तप ॥ ३ ॥
भयभीत देव माया ते निर्मिती । आप्तजन जाती पळूनियां ॥ ४ ॥
भगिनीमातांचा आक्रोश ऐकोनी । लवही न मनीं चलित होती ॥५॥
पाहोनी तें धैर्य ब्रह्मा प्रगटला । अमरत्व त्याला मागती ते ॥ ६ ॥
ब्रह्मा म्हणे व्हाल अजिंक्य या जनीं । अमरत्व मनीं आणूं नका ॥७॥
परस्परांवीण भय नसो आम्हां । म्हणतां त्यांसी ब्रह्मा होय म्हणे ॥८॥
वासुदेव म्हणे दीर्घकाल सुखें । जातां भान नसे पुढती तयां ॥ ९ ॥

अध्याय २१० वा

५५४

त्रिभुवन जिंकूं ऐसी मनीं इच्छा । धरूनी नरेशा[2] सिद्ध होती ॥ १ ॥

१ हिरण्यकशिपु. २ जनमेजय.

जिंकूनी देवांसी पाताळांत गेले । नागांसी जिंकीलें सहजपणें ॥ २ ॥
सागरीं निवास नित्य त्या म्लेच्छांसी। जिंकूनी मुनींसी पीडा देती ॥
यज्ञयाग सर्व विध्वंसित केले । शाप व्यर्थ झाले ब्राह्मणांचे ॥ ४ ॥
व्याघ्रसिंहरूपें 'अदृश्य मुनींसी'। दैत्य पीडा देती दुष्टभावें ॥ ५ ॥
वर्ण–आश्रमांचा नाश सर्व झाला । हाहाःकार केला ब्रह्मवरें ॥ ६ ॥
विवाहादि कार्यें सकळ बुडालीं । गोसेवा संपली भूलोकींची ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दैत्य कुरुक्षेत्रीं । निवास करिती आनंदानें ॥ ८ ॥

अध्याय २११ वा

५५५

ऋषिमुनि सर्व ब्रह्मलोकीं गेले । वृत्त निवेदिलें चतुरानना ॥ १ ॥
ऐकूनियां ब्रह्मा चिंती क्षणभरी । मग आज्ञा करी विश्वकर्म्या ॥ २ ॥
तिळ तिळ अंश रत्नांचा घेऊनी । निर्मियेली जनीं 'तिलोत्तमा' ॥ ३ ॥
ब्रह्मा म्हणे लावीं कलह दैत्यांसी । आज्ञा सुंदरीसी मान्य होई ॥ ४ ॥
चतुर्मुख झाला पाहूनी शंकर । नयन सहस्र इंद्रालागीं ॥ ५ ॥
जाई त्या दिशेतें पहावया ऐसे । उपाय दोघांचे अघटित ॥ ६ ॥
पाहूनी सौंदर्य म्हणती कार्य झालें । आश्चर्य वाटलें वासुदेवा ॥ ७ ॥

अध्याय २१२ वा

५५६

अजिंक्य ते दैत्य विंध्याचलावरी। स्वैर क्रीडाचारी हिंडताती ॥ १ ॥
स्त्रियांसह दोघे एका शिलातलीं । बैसतां ते आली तिलोत्तमा ॥ २ ॥
रक्तवर्ण वस्त्र परिधान केलें । नदीतीरीं फुलें वेंचीतसे ॥ ३ ॥
कामविव्हल ते उठले पाहूनी । धरिले जावोनी कर तिचे ॥ ४ ॥
सव्य उपसुंदें दक्षिण सुंदानें । धरूनी क्रोधानें बोलती ते ॥ ५ ॥
सुरामत्त सुंद म्हणे तुझी माता । उपसुंद स्नुषा म्हणे तुझी ॥ ६ ॥
तुझी नव्हे माझी, माझीच हे कांता । बोलोनियां गदा करीं घेती ॥ ७ ॥
परस्पराघातें पंचत्वा पावले । दैत्य ते पळाले प्रकंपित ॥ ८ ॥
तिलोत्तमेलागीं ब्रह्मा वर देई । वासुदेव पाईं नत त्याच्या ॥ ९ ॥

जिंकूनी देवांसी पाताळांत गेले । नागांसी जिंकीलें सहजपणें ॥ २ ॥
सागरीं निवास नित्य त्या म्लेच्छांसी । जिंकूनी मुनींसी पीडा देती ॥
यज्ञयाग सर्व विध्वंसित केले । शाप व्यर्थ झाले ब्राह्मणांचे ॥ ४ ॥
व्याघ्रसिंहरूपें ‘ अदृश्य मुनींसी ’ । दैत्य पीडा देती दुष्टभावें ॥ ५ ॥
वर्ण–आश्रमांचा नाश सर्व झाला । हाहाःकार केला ब्रह्मवरें ॥ ६ ॥
विवाहादि कार्यें सकळ बुडालीं । गोसेवा संपली भूलोकींची ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दैत्य कुरुक्षेत्रीं । निवास करिती आनंदानें ॥ ८ ॥

अध्याय २११ वा

५५५

ऋषिमुनि सर्व ब्रह्मलोकीं गेले । वृत्त निवेदिलें चतुरानना ॥ १ ॥
ऐकूनियां ब्रह्मा चिंती क्षणभरी । मग आज्ञा करी विश्वकर्म्या ॥ २ ॥
तिळ तिळ अंश रत्नांचा घेऊनी । निर्मियेली जनीं ‘ तिलोत्तमा ’ ॥ ३ ॥
ब्रह्मा म्हणे लावीं कलह दैत्यांसी । आज्ञा सुंदरीसी मान्य होई ॥ ४ ॥
चतुर्मुख झाला पाहूनी शंकर । नयन सहस्र इंद्रालागीं ॥ ५ ॥
जाई त्या दिशेतें पहावया ऐसे । उपाय दोघांचे अघटित ॥ ६ ॥
पाहूनी सौंदर्य म्हणती कार्य झालें । आश्चर्य वाटलें वासुदेवा ॥ ७ ॥

अध्याय २१२ वा

५५६

अजिंक्य ते दैत्य विंध्याचलावरी । स्वैर क्रीडाचारी हिंडताती ॥ १ ॥
स्त्रियांसह दोघे एका शिलातळीं । बैसतां ते आली तिलोत्तमा ॥ २ ॥
रक्तवर्ण वस्त्र परिधान केलें । नदीतीरीं फुलें वेंचीतसे ॥ ३ ॥
कामविव्हल ते उठले पाहूनी । धरिले जावोनी कर तिचे ॥ ४ ॥
सव्य उपसुंदें दक्षिण सुंदानें । धरूनी क्रोधानें बोलती ते ॥ ५ ॥
सुरामत्त सुंद म्हणे तुझी माता । उपसुंद स्नुषा म्हणे तुझी ॥ ६ ॥
तुझी नव्हे माझी, माझीच हे कांता । बोलोनियां गदा करीं घेती ॥ ७ ॥
परस्पराघातें पंचत्वा पावले । दैत्य ते पळाले प्रकंपित ॥ ८ ॥
तिलोत्तमेलागीं ब्रह्मा वर देई । वासुदेव पाईं नत त्याच्या ॥ ९ ॥

५५७

ब्रह्मसुत म्हणे पांडव हो ऐसा । नाश बांधवांचा होऊं नये ॥ १ ॥
जेणें मार्गें जातां होईल कल्याण । बोध हा जाणून करा कांहीं ॥ २ ॥
नारदवचनें नियम तो केला । नियोजित काळ विभागिती ॥ ३ ॥
याज्ञसेनीसवें एकांतीं एकानें । बैसतां अन्यानें जाऊं नये ॥ ४ ॥
जाईल जो तेणें द्वादशाब्दें वनीं । व्रतस्थ होऊनी कंठावीं कीं ॥ ५ ॥
संतुष्ट नारद स्वस्थानासी जाती । वासुदव चित्तीं संतोषला ॥ ६ ॥

---

## अर्जुनवनवासपर्व १५

अध्याय २१३ वा

५५८

परस्पर प्रेम थोर । होई राज्याचा विस्तार ॥ १ ॥
कुरुदेश होई सुखी । ऐसे बहुत दिन जाती ॥ २ ॥
पुढती कोणी एक विप्र । धेनुहरणें होई त्रस्त ॥ ३ ॥
आला खांडवप्रस्थासी । मागे अभय धर्मासी ॥ ४ ॥
ऐकोनियां तो आक्रोश । भिऊं नको म्हणे पार्थ ॥ ५ ॥
गेला आयुधें आणाया । धर्म-कृष्णा एका ठाया ॥ ६ ॥
चिंतूनियां मनामाजी । पार्थ वनवासा राजी ॥ ७ ॥
म्हणे लौकिक राजाचा । तेणें उत्कर्ष आमुचा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । राजआज्ञेनें कृतार्थ ॥ ९ ॥

५५९

रथारूढ धनुर्धर । येतां पळाले तस्कर ॥ १ ॥
धेनु विप्रासी लाभतां । मोद वाटे त्याच्या चित्ता ॥ २ ॥
सत्यप्रिय तो अर्जुन । सिद्ध सेवावया वन ॥ ३ ॥

---

१ द्रौपदी प्रत्येकाची दोन महिने व बारा दिवस याप्रमाणें कांता व्हावी. अ. भा. २४

दुःखी धर्म म्हणे त्यासी । पार्था दोष न तुजसी ॥ ४ ॥
ज्येष्ठ भ्रात्याच्या एकांतीं । दोष नसे कनिष्ठांसी ॥ ५ ॥
पार्थ म्हणे प्रतारणा । कदा चित्तासी रुचेना ॥ ६ ॥
घेऊनियां आज्ञा जाई । वासुदेव नत पाई ॥ ७ ॥

अध्याय २१४ वा

५६०

कथेकरी पौराणिक । जाती पार्थासमवेत ॥ १ ॥
गंगाद्वारीं वास केला । एक्यादिनीं अर्जुनाला ॥ २ ॥
जळीं ओढी नागसुता । दिसतां अग्नि तळीं पार्था ॥ ३ ॥
प्रेमें अग्निकार्य करी । हेतु कन्येसी विचारी ॥ ४ ॥
कौरव्याची उलुपी कन्या । म्हणे होईन अंगना ॥ ५ ॥
पार्थ म्हणे ब्रह्मचर्य । पण माझा अनिवार ॥ ६ ॥
उलुपी म्हणे द्रौपदीसी । नसो संबंध तुजसी ॥ ७ ॥
हाचि हेतु त्या व्रताचा । प्राण संरक्षीं तूं माझा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे कन्या । विनवी पार्थासी अनन्या ॥ ९ ॥

५६१

अनुरक्तेचा तो स्वीकार उचित । सज्जनांचें मत ध्यानीं आणी ॥ १ ॥
दीन अनाथांचें रक्षण करिसी । शरण तुजसी विव्हल मी ॥ २ ॥
उलूपीचा हेतु पार्थें पुरविला । गंगाद्वारीं आला अन्यदिनीं ॥ ३ ॥
वरलाभ झाला उलूपीपासूनी । नित्य जळांतूनी संरक्षण ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे तया नागकन्या । पोंचवी ते धन्या पूर्वस्थळीं ॥ ५ ॥

अध्याय २१५ वा

५६२

निवेदूनी वृत्त सकळ विप्रांसी । अगस्त्यवटासी प्राप्त होई ॥ १ ॥
वासिष्ठपर्वत तीर्थ तुंगनाथ । हिरण्यबिंदुतीर्थ पुढती पाहे ॥ २ ॥
पूर्वेसी नैमिष, नंदा, यशस्विनी । मंदिरें पाहूनी पुढती गेला ॥ ३ ॥

महेंद्र पाहूनी मणिपुरीं आला । चित्रांगदा त्याला दिसली तेथें ॥ ४ ॥
कन्येची मागणी करी रायापाशीं । बोलला तयासी राव तदा ॥ ५ ॥
'प्रभंजना' वर लाभला शिवाचा । एका अपत्याचा नियम कुळीं ॥६॥
पुढती सकलां पुत्र, परी कन्या मज । दौहित्र तें शुल्क मज लाभो ॥७॥
गोत्रवृद्धि तेणें होईल आमुची । बोलूनी कन्येसी अर्पी तया ॥ ८ ॥
वर्षत्रय तेथ राहीयेला पार्थ । होतां पुत्रलाभ पुढती जाई ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे विचित्र हा योग । अभंग अटळ दैवगति ॥ १० ॥

अध्याय २१६ वा

५६३

दक्षिणसागरतीरावरी आला । पंचतीर्थें त्याला मोद देती ॥ १ ॥
अगस्त्य, सौभद्र, पौलोम, पावन । तैसें कारंधम, भारद्वाज ॥ २ ॥
वर्ज परी पार्थें आग्रहें पाहिलीं । मगरी त्या स्थळीं वसती पांच ॥ ३ ॥
सौभद्रतीर्थांत धरितां मगरीसी । ओढूनी तीरासी आणी पार्थ ॥ ४ ॥
दिव्यरूपधारी अप्सरा ते झाली । वर्गा तया वेळीं वदली वृत्त ॥ ५ ॥
बुद्बुदा,समीची, सौरभेयी, लता, । मैत्रिणी त्या माझ्या वसती येथें ॥
भ्रष्ट करावया आश्रमासी जातां । विप्रशाप होतां पतन त्यांचें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शतवर्षें ऐशा । राहिल्या त्या तीर्थां मगरी पांची ॥ ८ ॥

अध्याय २१७ वा

५६४

वर्गा म्हणे वीरा ऐकूनियां शाप । शरण विप्रास गेलों आम्ही ॥ १ ॥
दयाळु विप्रानें उःशाप दिधला । वीर जो तुम्हाला काढी वरी ॥ २ ॥
तोचि उद्धरील निश्चय हा जाणा । विचारूनी मना आलों एथें ॥ ३ ॥
नारदवचनें लाभ हा जाहला । उद्धरीं या काला आम्हालागीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे उद्धार तयांचा । करूनी कुंतीचा सुत धाला ॥ ५ ॥

५६५

पार्थ मणिपुरा येई पुनरपि । बभ्रुवाहनासी अवलोकी ॥ १ ॥

१ चित्रवाहन २ चित्रवाहनाचा एक पूर्वज

पुत्ररूपी शुल्क अर्पूनी रायासी । चित्रांगदेप्रति तोष देई ॥ २ ॥
इंद्रप्रस्थामाजी पाचारी तियेसी । म्हणे समयासी येईन मी ॥ ३ ॥
राजसूययज्ञ होईल त्या स्थानीं । तेंचि संधी आणीं मनामाजी ॥४॥
पुत्राचा सांभाळ करूनियां राहें । दुःखी या विरहें होऊं नको ॥ ५ ॥
ऐसें वदोनियां गोकर्णासी गेला । स्थान तें शिवाला प्रिय बहु ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पावन तें क्षेत्र । दर्शनेंचि मुक्त होई प्राणी ॥ ७ ॥

अध्याय २१८ वा

५६६

अतुलविक्रमी तो पार्थ । आला गोकर्ण क्षेत्रास ॥ १ ॥
पुढती पश्चिमतीरानें । गेला प्रभासीं सुखानें ॥ २ ॥
वृत्त ऐकूनियां कृष्ण । धाला पार्थासी भेटून ॥ ३ ॥
सकळ वृत्तांत ऐकिला । रैवतकावरी नेला ॥ ४ ॥
द्वारकेंत सन्मानिती । हर्ष अपार जनांसी ॥ ५ ॥
वासुदेवमंदिरांत । राही हर्षभरें पार्थ ॥ ६ ॥
म्हणे वासुदेव ऐसा । कथिला वृत्तांत यात्रेचा ॥ ७ ॥

——०——

## सुभद्राहरणपर्व १६

अध्याय २१९ वा

५६७

रैवतकोत्सव वृष्णि-अंधकांचा । थाट त्या स्थळाचा वर्णू कैंवी ॥ १ ॥
रत्नखचित ते प्रासाद शोभती । भोंवतीं डोलती कल्पवृक्ष ॥ २ ॥
नृत्य वाद्य गीतें युवक–युवती । उत्साहें हिंडती गिरीवरी ॥ ३ ॥
रथ सान थोर, वाहनीं बैसून । सुखें पौरजन येती जाती ॥ ४ ॥
अनुचरांसह बळिभद्र रेवती । संचार करिती आनंदानें ॥ ५ ॥
रुक्मिणीतनय सांब ते प्रद्युम्न । करूनी मधुपान मत्त होती ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐशा उत्सवांत । कृष्ण आणि पार्थ प्राप्त झाले ॥ ७ ॥

५६८

हिंडतां हिंडतां सुभद्रा देखिली । दृष्टि स्थिर झाली अर्जुनाची ॥ १॥
कृष्ण म्हणे पार्था वनवासी कैसा । किंकर कामाचा ऐसा होई ॥ २ ॥
भगिनी हे माझी मोहित कां चित्त । देववीन तुज हवी तरी ॥ ३ ॥
पार्थ म्हणे कृष्णभगिनी कोणासी । मोहित ही ऐसी न करी सांगें ॥
पट्टराणी जरी मजसी हे लाभे । उपकार तुझे मजवरी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पार्थ श्रीहरीला । पुशितां उपायाला कृष्ण कथी ॥६ ॥

५६९

कृष्ण म्हणे पार्था क्षत्रियांचा धर्म । स्वयंवर कर्म योग्य तया ॥ १ ॥
सहज स्वभाव चांचल्य स्त्रियांचा । न कळे योग्यता सत्य त्यांसी ॥२॥
बाह्यरूपावरी लुब्ध होऊनियां । शिणताती वांयां मोहबळें ॥ ३ ॥
संशयित अस स्वयंवर तेणें । सुभद्राहरणें हेतु साधीं ॥ ४ ॥
क्षत्रियांसी असे कर्म हें विहित । योजना समस्त कथिली पार्था ।५।
वासुदेव म्हणे पाठवूनी दूत । युधिष्ठिरमत घेती त्वरें ॥ ६ ॥

अध्याय २२० वा

५७०

धर्माची अनुज्ञा ऐकोनियां पार्थ । बैसूनी रथांत सिद्ध होई ॥ १ ॥
शैब्य सुग्रीव ते अश्व स्यंदनासी । गर्जना रथाचा मेघासम ॥ २ ॥
नगराबाहेरी पार्थवीर आला । सुभद्रा त्या स्थळा तैंचि आली ॥ ३ ॥
बलात्कारें तिज रथावरी घेई । वृत्त कानीं जाई सैनिकांच्या ॥ ४ ॥
'सुधर्मा'[1]–सभेसी वृत्तांत कळतां । क्रोध अंधकांचा अनावर ॥ ५ ॥
बळिराम म्हणे आशय कृष्णाचा । घेऊनी पुढचा मार्ग क्रमा ॥ ६ ॥
सेवूनियां अन्न तेथेंचि भाजन । फोडोनी कृतघ्न झाला पार्थ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे क्रुद्ध बलराम । वृष्णि भोज मान करिती त्याचा ॥८ ॥

———o———

१ यादवांची सभा.

## हरणहारिकापर्व १७

### अध्याय २२१ वा

५७१

यादवांसि म्हणे श्रीकृष्ण सांवळा । सन्मानचि केला पार्थवीरें ॥ १ ॥
आसुरही तैसा स्वयंवर जाणा । ग्राह्य न अर्जुना ऐशा वेळीं ॥ २ ॥
चिंतूनी हें मनीं पराक्रम केला । भूषण वीराला जगामाजी ॥ ३ ॥
अजिंक्य पार्थासी नगरीं आणूनी । कन्येसी अर्पूनी तुष्ट करा ॥ ४ ॥
वचन कृष्णाचें मानिती यादव । म्हणे वासुदेव सुखी झाले ॥ ५ ॥

५७२

यथाविधि झाला विवाह थाटांत । कांहींकाळ पार्थ राही तेथें ॥ १ ॥
अवशिष्ट काळ पुष्कर तीर्थासी । सुभद्रेचा पति वास करी ॥ २ ॥
द्वादशाब्द ऐसा पूर्ण होतां काळ । भेटला तत्काळ बांधवांसी ॥ ३ ॥
वडिलजनांसी वंदूनियां जाई । द्रौपदीसी पाही प्रेमभरें ॥ ४ ॥
कृष्णा म्हणे पार्था कासयासी आतां । सोडूनी सुभद्रा येसी येथें ॥५॥
अन्य बंधें होई शिथिल पूर्वींचा । तृणभार ऐसा नियम जनीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पार्थ क्षमा मागे । वृत्त सर्व सांगे वनवासाचें ॥ ७ ॥

५७३

गोपवेषें म्हणे सुभद्रा कृष्णेसी । वंदूनी मी दासी असें तव ॥ १ ॥
ऐकूनी द्रौपदी सन्मानी तियेसी । म्हणे तुझा पति सुखी असो ॥ २ ॥
पार्थ दर्शनानें आनंद सर्वांसी । इंद्रप्रस्थामाजी कृष्ण येई ॥ ३ ॥
अक्रुर उद्धव बळिरामादिक । सकळ अंधक प्राप्त होती ॥ ४ ॥
सन्मान तयांचा अलौकिक झाला । अहेर लाभला अमोलिक ॥ ५ ॥
बळरामादिक स्वस्थानासी गेले । श्रीहरी राहिले पार्थापाशीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे पुढती सुभद्रा । अभिमन्यु वीरा जन्म देई ॥ ७ ॥

५७४

आजानुबाहू तो पुत्र भाग्यवंत । आल्हाददायक सकलां वाटे ॥ १ ॥
धनुर्वेद सर्व पढविला पार्थें । पांच द्रौपदीतें पुत्र होती ॥ २ ॥

विंध्यचि कीं जैसा 'प्रतिविंध्य' दिसे। 'सुतसोम' शोभे 'श्रुतकर्मा' ॥३॥
'शतानीक' तैंवी 'श्रुतसेन' पांचवा। क्रमानें पांडवां पांच पुत्र ॥ ४ ॥
अर्जुन तयांसी पढवी धनुर्वेद। अंतरीं आनंद वासुदेवा ॥ ५ ॥

---

## खांडवदाहपर्व १८

### अध्याय २२२ वा

५७५

युधिष्ठिर राव प्रिय सकलांसी। सांभाळी प्रजेसी परोपरी ॥ १ ॥
बृहस्पतीसम धौम्यादिक मुनि। आनंदें त्या स्थानीं वसताती ॥ २ ॥
कार्यदक्ष राव प्रजा ते निश्चिंत। मग्न स्वधर्मांत नित्य असे ॥ ३ ॥
एकेदिनीं पार्थ बोलला कृष्णासी। यमुनातीरासी क्रीडा करूं ॥ ४ ॥
कृष्ण आनंदानें देई अनुमोदन। साहित्य घेऊन प्राप्त झाले ॥ ५ ॥
द्रौपदी सुभद्रा हर्षित जाहल्या। क्रीडेंत रंगल्या परम मोदें ॥ ६ ॥
इतुक्यांत येई तेजस्वी ब्राह्मण। नील पीतवर्ण अंग ज्याचें ॥ ७ ॥
अग्नीज्वालेसम पीतवर्ण केश। पाहोनी द्विजास पार्थ कृष्ण–॥ ८ ॥
वासुदेव म्हणे उठले सत्वरी। आदर अंतरीं मानूनियां ॥ ९ ॥

### अध्याय २२३ वा

५७६

विप्र म्हणे तुम्हा मागतों मी भिक्षा। शमवूनी क्षुधा तृप्त करा ॥ १ ॥
जाणा मज अग्नि द्यावें खांडव वन। रक्षी मरुत्वान मित्रासाठीं ॥ २ ॥
तक्षक त्या स्थळीं वास करीतसे। इंद्रासवें त्याचें सख्य जाणा ॥ ३॥
श्वेतकेतु नामें राव करी यज्ञ। शिणले ब्राह्मण यज्ञधूमें ॥ ४ ॥
सोडोनियां यज्ञ गेले स्वस्थळासी। विनवी तयांसी राव बहु ॥ ५ ॥
अन्याचिया हस्तें यज्ञ पूर्ण केला। वासुदेव झाला कष्टि मनीं ॥ ६ ॥

---

१ इंद्र.

५७७

ध्यास रायालागीं यज्ञाचा बहुत । शतवर्षसत्र करूं म्हणे ॥ १ ॥
परी पुरोहित न लाभे कोणीही । म्हणती शिव येई ऐसें करीं ॥ २ ॥
संक्रुद्ध नृपाळ आराधी शिवासी । प्रसन्न तयासी होई शंभु ॥ ३ ॥
शिव म्हणे व्रत एक तप घेई । अविच्छिन्न ठेवी घृतधारा ॥ ४ ॥
ऐसें तृप्त करीं अग्निनारायणा । पुरवीन कामना पुढती तव ॥ ५ ॥
राव अविच्छिन्न घृतधारा धरी । आज्ञा पूर्ण करी शंकराची ॥ ६ ॥
दुर्वास शिवाचा अंश पुरोहित । लाभला रायास शिवाज्ञेनें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सत्र पूर्ण केलें । स्वर्ग प्राप्त झालें श्वेतकीसी ॥ ८ ॥

५७८

अग्नि झाला परितृप्त । पुढती होई नष्ट तेज ॥ १ ॥
विनवी जावूनी ब्रह्मयासी । येरु म्हणे वन भक्षीं ॥ २ ॥
खांडव वन भक्षिलेंसी । तेंचि पुनरपि भक्षीं ॥ ३ ॥
प्राणिजात वसती तेथें । दिव्य औषध तें तुझें ॥ ४ ॥
अग्नि आला खांडव वनीं । तया शमविती प्राणी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे जल । शांत करी तैं अनल ॥ ६ ॥

अध्याय २२४ वा

५७९

सातवेळ यत्न विफल जाहाले । ब्रह्मयासी कथिलें जावूनियां ॥ १ ॥
ब्रह्मा म्हणे ऋषि नरनारायण । करितील पूर्ण हेतु तुझे ॥ २ ॥
वासुदेव–पार्थ होवूनियां आले । अवतीर्ण झाले देवांसाठीं ॥ ३ ॥
विप्रवेषें आलों ऐकूनी हें वृत्त । अग्नि स्ववृत्तांत ऐसा कथी ॥ ४ ॥
हव्यवाहनासी पार्थ म्हणे देवा । चाप रथ द्यावा अनुरूप ॥ ५ ॥
योग्य शस्त्र देईं तेंवि श्रीहरीतें । सामर्थ्य आमुचें पाहीं मग ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे इंद्रासवें युद्ध । करावया सिद्ध होई पार्थ ॥ ७ ॥

## अध्याय २२५ वा

### ५८०

वरुणदेवासी प्रार्थी धूमकेतु । जाणूनियां हेतु प्रगट होई ॥ १ ॥
सोमदत्त चाप अक्षय्य ते भाते । अर्पी देवा मातें अग्नि म्हणे ॥ २ ॥
कपि चिन्हांकित रथहि अर्पावा । चक्रलाभ व्हावा वासुदेवा ॥ ३ ॥
यथास्तु म्हणोनी वरुण तो गेला । शस्त्रें तीं अग्नीला अर्पूनियां ॥४॥
अक्षय्यतूणीर चाप अलौकिक । पूजा देवादिक करिती त्याची ॥ ५ ॥
तपःप्राप्त रथ तो प्रजापतीचा । विजय सोमाचा ख्यात जेणें ॥ ६ ॥
ऐसा दिव्य रथ पार्थासी अर्पितां । परमानंद चित्ता होई त्याच्या ॥७॥
प्रदक्षिणा घाली मग रथीं बैसे । वासुदेव त्याचे चरण वंदी ॥ ८ ॥

### ५८१

सूक्ष्म रज्जुयुक्त चक्र श्रीहरीसी । गदा कौमोदकी अर्पी अग्नि ॥ १ ॥
पार्थाच्या स्यंदनीं शोभे महाकपि । पिशाचें भोंवतीं विविध त्याच्या ॥
ऐसे दोघे वीर सज्ज ते युद्धासी । हव्यवाहनासी साह्य होती ॥ ३ ॥
मग खांडव वन अग्नीनें वेढिलें । ज्वालामय झालें क्षणार्धांत ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे सर्व भयाभीत । नाद गगनांत न सामावे ॥ ५ ॥

## अध्याय २२६ वा

### ५८२

शूरवीर दोघे भोंवतीं हिंडती । प्राणी जे पळती वधिती तयां ॥ १ ॥
अलातचक्राची गति तयां होती । कोणी न सुटती वनांतूनी ॥ २ ॥
पटापटा जीव असंख्य जळती । व्याघ्र गज किती सर्प मेले ॥ ३ ॥
पक्षी गगनांत उडूनियां जातां । पार्थ छेद त्यांचा करीतसे ॥ ४ ॥
विनवितां इंद्र येई तया स्थळीं । जळवृष्टि केली तया वनीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धूम्रमय स्थान । मेघांनीं व्यापून सकळ जाई ॥ ६ ॥

अध्याय २२७ वा

५८३

निवारूनी वृष्टि शरांचें तें छत । करोनियां पार्थ नवल करी ॥ १ ॥
तक्षकसुतांसी संरक्षी देवेंद्र । करोनी मोहित पार्थालागीं ॥ २ ॥
होईल रे नागा तुझा वंशछेद । तदा तो संक्रुद्ध पार्थ म्हणे ॥ ३ ॥
विविध अस्त्रांनीं आटविलें जळ । संतुष्ट अनल होवो म्हणे ॥ ४ ॥
असुर गंधर्व देवही पातले । पराभूत केलें तयांलागीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वीर कृष्णार्जुन । एक होतां कोण जिंकी तयां ॥ ६ ॥

—०—

## मयदर्शनपर्व १९

अध्याय २२८ वा

५८४

दानव राक्षस नाग पशु-पक्षीं । तरस ऋक्ष हस्ती संहारिले ॥ १ ॥
खांडव वनाचा दाह दैवप्राप्त । जाणूनियां स्वस्थ राहे इंद्र ॥ २ ॥
‘ नर-नारायण जाणावे हे वीर । तक्षक त्वन्मित्र नसे एथें ’ ॥ ३ ॥
ऐसी नभोवाणी ऐकोनी इंद्रानें । युद्ध आनंदानें संपविलें ॥ ४ ॥
पुनरपि पक्षी दैत्य ते धांवले । तयां संहारिलें वीरद्वयें ॥ ५ ॥
इतुक्यांत आला मय, तो शरण । अभयवचन दिधलें त्यासी ॥ ६ ॥
अश्वसेन, मय, शार्ङ्गक ते चार । वांचले, समग्र इतर भस्म ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे श्रेष्ठ शिल्पी ‘मय’ । तयासी अभय पार्थामुळें ॥ ८ ॥

अध्याय २२९ वा

५८५

अश्वसेन शचीनाथें । वांचविला तें सरतें ॥ १ ॥
कैसे वांचले शार्ङ्गक । घ्यावें ऐकूनी तें वृत्त ॥ २ ॥

मंदपाल नामें ऋषि । पुण्यलोक न तयासी ॥ ३ ॥
देव म्हणती मुनिराजा । क्रिया, ब्रह्मचर्य, प्रजा ॥ ४ ॥
ऐसीं असती तीन ऋणें । यज्ञ, तप, तैं संतानें ॥ ५ ॥
ऋणमुक्त होतां पुण्य । जीव भोगी हे सुजाण ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सुत । नव्हता मुनीसी हें दुःख ॥ ७ ॥

५८६

मुनि चिंतूनियां मनीं । स्वीकारितो पक्षीयोनि ॥ १ ॥
कांता शार्ङ्गिका-जरिता । प्रसवली चार सुतां ॥ २ ॥
मुनि सोडूनी जरितेसी । स्वीकारितो लपितेसी ॥ ३ ॥
खांडव वनीं सुत होते । मुनि प्रार्थितो अग्नीतें ॥ ४ ॥
ज्ञानी पक्षी वांचवावे । वासुदेवकार्य भावें ॥ ५ ॥

अध्याय २३० वा

५८७

जरिता म्हणे बालकांसी । कैसें वांचवूं तुम्हांसी ॥ १ ॥
जरितारि, सारिसृक्क । स्तंबमित्र, द्रोण देख ॥ २ ॥
तुम्ही आधार कुळाचे । बाळें म्हणती जाई माते ॥ ३ ॥
माता म्हणे मूषकाचें । बीळ रक्षील तुम्हातें ॥ ४ ॥
म्हणती बाळें अग्नीहूनी । भय मूषकसदनीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अग्नि-। दाह रुचे तयां मनीं ॥ ६ ॥

अध्याय २३१—२३२ वा

५८८

माता म्हणे श्येनें वधिला मूषक । असती अनेक म्हणती बाळें ॥ १ ॥
माते तुज अन्य होतील सुपुत्र । वांचूं तरी येथ फिरुनी येई ॥ २ ॥
ऐकूनी जरिता सोडूनियां गेली । समीप ज्या वेळीं अग्नि आला ॥ ३ ॥
मंदपाल सुत अग्नीतें स्तवीती । सूत्रात्मा बोलती तूंचि अग्ने ॥ ४ ॥
वनस्पतीहूनी पृथ्वीजल तैसें । सर्व रूप तुझें अग्निदेवा ॥ ५ ॥

कार्यरूपें भिन्न कारण तूं एक । तुझ्यावरी भास जगताचा ॥ ६ ॥
उत्पत्ति स्थिति तैं संहारक तूंचि । संरक्षीं आम्हांसी म्हणती बाळें॥७॥
कनवाळु अग्नि बालकांसी म्हणे । प्रार्थिलें पित्यानें तुम्हांस्तव ॥ ८ ॥
वन्य मार्जारांसी जाळूनियां गेला । वासुदेव धाला अंतरांत ॥ ९ ॥

अध्याय २३३ वा

५८९

मंदपाल दुःखी, बाळांसी स्मरूनी । लपिता पाहोनी द्वेष करी ॥ १ ॥
मजवरी प्रेम नाहींच ती म्हणे । एकटी सुखानें राहीन जा ॥ २ ॥
इकडे जरिता बाळापाशीं आली । प्रेमानें भेटली तयांलागीं ॥ ३ ॥
इतुक्यांत येई मंदपाल तेथें । लपितेसी भेटे जरिता म्हणे ॥ ४ ॥
दुराचार तैसा मत्सर तयांसी । घातक स्वर्गासी मुनि म्हणे ॥ ५ ॥
पति–पत्नीमाजीं तेणें वाढे वैर । अरुंधति थोर भ्रमली तेही ॥ ६ ॥
निष्पाप मुनींचा संशय तिजसी । तेणें उभयांसी दुःख बहू ॥ ७ ॥
तैसें मज दुःख न देई जरिते । पुत्रलाभें स्त्रीचें कार्य संपे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे ऐकोनी हे बोल । सेवेंत तत्पर सकल होती ॥ ९ ॥

अध्याय २३४ वा

५९०

मंदपाल म्हणे बाळांसी, अग्नीनें । वचन दिधलें पूर्वी मज ॥ १ ॥
विश्वासें तयाच्या राहिलों निर्भय । सोडूनी तें स्थळ पुढती गेलों ।२।
भक्षूनियां वन संतुष्ट दावाग्नि । पार्थासी येऊनी भेटतसे ॥ ३ ॥
इतुक्यांत इंद्र येई तया स्थळीं । वर ऐशा वेळीं मागा म्हणे ॥ ४ ॥
पार्थ म्हणे अस्त्रें सर्व मज देई । योग्यवेळीं होई लाभ म्हणे ॥ ५ ॥
कृष्ण म्हणे राहो पार्थावरी प्रेम । इंद्र म्हणे पूर्ण हेतु तुझे ॥ ६ ॥
पड्दिन विश्रांति घेवूनियां अग्नि । म्हणे जा स्वस्थानीं सुखें आतां ॥
मयासह तिघे येती यमुनातीरीं । हर्षित अंतरीं सकल होती ॥ ८ ॥
वासुदेव प्रार्थी अनादि अनंता । आदिपर्व–श्रोता–वक्ता तूंचि ॥ ९ ॥

## आदिपर्व समाप्त

-ॐ नमो भगवते वासुदेवाय-

# अभंग-भारत

( महाभारताचा अभंगमय सुबोध भावार्थ )

## २ सभापर्व

—०—

### सभाक्रियापर्व १

अध्याय १ ला

नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ॥
देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ॥ १ ॥

अभंग १ ला

नारायण नर देवी सरस्वती। वंदूनी पुढती गाऊं ग्रंथ ॥ १ ॥
सभापर्व रम्य बोधप्रद ऐका। चुकवील धोका दुष्कर्माचा ॥ २ ॥
मयासुर नम्र कृतज्ञ पार्थासी। सेवा म्हणे तुझी काय करूं ॥ ३ ॥
पार्थ म्हणे प्रेम असो निरंतर। मय म्हणे कार्य सांगें कांहीं ॥ ४ ॥
कृष्ण म्हणे सभा अद्भुत निर्मावी। त्रैलोक्यांत व्हावी ख्यात ऐसी॥५॥
सन्मान धर्मानें केला बहु त्याचा। कार्य सुमुहूर्ता आरंभिलें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे तोषवी विप्रांस। दशसहस्र हस्त भूमी योजी ॥ ७ ॥

अध्याय २ रा

२

खांडवप्रस्थासी पांडवांसन्निध। राहिला मुकुंद बहुतकाळ ॥ १ ॥

पित्याच्या भेटीसी म्हणे जावें आतां । निरोप अच्युता देई धर्म ॥ २ ॥
सद्गदित कंठें सुभद्रा भेटली । नीति कथियेली हरिनें तिज ॥ ३ ॥
पार्थ गाडिवरें मागोमाग गेला । शुभ मुहूर्ताला कृष्ण निघे ॥ ४ ॥
सीमेवरी धर्म म्हणे यादवेंद्रा । कुंतीच्या कुमारां विसरूं नको ॥ ५ ॥
कृष्ण म्हणे येतों सत्वरी मागुती । लांबवूनी दृष्टि बघती जातां ॥ ६ ॥
दृष्टिआड होतां रथ, येती मागें । द्वारकेसी वेगें हरि गेला ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे वडिलां भेटूनी । रुक्मिणीसदनीं जाई कृष्ण ॥ ८ ॥

अध्याय ३ रा

३

मय विनवी पार्थासी । येतों जाऊनी कैलासीं ॥ १ ॥
बिंदुसरोवरतीरीं । सभा निर्मियेली पूर्वी— ॥ २ ॥
तया वृषपर्व्यास्तव । तेथ असे मूळ द्रव्य ॥ ३ ॥
विविध रत्नमय चूर्ण । येतों त्वरित घेऊन ॥ ४ ॥
गदा श्रेष्ठ वृषपर्व्याची । 'देवदत्त'[1] त्या स्थळासी ॥ ५ ॥
विनवूनी ऐसें मय । जाई कथितो वासुदेव ॥ ६ ॥

४

कैलासाच्या उत्तरेसी । आला मैनाकपर्वतीं ॥ १ ॥
समिप बिंदुसरोवर । पावन तें क्षेत्र थोर ॥ २ ॥
भगीरथ, इंद्र, ब्रह्मा । करिती जेथ पुण्यकर्मा ॥ ३ ॥
भूतनाथ तेंवि यम । करी विष्णु चैत्यदान ॥ ४ ॥
तया स्थानीं मय आला । वस्तुलाभें संतोषला ॥ ५ ॥
गदा भीमासी अर्पिली । देवदत्त पार्था करीं ॥ ६ ॥
शंखनादें गगन कोंदे । वासुदेव नाचे छंदें ॥ ७ ॥

५

दशसहस्र चौरसहस्त । महासभा ते विस्तृत ॥ १ ॥

१ अर्जुनाच्या शंखाचें नांव

वृक्षराजी सुवर्णाची । सूर्यासम महादीप्ति ॥ २ ॥
नवरसांचा अभिनय । चित्रें दाविती अभिनव ॥ ३ ॥
रत्नखचित महाद्वार । सभा त्रैलोक्यीं अपूर्व ॥ ४ ॥
आठ सहस्र किंकर । संरक्षक द्वारावर ॥ ५ ॥
सभा विमानासमान । नेती ऐसे बलवान ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सभा । नव्हे कौशल्याचा गाभा ॥ ७ ॥

६

सरोवर तया ठाईं निर्मियेलें । सुवर्णकमळें असंख्यात ॥ १ ॥
इंद्रनीलमणिपर्णें चमकती । देंठेंहि रत्नाचीं शोभताती ॥ २ ॥
रत्नमय पक्षी बैसले विविध । मत्स्य-कूर्मवृंद रत्नमय ॥ ३ ॥
विचित्र स्फटिकसोपान शोभती । निर्मल तें अति सलिल तेथें ॥४॥
स्थानाचि तें भासे सलिल असोनी । पुष्पें उपवनीं सुगंधित ॥ ५ ॥
तुषार जलाचे विखुरलीं मोत्यें । भासती लोकांतें तया स्थानीं ॥६॥
चतुर्दश मासीं निर्मिली ही सभा । मय म्हणे राजा कार्य पूर्ण ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हंस चक्रवाक । पाहूनियां लोक, [illegible] ॥८॥

स्थळप्रत.
मराठा ग्रंथ संग्रहालय
अध्याय ४ था ........ वि: ..............
अनुक्रम ..............
क्रमांक ...७.. ........ नों: दि: ..............

सभा प्रवेशाचा मंगलमुहूर्त । पांडव थाटांत करिती मोठा ॥ १ ॥
शत शत संख्या भोजन विप्रांसी । षड्रस अन्नेंसी वाढीयेलें ॥ २ ॥
असंख्य धेनूंचें दान तदा केलें । आशीर्वाद झाले मंत्रघोषें ॥ ३ ॥
वाद्यघोषामाजी स्थापिल्या देवता । धर्मराज पूजा करी त्यांची ॥४॥
मल्ल, नट, सूत, ऐसे गुणिजन । नाना देशांतून नृपति आले ॥ ५ ॥
नृत्य-गीत नित्य अप्सरांचें होई । हर्ष तया ठाईं सकलांसी ॥ ६ ॥
देवादिक जैसे सेविती ब्रह्म्यासी । सुव्रत सेविती तेंवी धर्मा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे इंद्रासम धर्म । शोभवी तें स्थान आनंदानें ॥ ८ ॥

——o——

# लोकपालसभाख्यानपर्व २

## अध्याय ५ वा

८

धर्मसभेमाजी नारद पातले । पाहूनी वंदीले चरण त्यांचे ॥ १ ॥
वेदोपनिषदें तेंवि शास्त्रवेत्ता । प्रभावी जो वक्ता ब्रह्मसुत ॥ २ ॥
पुराणेतिहास योगबळें पाही । न्याय-पंचांगेंही जाणीतसे ॥ ३ ॥
साधर्म्य वैधर्म्य जाणे सकळिक । पूर्वोत्तरपक्षफल जाणे ॥ ४ ॥
मन्वादींचीं तत्त्वें शिक्षादि षडंगें । ऐक्य-भेद-मार्गें तत्त्वज्ञाता ॥ ५ ॥
शंकासमाधान दृढस्मृति जाण । होणाराचें ज्ञान पूर्वींच ज्या ॥ ६ ॥
कर्म-ज्ञान-कांड-विभाग जाणता । प्रमाणमर्यादा जाणीतसे ॥ ७ ॥
वक्ता जो कुशल बृहस्पतीसम । पुरुषार्थज्ञान सकल ज्यासी ॥ ८ ॥
भुवनकोशाचा द्रष्टा महाभाग । जाणे सांख्ययोग विभागातें ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे युद्ध, गांधर्वेही । प्रिय ज्या, तो येई सभेमाजी ॥ १० ॥

९

पूजूनी तयासी संतोषवी धर्म । विविध तैं प्रश्न करी मुनि ॥ १ ॥
समर्थ पालनीं असती कीं अर्थ । धर्ममार्गी रत असती कीं तूं ॥२॥
निर्विकारचित्तें भोगिसी कीं सुख । एकांतासी चित्त रमतें कीं ना ॥३॥
उदार चित्तानें पूर्वजांसमान । लौकिक राखून वागसी कीं ॥ ४ ॥
पुरोहितालागीं सन्मान देऊनी । दंड्यासी दंडूनी वागसी कीं ॥ ५ ॥
नीचत्व, विरक्ति, कामुकता विघ्न । राया नित्य जाण राजधर्मा ॥६॥
धर्मा-धर्मलोभें बाध धर्मार्थांचा । काम उभयांचा नाश करी ॥ ७ ॥
पूर्वाण्ही तो धर्म अर्थ तो मध्यान्ही । पुरुषार्थ सायान्ही तृतीय योग्य ॥
ऐसा श्रुतिबोध, धर्म हा अबाध । जाणूनी विशद वागसी कीं ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे नारदाचे प्रश्न । बोधप्रद पूर्ण सकलांसी ॥ १० ॥

१०

कार्योपदेशाचें कौशल्य संपूर्ण । शत्रूचें दमन तर्कबुद्धि ॥ १ ॥
अचुक स्मरण तैसें कालज्ञान । नीतिज्ञानपूर्ण षड्गुण हे ॥ २ ॥

सामादिक चार, औषध तैं मंत्र । तैंवि इंद्रजाल उपाय हे ॥ ३ ॥
नास्तिक्य अनृत क्रोध तैं प्रमाद । आलस्य कीं छंद इंद्रियांचा ॥४॥
दीर्घसूत्रीपणा ज्ञात्यांचा अवमान । अर्थाचें चिंतन एकमात्र ॥ ५ ॥
अनर्थज्ञ मंत्री देवपूजा द्वेष । सर्वदा शत्रुत्व सकलांसी ॥ ६ ॥
मंत्रस्फोट तेंवी निश्चित कार्यांचा । अनारंभ साचा विघातक ॥ ७ ॥
चतुर्दश दोष नृपाचे नरेंद्रा । जाणूनियां भद्रा वागसी कीं ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे नारदाची नीति । ऐकूनियां चित्तीं बोध घ्यावा ॥९॥

११

बाल, वृद्ध, रोगी, ज्ञातिबहिष्कृत । अमात्यांसहित भीरु स्वयें ॥ १ ॥
तैसा मंत्र्यांसवें लोभी, जो अप्रिय, । प्रिय ज्या विषय सर्वकाल ॥२॥
चंचल संकेतीं, विप्र देवां निंदी, । तैसा दैववादी, भाग्यहीन, ॥ ३ ॥
दुर्भिक्ष-व्यसनें नित्य जो पीडित, । सैन्य कार्यरत नसे ज्याचें, ॥४॥
प्रतिकूल देशीं वास्तव्य जयाचें, । शत्रूहि जयाचे बहुत लोकीं ॥ ५ ॥
जयालागीं काल प्रतिकूल जाणा । तेंवी सत्य-धर्मा जो न मानी ॥६॥
अयुक्त तेंवी संधीसी अपात्र । तैसा युधिष्ठिर असेना कीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे अधें हीं विंशति । सर्वकाळ चित्तीं वागवावीं ॥ ८ ॥

१२

संधीचा तो पूर्ण विचार करावा । भेद नित्य घ्यावा वैरियाचा ॥१॥
देश दुर्गादिक, विघातक मित्र । करावा विचार नित्य त्याचा ॥ २ ॥
बलाबल भेद पाहोनी वागावें । कोश वाढवावे न्यून होतां ॥ ३ ॥
कृषि, वाणिज्य, ते दुर्ग, सेतु, गज, । वसवावे प्रदेश, आकर-खनि ॥४॥
संपत्तीचे मार्ग अष्ट हे जाणावे । राज्यांगां रक्षावें सप्तही त्यां ॥ ५ ॥
स्वामी, अमात्य, ते सुहृद्, कोश, राष्ट्र । दुर्ग, सैन्य, सप्त राज्यांगें हीं ॥६॥
दुर्ग-सेनाध्यक्ष, बल-धर्म-नेता । चमूपती तैसा पुरोहित ॥ ७ ॥
वैद्य तैं ज्योतिषि ऐसी हे प्रकृति । जाणूनियां कृति व्हावी तैसी ॥८॥
वासुदेव म्हणे अमात्य तो मंत्री । सुहृद् बोलताती न्यायाधीशा ॥९॥

---

१ आकर-सुवर्णखाण, खनि-रत्नांच्या खाणी.

१३

प्रकृति कदापि मोहित नसावी । व्यसनीं रंगावी ऐसी नसो ॥ १ ॥
अधिकारी दृप्त नसती कीं राजेंद्रा । लोभ अनर्थाला कारण तो ॥२॥
कृत्रिम मित्रांसी न होसी कीं वश । कोणी मंत्रभेद करीना कीं ॥ ३ ॥
मित्र परीक्षित, संरक्षीं संकेत । बळिवंता सख्य राखिसी कीं ॥ ४ ॥
आत्मसम वृद्ध शुद्ध बोधक्षम । मंत्री ते कुलीन अनुरक्त कीं ॥ ५ ॥
मध्यमासी साम्य विग्रह दुर्बलां । अनुभवी व्हावा कुलिन मंत्री ॥६॥
राज्यामाजी तुझ्या क्षोभ तो नसे कीं । अकालीं निद्रेसी न घेसी कीं ॥
चिंतित तो अर्थ ब्राह्म मुहूर्तासी । पुनरपि घेसी ध्यानीं कीं ना ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे संकेत दोघांनीं । करावा हें मनीं आणिसी कीं ॥ ९ ॥

१४

मंत्र तो षट्कर्णी न होई कीं तुझा । अल्प—व्ययें अर्था जोडिसी कीं ॥
कृषि—वाणिज्य तें होई कीं सुखानें । कृषिवल प्रेमें वागती कीं ॥ २ ॥
पालट तयांचा नित्य न करावा । विश्वासेंचि घ्यावा लाभ त्यांचा ।३।
मंत्रासम कर्म असे कीं तें गुप्त । होतां कार्यसिद्ध कळो लोकां ॥ ४ ॥
धर्मविशारद गुरु सकळांसी । नृपा असती कीं तुझ्या राज्यीं ॥ ५ ॥
त्यागूनी मूर्खासी ज्ञाता जवळी घ्यावा । मार्ग हा वरावा जाणिसी कीं
वासुदेव म्हणे स्वाधीन कीं दुर्ग । नित्य ते सायुध असती कीं ना ।७।

१५

बुद्धिवंत शूर जितेंद्रिय ज्ञात्या । एकाही अमात्या हित साधे ॥ १ ॥
अष्टादशतीर्थीं हेर पाठवावे । अनेकांचें व्हावें एक मत ॥ २ ॥
स्वप्रजापालन, अभय परांसी । स्वराष्ट्राची वृद्धि ऐसी व्हावी ॥ ३ ॥
स्वरंध्राच्छादन, पररंध्रज्ञान । सद्गुणसंपन्न पुरोहित ॥ ४ ॥
दिव्य भौम तैसीं शारीरलक्षणें । जाणावीं दैवज्ञें सर्वकाळ ॥ ५ ॥
उत्तम सैन्याचे धनाचे मध्यम । कनिष्ठ ते जाण कृषिकर्मी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नारदाची नीति । योजावे ते मंत्री निवडोनी ॥ ७ ॥

१६

उग्रदंडें तुझी अवज्ञा न होवो । कार्यदक्ष राहो सेनापति ॥ १ ॥

युद्धविशारद सैन्याचे जे नेते । संतुष्ट तयांतें राखीं नित्य ॥ २ ॥
वेतन जयांचें लाभे योग्य वेळीं । भृत्य प्राणावरी उदार ते ॥ ३ ॥
सेनापति स्वैर नसे कीं रे तुझा । सत्कार शूरांचा करिसी कीं तूं ॥४॥
कृतज्ञ गुणज्ञ असावें रायानें । वीर विश्वासानें अभय राहो ॥ ५ ॥
नृपास्तव रणीं जो कोणी पडेल । त्याचा परिवार संरक्षावा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शरण जो आला । सांभाळी तयाला पुत्रासम ॥ ७ ॥

१७

समदृष्टि प्रजेवरी । ठेविसी कीं नृपा खरी ॥ १ ॥
स्त्रिया, द्यूत, मृगया, मद्य । नृत्यगीत अटन वाद्य ॥ २ ॥
व्यसनें, निंदा, दिवानिद्रा । मंत्र कोश भृत्य त्रिधा ॥ ३ ॥
बल त्रिविध, ते शक्ति । प्रभु, मंत्र, उत्साहेंसी ॥ ४ ॥
जाणूनियां आक्रमण । करिसी कीं, येतां क्षण ॥ ५ ॥
स्वयें आपणा आपण । सर्वांआधीं घे जिंकून ॥ ६ ॥
दंड अंतिम उपाय । समयीं आचरितां जय ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दंड । करुनी मोडीं दुष्टबंड ॥ ८ ॥

१८

स्वराज्याचें योग्य रक्षण करावें । मग आचरावें दंडशास्त्र ॥ १ ॥
उद्यत जो दंड विजयाविण कदा । ठेवूं नये राजा ध्यानीं धरीं ॥ २ ॥
समूळ उच्छेद जिताचा न होवो । अष्टांगांनीं राहो सैन्य सज्ज ॥ ३ ॥
रथ, गज, अश्व, योद्धे तैं पदाती । चार, भृत्य, लोकीं श्रेष्ठ जन ॥४॥
ऐसीं अंगें आठ चतुर्विध सैन्य । मित्र, भृत्य, वन, स्वकीय तैं ॥ ५ ॥
शिक्षणें सर्वदा असे कीं समर्थ, । दुर्भिक्षींहि युध्द हितकारी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे वस्त्र सुगंधादि । नृपार्थ रक्षिती सांगें कीं ना ॥७॥

१९

धनधान्य अश्व यांचें संरक्षण । सर्वकाळ प्राण रक्षिसी कीं ॥ १ ॥
पूर्वाण्हसमयीं धर्म आचरितां । द्रव्यव्ययवृत्ता न कथिती कीं ॥ २ ॥

---

१ फिरणें.

शिष्ट पुरोहित कळतां व्यसन। जातील सोडून तुजलागीं ॥ ३ ॥
समृध्दसमर्थी तृतीय विभाग। द्वितीय तो चांग मध्यमांत ॥ ४ ॥
चतुर्थांशवृध्दि दुर्भिक्षीं करावी। नित्य वाढवावी संपत्ती ते ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे आप्त स्वकीयांची। धनधान्यवृद्धि करीं सदा ॥ ६ ॥

२०

आय–व्यय नित्य घेसी कीं ऐकूनी। पात्रता जाणूनी वागसी कीं ॥१॥
प्रांजलवुद्धीनें दीर्घसेवा ज्यांची। छिन्न वृत्ति त्यांची करूं नये ॥ २ ॥
तस्कर आशक कुमार स्त्री नृप। न देती कीं दुःख जनांलागीं ॥ ३ ॥
दीर्घ जलाशय असती कीं पूर्ण। धान्य वृष्टीविण पिकतें कीं ना ॥४॥
अन्नधान्यबीज विपुल असावें। अल्प-व्याजें द्यावें धन लोकां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अधार्मिक जन। बहु व्याजें धन अर्पिताती ॥ ६ ॥

२१

वार्ता चतुर्विध कृषि वाणिज्यादि। सुजन त्या माजी अथवा दुष्ट ॥१॥
व्याज, पशुरक्षा करिती ते सुखी। वार्ताचि या लोकीं अर्थदात्री ॥ २ ॥
ग्रामांत प्रशास्ता, समाहर्ता, साक्षी। संविधाता तैंवि लेखक असो ॥३॥
पंचाधिकारी हे सेविती कीं तुज। रक्षक शूरास नेमिसी कीं ॥ ४ ॥
ग्राम व्हावे प्रांत, नगरें ते ग्राम। तेणें संरक्षण नगरांचें ॥ ५ ॥
राजनगरासी संज्ञा पुर ऐसी। त्या स्थानीं शूरांची वसती असो ॥६॥
वासुदेव म्हणे नारद धर्मासी। विचारी प्रश्नासी पुढती ऐका ॥ ७ ॥

२२

बहुसंख्य शूद्र ग्राम त्या म्हणावें। नगर जाणावें आपेण जें ॥ १ ॥
वनासन्निध जे ग्राम तेचि प्रांत। वसूल समस्त नगरीं यावा ॥ २ ॥
पाठलाग नित्य व्हावा तस्करांचा। त्रिविध न व्हावा ताप लोकां ॥३॥
सांत्वन स्त्रियांचें तैसेंचि रक्षण। करिसी कीं मन लावूनियां ॥ ४ ॥
वचनीं विश्वास नसावा स्त्रियांच्या। गुप्त मंत्र त्यांचा विषय नसो ॥५
वासुदेव म्हणे दुर्वृत्त ऐकूनी। विषयीं रंगूनी न जासी कीं ॥ ६ ॥

---

१ कर वसूल करणारा. २ प्रजा व समाहर्ता यांची एकवाक्यता करणारा.
३ बाजार.

२३

द्वितीय तृतीय प्रहरीं शयन । चतुर्थी चिंतन धर्म अर्थ ॥ १ ॥
स्नानादिक कर्म आटोपूनी नित्य । येसी कीं सभेस उत्साहानें ॥ २ ॥
कालज्ञ मंत्र्यासी भेटसी कीं नित्य । रक्तवस्त्र भृत्य रक्षिती कीं ॥ ३ ॥
अपराध्यां अप्रिय पूज्यांलागीं प्रिय । परीक्षूनि न्याय वर्तसी कीं ॥ ४ ॥
औषधी पथ्यानें शारीरिक व्याधि । सेवाधर्में आधि वारिसी कीं ॥५॥
अष्टांगचिकित्सा जाणूनी सादर । योजिती कीं थोर वैद्य तुझे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अनुरक्त वैद्य । प्रेमळ सुहृद असो तुझा ॥ ७ ॥

२४

लोभ मोह मानें याचक जे येती । संतुष्ट तयांसी करीं नित्य ॥ १ ॥
दानभयें त्यांची भेटी न टाळावी । इच्छा पुरवावी संतोषानें ॥ २ ॥
आश्रितांची वृत्ति न छेदीं सर्वथा । फितुर जनांचा शोध घेईं ॥ ३ ॥
दुर्बलही वैरी होई बलवंत । तयावरी नित्य लक्ष ठेवीं ॥ ४ ॥
प्रबल जे नृप तयां दान-मानें । आकर्षूनि प्रेमें घेतलें कीं ॥ ५ ॥
तुझ्यास्तव प्राण देती कीं समया । विप्र-साधुपायां वंदीसी कीं ॥६॥
वासुदेव म्हणे पूर्वापार धर्म । स्वाध्यायांत मन लाविसी कीं ॥ ७ ॥

२५

दक्षिणासंयुक्त मधुरान्न विप्रांसी । मंदिरीं अर्पिसी नृपाळा कीं ॥ १ ॥
सावधानचित्तें वाजपेयादिक । याग पुंडरीक करिसी कीं तूं ॥ २ ॥
ज्ञातीजन, गुरु, वृद्ध, देव, मुनि । वंद्यवृक्ष जनीं वंदीसी कीं ॥ ३ ॥
बुद्धि, वृत्ति, नित्य स्थिर असो द्यावी । तेणेंचि जिंकावी अवघी भूमी ॥
घोर-निंद्य-कर्म आचरितां कोणी । सर्वस्व हरूनी घ्यावें त्याचें ॥५॥
पुनरपि परी पीडा नच व्हावी । चोरी न क्षमावी द्रव्यलोभें ॥ ६ ॥
बीजकणिशन्यायें द्रव्यलाभ होतां । अमात्यासी शंका न येई कीं ॥
वासुदेव म्हणे निंदकांची पोळी । पिके ऐशा वेळीं ध्यानीं धरा ॥८॥

२६

वेद, धन, पत्नी, शास्त्राचें पठण । सफल राखून वागसी कीं ॥ १ ॥
युधिष्ठिर म्हणे साफल्य कशानें । होई तें प्रेमानें उपदेशावें ॥ २ ॥

अग्निहोत्रें वेद, दान-भोगें धन, । पुत्रवती जाण सफल कांता ॥ ३ ॥
शील–वृत्तें होई अध्ययन धन्य । पुनरपि प्रश्न करिती मुनि ॥ ४ ॥
असे कीं परदेशी वैश्यांवरी कर । फंसूनी व्यापार न घडेची कीं ।५।
धर्मअर्थपूर्ण वृद्धांचें जें मत । असे कीं संमत तुजलागीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ज्ञात्यासी संवाद । करोनियां बोध नित्य घ्यावा ॥७॥

२७

धान्यघृतदानें तुष्ट कीं ब्राह्मण । शिल्पी सुप्रसन्न असती कीं ना ॥१॥
अस्त्र यंत्र तेंवी अभिचारादिक । विषयोग समस्त जाणसी कीं ॥२॥
अग्नि व्याघ्रादि तैं रोग-रक्षोभय । सकल अपाय वारीसी कीं ॥३॥
अंध, मूक, पंगु, अबांधवजन । रक्षिसी कीं जाण पित्यासम ॥ ४ ॥
निद्रा तंद्रा भय क्रोध तें मार्दव । दीर्घसूत्रभाव घातक हे ॥ ५ ॥
जाणूनियां राष्ट्र रक्षिसी कीं राया । ऐकूनी हृदया मोद होई ॥ ६ ॥
वंदी मुनीलागीं नृपाळ कृतार्थ । होई ज्ञानलाभ अपूर्व त्या ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे चिंतूनी हे नीति । राज्य जे करिती तयां यश ॥ ८ ॥

२८

युधिष्ठिर म्हणे सन्मान्य हा बोध । आचरितों मार्ग हाचि मुने ॥ १ ॥
पुनरपि बोधें जागृति पावलों । धन्यचि जाहलों जगामाजी ॥ २ ॥
मुनि म्हणे रक्षी चातुर्वर्ण्य ऐसें । इंद्रपद त्यातें प्राप्त होई ॥ ३ ॥
बोलूनियां तैसें नृपाळ वागला । सागरमेखला भूमी भोगी ॥ ४॥
देवर्षीचा बोध ऐकूनी अपूर्व । चित्तीं वासुदेव स्फूर्ति पावे ॥ ५ ॥

अध्याय ६–७ वा

२९

धर्म म्हणे मान्या पूर्वजांसमान । ठेविलें वर्तन यथाशक्ति ॥ १ ॥
सर्वथा त्यांसम शक्य नच होई । इच्छा मात्र पाहीं तेचि नित्य ॥ २ ॥
मुनिश्रेष्ठा तुझा संचार त्रिलोकीं । पाहिलीस ऐसी सभा कोठें ॥ ३ ॥
मुनि म्हणे ऐसी नसे या भूलोकीं । बहु अन्य लोकीं कथितों ऐकें ॥४॥
कुंतीपुत्रा शक्रसभेचें वर्णन । सार्धशत योजन विस्तीर्ण ते ॥ ५ ॥
जराशोकभयनाशक ती सभा । लक्ष्मी शची शोभा इंद्रासवें ॥ ६ ॥

देव सिद्ध साध्य इंद्रातें सेविती । यश-नय-कीर्तियुक्त इंद्र ॥ ७ ॥
पराशरादिक सोमयाजी मुनि । बैसती त्या स्थानीं आनंदानें ॥ ८ ॥
नृत्यगीतीं रत गंधर्व अप्सरा । नित्य गुरु शुक्रां वास तेथें ॥ ९ ॥
'पुष्करमालिनी' सभा ते इंद्राची । वासुदेव कथी नारदवच ॥१०॥

अध्याय ८–९ वा

३०

इंद्रसभेहूनी श्रेष्ठ यमसभा । शोक जरा क्षुधा हरती तेथें ॥ १ ॥
दिव्य मानुष ते विषय लाभती । कल्पवृक्ष देती इष्ट फळ ॥ २ ॥
ययाति, नहुष, पुरु, तो मांधाता । ऐशा पुण्यवंतां मान तेथें ॥ ३ ॥
वरुणसभेसी रत्नमय वृक्ष । शुभ्र नील पीत लता बहु ॥ ४ ॥
माध्वीसह शोभे वरुण त्या स्थानीं । वली, संन्हादांनीं परिवेष्टित ॥५॥
गंगा-यमुनादि सागरहि तैसे । वसती स्वरूपें सभेमाजी ॥ ६ ॥
रम्य कथा गाती मूर्तिमंत रस । आनंद चित्तास वासुदेवा ॥ ७ ॥

अध्याय १० वा

३१

कुबेराची सभा वर्णितों मी आतां ॥ बर्फासम तिचा धवल वर्ण ॥ १ ॥
दरवळे नित्य सुगंध त्या ठाईं । स्त्रियांसह राही वैश्रवण ॥ २ ॥
वायु डोलवितो मंदार वृक्षासी । भेटे कुबेरासी साक्षात् शिव ॥ ३ ॥
भगदत्तादिक वास्तव्य करीती । भेटे बांधवासी बिभीषण ॥ ४ ॥
दिव्यरूपधारी हिमवानादिक । शोभती पर्वत सभेमाजी ॥ ५ ॥
सर्वनिधींमाजी श्रेष्ठ शंख पद्म । करिती वंदन धनेश्वरा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे नारद वर्णिती । सभा कुबेराची ऐशा रीती ॥ ७ ॥

अध्याय ११ वा

३२

ब्रह्मसभा राया वर्णवेना मज । बोलती नारद हर्षभरें ॥ १ ॥

---

१ कुबेरास.

जितेंद्रिय प्रार्थी कोणी हृदयस्था । लाभ दर्शनाचा तया घडे ॥ २ ॥
आदित्यवचनें वैसलों तपासी । इडासूर्यभेदी मार्ग असे ॥ ३ ॥
क्षणांत कैलास क्षणांत वैकुंठ । ऐसें तिचें रूप अलौकिक ॥ ४ ॥
शीत-उष्ण-साम्य-सुखाचें निधान । क्षुधा तृषा जाण नसे तेथें ॥ ५ ॥
स्वयंप्रकाशें त्या सूर्यहि दिपतो । ब्रह्मा विनिर्मितो सृष्टीलागीं ॥ ६ ॥
पुण्यवंत बहु नांदती त्या ठाईं । त्रैलोक्यांत नाहीं तैसी सभा ॥ ७ ॥
धर्मा मृत्युलोकीं सभा हे अपूर्व । वंदी वासुदेव मुनिपाय ॥ ८ ॥

## अध्याय १२ वा

### ३३

यमाच्या सभेंत भूपाल बहुत । वरुणसभेंत नाग नद्या ॥ १ ॥
राक्षस गुह्यक कुबेरसभेतें । मूर्तिमंत शास्त्रें ब्रह्मस्थानीं ॥ २ ॥
इंद्रसभेमाजी हरिश्चंद्र नृप । जाणावा विख्यात एकमेव ॥ ३ ॥
धर्म म्हणे काय पुण्य त्या नृपाचें । आमुच्या पित्यातें देखिलें कीं ॥ ४ ॥
मुनि म्हणे वीर हरिश्चंद्र राजा । जिंकी सप्तद्वीपा-वसुंधरा ॥ ५ ॥
राजसूय तेणें आरंभिला यज्ञ । वाढपी तैं जाण झाले नृप ॥ ६ ॥
मागती त्याहूनी पांच पट धन । याचकां अर्पून तुष्ट करी ॥ ७ ॥
विप्र आशीर्वादें सम्राट जाहला । आनंद पावला वासुदेव ॥ ८ ॥

### ३४

राजसूयकर्ता इंद्रासह वैसे । पांडु म्हणे माझे तनय पांच ॥ १ ॥
राजसूय यज्ञ करावा तयांनीं । तरीच सन्मानी इंद्र मज ॥ २ ॥
मुनि म्हणे ऐसा निरोप पित्याचा । सुखालागीं त्याच्या कथिला तुज ॥
कष्टसाध्य असे यज्ञ तो नृपाळा । संकटें तयाला असती बहु ॥ ४ ॥
चिंतूनियां मनीं हित तेंचि करीं । राहूनी अंतरीं धर्मनिष्ठ ॥ ५ ॥
ऐसें बोलूनियां नारद देवर्षि । गेले द्वारकेसी आनंदानें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे युधिष्ठिर राव । चिंती राजसूय कैसा घडे ॥ ७ ॥

—०—

# राजसूयारंभपर्व ३

## अध्याय १३ वा

३५

' धन्य धर्मराज ' एकचि हा शब्द । प्रजेच्या मुखांत वसतसे ॥ १ ॥
पित्यासमान तो पालक प्रजेचा । उदारवृत्तीचा महाराजा ॥ २ ॥
' अजातशत्रु ' हें सार्थ अभिधान । पाहूनी सद्गुण प्रेम त्यासी ॥ ३ ॥
धर्माचें वात्सल्य, पालन भीमाचें । शौर्य अर्जुनाचें ख्यात होई ॥ ४ ॥
सहदेव-वीर स्वधर्माचा शास्ता । अहो सुजनता नकुलाची ॥ ५ ॥
ऐशा सद्गुणांनीं प्रजा सुखी होई । कलह न राही औषधासी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धनधान्यवृद्धि । होई शुद्ध बुद्धि सकलांची ॥ ७ ॥

३६

धर्मराज्य लोकां सुखद जाहलें । दारिद्र्य पळालें दूरदेशीं ॥ १ ॥
दारिद्र्यें जे कोणी नाडले तयांसी । धनिक ऋणासी मागेचिना ॥ २ ॥
चोर-वंचकाग्निभय न कोणासी । कोणीही विरोधी राव नसे ॥ ३ ॥
सर्वकार्यामाजी प्रजा अनुकूल । सर्वदा नृपाळ क्षमाशील ॥ ४ ॥
नीतिशिक्षणादि पितृकार्य करी । वात्सल्यादि करी भ्रातृकार्य ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे प्रजा अनुरक्त । सद्गुणमंडित राजावरी ॥ ६ ॥

३७

मंत्री बंधु बांधवांसी । धर्म पितृवचन कथी ॥ १ ॥
सकल म्हणती व्हावा यज्ञ । करुनी धर्माचें वर्णन ॥ २ ॥
पुशी धौम्य द्वैपायना । तेही देती अनुमोदना ॥ ३ ॥
सकल बंधु हर्षभरें । साह्यालागीं सिध्द झाले ॥ ४ ॥
धर्म चिंती श्रीहरीसी । दूत धाडी द्वारकेसी ॥ ५ ॥
इंद्रसेनासह हरी । आला इंद्रप्रस्थपुरीं ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्म । हर्षें कृष्णासी भेटून ॥ ७ ॥

३८

धर्म म्हणे जनार्दना । राजसूयाची कामना ॥ १ ॥
तुझ्या संमतीवांचून । कार्य न घडे हें जाणून ॥ २ ॥
सुहृद्भावें कार्यदोष । जनीं न दिसती कोणास ॥ ३ ॥
कोणी स्वार्थें वदती प्रिय । सुख कोणा प्रिय होय ॥ ४ ॥
रागद्वेषरहित कृष्णा । अचुक मार्ग दावी आम्हा ॥ ५ ॥
परमहित सांगे देव । ऐका म्हणे वासुदेव ॥ ६ ॥

अध्याय १४ वा

३९

मुख्यमल्लनिबर्हण । न्याय थोर म्हणे कृष्ण ॥ १ ॥
जरासंध प्रबल वीर । सार्वभौम तो नरेंद्र ॥ २ ॥
त्याच्या भयें द्वारकेसी । गेलों त्यागूनी मथुरेसी ॥ ३ ॥
स्वयें आपणा सम्राट । मानी बळी तो वरिष्ठ ॥ ४ ॥
हंस डिंभकादि वीर । करुष, करभ दंतवक्र ॥ ५ ॥
शब्द झेलिती तयाचा । पुरुषोत्तम पौंड्रक राजा ॥ ६ ॥
नामधारी ‘ वासुदेव ’ । जरासंधासी ते साह्य ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे राजे । भयें त्यागिती स्थानातें ॥ ८ ॥

४०

जरासंध कन्या ‘अस्ति’ ‘प्राप्ति’ दोघी । कंसासी वरिती युधिष्ठिरा ।१।
आहूकाची कन्या अक्रूरासी दिली । भोजांनीं हे केली युक्ति मोठी ॥
जातिहितास्तव वधिलें कंसातें । जरासंध क्रोधें युद्ध करी ॥ ३ ॥
वर्ष शतत्रय-तुल्य अब्दें तीन । झुंजतां न जाण विजय आम्हां ।४।
अजिंक्य तयाचे मंत्री दोघे वीर । वृत्त परस्पर कथितां मेले ॥ ५ ॥
हंस नामें कोणा नृपा राम वधी । दुःखें यमुनेमाजी डिंभक शिरे ॥६॥

१ या नांवाचा राजा होता.

डिंभकाचें वृत्त ऐकूनियां हंस । यमुनाजळांत प्राण देई ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे दुःखी जरासंध । ससैन्य मगधदेशीं गेला ॥ ८ ॥

४१

पित्यालागीं कन्या म्हणती सूड घेईं । कृष्णासी पाठवीं यमलोकीं ॥१॥
वृत्तांत ऐकूनी चिंतिलें सर्वांनीं । मथुरा सोडूनी गेलों दुःखें ॥ २ ॥
रैवतासन्निध रम्य कुशस्थली । नगरी पाहिली पुरातन ॥ ३ ॥
बांधिला त्या स्थानीं दुर्गहि अभेद्य। स्त्रिया जेथ युद्ध करिती सुखें ॥४॥
न घडावा नाश आमुचिया हस्तें । म्हणोनी पुरातें त्यागियेलें ॥ ५ ॥
लांब रुंद मोठी द्वारकानगरी । वीर शस्त्रधारी सज्ज तेथें ॥ ६ ॥
वीर अष्टादश सहस्र कुळांत । स्मरती ते नित्य मथुरा मनीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे शिवाच्या प्रसादें । वीर जरासंधें बंदी केले ॥ ८ ॥

४२

जरासंध भयें सोडिली मथुरा । यज्ञ जरी पुरा व्हावा मनीं ॥ १ ॥
जरासंधवध प्रथम उचित । क्षत्रिय ते मुक्त करीं आधीं ॥ २ ॥
ऐसें माझें मत कथिलें तुजसी । चितूनी मनासी तैसा वागें ॥ ३ ॥
वासुदेव म्हणे ऐसें वदे कृष्ण । ऐकूनियां धर्म चिंता करी ॥ ४ ॥

## अध्याय १५ वा

४३

द्वारकेरच्या नाथा बुद्धीच्या सागरा । तुजविण उदारा बोध कोठें ॥
अन्यांसी तुळितां श्रेष्ठता जयाची । तोचि थोर जगीं मान्य लोकां ॥२॥
आपुल्याच स्वार्थें घरोघरीं राव । साम्राज्याचें श्रेय नसे कोणा ॥ ३ ॥
दुर्लभ या जनीं सम्राट पदवी । पौढी न करावी व्यर्थ स्वयें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे चित्त सर्वकाळ । आशा अमंगळ करीतसे ॥ ५ ॥

४४

मानव सर्वदा वासनाव्याकुळ । नेणें बलाबल अहंपणें ॥ १ ॥
प्रत्यगात्मरूप बुद्धि पराकाष्ठा । पावे, तदा काष्ठा गति लाभे ॥ २ ॥

आसक्ति सर्वदा स्वभाव नराचा । दुष्प्राप्य वस्तूचा ध्यास धरी ॥३॥
धर्म म्हणे कृष्णा राजसूय सिद्धि । अशक्य हें, वुद्धि सांगे मज ॥ ४ ॥
अजिंक्य जो वीर असे केशवासी । कैसा तो आम्हासी जेय होई ॥
वासुदेव म्हणे पांडवांसी कृष्ण– । वचन प्रमाण सर्व काळ ॥ ६ ॥

४५

भीम म्हणे नाश कर्तव्यहीनाचा । तैसा दुर्बलाचा हीनोपायें ॥ १ ॥
उपाय योजितां दुर्बलहि बळी । होऊनी सुवेळीं विजय पावे ॥ २ ॥
कृष्ण-भीम-पार्थ, नीति-बळ-जय । ऐसा समन्वय नित्य असे ॥ ३ ॥
अग्नित्रय जेंवी इष्टि साधीतले । तेंवी मगधातें जिंकूं आम्हीं ॥ ४ ॥
कृष्ण म्हणे अज्ञ परिणाम न पाही । अज्ञाचें तें नाहीं भय ज्ञात्या ॥५॥
मांधाता प्रभृति पंच साधनांनीं । सम्राट होऊनी सुखी झाले ॥ ६ ॥
जय, पालन तें तपोवल नीति । पंचम ते ऋद्धि साधनें हीं ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे एकेक इतरां । सर्व युधिष्ठिरा अनुकूल ॥ ८ ॥

४६

पालन मध्यम साम्राज्यलक्षण । भगीरथा धर्म साह्य होता ॥ १ ॥
कार्तवीर्यामाजी धर्म आणि योग । मरुत्तासी चांग ऐश्वर्य तें ॥ २ ॥
नीति वल मोठें लाभलें भरता । बृहद्रथसुता विजयचिन्ह ॥ ३ ॥
शतावधि वीर प्रतिकूळ त्यासी । जरासंध जिंकी परी तयां ॥ ४ ॥
पंच साधनानीं साम्राज्याची इच्छा । करिसी परी तुझा वैरी थोर ॥
जरासंध जरी धर्मादिक युक्त । असता तरी दुःख नव्हतें आम्हां ॥६॥
वलात्कारें गांजी मगध नृपांसी । शिवालयामाजी बांधी तयां ॥७॥
वासुदेव म्हणे अष्टाशीति नृप । आणी संकटांत ऐशा रीतीं ॥ ८ ॥

४७

पूर्ण होतां शतसंख्या । हेतु मनीं वलिदानाचा ॥ १ ॥
धर्मा व्हावा दुष्टवध । निर्दय तो जरासंध ॥ २ ॥
वांचवील जो नृपांसी । लाभे साम्राज्य तयासी ॥ ३ ॥
गाजे यश त्रिभुवनीं । ऐसी श्रीकृष्णाची वाणी ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे धन्य । निजधर्मी जो अनन्य ॥ ५ ॥

## अध्याय १६ वा

### ४८

धर्म म्हणे कैंवी लोटूं संकटांत । होऊनी स्वार्थांध सकळांसी ॥ १ ।
नेत्र भीमार्जुन मन तूं माधवा । यज्ञ राहूं द्यावा ऐसें वाटे ॥ २ ॥
सर्वसंगत्याग घडावा अच्युता । निरंतर इच्छा हेचि मनीं ॥ ३ ॥
ऐकूनियां पार्थ म्हणे मी समर्थ । साह्य यदुनाथ असे जरी ॥ ४ ॥
उत्साहचि एक श्रेयस्कर वाटे । बलावीण खोटे यत्न सर्व ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे उत्साहें विक्रम । करितां सामान्य तोहि श्रेष्ठ ॥ ६ ॥

### ४९

उत्साह, अनुकूल दैव, हीं कारणें । विजयार्थ जाणें नृपश्रेष्ठा ॥ १ ॥
अनवधानें जरी प्रमाद घडेल । नाशचि पावेल वीरही तो ॥ २ ॥
दैन्य मोह दोन्ही त्यागितां विजय । जनीं प्राप्त होय बळिवंता ॥ ३ ॥
जरासंध वधें मुक्तता नृपांची । होतां काय तुझी अन्य इच्छा ॥ ४ ॥
गांडीवासमान चाप, कृष्ण साह्य । असतां अजेय कोण आम्हां ॥ ५ ॥
आरंभावांचोनी यशलाभ कैसा । संन्यास मुनींचा मार्ग राया ॥ ६ ।
वासुदेव म्हणे पार्थ कथी धर्मा । वधोनी दुर्जना यज्ञ साधूं ॥ ७ ॥

## अध्याय १७ वा

### ५०

यदुनाथ म्हणे पार्थाचें वचन । कुळासी भूषणभूत असे ॥ १ ॥
युध्द टाळूनियां अमर न कोणी । आजवरी जनीं ऐकीयेला ॥ २ ॥
नीतिन्यायास्तव युध्द योग्य असे । संतोष चित्तातें तेणें होई ॥ ३ ॥
अनुकूल दैव मंत्र हीं विशुध्द । तयालागीं युध्द विजय दायी ॥४॥
समसमांलागीं संदेह जयाचा । मार्ग निर्णयाचा युध्दचि तैं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सामर्थ्य संदेहें । स्वस्थ राहूं नये विजयेच्छूनें ॥ ६ ॥

### ५१

नीतिशून्य तेंवी उपाय विहीन । सत्य सत्य जाण नाश त्याचा ॥ १ ॥
जरासंधालागीं समान लेखिसी । परी उत्कर्षासी पक्ष तुझा ॥ २ ॥

मंत्रबळें जातां सान्निध तयाच्या। सरिता जैंवी वृक्षा तैंवी नाश ॥३॥
येणें मार्गें आम्हां विजय लाभेल। अन्यथा घडेल स्वर्गप्राप्ति ॥ ४ ॥
धर्म म्हणे कैसा जरासंध बळी। उत्पत्ति ते झाली कैसी कृष्णा ॥५॥
वासुदेव म्हणे कृष्ण कथीतसे। युधिष्ठिर ऐके वृत्त सर्व ॥ ६ ॥

५२

मगधदेशाचा राजा बृहद्रथ। यज्ञ दीक्षांकित नित्य असे ॥ १ ॥
अक्षौहिणी त्रय अजिंक्य सैन्याचा। स्वामी तेजस्विता सूर्यासम ॥२॥
कुबेरासमान वैभव तयाचें। वर्णिती तयातें अवघे जन ॥ ३ ॥
कन्या वरी जुळया तो काशिराजाच्या। आधार वंशाचा न लाभेचि ॥
चंडकौशिक तो गौतमाचा सुत। उपवनीं येत यदृच्छेनें ॥ ५ ॥
संतुष्ट तयासी बृहद्रथ करी। मुनि म्हणे वरीं वर नृपा ॥ ६ ॥
काय मागूं म्हणे निराश तो राव। वृत्त वासुदेव पुढती कथी ॥ ७ ॥

५३

ऐकूनियां मुनि स्तब्ध क्षणभरी। होतां,अंकावरी आम्रफल–॥ १ ॥
अक्षत, शुकानें आणोनी टाकिलें। नृपासी अर्पिलें अभिमंत्रूनी॥ २॥
वंदूनी मुनीतें राव स्वगृहासी। येवोनी कांतांसी देई फल ॥ ३ ॥
अर्ध अर्ध प्रेमें दोघींनीं भक्षिलें। गर्भही राहिले तयांलागीं ॥ ४ ॥
योग्यकाल येतां होतसे प्रसूति। शकलेंचि होती बालकाचीं ॥ ५ ॥
उद्विग्न चित्तानें फेंकिलीं बाहेरी। राक्षसी तैं आली 'जरा' नामें ॥ ६॥
वासुदेव म्हणे सहज जोडितां। पाहूनी बालका चकित होई ॥ ७ ॥

५४

बळिवंत वज्रासम। बाळ करी तो रुदन ॥ १ ॥
न उचले राक्षसीतें। आले जन त्या स्थळातें ॥ २ ॥
जरा म्हणे नृपाळासी। घेंई आपुल्या पुत्रासी ॥ ३ ॥
दाया टाकूनियां गेल्या। सांभाळिलें मी तयाला ॥ ४ ॥
माता प्रेमें तया घेती। पान्हा नावरे तयांसी ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे वृत्त। पुशी नृपाळ जरेस ॥ ६ ॥

## अध्याय १८ वा

### ५५

जरा म्हणे मी राक्षसी । सदनीं तुझ्या पूजा माझी ॥ १ ॥
नाम माझें ' गृहदेवी ' । पूजिताती भित्तीवरी ॥ २ ॥
दानवांच्या विनाशार्थ । मज पूजिताती नित्य ॥ ३ ॥
सदनीं पाहूनियां पूजा । पुत्र अर्पितें मी तुझा ॥ ४ ॥
कथुनी ऐसें गुप्त झाली । नेती पुत्रासी मंदिरीं ॥ ५ ॥
करिती उत्सव जरेचा । नांव ' जरासंध ' सुता ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे हर्ष । नगरीं न मावे गगनांत ॥ ७ ॥

## अध्याय १९ वा

### ५६

पुनरपि मुनि नगरासी येतां । अर्पी राज्य सुता बृहद्रथ ॥ १ ॥
मुनि म्हणे तुझा पुत्र भाग्यवान । अजिंक्य तो जाण सकल भूपां ॥२॥
सरिता सिंधूसी तैसे हे नृपती । आपुली संपत्ती अर्पितील ॥ ३ ॥
लाभेल दर्शन यासी शंकराचें । वचन तूं माझें सत्य जाण ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे संतुष्ट नरेंद्र । अर्पी राज्यभार जरासंधा ॥ ५ ॥

### ५७

भार्यासह गेला बृहद्रथ वनीं । रत निजकर्मीं जरासंध ॥ १ ॥
अंकित तयाच्या सर्वही नृपाळ । वनीं तो भूपाळ स्वर्गवासी ॥२॥
कृष्ण म्हणे माझा पुढती वैरी होई । कंसवधें पाही जरासंध ॥ ३ ॥
एकोनशतदां गदा फिरवोनी । दिधली फेंकोनी मथुरेसी ॥ ४ ॥
हंस डिंभक ते मंत्री मगधाचे । अमर शस्त्राघातें वरलाभ ॥ ५ ॥
वृत्त कथियेलें पूर्वींच तयांचें । स्पर्धा बलवंतातें करूं नये ॥ ६ ॥
ऐसें जाणूनियां कुकुर, अंधक । राहिले तटस्थ तया वेळीं ॥ ७ ॥
राजसूयारंभ समाप्त हें पर्व । म्हणे वासुदेव भारताचें ॥ ८ ॥

---

# जरासंधवधपर्व ४

## अध्याय २० वा

### ५८

कृष्ण म्हणे युधिष्ठिरा। समय ओळखीं नरवरा॥ १॥
हंस डिंभकांचा नाश। मृत्यु पावलासे कंस॥ २॥
एकाकी तो जरासंध। जिंकूं तयासी सहज॥ ३॥
द्वंद्व युध्दासी पाचारूं। ऐसे त्याचे प्राण हरूं॥ ४॥
करीं स्वाधीन बांधव। लवही न धरितां भय॥ ५॥
वासुदेव म्हणे धर्म। झाला प्रफुल्ल वदन॥ ६॥

### ५९

धर्म म्हणे देवा नाथ तूं आमुचा। दाविसील पंथा तैसे वागूं॥ १॥
दैवहीनालागीं साह्य न हरीचें। यज्ञ हा सिध्दीतें गेला माझा॥ २॥
विलंब त्यजूनी कार्यारंभ करीं। प्रेम पार्थावरी अतुल तुझें॥ ३॥
सैनिक सर्वदा असती अज्ञान। कुशल धूरीण मिळतां जय॥ ४॥
भूमि अनुकूल लाभतां सलिल। वाहे खळखळ तैसें सैन्य॥ ५॥
सैन्य बळाहूनी नीतिबळ श्रेष्ठ। नीति विशारद गोविंदा तूं॥ ६॥
वासुदेव म्हणे बुध्दि, नीति, बल,। साधनें सकल कृष्णापाशीं॥ ७॥

### ६०

यदुश्रेष्ठा तुझा अनुयायी पार्थ। भीम अनुगत पार्था होवो॥ १॥
तेणें नीति जय बल एकरूप। होऊनी, कृतार्थ कृष्णा आम्ही॥ २॥
नृपाळवचनें वीर ते निघाले। स्नातक जहाले ब्रह्मनिष्ठ॥ ३॥
दंड कमंडलू धारण करूनी। क्रोधाकुल मनीं क्रमिती मार्ग॥ ४॥
चंद्र-सूर्य-अग्निसमान ते वीर। पाहूनी नृपाळ हर्ष पावे॥ ५॥
कृष्णार्जुन दोघे नारायण नर। इष्ट देशीं शूर प्राप्त झाले॥ ६॥
गोरथावरूनी[१] अवलोकिती देश। अंतरीं उत्सुक वासुदेव॥ ७॥

---

१ पर्वताचें नांव,

## अध्याय २१ वा

### ६१

कृष्ण म्हणे पहा शोभा मगधाची । गिरी वैराहादि[1] पंच एथें ॥ १ ॥
गिरिव्रजपुर रक्षिती हे गिरी । मुनि 'औशीनरी' वसती एथें ॥ २ ॥
लोध्र पिप्पलांची पहा वनराजी । अर्बुद शक्रवापी वसती सर्प ॥ ३ ॥
अवर्षण कदा न पडे या स्थानीं । रचना हे ध्यानीं येई ऐसी ॥ ४ ॥
जरासंध एथें वास करी नित्य । हरूनियां दर्प जाऊं त्याचा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे मगधपुरासी । चैत्यक बुरुजासी अवलोकिती ॥ ६ ॥

### ६२

वृषाकार दैत्य वधोनी, दुंदुभि- । केले तीन, नभीं नाद गाजे ॥ १ ॥
नाद मास एक घुमती जयांचे । फोडूनी तयांतें पुढती गेले ॥ २ ॥
सशस्त्र दूतांसी निवारूनि गेले । शिखर पाडिलें बाहूबळें ॥ ३ ॥
पूज्य जें मगधा, शिरले नगरांत । दुश्चिन्हें विप्रांस होती तदा ॥ ४॥
पर्यग्निकरण[2] नृपाळाचें केलें । व्रत स्वीकारीलें जरासंधें ॥ ५ ॥
उपवासी राव दीक्षित जाहला । वीर तैं द्वंद्वाला सिद्ध होती ॥६॥
वासुदेव म्हणे गळां पुष्पमाळा । घालूनी नृपाला शोधिती ते ॥ ७ ॥

### ६३

वाटे विस्मय जनांसी । पाहूनियां भाग्यराशी ॥ १ ॥
ओलांडूनी तीन चौक । आले नृपाच्या समीप ॥ २ ॥
केलें स्वागत तयांचें । मौन भीम अर्जुनातें ॥ ३ ॥
कृष्ण म्हणे स्नातक व्रती । बोलताती मध्यरात्रीं ॥ ४ ॥
रात्रौ राजसंध भेटे । वेषें तया नवल वाटे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे नृप । पुशी कासया हा वेष ॥ ६ ॥

---

१ वैराह, वराह, वृषभ, ऋषि, आणि चैत्यक हे पांच गिरी नगराभोवतीं होते. २ ज्वलदर्भ तीन वेळां भोंवतीं फिरविणें.

६४

वेषधारी ऐसे ओळखूनी नृप । बोलला स्नातक नव्हे तुम्हीं ॥ १ ॥
भुज 'किणी' होते धनुष्यधारणें । क्षत्रियांचीं चिन्हें दिसती स्पष्ट ॥२॥
गंधमालाधारी कोण तुम्हीं सांगा । वरिलें आडमार्गा कालयासी ॥३॥
कृष्ण म्हणे माला विजयाचें चिन्ह । यास्तव धारण केल्या आम्ही ॥४॥
बाहूमाजी वल वसे क्षत्रियाचें । जाती आडमार्गें अरिगृहीं ॥ ५ ॥
नको हा सत्कार हेतु पुरवावा । वासुदेव देवा शरण नित्य ॥ ६ ॥

अध्याय २२ वा

६५

वैर न करीं मी तुम्हांसी । नसे तुमचा मी अपराधी ॥ १ ॥
श्रेष्ठ क्षात्रधर्म माझा । सांभाळितों सर्व प्रजा ॥ २ ॥
कृष्ण म्हणे हे नृपाळा । कोंडिलेंसी तूं भूपाळां ॥ ३ ॥
रुद्रालागीं त्यांचा बळी । द्यावा हेतु हा अंतरीं ॥ ४ ॥
वध्य यालागीं तूं आम्हां । मुक्त करूं नृपाळांनां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे हरि । मुक्त बद्धांलागीं करी ॥ ६ ॥

६६

आचरण तैसें रक्षण धर्माचें । करावया साचे सिद्ध आम्हीं ॥ १ ॥
आजवरी कोणी क्षत्रियांचा बळी । मात ही ऐकिली नाहीं कदा ॥२ ॥
उलंघूनी धर्म तोषवीसी शिवा । कर्माचा भोगावा भोग आतां ॥ ३ ॥
आर्तत्राणालागीं धांव घेतों आम्हीं । ज्ञातिक्षय जगीं करिसी मूढा ॥ ४॥
प्राप्त आम्हीं झालों ज्ञातिवृद्धीस्तव । म्हणे वासुदेव ज्ञाति रक्षा ॥ ५ ॥

६७

अजिंक्य आपणा मानिसी भ्रमानें । क्षत्रिय युद्धानें इच्छी स्वर्ग ॥ १ ॥
वेद, यश, तप, मृत्यु समरांत । स्वर्गलाभ यांत धार्मिकासी ॥ २ ॥

---

१ घट्टे

श्रेष्ठ आम्हांपाशीं असे बाहुबळ । दर्प तो सकळ सोडीं आतां ॥ ३ ॥
हृषीकेश शौरी जाणें मज राया । पार्थ-भीमासी या ओळखावें ॥४॥
मुक्त करीं नृपां अथवा युद्ध वरीं । स्पष्ट सांगे हरि तयालागीं ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे देऊनी आव्हान । धर्मयुद्ध कृष्ण करीं म्हणे ॥ ६ ॥

६८

जिंकूनियां बध्द केले । कृष्णा जरासंध बोले ॥ १ ॥
क्षात्रधर्मासी त्यजूनी । सोडूं कैसे त्यां भिऊनी ॥ २ ॥
होतों युद्धालागीं सिद्ध । शस्त्र सैन्य अथवा द्वंद्व ॥ ३ ॥
एक, दोघे अथवा तीन । एकावेळीं करा रण ॥ ४ ॥
सुत सहदेवा राज्य । अर्पूनियां होई सिद्ध ॥ ५ ॥
झालें स्मरण मंत्र्यांचें । कृष्ण विचारी स्वमनानें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भीम । सज्ज भविष्य जाणून ॥ ७ ॥

अध्याय २३ वा

६९

कृष्ण म्हणे युद्ध करिसी कोणासवें । येरु म्हणे व्हावें सिद्ध भीमें ॥१॥
जय पराजय होवो वीरहस्तें । बोलूनी द्वंद्वातें सिद्ध झाला ॥ २ ॥
गोरोचन, पुष्पें, दुःखमूर्च्छाहारी । वनस्पतिधारी, होई राजा ॥ ३ ॥
पराक्रमी राव धांवे भीमावरी । आनंद अंतरीं उभयांलागीं ॥ ४ ॥
परस्परांप्रती वंदूनी भिडले । दंड थोपटिले उत्साहानें ॥ ५ ॥
स्कंधावरी ठोंसे देती एकमेक । परस्परां घट्ट आंवळीती ॥ ६ ॥
पादप्रहार तीं हस्ताचीं ताडनें । हस्त पिळवटणें गर्जनेसी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे प्रबल बाहूपाश । असह्य जनांस उभयांचे ते ॥ ८ ॥

७०

युध्द घोर त्या वीरांचें । मल्लविद्या प्रवीणांचें ॥ १ ॥
जन अपार लोटले । पाहूनियां थक्क झाले ॥ २ ॥
हस्त पाद तेंवी मान । ओढिताती पिरगळून ॥ ३ ॥
करिती मर्मावरी घात । गिरिवरी जैसें वज्र ॥ ४ ॥

ओढिताती एकमेकां । मागें रेंटिताती लोकां ॥ ५ ॥
कार्तिकाची पंचम तिथि । तेथूनियां त्रयोदशी ॥ ६ ॥
अहोरात्र युध्द चाले । वासुदेव कंप पावे ॥ ७ ॥

७१

श्रांत जरासंध चतुर्दश दिनीं । कृष्ण हें जाणूनी वदला भीमा ॥ १ ॥
श्रांत शत्रूलागीं बहुत पीडितां । त्याजितो सर्वथा प्राणांलागीं ॥ २ ॥
यालागीं हे भीमा सह्य जें होईल । ऐसेंचि कौशल्य दावीं आतां ॥ ३ ॥
भीम जरासंधा पाहूनियां क्लांत । सज्जला वधार्थ निश्चयानें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे आणूनी आवेश । अजिंक्यवीरास मारूं पाहे ॥ ५ ॥

अध्याय २४ वा

७२

भीम म्हणे देवा कठिण हें काज । कृष्ण म्हणे तेज प्रगट करीं ॥ १ ॥
वायूचा प्रभाव दावीं ऐशा वेळीं । एकतांचि वळी त्वरा करी ॥ २ ॥
उचलूनि वेगें गरगरां फिरवी । भूमीसी आदळी मोडी कणा ॥ ३ ॥
पायावरी पाय ठेऊनियां अन्य । स्वकरें धरून फाडी देह ॥ ४ ॥
भीषण त्या नादें लोक भयाभीत । मृत जरासंध द्वारीं पडे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कृष्ण जोडी रथ । पातला त्वरित नृपांजवळी ॥ ६ ॥

७३

सोडवीतां नृपाळांसी । हर्ष अंतरीं कृष्णासी ॥ १ ॥
आनंदित सकळ नृप । रत्नें देती अमोलिक ॥ २ ॥
भीमार्जुन रथामाजी । हांकीतसे कृष्ण वाजी ॥ ३ ॥
इंद्र अर्पी जो वसूतें । मेळविला बृहद्रथें ॥ ४ ॥
त्याचि रथावरी वीर । स्मरतां गरुड ध्वजावर ॥ ५ ॥
सम प्रदेशासी येतां । हर्ष अपार त्या नृपां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे राजे । करिती पूजन कृष्णाचें ॥ ७ ॥

७४

राजे म्हणती वासुदेवा । थोर उपकार देवा ॥ १ ॥
करी आज्ञा क्लेशमुक्तां । हरिली आमुची तूं चिंता ॥ २ ॥
कृष्ण म्हणे त्या वीरांसी । साह्य करावें यज्ञासी ॥ ३ ॥
सकल राजांसी तें मान्य । शरण कृष्णासी अनन्य ॥ ४ ॥
राज्य जरासंधसुता । अर्पूनियां, इंद्रप्रस्था ॥ ५ ॥
प्राप्त झाले, वासुदेव । म्हणे कथा ऐका नव ॥ ६ ॥

७५

कृष्ण म्हणे धर्मा ऐकें ही सुवार्ता । वधिलें जरासंधा वृकोदरें ॥ १ ॥
सोडवूनी नृपां आलों आनंदानें । आलिंगिलें प्रेमें धर्में तयां ॥ २ ॥
युधिष्ठिरालागीं वंदिती नृपाळ । अनुज्ञा सकळ घेती सौख्यें ॥ ३ ॥
भेटूनी आप्तांसी द्वारकेसी गेला । कृष्ण, तैं धर्माला दुःख बहु ॥ ४ ॥
लौकिक वाढला धर्माचा सर्वत्र । प्रजापालनांत दक्ष सदा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे धर्म-अर्थ-काम । अनुकूल जाण धर्मालागीं ॥ ६ ॥

---

## दिग्विजयपर्व ५

### अध्याय २५ वा

७६

दिव्य आनंदसंयुक्त । नित्य उत्साही तो पार्थ ॥ १ ॥
एक पाहूनी शुभ दिन । म्हणे कोश वाढवीन ॥ २ ॥
स्वस्तिवाचन करूनी । धर्म आनंदला मनीं ॥ ३ ॥
म्हणे दुर्जनांसी दुःख । होवो सज्जनां आनंद ॥ ४ ॥
चारी बंधु चारी दिशा । जिंकूं ऐसी धरिती इच्छा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे पार्थ । हर्षें गेला उत्तरेस ॥ ६ ॥

## अध्याय २६—२७ वा

### ७७

जिंकूनी कुलिंद आनर्त्तासी गेला। कालकूट केला पादाक्रांत ॥१॥
शाकल तैं सप्तद्वीपें जिंकेयेलीं। भगदत्तावरी चाल करी ॥ २ ॥
अष्टदिन झाला दारुण संग्राम। खंडणी घेऊन पुढती गेला ॥ ३ ॥
उत्तरेसी गेला उलूक देशांत। प्रबल बृहन्त राव तेथें ॥ ४ ॥
घनघोर युध्द केलें बृहन्तानें। जिंकिलें पार्थानें अंतीं त्यासी ॥ ५ ॥
सेनाबिंदु, वन्यदेश, तैं काश्मीर। ऋषिक उत्तरदेशीं जाई ॥ ६ ॥
जिंकूनियां गेला श्वेत गिरीवरी। वासुदेव करी कथन वृत्त ॥ ७ ॥

## अध्याय २८ वा

### ७८

गुह्यक रक्षित हाटकदेशासी। जिंकूनीं मांनसीं गेला पार्थ ॥ १ ॥
गंधर्वांचा देश जिंकूनियां जाई। हरिवर्ष पाही पुढती वीर ॥ २ ॥
द्वारपाल देती खंडणी तयासी। गति न पुढती म्हणती नरां ॥ ३ ॥
आजिनें भूषणें कौशेयादि वस्त्रें। स्वीकारूनि वीरें अभय दिलें ॥ ४ ॥
अपार संपत्ति अर्पिली धर्मासी। उत्तर दिशेसी जिंकूनियां ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे निज मंदिरांत। धर्माज्ञेनें पार्थ राही सुखें ॥ ६ ॥

## अध्याय २९—३० वा

### ७९

जिंकी पूर्वदिशा वीर वृकोदर। दाशार्णासी घोर युद्ध झालें ॥ १ ॥
शिशुपाल कर्णा जिंकूनियां भीम। विदेहां जिंकून पुढती गेला ॥ २ ॥
शक वर्वरांसी जिंकिलें नीतीनें। किरातपतींनें वंदीयेलें ॥ ३ ॥
पौंड्रपतीराव वासुदेवा जिंकी। गेला वंगदेशीं पुढती भीम ॥ ४ ॥
सागरवासी त्या म्लेच्छांसीं जिंकिलें। अपार आणिलें नगरीं धन ॥५॥
वासुदेव म्हणे ऐशी पूर्वदिशा। जिंकूनी नरेशा तोषविलें ॥ ६ ॥

---

१ सरोवर

अध्याय ३१ वा

८०

दक्षिणेसी गेला सहदेव ससैन्य । मत्स्य शूरसेन जिंकियेले ॥ १ ॥
कुंतीभोज तेंवी अपरसेक राजे । अवंतीदेशातें पुढती आला ॥ २ ॥
विंद अनुविंद जिंकूनी निघाला । भोजकटीं गेला सहदेव ॥ ३ ॥
संपादित ऐसा विजय पुढती । मैंद द्विविदांसी जिंकियेलें ॥ ४ ॥
किष्किंधा घेऊनी मागुती फिरला । नीलराज त्याला वीर भेटे ॥ ५ ॥
श्वशुर तयाचा अग्निनारायण । सहदेवाचें सैन्य दग्ध करी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अग्नि विप्रवेषें । नृपाळकन्येतें वरीतसे ॥ ७ ॥

८१

रायावरी अग्नि प्रसन्न होऊनी । म्हणे घे मागूनी कांहीं वर ॥ १ ॥
नृप म्हणे व्हावें अभय सेनेसी । अग्नि साह्य त्यांसी ऐसा होई ॥ २ ॥
व्याकुळ पांडव प्रार्थितां अग्नीला । संतुष्ट तो झाला वीरालागीं ॥ ३ ॥
ऐसें सौख्य होई नीलराजयातें । देश जिंकीतसे सहदेव ॥ ४ ॥
शूर्पारकादिक प्रदेश जिंकिले । वृत्त कळाविलें बिभीषणा ॥ ५ ॥
मान्यता तयानें दिधली धर्मासी । खांडवप्रस्थासी वीर आला ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अपार तें धन । अर्पण करून वंदी धर्मा ॥ ७ ॥

अध्याय ३२ वा

८२

पश्चिम दिशेस पंचम पांडव । निशाणासी घाव घालीतसे ॥ १ ॥
मत्तमयूरादि क्षत्रियां जिंकिलें । शैरीषकां केलें आत्मसात ॥ २ ॥
दशार्ण देशासी करूनी स्वाधीन । अनेक जिंकून घेई देश ॥ ३ ॥
सिंधु सरस्वतीतीरें जिंकूनियां । खंडणी यादवां मागितली ॥ ४ ॥
पल्हव बर्बर सागरनिवासी । तेही वीर जिंकी सैन्यबळें ॥ ५ ॥
जिंकूनियां आला दिशा वरुणाची । संतुष्ट धर्मासी करीतसे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे उष्ट्र शतावधि । आणूनी संपत्ति अर्पी नृपा ॥ ७ ॥

# राजसूयपर्व ६

## अध्याय ३३ वा

### ८३

धर्मराजराज्य आज्य कीं शर्करा। अथवा दुग्धधारा अमृत कीं ॥ १ ॥
पुष्ट तुष्ट लोक धनधान्यवृध्दि। पर्जन्याची वृष्टि इष्टवेळीं ॥ २ ॥
तस्कर कीं धूर्त नव्हते राज्यांत। मूर्तिमंत सत्य न्याय तेथें ॥ ३ ॥
कोषवृध्दि पावे सर्वदा नृपाची। शतवर्ष भीति नुरली तया ॥ ४ ॥
यज्ञ निश्चय तैं करीतसे मनीं। सकल सुहृदांनीं कथिलें तेंचि ॥ ५ ॥
केशिनिषूदन केशव पातला। आधार जगाला एकचि जो ॥ ६ ॥
संपत्ति अपार रत्नांचा सागर। घुमवीत नगर प्राप्त झाला ॥ ७ ॥
ग्रीष्मीं मंद वायु तैसाचि माधव। म्हणे वासुदेव भासे तदा ॥ ८ ॥

### ८४

सन्मानूनी श्रीहरिला। धर्म सादर बोलला ॥ १ ॥
देई अनुज्ञा दीक्षेची। इच्छा पुरवीं यज्ञाची ॥ २ ॥
कृष्ण म्हणे हे नृपाळा। करीन सांगसी जें मला ॥ ३ ॥
आरंभावा महा यज्ञ। सम्राट तूं सत्य जाण ॥ ४ ॥
होतां अनुज्ञा हरीची। सिध्द जाहले कार्यासी ॥ ५ ॥
जमवी साहित्य सहदेव। व्यास आणिती भूदेव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसी। सकल सिद्धता यज्ञाची ॥ ७ ॥

### ८५

ब्रह्मा स्वयें व्यास सामग सुसामा। याज्ञवल्क्य जाणा अध्वर्यू तो ॥१॥
होता, वसुपुत्र पैलासह धौम्य। होत्रग सुजाण पुत्र त्याचे ॥ २ ॥
स्वाराज्यप्राप्तीचा संकल्प सुटला। मंडप शोभला विविध गृहें ॥३॥
देशोदेशीं जाती दूत निमंत्रणा। दीक्षित तो राणा योग्य काळीं ॥४॥
असंख्य मंदिरें सिद्ध तया स्थानीं। होई महाध्वनि ब्राह्मणांचा ॥ ५ ॥
स्नानपान शय्या सुवर्णमंचकीं। सेवा अवघीयांची ऐसी होई ॥ ६ ॥

## राजसूयपर्व ६

### अध्याय ३३ वा

८३

धर्मराजराज्य आज्य कीं शर्करा । अथवा दुग्धधारा अमृत कीं ॥ १ ॥
पुष्ट तुष्ट लोक धनधान्यवृध्दि । पर्जन्याची वृष्टि इष्टवेळीं ॥ २ ॥
तस्कर कीं धूर्त नव्हते राज्यांत । मूर्तिमंत सत्य न्याय तेथें ॥ ३ ॥
कोषवृध्दि पावे सर्वदा नृपाची । शतवर्षे भीति नुरली तया ॥ ४ ॥
यज्ञ निश्चय तैं करीतसे मनीं । सकल सुहृदांनीं कथिलें तेंचि ॥ ५ ॥
केशिनिषूदन केशव पातला । आधार जगाला एकचि जो ॥ ६ ॥
संपत्ति अपार रत्नांचा सागर । घुमवीत नगर प्राप्त झाला ॥ ७ ॥
ग्रीष्मीं मंद वायु तैसाचि माधव । म्हणे वासुदेव भासे तदा ॥ ८ ॥

८४

सन्मानूनी श्रीहरिला । धर्म सादर बोलला ॥ १ ॥
देई अनुज्ञा दीक्षेची । इच्छा पुरवीं यज्ञाची ॥ २ ॥
कृष्ण म्हणे हे नृपाळा । करीन सांगसी जें मला ॥ ३ ॥
आरंभावा महा यज्ञ । सम्राट तूं सत्य जाण ॥ ४ ॥
होतां अनुज्ञा हरीची । सिध्द जाहले कार्यासी ॥ ५ ॥
जमवी साहित्य सहदेव । व्यास आणिती भूदेव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । सकल सिद्धता यज्ञाची ॥ ७ ॥

८५

ब्रह्मा स्वयें व्यास सामग सुसामा । याज्ञवल्क्य जाणा अध्वर्यू तो ॥१॥
होता, वसुपुत्र पैलासह धौम्य । होत्रग सुजाण पुत्र त्याचे ॥ २ ॥
स्वाराज्यप्राप्तीचा संकल्प सुटला । मंडप शोभला विविध गृहें ॥३॥
देशोदेशीं जाती दूत निमंत्रणा । दीक्षित तो राणा योग्य काळीं ॥४॥
असंख्य मंदिरें सिद्ध तया स्थानीं । होई महाध्वनि ब्राह्मणांचा ॥ ५ ॥
स्नानपान शय्या सुवर्णमंचकीं । सेवा अवश्रीयांची ऐसी होई ॥ ६ ॥

धृतराष्ट्र भीष्म द्रोण विदुरांसी । आणावया जाती दूत वेगें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ब्राह्मणक्षत्रिय । तैसे वैश्यशूद्र येती बहु ॥ ८ ॥

अध्याय ३४ वा

८६

हस्तिनापुरासी नकुळ जाऊनी । श्रेष्ठांसी वंदूनी वृत्त कथी ॥ १ ॥
सकल ते येती आनंदें यज्ञासी । राव इंद्रप्रस्थीं येती बहु ॥ २ ॥
धृतराष्ट्र, भीष्म, शकुनी, सुबल, । मालव, कुंतल, दुर्योधन ॥ ३ ॥
शिशुपालादिक नृपाळ समस्त । बलराम अनिरुद्ध तेही येती ॥४॥
कैलासभुवनासम मंदिरांत । करिती निवास सकळ राजे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे शोभे इंद्रप्रस्थ । स्वर्गचि लोकांत प्रगटलें ॥ ६ ॥

अध्याय ३५ वा

८७

ऋत्विजआज्ञेनें वडिलांचें स्वागत । करोनियां नृप वंदी तयां ॥ १ ॥
व्यय करूनियां यथेच्छ द्रव्याचा । सुपंथ श्रेयाचा दावा म्हणे ॥ २ ॥
भक्ष्य भोज्यांवरी दुःशासन शास्ता । विप्रांच्या स्वागता अश्वत्थामा ॥
नृपाळस्वागत करावें संजयें । सकलहि कार्यें भीष्म-द्रोणें ॥ ४ ॥
कृपाचार्य देती दक्षिणा सकळ । व्यय तो विदुर करीतसे ॥ ५ ॥
प्राप्त उपायनें घेई दुर्योधन । चरणप्रक्षालन कृष्ण करी ॥ ६ ॥
सहस्रेंसी न्यून नसे उपायन । स्पर्धायुक्त धन अर्पिताती ॥ ७ ॥
अंतरिक्षामाजी देवही पातले । पाहोनी तोषले यज्ञकार्य ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे पाहोनी सोहळा । प्रमोद जाहला सकलांसी ॥ ९ ॥

८८

वैभवें वरुणस्पर्धा भासतसे । सर्वांगीण असे राजसूय ॥ १ ॥
आरंभणीयाग्नि, क्षत्र, धृति, व्युष्टि, । द्विरात्र शोभती दशपेयें ॥ २ ॥

१ अहेर २ हे सहा अग्नि आहेत.

विपुल दक्षिणा भोज्यादिकें तृप्ति। विप्र मंत्र–कृतिविशारद ॥ ३ ॥
इडाकर्म, स्विष्टकृत्, ऊर्ध्वांशिष्ट। देव सर्व तृप्त हविर्भागें ॥ ४ ॥
तया यज्ञामाजी अन्न, महाधन। दक्षिणा अर्पून तुष्ट विप्र ॥ ५ ॥
इष्ट लाभें जन अवघेचि संतुष्ट। वासुदेव हृष्ट स्तवन करी ॥ ६ ॥

—०—

## अर्घाभिहरणपर्व ७

अध्याय ३६ वा

८९

सोमयागादिनीं अंतर्वेदीमाजीं। सत्कारार्ह ऋषि प्राप्त झाले ॥ १ ॥
प्रतिभासंपन्न होई शास्त्रचर्चा। सिद्धांताच्या पक्षा पुष्टी देती ॥२॥
केवळ वितंडा कारिताती कोणी। हीन पक्ष कोणी चर्चिताती ॥ ३॥
ऐकोनी ती चर्चा संतुष्ट नारद। चिंतूनी मनांत दुःख करी ॥ ४ ॥
देव दैत्य लोकीं नृपवेषें आले। निमित्त जाहलें राजसूय ॥ ५ ॥
मानववेषानें आला भगवान। संहार करून जाईल तो ॥ ६ ॥
प्रारंभ नाशाचा राजसूययज्ञें। केला नारायणें स्वयेंचि हा ॥ ७ ॥
चिंतूनियां ऐसें बैसले नारद। वासुदेव वृत्त कथितो ऐका ॥ ८ ॥

९०

भीष्म म्हणे आतां सकलांची पूजा। सार्वभौम राजा धर्मा करीं ॥१॥
विप्र क्षत्रियादि जमले बहुत दिनीं। अर्घ्यादि अर्पूनी पूजीं त्यांसी ॥२॥
सर्वात्मा श्रीहरी द्वारकानिवासी। अग्रपूजा त्याची करीं वेगें ॥ ३ ॥
देवताप्रसादें ब्राह्मण ते पूज्य। पूर्ण मनोरथ कारिती देव ॥ ४ ॥
कृष्ण पूज्यतम आनंदानिधान। भीष्माचें वचन मान्य धर्मा ॥ ५ ॥
सहदेव अर्पी अर्घ्य यथाविधि। चेदिराज निंदी वासुदेवा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे शिशुपाल मत्त। यज्ञ मंडपांत विघ्न करी ॥ ७ ॥

अध्याय ३७ वा

९१

शिशुपाल म्हणे बुद्धिभ्रष्ट भीष्म–। वचनें अधर्म घडला एथें ॥१॥

नसे वंद्यराजा, नसे श्रेष्ठ, वृध्द । पूजार्ह गोविंद कैसा होई ॥ २ ॥
प्रिय तेंवि वंद्य तरी तो द्रुपद । शास्त्रविशारद अश्वत्थामा ॥ ३ ॥
धनुर्वेदाचार्य द्रोण, द्वैपायन । ऋत्विज सन्मान्य सभेमाजी ॥ ४ ॥
दुर्योधनादींचा अवमान करूनी । कृष्णासी पूजूनी काय लाभ ॥ ५ ॥
राज्यचिन्हहीन मातुलघातकी । पूजार्ह या लोकीं कैसा होई ॥ ६ ॥
अधर्म हा जरी घडेल या स्थानीं । खंडणी देऊनी वंचना ही ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे धर्मासवें कृष्णा । निंदी चेदिराणा सभेमाजी ॥ ८ ॥

९२

निर्लज्जा श्रीकृष्णा योग्यता सोडूनी । कैसा सभास्थानीं वागलासी॥१॥
भ्याड-कृपणांची पूजा स्वीकारिसी । श्वान जैं हवीसी लुब्ध होई ॥२॥
क्लीबाचा विवाह; रूपवती अंधा । तैसी तुझी पूजा अयोग्य हे॥ ३ ॥
निष्ठा ते धर्माची भीष्मांचा विवेक । यादवांचा स्वार्थ कळला लोकां ॥
वासुदेव म्हणे बोलूनियां ऐसें । त्यागी त्या स्थानातें चेदिपति ॥ ५ ॥

अध्याय ३८ वा

९३

धर्म म्हणे चेदिराजा । कां रे बोलतोसी ऐसा ॥ १ ॥
पितामह महाज्ञानी । यासी विरोधी ना कोणी ॥ २ ॥
भीष्म म्हणे, शिशुपाल । मूर्ख, नसे ज्ञान बल ॥ ३ ॥
वंदी जया त्रिभुवन । तो हा देवकीनंदन ॥ ४ ॥
जिंकी श्रीकृष्णासी ऐसा । अवनीमाजी कोण राजा ॥ ५ ॥
वयोवृद्ध अथवा ज्ञानी । धन्य कृष्णासी वंदूनी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । वर्णी श्रीकृष्णाचे गुण ॥ ७ ॥

९४

जन्मा पासूनियां सकळ वृत्तांत । कृष्णाचा अद्भुत जाणूनियां ॥ १ ॥
अग्रपूजा त्याची केली असे आम्हीं । स्वार्थबुद्धि मनीं नसे कांहीं ॥२॥

विप्रांमाजी कृष्ण ज्ञानवृद्ध असे । अजिंक्य वीरांतें बलाढ्य हा ॥ ३ ॥
धनधान्य युक्त, वयोवृध्द पूज्य । लक्ष्मीपति वंद्य सनातन ॥ ४ ॥
दानी, ज्ञानी दक्ष लज्जा कीर्तिमंत । श्री धृति हे नित्यधर्म ज्याचे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे महात्म्य हरीचें । कथिती सभेतें भीष्म प्रेमें ॥ ६ ॥

९५

विवर्त, परिणामी, आरंभी हीं तीन । उपादानें जाण वस्तूलागीं ॥ १ ॥
रज्जु, दधि, तंतु जाणूनि हे ध्यावीं । नित्यता जाणावी रज्जूवरी ॥ २ ॥
निर्विकार नित्य आतमरूप कृष्ण । कूटस्थ तो जाण चित्स्वरूप ॥ ३ ॥
सरितांसि सिंधूसम विश्वाधार । गोवर्धनोध्दार गोपाल हा ॥ ४ ॥
व्यापक श्रीहरि जाणील तो धन्य । कृष्णाचें पूजन मान्य त्यासी ॥ ५ ॥
ज्ञानाचा संस्कार शिशुपाला नसे । वंद्य श्रीकृष्णातें न म्हणे कोण ॥६॥
निर्णयाधिकार नित्य नृपाळाचा । आशय भीष्माचा ऐसा स्पष्ट ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे ऐसें बोलूनियां । आपुलीया ठाया बैसे भीष्म ॥ ८ ॥

## अध्याय ३९ वा

९६

म्हणे सहदेव वीरांसी । वधीन मी विरोध्यांसी ॥ १ ॥
कोणी विरोध न केला । पुष्पवर्षाव जाहला ॥ २ ॥
अजिन हालवोनी मुनि । बोले नारद त्या स्थानीं ॥ ३ ॥
जे न पूजिती कृष्णासी । शवें मानितों मी त्यांसी ॥ ४ ॥
उठा म्हणे शिशुपाल । सेनापति मी झुंजार ॥ ५ ॥
विघ्न कराया सज्जला । दुष्ट राजे साह्य त्याला ॥ ६ ॥
निवारितांही न थांबे । कृष्ण स्वस्थचि निजांगें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे आली । वेळ युद्धाची त्या काळीं ॥ ८ ॥

—o—

## शिशुपालवधपर्व ८

### अध्याय ४० वा

९७

धर्म म्हणे पितामहा । कथीं हितार्थ उपाया ॥ १ ॥
नृपसिंधु खवळला । विघ्न वाटे हें यज्ञाला ॥ २ ॥
भीष्म म्हणे कैसा श्वान । घेई शार्दूलाचा प्राण ॥ ३ ॥
तेजोकर्षण करावें । चिंती श्रीहरी स्वभावें ॥ ४ ॥
बुद्धिभ्रष्ट शिशुपाल । समीप पातलासे काळ ॥ ५ ॥
प्रभव प्रलय हा जाण । त्रिभुवनाचा श्रीकृष्ण ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दुष्ट । ऐकूनियां बोले क्रुद्ध ॥ ७ ॥

### अध्याय ४१ वा

९८

कौरवकलंका भय कां दाविसी । वृद्धा न मानिसी लाज मनीं ॥ १ ॥
अंधा मागें नेसी अंध कैसे पंढा । विदीर्ण ही जिव्हा कैसी नोहे ॥ २ ॥
गवळीयांचीं कर्मं क्षुद्र तीं स्तविसी । पूजा कृतघ्नाची कैसी साहूं ।३।
शाब्दिक वेदान्तें नव्हे जेंवी संत । पक्षी जैं भूलिंग[1] मिथ्यावादी ॥ ४ ॥
दांभिका, दांभिक स्तवूनियां लोकां । फसविती तैसा मिथ्याभाव ॥५॥
वासुदेव म्हणे ऐसें निंदी भीष्मा । दोष लावी कृष्णा शिशुपाल ॥ ६ ॥

९९

अपहार अंबेचा धर्मज्ञाचें चिन्ह । म्हणेल रे कोण सांगें भीष्मा ॥ १ ॥
वृद्ध सेवा नाही घडली तुजसी । अधर्मकृत्यासी वरिसी तेणें ॥ २ ॥
व्यर्थ जनीं व्रतें अपत्यहीनाचीं । गांगेय आम्हासी वध्य होई ॥ ३ ॥
सागरतीरासी पूर्वी एक हंस । धर्माचा उपदेश सकलां करी ॥ ४ ॥

---

१ भूलिंग नांवाचा भूमीवर वास करणारा पक्षी 'मासाहसम्' साहस करूं नये असें म्हणत असतो पण सिंहाचे दातांतील मांस खातो, तसें.

भोळ्याभावें पक्षी सन्मान करिती । हळुहळू अंडीं खाई त्यांची ॥ ५ ॥
जाणूनियां कोणी पाळत ठेवितां । करी हंस घाता ऐसें कळे ॥ ६ ॥
अंती सर्व पक्षी वधिती तयासी । तैसी भीष्मा स्थिति तुझी होवो ॥
वासुदेव म्हणे भीष्मासी दांभिक । म्हणे चेदिनाथधाष्टर्य थोर ॥ ८ ॥

अध्याय ४२ वा

१००

शिशुपाल म्हणे कपटी गोपाल । दंभें मगधपाल वधिला येणें ॥ १ ॥
दुर्बल स्त्रिया वा वृद्ध तुझ्यासम । मंत्री तरी जाण हेंचि फल ॥ २ ॥
ऐकूनियां भीम संक्रुध्द जाहला । आंवरी तयाला गंगासुत ॥ ३ ॥
शिशुपाल म्हणे सोडीं या पतंगा । दग्ध सर्व अंगा करितों क्षणीं ॥४॥
ऐकूनी हे वाणी नढळे भीष्मशांति भीमसेन चित्तीं क्रोध पावे ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे अतिप्रसंगाची । वेळ ही आणिती दुष्ट जनीं ॥ ६ ॥

अध्याय ४३ वा

१०१

भीष्म म्हणे भीमा ऐकें जन्मवृत्त । शिशुपाल मूढ चेदिसुत ॥ १ ॥
चतुर्भुज, नेत्र तीन या जन्मतां । गळती ठेवितां अंकीं ज्याच्या ॥ २ ॥
तयाच्याचि हस्तें यालागीं मरण । ऐसा गगनांतून शब्द होई ॥ ३॥
ऐकूनी हें वृत्त नृपाळ पातले । पाहूनियां गेले शिशुपालासी ॥ ४ ॥
कळतां वृतांत द्वारकापुरीसी । पितृभगिनीसी भेटे कृष्ण ॥ ५ ॥
कुशल अनामय पुसूनी सुतासी । घेतांचि त्या अंकीं नवल झालें ॥६॥
भुज ते गळाले नेत्र गुप्त झाला । पाहोनी मातेला दुःख वाटे ॥ ७॥
वासुदेव म्हणे कृष्णासी प्रार्थूनी । अपराध क्षमीं म्हणे. आत्या ॥ ८ ॥

१०२

कृष्ण म्हणे देवी निर्भय तूं राहें । चरणीं नम्र आहें नित्य तुझ्या ॥ १ ॥
शिशुपालमाता म्हणे क्षमा करीं । अपराध जरी घडती थोर ॥ २ ॥
पितृभगिनीसी म्हणे यदुनाथ । शत अपराध क्षम्य यासी ॥ ३ ॥

दुःख नको करूं श्रीहरी बोलला । वृत्तांत हा झाला बालपणीं ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे शिशुपाल दृप्त । करावया युद्ध सिद्ध होई ॥ ५ ॥

अध्याय ४४ वा

१०३

कालप्रेरित हा राजा भीष्म म्हणे । चेदिपति तेणें क्रुद्ध होई ॥ १ ॥
म्हणे हे गांगेया श्रीकृष्णाचा भाट । होऊनियां पाठ गासी एथें ॥ २ ॥
स्तुतिपात्र नर काय जगीं थोडे । ऐकें हें उघडें वचन माझें ॥ ३ ॥
निंदा स्तुति दोन्ही निंद्य हीं आर्यांसी । स्वात्रिसी गुराखी कैसा सांगे ॥
भूलिंगाचे प्राण शार्दूलाचे हातीं । तैसा तूं नृपांसी सहज वध्य ॥ ५ ॥
कालमुखांतूनी वदसी 'सांभाळा' । रक्षिती तुजला नृपाळ हे ॥ ६ ॥
तृणासम मज नृप, म्हणे भीम । ऐकतां वचन क्रुद्ध सभा ॥ ७ ॥
म्हणती पशूसम वधा किंवा जाळा । भीमहि गर्जला पुढती यावें ॥ ८ ॥
म्हणती कोणी द्यारे आव्हान कृष्णासी । वासुदेव कथी सकल वृत्त ।९।

अध्याय ४५ वा

१०४

जनार्दना तुज आव्हान युद्धासी । म्हणे चेदिपति वासुदेवा ॥ १ ॥
पांडवां समवेत वध्य तूं गोपाळा । बोलूनी सज्जला शिशुपाल ॥ २ ॥
शांतपणें तेव्हां कृष्ण बोलतसे । सात्त्वतीसुतातें वधितों आतां ॥ ३ ॥
जाळिली द्वारका वधिलें यादवां । येणें अश्वमेधा विघ्न केलें ॥ ४ ॥
बभ्रु यादवाची कांता पळविली । भद्रा ते हरिली कपटानें ॥ ५ ॥
रुक्मिणीची इच्छा धरिली मूढानें । अपराध खळानें बहुत केले ॥६॥
खळ म्हणे मज अर्पिली रुक्मिणी । पूर्वीच आप्तांनी, लाज धरीं ॥७॥
अन्यदत्ता वधुस्वीकार करूनी । बोलसी या स्थानीं लज्जाहीना ॥८॥
वचन स्मरूनी क्षमा करीं किंवा । न करीं केशवा बलहीना ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे स्मरतां सुदर्शन । करांत येऊन झळकूं लागे ॥ १० ॥

१०५

कृष्ण गर्जूनी नृपांसी । वधितों म्हणे शिशुपालासी ॥ १ ॥

झाले अपराध पूर्ण । म्हणुनी फेंकी सुदर्शन ॥ २ ॥
केला शिरच्छेद क्षणीं । हाहाःकार तया स्थानीं ॥ ३ ॥
प्रगटली दिव्य ज्योति । शिरली श्रीहरीच्या मुखीं ॥ ४ ॥
झाला विस्मय जनांसी । क्रुद्ध स्तब्ध जे विवेकी ॥ ५ ॥
ज्ञाते होती हृष्ट तदा । स्तविती आनंदें गोविंदा ॥ ६ ॥
अग्निसंस्कार वीरासी । होई यज्ञाची समाप्ति ॥ ७ ॥
झालें अवभृथस्नान । केला सकलांचा सन्मान ॥ ८ ॥
राजे गेले निजस्थानीं । धर्म अनुज्ञा घेवोनी ॥ ९ ॥
कृष्ण वंदूनी कुंतीसी । सुखें गेला द्वारकेसी ॥ १० ॥
वासुदेव म्हणे राही । दुर्योधन शकुनी तोही ॥ ११ ॥

---

## द्यूतपर्व ९

### अध्याय ४६ वा

१०६

निर्विघ्न समाप्त राजसूय होई । व्यास तया ठाई येती सुखें ॥ १ ॥
स्वागत तयांचें धर्मराज करी । आनंद अंतरीं मुनींलागीं ॥ २ ॥
म्हणती आतां राया जाऊं दे स्वस्थानीं । संशय निरसूनी जावें म्हणे ३
नारद कथित उत्पात परिणाम । कथीं म्हणे धर्म व्यासांप्रती ॥४॥
त्रयोदश वर्षें कठिण तुम्हांसी । त्वन्निमित्तें भक्षी काल वीरां ॥ ५ ॥
पशुपति भव येईल स्वप्नांत । दक्षिण दिशेस पाहील तो ॥ ६ ॥
त्यजूतियां चिंता करावें कर्तव्य । नटळे भवितव्य कथिती व्यास ॥७॥
वासुदेव म्हणे धर्मराजचित्ता । येई अस्वस्थता रात्रंदिन ॥ ८ ॥

१०७

बांधवांसी म्हणे त्यजीन मी प्राण । मजमुळें जन नष्ट होती ॥ १ ॥
पार्थ म्हणे ऐसा नको अविचार । करावा निर्धार विवेकानें ॥ २ ॥
त्रयोदश अब्द काल हा कठिण । संयमूनी मन राहीन मी ॥ ३ ॥

ज्ञाति अनुज्ञेनें करीन व्यवहार। न व्हावा संहार इच्छा हेचि ॥ ४ ॥
तेंचि स्वीकारिलें व्रत सकलांनीं। तर्पण करोनी नगरीं येती ॥ ५ ॥
मयसभेमाजी राही दुर्योधन। वासुदेव मन शंकाकुल ॥ ६ ॥

अध्याय ४७ वा

१०८

अपूर्व ती सभा पाही दुर्योधन। जळीं स्थळ भ्रम होई त्यासी ॥ १ ॥
पहातां पहातां पडला घसरूनी अपूर्व ते भूमी नृपाळासी ॥ २ ॥
द्वार समजोनी स्वैरपणें जातां। मस्तकीं आघाता सोशीतसे ॥ ३ ॥
पिनध्द द्वारासी उघडितां पडे। जळामाजी बुडे नकळतांचि ॥ ४ ॥
भीम अर्जुनादि हांसती पाहूनी। वस्त्रें पालटूनी येतां राव ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सभा ते मयाची। पाहोनी रायासी द्वेष वाटे ॥ ६ ॥

१०९

हास्तिनापुरासी दुर्योधन जाई। मार्गामाजी कांहीं बोलेचिना ॥ १ ॥
अंती सौबलासी म्हणे दाह माझा। उत्कर्ष धर्माचा पाहूनियां ॥ २ ॥
प्राणत्याग मज करावासा वाटे। सर्व रक्त आटे संतापानें ॥ ३ ॥
उत्कर्ष शत्रूचा साही ऐसा कोण। एकाकी मी कोण साह्य मज ॥ ४ ॥
क्लीब मजलागीं म्हणसील जरी। तैसें मज परी म्हणूं नको ॥ ५ ॥
अशक्य तें युध्द, मार्ग कपटाचा। योजावा नरेशा ऐसा हेतु ॥ ६ ॥
दैव बल वाटे श्रेष्ठ यत्नाहूनी। उत्कर्ष पाहूनी पांडवांचा ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे मरणासी सिद्ध। दुर्योधन क्रुद्ध होत असे ॥ ८ ॥

अध्याय ४८ वा

११०

द्वेष दुर्योधना ऐसा करूं नको वीरा ॥
भाग्य उत्कर्षासी नेई यत्नशील नरा ॥ १ ॥
यत्न पांडवांनीं केला उत्कर्षाचा नित्य ॥
उपाय तूं योजितोसी तयांच्या घातार्थ ॥ २ ॥

दुर्लभ द्रौपदीलाभें सखा तो द्रुपद ॥
साह्य नित्य भाग्यशाली असे त्यां गोविंद ॥ ३ ॥
दिलें तेंचि घेवोनीयां चढले वैभवा ॥
कां रे बाबा तुजलागीं खेद ऐसा व्हावा ॥ ४ ॥
आज्ञा मान्य करिती भ्राते अश्वत्थामा द्रोण ॥
राया न्यून काय साह्य महारथी कर्ण ॥ ५ ॥
राव म्हणे पांडवांसी जिंकितों सत्वरी ॥
संशय न धरीं म्हणे सौबल अंतरीं ॥ ६ ॥
द्यूत आवडे धर्मासी जिंकीन मी तया ॥
वासुदेव म्हणे वृत्त कथितातो राया ॥ ७ ॥

अध्याय ४९ वा

१११

शकुनी म्हणे धृतराष्ट्रा । खेद दुर्योधनाचित्ता ॥ १ ॥
राव म्हणे काय न्यून । वस्त्र भूषण वाहन ॥ २ ॥
दुर्योधन म्हणे ताता । सौख्य नसे खातां-पितां ॥ ३ ॥
ऐशीं सहस्र स्नातक । युधिष्ठिर पोशी नित्य ॥ ४ ॥
कनकपात्रीं दशसहस्र । नित्य तृप्त होती विप्र ॥ ५ ॥
ऐसी अपार संपदा । ऐकिलीही नाहीं कदा ॥ ६ ॥
जळफळे दुर्योधन । वासुदेव होई खिन्न ॥ ७ ॥

११२

दुर्योधन म्हणे मधु आणी सोम । सागर येऊन दधि अर्पी ॥ १ ॥
सर्वोत्तम शंखें कृष्ण अभिषेकी । सुवर्णाचीं शिंकीं सिंधूदकां ॥ २ ॥
उत्तर-सागर जल आणीयेलें । पाहूनी पेटलें मन माझें ॥ ३ ॥
चमत्कार शंखनाद तो संकेत । जेवूनियां लक्ष उठतां विप्र ॥ ४ ॥
वारंवार ऐसा ध्वनि येइ कानीं । नक्षत्रें गगनीं तैसे राजे ॥ ५ ॥
असह्य तें भाग्य होई मज ताता । मार्ग अक्षविद्या शकुनी म्हणे ॥ ६ ॥
धृतराष्ट्र होई विदुरा आधीन । होई दुर्योधन मरणा सिद्ध ॥ ७ ॥
पुत्रवात्सल्यानें कळवळे राव । म्हणे वासुदेव दुर्दैव हें ॥ ८ ॥

११३

रत्नजडित सभा निर्मावी सत्वरी । ऐसी आज्ञा करी धृतराष्ट्र ॥ १ ॥
कळतां वृत्तांत बोलला विदुर । विनाशाचें द्वार मुक्त केलें ॥ २ ॥
विरोध आपुला रायासी कथिला । सौख्यावरी घाला येई म्हणे ॥३॥
राव म्हणे जरी दैव अनुकूल । कलह सकल मिटती येणें ॥ ४ ॥
स्नेहभावें यांसी खेळूं द्यावें द्यूत । न कथीं संकेत धर्मालागीं ॥ ५ ॥
घेऊनी त्वरित येई युधिष्ठिरा । घात धृतराष्ट्रा, विदुर म्हणे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे दैवाची प्रेरणा । क्षत्ता तदा भीष्मा वृत्त कथी ॥ ७ ॥

अध्याय ५० वा

११४

एकांतीं धृतराष्ट्र म्हणे दुर्योधना । आणूं नको मना द्यूत ऐसें ॥ १ ॥
महाज्ञानी क्षत्ता हित तेंचि सांगे । वैराचिया मार्गें राज्यनाश ॥ २ ॥
बाळा तुजलागीं न्यून काय असे । इंद्रासम भासे यश तुझें ॥ ३ ॥
द्यूतबुद्धि कैसी सुचली तुजला । मोह कैसा झाला मानसासी ॥ ४ ॥
दुर्योधन म्हणे अन्नाच्छादनाचा । मोह उत्कर्षाचा मार्ग रोधी ॥ ५ ॥
जिवंत मी ऐसें कथितों दुःखानें । याहूनी मरणें बरें वाटे ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे धर्माचें वैभव । कौरवांचा राव स्वयें कथी ॥ ७ ॥

अध्याय ५१ वा

११५

अर्पिताती करभार । राजे, विप्र, वनचर ॥ १ ॥
वैश्य, शूद्र, लक्षावधि । अर्पिताती वस्त्रें निधि ॥ २ ॥
रंकु मृगाचीं अजिनें । ऊर्णा वस्त्रें विविध रत्नें ॥ ३ ॥
खेचरेंहि अगणित । वनगाई ते गर्दभ ॥ ४ ॥
शीघ्रगामी श्रेष्ठ गज । अश्व अर्पिती विविध ॥ ५ ॥
यज्ञ मंडपीं आसनें । हस्तिदंती सिंहासनें ॥ ६ ॥
रथ नाराच गजझूली । वासुदेव वृत्ती धाली ॥ ७ ॥

अध्याय ५२ वा

११६

पारद कुलिंद तंगण । पिपीलिक तें सुवर्ण ॥ १ ॥
हत्तीवरूनी आणिती । दूत कुडयांनी मोजिती ॥ २ ॥
दिव्यौषधि विविध रत्नें । अगरु चंदन रम्य चर्मे ॥ ३ ॥
शिरस्त्राणें खड्ग चाप । कोणी अर्पिती धर्मास ॥ ४ ॥
भूमंडळींचे नरवर । तिष्ठताती द्वारावर ॥ ५ ॥
वैश्य शूद्र चांडाळहि । नित्य संतुष्ट त्या ठाई ॥ ६ ॥
ज्याचा जैसा अधिकार । तैसा होतसे सत्कार ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे माता । भासे द्रौपदी समस्तां ॥ ८ ॥

अध्याय ५३ वा

११७

दूतासम राजे करिति कामकाज । म्हणती धर्मराज सुखी होवो ॥ १ ॥
कोणी ध्वज, कोणी कवच पुष्पमाला । पादत्राणें, धाला अर्पूनियां ॥
तूणीर धनुष्य, तीक्ष्ण खड्ग कोणी । धर्मासी अर्पूनी मोद पावे ॥३॥
नारद असित उभे भोंवतालीं । सात्यकी तो धरी छत्र मोदें ॥ ४ ॥
धनंजय भीमा, करीं तीं व्यजनें । कनिष्ठ सुखानें चौऱ्या घेती ॥ ५ ॥
कृष्ण शंखोदकें अभिषेक होतां । पाहूनियां मूर्छा येई मज ॥ ६ ॥
पावलों पतन तदा शंखनादें । हरिश्चंद्र शोभे दुसरा धर्म ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे त्रस्त दुर्योधन । वृत्तांत कथून खिन्न होई ॥ ८ ॥

अध्याय ५४ वा

११८

नको करूं द्वेष दुर्योधना ऐसा । दोष करी नाशा राव म्हणे ॥ १ ॥
शांत होऊनियां बाळा त्यजीं शोक । करीं महामख गायत्रीचा ॥२॥
खंडणी तुजसी अर्पितलि राजे । द्रव्य कां पराचें इच्छितोसी ॥ ३ ॥
लोभ परस्वाचा न कारितां यत्नें । वैभव स्वकर्मे संपादावें ॥४॥

पांडव विच्छेदें बाहुच्छेद होई। नको बंधुद्रोही होऊं ऐसा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे राव उपदेशी। बुद्धि सध्दर्माची होवो तुज ॥ ६ ॥

अध्याय ५५ वा

११९

दुर्योधन म्हणे ताता। पराधीन ज्यांचा नेता ॥ १ ॥
त्याचा निश्चयेंसी नाश। करिसी कां रे माझा द्वेष ॥ २ ॥
लाभ त्वरित द्यूतानें। उत्कर्ष न निवृत्तीनें ॥ ३ ॥
शत्रूचा जें करी नाश। शस्त्र तेंचि क्षत्रियास ॥ ४ ॥
असंतोष मूळ साचें। ज्ञाते म्हणती वैभवाचें ॥ ५ ॥
परवैभव हरण। हाचि क्षत्रियांचा धर्म ॥ ६ ॥
कपटें नमुची दैत्यासी। वधितां लौकिक इंद्रासी ॥ ७ ॥
हरिन पांडवांचें धन। अथवा प्राणही त्यजीन ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे नीच। म्हणती धर्म अधर्मास ॥ ९ ॥

अध्याय ५६ वा

१२०

शकुनी म्हणे क्षणार्धांत। इच्छा पुरवील द्यूत ॥ १ ॥
शर–चाप तेंचि माझें। हेतु पूर्ण होती तुझे ॥ २ ॥
दुर्योधन म्हणे स्वार्थी। विदुर त्यांचा पक्षपाती ॥ ३ ॥
करी विनाश परबुद्धि। श्रेय साधूं व्याधि आधीं ॥ ४ ॥
धृतराष्ट्र म्हणे वैर। असे लोहरहित शस्त्र ॥ ५ ॥
दुर्योधन म्हणे द्यूतें। नाश, युध्द, न नळातें ॥ ६ ॥
राजा अनन्यगतिक। आज्ञा विदुरासी देत ॥ ७ ॥
येई घेऊनी धर्मासी। द्यूत होवो सुहृदांसी ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे नाश। अटळ दुष्टांचा ब्रह्मयास ॥ ९ ॥

अध्याय ५७ वा

१२१

दैवाधीन झाला राव। विदुर म्हणे हा अन्याय ॥ १ ॥

कलह माजेल बा येणें। कुलक्षयाचीं लक्षणें ॥ २ ॥
धृतराष्ट्र म्हणे जन। अवघे दैव पराधीन ॥ ३ ॥
बुध्दि कर्मानुसारिणी। सकलां देतो अंतर्यामी ॥ ४ ॥
साधु असाधु वा कर्म। घडवी दैवें नारायण ॥ ५ ॥
पराधीन हा मानव। आज्ञा करी अंध राव ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे क्षत्ता। निघे धर्माच्या निवासा ॥ ७ ॥

अध्याय ५८ वा

## १२२

इंद्रप्रस्थामाजी विदुर पातला। प्रेमें धर्म त्याला वंदीतसे ॥ १ ॥
कैसी अप्रसन्न मुद्रा म्हणे धर्म। पुत्र, प्रजा, कर्म आचरीं कीं ॥ २ ॥
क्षत्ता म्हणे धर्मा प्रख्यात गुणांनीं। नृप सुखी मनीं स्वपुत्राच्या ॥३॥
विनीत विशोक आत्मरति झाला। पाठवी मजला सहेतुक ॥ ४ ॥
निर्मियेली सभा मयसभेसम। पहावी येऊन पांडवांनीं ॥ ५ ॥
द्यूत सुहृद्भावें करावें तयांसी। द्यूतप्रिय येती बहुत तेथें ॥ ६ ॥
निमंत्रणालागीं धाडिलें मजसी। दुःख अंतरासी वासुदेवा ॥ ७ ॥

## १२३

कलहकारी द्यूत कोण। खेळे ज्ञाता म्हणे धर्म ॥ १ ॥
पांडवांसी तें न रुचे। विदुरा बोल जें मनींचें ॥ २ ॥
क्षत्ता म्हणे अनर्थाचें। मूळ मजसी तें वाटे ॥ ३ ॥
निवारिलें धृतराष्ट्रासी। व्यर्थ अवघे यत्न होती ॥ ४ ॥
धर्म म्हणे जमले कोण। क्षत्ता म्हणे बहुत जन ॥ ५ ॥
शकुनी, जय, चित्रसेन। करिती मर्यादातिक्रम ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसे। जमले छद्मी बहु तेथें ॥ ७ ॥

## १२४

विदुरासि बोले चिंतूनियां धर्म। नित्य दैवाधीन त्रैलोक्य हें ॥ १ ॥
इच्छा न द्यूताची तात आज्ञा परी। उल्लंघूनी दुरी जाऊं कैसा ॥ २ ॥
युद्ध-द्यूता जरी आव्हानितां कोणी। निवृत्त वीरांनीं होऊं नये ॥ ३ ॥

ऐसें बोलूनियां रथ सज्ज केला । प्रज्ञाहीन त्याला दैव करी ॥ ४ ॥
सहपरिवार हस्तिनापुरासी । पातला दैवाची आज्ञा होतां ॥ ५ ॥
भेटूनियां सर्वां माद्रीसी वंदीलें । धृतराष्ट्र पाउलें धरिलीं प्रेमें ॥ ६ ॥
द्रौपदीचा हेवा वाटला स्त्रियांसी । घडती व्यायामादि नित्यकर्में ॥७॥
रात्रौ आनंदानें सौख्यनिद्रा घेती । प्रातःकाळीं जाती सभेमाजी ॥८॥
वासुदेव म्हणे द्यूतप्रिय जन । करिती सन्मान पांडवांचा ॥ ९ ॥

अध्याय ५९ वा

१२५

शकुनी धर्मासी बोलला । पट द्यूतार्थ पसारिला ॥ १ ॥
धर्म म्हणे हीनकर्म । कोण आचरील सुज्ञ ॥ २ ॥
शकुनी म्हणे सावधान । चित्त, तया विजय जाण ॥ ३ ॥
राया अक्ष दैवाधीन । बोल काय तुझा पण ॥ ४ ॥
धर्म म्हणे द्यूताहूनी । श्रेष्ठ युध्द म्हणती ज्ञानी ॥ ५ ॥
नको इच्छूं ऐसें धन । करुनी अन्यायाचें कर्म ॥ ६ ॥
जय दैवाधीन जरी । व्हावें स्वाधीन कां तरी ॥ ७ ॥
शकुनी म्हणे भयग्रस्ता-। वीरा नको खेळूं द्यूता ॥ ८ ॥
धर्म म्हणे खेळे कोण । मी मी म्हणे दुर्योधन ॥ ९ ॥
वासुदेव म्हणे धर्म । अंतीं स्वीकारी आव्हान ॥ १० ॥

अध्याय ६०-६१ वा

१२६

भीष्म, द्रोण, कृप पातले सभेसी । धर्माच्या पणासी रत्नहार ॥१॥
असंख्यात रत्नें लावी दुर्योधन । शकुनी म्हणे पण जिंकिला मी ॥२॥
ऐसें बोलोनियां टाकीतसे फांसे । वचन खळाचें सत्य होई ॥ ३ ॥
धर्म म्हणे केलें कपट निःशंक । लावियेले निष्क सकळ पणा ॥ ४ ॥
ऐकितांचि शब्द टाकियेले फांसे । वचन खळाचें सत्य होई ॥ ५ ॥
धर्म म्हणे केलें कपट नृपाळा । स्यंदन पणाला लावीयेले ॥ ६ ॥

दास दासी गज अश्वहि सकळ । रथ निधी खळ जिंकी वेगें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कालवश धर्म । जाणूनियां धन लावी पणा ॥ ८ ॥

अध्याय ६२ वा

१२७

क्षत्ता म्हणे राया मरणोन्मुख जैसा । न सेवी औषधा करिसी तेंवी ॥
परी कर्तव्यार्थ सांगतों तुजसी । त्यागीं या सुतासी कुलघ्न हा ॥२॥
माध्विका प्रपात न दिसे नृपाळा । अथवा मद्यप्याला भान नसे ॥३॥
तैसे भानहीन होऊं नका तुम्हीं । पार्थासवें रणीं गांठ असे ॥ ४ ॥
कंस-जृंभत्यागें ज्ञाति पावे सुख । सिंहा करीं मित्र श्वानत्यागें ॥ ५ ॥
नित्य सुवर्णद पक्षासी मारणें । वृक्षांसी जाळणें मूर्खपण ॥ ६ ॥
वासुदेव कथी क्षत्त्याचें भाषण । पांडवांसी रग करूं नका ॥ ७ ॥

अध्याय ६३ वा

१२८

ऐका ऐका सभ्य जन । द्यूत कलहाचें कारण ॥ १ ॥
स्वयें शिंग मोडी पोळ । तैसें नाशील हा कुळ ॥ २ ॥
विजयभ्रमें हर्ष होई । अंतीं सर्वनाश पाहीं ॥ ३ ॥
क्रुद्ध होतां भीमार्जुन । सांभाळील सांगा कोण ॥ ४ ॥
धनासाठीं पांडवांचा । नाश नका करूं ऐसा ॥ ५ ॥
सौबलाचें कपटद्यूत । सकलांसी असे ज्ञात ॥ ६ ॥
नका नका करूं ऐसें । समरप्रसंग वीरांतें ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे मूर्ख । अंतीं पावे पश्चात्ताप ॥ ८ ॥

अध्याय ६४ वा

१२९

प्रिय सत्य हित विदुराची वाणी । खळ तें ऐकूनी क्रुद्ध होती ॥ १ ॥
दुर्योधन म्हणे विदुरा निंदिसी । नित्य तूं आम्हासी योग्य न हें ॥२॥

---

१ मध काढणाराला ( कड्यावरून )

लज्जाहीन कैसें यापरी बोलसी। कृतघ्ना नेणसी आश्रयातें ॥ ३ ॥
पांडवांचें हित इच्छितोसी नित्य। नृपाळासी दुःख व्यर्थ देसी ॥४॥
फिरूनी न बोलें ऐसें परपुष्टा। निघूनी जा दुष्टा सदनांतूनी ॥ ५ ॥
दुराचारिणी ते संतुष्ट न कदा। सोडूनी एकदां जाणारचि ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे अमर्याद बोले। दुर्योधन डोळे वटारूनी ॥ ७ ॥

१३०

मूढ सुहृद्वचनास। अविचारें लावी दोष ॥ १ ॥
दुराचारिणी तैं मंद। सोडितां न कदा छंद ॥ २ ॥
रुचे तेंचि वदणें जरी। कासयासी ज्ञाते मंत्री ॥ ३ ॥
दुर्लभ ज्या श्रोता वक्ता। ऐसें वचन करी हिता ॥ ४ ॥
पुत्र विचित्रवीर्याचा। सुखी व्हावा हेचि इच्छा ॥ ५ ॥
जोडितों मी दोन्ही कर। येई राजा शुद्धीवर ॥ ६ ॥
धृतराष्ट्रा न ऐकसी। तरी कुल संहारिसी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे क्षत्ता। विनवी प्रेमें धृतराष्ट्रा ॥ ८ ॥

अध्याय ६५ वा

१३१

शकुनी म्हणे कांहीं पण लावीं धर्मा। असतां अन्य धना कथन करीं ॥
धर्म म्हणे अब्ज, खर्व, महापद्म। परार्ध तें जाण धन माझें ॥ २ ॥
शकुनी म्हणे सर्व पहा हें जिंकिलें। अश्व वृष केले पुढती धर्मे ॥३॥
देश, अब्राह्मण जन, ते पणासी। खांडव प्रस्थासी हरला नृप ॥ ४ ॥
सालंकार पुत्र लावियेले पणा। दुर्दैवी तो राणा हरला त्यासी ॥ ५ ॥
नकुल सहदेव तेही जिंकियेले। वासुदेव बोले पुढती दुःखें ॥ ६ ॥

१३२

सापत्न्यबंधूंसी लावितोसि पणा। धर्मा, पार्थ-भीमां संरक्षिसी ॥१॥
ऐसी कपटवाणी ऐकूनियां धर्म। म्हणे भेद कर्म आरंभिसी ॥ २ ॥
शकुनी म्हणे राया द्यूतमत्तवाणी। आणूं नको ध्यानीं सर्वथा हे ॥ ३ ॥

लोकैकवीराचा पण लावियेला । क्षणार्धें जिंकिला शकुनीनें तो ॥ ४ ॥
नेता पांडवांचा भीमही जिंकिला । हर हर वीरा म्हणे खळ ॥ ५ ॥
भ्रातृप्रिय आतां राहिलों मी स्वयें । युधिष्ठिर बोले शकुनीलागीं ॥६॥
तत्काळ खळानें जिंकिलें धर्मास । वासुदेव खेद करी बहु ॥ ७ ॥

१३३

शकुनी म्हणे ऐक राया । अवशिष्ट तुझी भार्या ॥ १ ॥
लावूनियां तिचा पण । द्यूत करावें संपूर्ण ॥ २ ॥
आवेशानें म्हणे धर्म । तेंचि आतां उरलें कर्म ॥ ३ ॥
गुणवती ते पांचाळी । वंद्य सकलांसी जाहली ॥ ४ ॥
सुकुमार राजकन्या । आतां लावियेली पणा ॥ ५ ॥
ऐकुनियां तें वचन । द्रवले अंतरीं सज्जन ॥ ६ ॥
धिक् धिक् ऐसा शब्द झाला । हर्ष वाटला नृपाळा ॥ ७ ॥
शकुनी म्हणे जितं मया । खेद बहु वासुदेवा ॥ ८ ॥

अध्याय ६६ वा

१३४

दुर्योधन म्हणे क्षत्त्या द्रौपदीसी । आणीं या सभेसी सेवेलागीं ॥१॥
झाड–सारव, ते करील सभेचीं । धिक्कृत ते लोकीं दासी राहो॥२॥
क्रोधावेशें बोलें विदुर ऐकूनी । कलंकचि जनीं स्वकुलाचा तूं ॥ ३ ॥
लोंबसी प्रपातीं न दिसे तें अंधा । क्षुब्ध पंचनागां नको करूं ॥ ४ ॥
नको ऐसा जाऊं वांयांचि मरूनी । मृगा, या डिवचूनी पंचाननां ॥५॥
वेनासम झाला दुर्योधन मत्त । केंवी, कांता, दास, लावी पणा ॥६॥
वासुदेव म्हणे विनाशाची वेळ । उपदेश अमोल व्यर्थ करी ॥ ७ ॥

१३५

द्यूतें महाभय वैर । दुर्योधनासी विसर ॥ १ ॥
मर्मभेदी वाक्यें कोणी । दुखवूं नये उच्चारूनी ॥ २ ॥
कपटें जिंकूं नये कोणा । हीन अनुसरती श्वाना ॥ ३ ॥
अजापुत्रें गिळीतां शस्त्र । धडा वेगळेंचि शिर ॥ ४ ॥
भासे उत्कर्ष हा थोर । परी उघडे नरकद्वार ॥ ५ ॥

अशक्य तें होई शक्य । दुर्योधना न रुचे हित ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे बोध । न रुचे जया तोचि मूढ ॥ ७ ॥

अध्याय ६७ वा

१३६

दर्पयुक्त दुर्योधन । 'प्रातीकामी'[1] सी लक्षून ॥ १ ॥
म्हणे अंतःपुरीं जाईं । आणीं द्रौपदी या ठाईं ॥ २ ॥
दुःखें गेला प्रातीकामी । वृत्त कथिलें जावोनी ॥ ३ ॥
कृष्णा म्हणे रायापाशीं । धन नव्हतें कीं, द्यूतासी ॥ ४ ॥
येरु म्हणे सर्वनाश । अंतीं हरला आपणास ॥ ५ ॥
राजकन्ये अंतीं तुझा । पण लावी धर्मराजा ॥ ६ ॥
कृष्णा तयालागीं पुशी । आधीं जिंकिलें कोणासी ॥ ७ ॥
मग येईन सभेंत । वासुदेव स्वस्थचित्त ॥ ८ ॥

१३७

दूत सभेमाजी येवोनी बोलतां । धृतराष्ट्र तदा संज्ञाशून्य ॥ १ ॥
दुर्योधन म्हणे विचारील एथें । आणावें सभेतें द्रौपदीसी ॥ २ ॥
नाशकाल म्हणे दूत द्रौपदीसी । कृष्णा म्हणे कथी काय सभा ॥ ३ ॥
धर्म नच जावो कौरवां सोडोनी । दूत तें येवोनी कथीतसे ॥ ४ ॥
भीड धरूनियां न बोलेचि कोणी । धर्म म्हणे आणीं दूता सती ॥ ५ ॥
रजस्वला येई श्वशुरासमोर । निंद्यचि ठरेल राव तेणें ॥ ६ ॥
सत्य रज्जुबद्ध पांडव ते दीन, । म्हणे दुर्योधन जा रे दूता ॥ ७ ॥
प्रातीकामी परी स्वस्थचि राहीला । सांगावें सतीला काय म्हणे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दुष्ट दुःशासना । पाठवी त्या कामा दुर्योधन ॥ ९ ॥

१३८

भ्रातृवचनें दुःशासन । उठला हर्षित होऊन ॥ १ ॥
त्वरित अंतःपुरीं आला । त्वरा करी तो साध्वीला ॥ २ ॥
म्हणे दासी तूं आमुची । त्वरित येईं सभेमाजी ॥ ३ ॥

---

१ दूताचे नांव.

पाहूनी त्या निर्दयासी । कृष्णा त्यजूनी स्थानासी ॥ ४ ॥
स्त्रियांमाजी धांव घेई । दुष्ट मागोमाग जाई ॥ ५ ॥
पवित्र ते कुरळे केश । धरुनीं ओढिलें साध्वीस ॥ ६ ॥
ओढूनियां फरफरां । आणीयेली सभाद्वारा ॥ ७ ॥
कदलीसम कंप पावे । महा अनर्थ ओढवे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भ्यालीं । रजस्वला मी बोलली ॥ ९ ॥

१३९

मंदा, एकवस्त्रा रजस्वला कैसी । येऊं मी सभेसीं बुद्धिहीना ॥ १ ॥
दुःशासन म्हणे प्रार्थी श्रीकृष्णासी । दासी तूं आमुची जाण आतां ॥
एकवस्त्रा किंवा विवस्त्राहि तुज । प्राताचि सभेस येणें आतां ॥२ ॥
विखुरले केश वस्त्र अस्ताव्यस्त । म्हणे दुष्टा तेथ थोर ज्ञाते ॥ ४ ॥
तयांपुढें मज ओढूं नको नीचा । विवस्त्र कां ऐसा करिसी मज ॥५॥
साह्यालागीं धांव घेतां इंद्रादिक । वांचसी न देख अपराधें या ॥६॥
धर्म अतिसूक्ष्म ज्ञातेचि जाणती । अपराधी नसती पति माझे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सभेमाजीं कोणी । निंदींना करणी बलवंताची ॥ ८ ॥

१४०

आणी ओढूनी सभेंत । कृष्णा बोले शब्द आर्त ॥ १ ॥
भारतांचा नष्ट धर्म । सहन करिती निंद्य कर्म ॥ २ ॥
असो धिक्कार धिक्कार । नष्ट झाला सदाचार ॥ ३ ॥
द्रोण भीष्म विदुर ऐसे । धैर्यहीन झाले कैसे ॥ ४ ॥
सत्व धृतराष्ट्राचें गेलें । घोरकर्म पुढती चाले ॥ ५ ॥
आर्त द्रौपदी हंबारे । वीर पांडव लाजले ॥ ६ ॥
दासी ऐसें संबोधून । विकट हांसे दुःशासन ॥ ७ ॥
कर्ण शकुनी साथ देती । दुर्योधन भ्रष्टमति ॥ ८ ॥
सभ्य लोकांचें दुर्दैव । चित्तीं म्हणे वासुदेव ॥ ९ ॥

१४१

भीष्म म्हणे पांचाळीतें धर्म सूक्ष्म बाई ॥
अनिर्णित प्रश्न तेणें सभेमाजी राही ॥ १ ॥

सर्वकाळ स्त्री भर्त्यांच्या अधीन गणावी ॥
भार्या दासाची ते जगीं दासीचि म्हणावी ॥ २ ॥
धर्म, धर्मरूप स्वयें म्हणे जित झालों ॥
वाक्य तयाचें ऐकोनी स्तब्धता पावलों ॥ ३ ॥
जिंकितां तयासी जिता तूंहि जरी होसी ॥
शकुनी हा लाववीता कां तुज पणासी ॥ ४ ॥
वचनें पराच्या तुज लाविलें पणातें ॥
दासी तूं न परी धर्म म्हणेनाच ऐसें ॥ ५ ॥
कृष्णा म्हणे कपटद्यूतआव्हान नृपासी– ॥
देवोनी, जिंकिलें द्यूत अभ्यास न ज्यासी ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कृष्णा दीन होऊनीयां ॥
न्याय मागते सभेसी हात जोडुनीयां ॥ ७ ॥

१४२

हरिलें सर्वस्व कपट करूनी । पणासी लावूनी घेई स्वयें ॥ १ ॥
कैसा माझा पण लावूं शके धर्म । नीचाचें तें कर्म पूर्ण होतां ॥ २ ॥
स्वयंपराधीन होऊनियां मातें । लाविलें पणातें ध्यानीं आणा ॥ ३ ॥
लेंकी सुना तुम्हां आहेत सकळां । न्यायातें सांभाळा सभेमाजी ॥४॥
ऐशा दीन शब्दें रूदन करितां । नाहीं दया नीचा ओढी तिज ॥ ५ ॥
रजस्वला एकवस्त्रा ते पाहोनी । कळवळे मनीं वृकोदर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे सन्मान्या ते सती । खवळला चित्तीं भीम बहु ॥ ७ ॥

## अध्याय ६८ वा

१४३

भीम म्हणे घरची दासी । कितव[1] लावीना पणासी ॥ १ ॥
कैसा निर्दय तूं राया । पणा लावियेली प्रिया ॥ २ ॥

---

१ जुगारी.

धन राज्य देह जातां । दुःख लवही न चित्ता ॥ ३ ॥
परी राजकन्या गृहीं । दुःखसागरीं हे पाहीं ॥ ४ ॥
पण केला द्रौपदीचा । घोर अन्याय हा साचा ॥ ५ ॥
असामान्य अपमानाचा । भोगीं परिणाम राजा ॥ ६ ॥
सहदेवा अग्नि आण । हस्त धर्माचे जाळीन ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीम । ऐसा होई क्रोधमग्न ॥ ८ ॥

१४४

पार्थ म्हणे भीमा ऐसें हें वचन । बोलसी प्रथम आयुष्यांत ॥ १ ॥
धर्म, गांभीर्यहि हरिलें शत्रूंनीं । आणूं नको मनीं अकार्य हें ॥ २ ॥
भेदार्थ पराचा यत्न हा जाणावा । भ्राता सन्मानावा ज्येष्ठ, सदा ॥३॥
परेच्छेनें झाला द्यूतासक्त राजा । क्षत्रियांच्या व्रता अनुसरे ॥ ४ ॥
कीर्ति वाढवील ऐसी धर्मनिष्ठा । भीम म्हणे क्रोधा वश झालों ॥५॥
वासुदेव म्हणे पार्थवचनानें । भीम विवेकानें स्वस्थ राही ॥ ६ ॥

१४५

दुष्ट दुःशासन ओढी पांचाळीसी । दुःख विकर्णासी[1] वदला क्रोधें ॥१॥
सभ्यहो निर्णय द्यावा द्रौपदीसी । अथवा नरकप्राप्ति सभासदां॥ २॥
भीष्म द्रोण कृप स्वस्थ कां राहिले । नृपही न बोले कैसा कोणी ॥३॥
साधु वा असाधु न बोलेचि कोणी। हस्तांसी चोळूनी वदला वीर ॥४॥
वदा, न वदा, वा कोणी माझें मत। मांडीन मी स्पष्ट निर्धारेंसीं ॥५॥
क्रिया ते अक्रिया व्यसनाधीनाची । पराधीन कृति स्पष्ट दिसे ॥ ६ ॥
व्यसनी जित हा परप्रवर्तित । सामान्य पांचांस पांचाळी हे ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे विकर्ण बोलला । जित पांचाळीला न मानी मी ॥८॥

१४६

कोलाहल झाला थोर । उचली बाहू कर्णवीर ॥ १ ॥

---

१ कौरवांपैकीं एक.

म्हणे अग्नि अरणीसी । नाशी तैसी याची कृति ॥ २ ॥
ज्ञाते मूक जेथें होती । तेथें बोले अल्पमति ॥ ३ ॥
सर्वस्व तो लावी पणा । काय द्रौपदी हे भिन्ना ॥ ४ ॥
आड बांधव न आले । धर्मकृत्य त्यां मानलें ॥ ५ ॥
पति अनेक जियेचे । दुराचारिणी सभेतें ॥ ६ ॥
आणितां न दोष कांहीं । वस्त्रें सकलांची घेई ॥ ७ ॥
ऐकूनियां भीमादिक । वस्त्रें दूर ठेवीतात ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे दैन्य । नसे थोराचें सामान्य ॥ ९ ॥

१४७

संकटीं सती ती मारी हाक श्रीहरीला ॥
वस्त्र बलात्कारें दुष्ट ओढितां सभेला ॥ १ ॥
गोविंदा द्वारकाधीशा कृष्णा गोपिप्रिया ॥
गांजिती कौरव मज धांव हे केशवा ॥ २ ॥
नाथा अनाथांच्या प्रभो व्रजनाथ देवा ॥
कौरवार्णवीं मी बुडतें उद्धार करावा ॥ ३ ॥
विश्वभावना विश्वात्मन् कृष्णा योगीश्वरा ॥
रक्ष मी शरण तुज त्रिभुवनेश्वरा ॥ ४ ॥
प्रार्थुनी असें कृष्णासी रडे ढळढळां ॥
मुख आच्छादूनी घेई दावीना कुणाला ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे सती प्रार्थी केशवासी ॥
निर्धार तियेच्या मनीं दया माधवासी ॥ ६ ॥

१४८

याज्ञसेनीचा तो धांवा । दया ऐकूनी माधवा ॥ १ ॥
कंठ सद्गदित त्याचा । करी त्याग आसनाचा ॥ २ ॥
चरणीं धांव घेई वेगें । आला सभेसी निजांगें ॥ ३ ॥
पाही दीन याज्ञसेनी । वस्त्रें झाला जगदानी ॥ ४ ॥
घाली कृपेची पाखर । लाज राखी शारङ्गधर ॥ ५ ॥
दुष्ट फेडितां वस्त्रासी । नवल झालें सकलांसी ॥ ६ ॥

वस्त्रामागें वस्त्रें किती । ढीग वस्त्रांचा पुढती ॥ ७ ॥
म्हणती पुण्य पांडवाचें कोलाहल थोर माजे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे भीम । क्रोधें उठला चवताळून ॥ ९ ॥

१४९

हातावरी हात चोळूनी क्रोधानें । मेघ गर्जनेनें वदला भीम ॥ १ ॥
क्षत्रिय हो ऐका प्रतिज्ञा हे माझी । वाणी न कोणाची वदली ऐसें ॥२॥
वदणार नाहीं ऐसें पुढें कोणी । शपथ हे ध्यानीं ठेवा माझी ॥ ३ ॥
या नराधमाचें फोडोनियां वक्ष । प्राशीन मी रक्त रणामाजी ॥ ४ ॥
असत्य हें होतां पुण्यलोक प्राप्ति । न होवो मजसी कदाकाळीं ॥ ५ ॥
दुःशासन निंदा करिती सभासद । देती धन्यवाद वृकोदरा ॥ ६ ॥
वस्त्रें फेडूनियां दुष्ट शांत झाला । लाजूनी बैसला अधोमुख ॥ ७ ॥
निर्णय न देई अद्यापीहि कोणी । धिक्कार हे वाणी घुमली तेथें ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे विदुर उठोनी । सकलां निवारुनी न्याय वदे ॥ ९ ॥

१५०

सनाथ असोनी अनाथ जाहली । आर्त हे पातली सभेमाजी ॥ १ ॥
काम–क्रोध बल निवारूनी सर्व । न्यायाचें उत्तर द्यावें आधीं ॥ २ ॥
विकर्णासमान बोला स्पष्ट मत । सोडा मूकव्रत अधर्म हा ॥ ३ ॥
प्रल्हादाचा सुत सुधन्व्याचे मनीं । लाभावी केशिनी हेचि इच्छा ॥४॥
श्रेष्ठ कोण त्यासी वरीन मी म्हणे । न्याय प्रल्हादानें म्हणती द्यावा ॥५॥
पुत्र विरोचन, सुधन्वा तो ऋषि । चिंता प्रल्हादासी वाटे बहु ॥ ६ ॥
मुनि म्हणे न्याय सत्य तोचि द्यावा । अथवा भोगावा नरकवास ॥७॥
वासुदेव सांगे विदुराचा बोध । ऐकूनी प्रमोद सज्जनासी ॥ ८ ॥

१५१

सुधन्वा तो सांगे न्यायाचा महिमा । सभासद धर्मा कथन करी ॥१॥
प्रल्हादानें दिला निर्णय तयासी । श्रेष्ठता मुनीची मान्य केली ॥ २ ॥
विरोचनप्राण स्वाधीन मुनीच्या । हाचि त्या न्यायाचा परिणाम ॥३॥
पुत्राहूनी न्याय मानियेला श्रेष्ठ । मुनि म्हणे सुत दिधला तुज ॥ ४ ॥
विदुर म्हणे तेंवी न्याय द्यावा तुम्हीं । ऐकूनीहि कोणी न वदे मात ॥५॥

लज्जित कंपित कृष्णेलागीं दुष्ट । ओढीतसे कष्ट पाहूनियां ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कर्णाचें वचन । सदनीं नेऊन ठेवा दासी ॥ ७ ॥

अध्याय ६९ वा

१५२

कृष्णा म्हणे दुःशासन । गांजितो हा मजलागून ॥ १ ॥
वंदितें मी सकलांसी । न्याय मागतें तुम्हासी ॥ २ ॥
मज स्वयंवराविण । पाहूं शकले नाहीं जन ॥ ३ ॥
वायुस्पर्शेही अशक्य । तेथ ऐसें निंद्य कृत्य ॥ ४ ॥
क्लेश असह्य हे मज । उलटलें दैव आज ॥ ५ ॥
कैसी पांडवांची भार्या । धृष्टद्युम्न भगिनी आर्या ॥ ६ ॥
सखी द्वारकाधीशाची । दीन झाली सभेमाजी ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे सती । न्याय मागे सकलांसी ॥ ८ ॥

१५३

भीष्म म्हणे द्रौपदीसी । सूक्ष्म धर्माची ते गति ॥ १ ॥
बलवंताचें भाषण । तोचि धर्म म्हणती जन ॥ २ ॥
जरी धार्मिक दुर्बल । त्याचें वचन होई फोल ॥ ३ ॥
गहन सूक्ष्म प्रश्न तुझा । निर्णय न होई माझा ॥ ४ ॥
परी दुर्बुद्धि खळांची । नष्ट करील तयांसी ॥ ५ ॥
ऐशा थोरही संकटीं । धर्मबुद्धि पांडवांची ॥ ६ ॥
तुझ्या प्रश्नाचें उत्तर । देईल हा युधिष्ठिर ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे भीष्म । कथितो द्रौपदीस जाण ॥ ८ ॥

अध्याय ७० वा

१५४

कुररीसम करी द्रौपदी आक्रोश । कोणी न तियेस न्याय देई ॥ १ ॥
दुर्योधन म्हणे कथावें चौघांनीं । 'धर्म नव्हे स्वामी पांडवांचा' ॥ २ ॥

अथवा धर्म वदो पांचाळी न माझी। सुटका द्रौपदीची होई क्षणीं ॥३॥
दुर्योधनवचें विस्मय नृपांसी। भीम त्या सभेसी वदला क्रोधें ॥ ४ ॥
पराजित धर्में लावियेला पण। कैसी पराधीन याज्ञसेनी ॥ ५ ॥
पराजित जरी नसतों बंधु आम्ही। दुष्टांचे या क्षणीं हरितों प्राण ॥६॥
युधिष्ठिर जरी हूं म्हणे मजसी। थापेनें दुष्टांसी लोळवीन ॥ ७ ॥
भीष्म द्रोणादिक म्हणती भीमसेना। लाभसील क्षणा त्वरित ऐशा ।८।
वासुदेव म्हणे वाढू दावी भीम। धर्मपाशांतून सुटतां पाहूं ॥ ९ ॥

## अध्याय ७१ वा

### १५५

कर्ण म्हणे तीन अधार्मिक जन। याज्ञसेनी जाण असती येथें ॥ १ ॥
भीष्म द्रोण क्षत्ता कृतघ्न हे लोकीं। रत स्वामिघातीं निर्लज्ज हे ॥ २ ॥
पराधीन भद्रे दास, पुत्र, कांता। अंतःपुरीं आतां जाई सुखें ॥ ३ ॥
धृतराष्ट्र पुत्रां मानूनियां स्वामी। वरीं तयांतूनीं एकालागीं ॥ ४ ॥
दास्यामाजी नसे निंद्य ऐसी कृति। असंख्य पतींसी रमवीं किंवा ॥५॥
याज्ञसेनी पणा लावोनियां धर्म। जगीं आजि धन्य वीर होई ॥ ६ ॥
क्रुद्ध भीम म्हणे दोष न कर्णाचा। स्पष्टार्थ दासाचा केला येणें ॥ ७ ॥
दुर्योधन सांगे धर्मानें कथावें। वासुदेव व्हावें दक्ष म्हणे ॥ ८ ॥

### १५६

ऐश्वर्यमदानें मत्त दुर्योधन। मर्यादा त्यजून वागतसे ॥ १ ॥
वस्त्रहीन वाम पुढें करी अंक। दावोनी सतीस हास्य करी ॥ २ ॥
रक्तवर्ण नेत्र भीमाचे जाहले। प्रतिज्ञा तो बोले सभेमाजी ॥ ३ ॥
दुष्टा हाचि अंक फोडीन गदेनें। तरीच सुखानें पुण्यलोक ॥ ४ ॥
अग्निज्वालेसम भासला तैं भीम। बोलला उठून विदुर तेव्हां ॥ ५ ॥
कौरवहो व्हावें सावध अद्यापि। कर्णवचनासी ऐकूं नका ॥ ६ ॥
अदासाचें धन न होई स्वामीचें। कथितो ऐका जें वासुदेव ॥ ७ ॥

### १५७

दुर्योधन म्हणे कथावें चौघांनीं। मुक्त्ताचि या क्षणीं द्रौपदी हे ॥ १ ॥

कैसा पराजित अन्या पणा लावी । गोष्ट ध्यानीं घ्यावी पार्थ म्हणे ॥
इतुक्यांत तेथें भालु ओरडली । गृह्याग्नीजवळी नृपाळाच्या ॥ ३ ॥
गांगाट करिती गर्दभ सर्वत्र । काक गृध्र क्रूर पक्षी तैसे ॥ ४ ॥
स्वस्ति स्वस्ति ऐसें बोलले सुजन । विदुर दुश्चिन्ह कथितो राया ॥५॥
वासुदेव म्हणे गांधारी नृपासी । म्हणे या मूर्खासी आंवरावें ॥ ६ ॥

१५८

निंदूनियां दुर्योधना । राव बोलला त्या क्षणा ॥ १ ॥
सभेमाजी साध्वि स्त्रीशीं । ऐसी असभ्य हे कृति ॥ २ ॥
अनहित होई तेणें । मृत्यु समीपाचि जाणें ॥ ३ ॥
वदला द्रौपदीसी वाणी । वर माग हे कल्याणि ॥ ४ ॥
कृष्णा म्हणे युधिष्ठिर- । दास्यमुक्ति हा दे वर ॥ ५ ॥
प्रतिविंध्य दासपुत्र । ऐसा न होवों उच्चार ॥ ६ ॥
शस्त्रांसह भीमादिक । द्वितीय वरें केले मुक्त ॥ ७ ॥
मागें तृतीय म्हणतां । म्हणे अधिकार न माझा ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे लोभ । ज्ञाते मानिती कुमार्ग ॥ ९ ॥

१५९

वैश्या एक, क्षत्रियासी- । दोन, तीन ते नृपासी ॥ १ ॥
विप्रालागीं शत वर । मागण्याचा अधिकार ॥ २ ॥
कृष्णा म्हणे माझे पति । शौर्यें समर्थ या लोकीं ॥ ३ ॥
सकल वैभव विक्रमें । जोडितील ते सन्मानें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे राजा । पुरवी हेतु द्रौपदीचा ॥ ५ ॥

अध्याय ७२ वा

१६०

खिन्न होऊनियां कर्ण म्हणे धन्य । पांडव अनन्य वीर जगीं ॥ १ ॥
सुस्वरूप कांता नौका होई यांसी । ऐकूनी भीमासी क्रोध बहु ॥ २ ॥
म्हणे सूतपुत्र वीर न हा कोणी । संकरापासोनी जन्म याचा ॥ ३ ॥
पार्थ तदा करी भीमाचें सांत्वन । सुकृत सज्जन ध्यानीं घेती ॥ ४ ॥

भीम म्हणे धर्मआज्ञा जरी होई। दावीन सर्वांही यमपुरी ॥ ५ ॥
दुष्प्रेक्ष्य भीमासी कवटाळूनी धर्म। म्हणे घोरकर्म न वदें ऐसें ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे कर जोडूनियां। धृतराष्ट्र—पायां वंदी धर्म ॥ ७ ॥

अध्याय ७३ वा

१६१

युधिष्ठिर म्हणे राया आज्ञा करीं। भाव चरणांवरी नित्य तुझ्या ॥१॥
राव म्हणे धर्मा जाईं तूं स्वस्थानीं। साम्राज्याचा धनी सुखें होईं ॥२॥
बाळा धर्मगति सूक्ष्म हें जाणसी। शांति हें ज्ञानासी मधुर फळ ॥३॥
वैर न ठेविती उत्तम पुरुष। शठासी तें शाठ्य मध्यमांसी ॥ ४ ॥
अधम करिती कठोर वर्तन। धर्माचें पालन केलें तुम्ही ॥ ५ ॥
कठोर हे कृति विसरूनी जाई। लोभ नित्य ठेवीं वृद्धांवरी ॥ ६ ॥
धर्म, धैर्य, बल, शुश्रूषादि गुण। करिती कल्याण पांडवांचें ॥ ७ ॥
दुर्योधनावरी प्रेम असों द्यावें। धर्मा सुखें जावें नगरीं आतां ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वंदूनी नृपासी। स्यंदन हांकिती गर्जत ते ॥ ९ ॥

—०—

## अनुद्यूतपर्व १०

अध्याय ७४ वा

१६२

वैशंपायन तो वृत्त कथीतसे। जनमेजयातें ऐका आतां ॥ १ ॥
दुर्योधनालागीं सांगे दुःशासन। संपादित धन गेलें सर्व ॥ २ ॥
कर्णादिक तेव्हां धृतराष्ट्रापाशीं। येवोनी बोलती नम्रपणें ॥ ३ ॥
दुर्योधन म्हणे ताता क्रुद्ध सर्प। करील विनाश कंठगत ॥ ४ ॥
दिव्य तीं शस्त्रास्त्रें पाहूनियां पीडा। तत्काळ आमुचा करिती नाश ॥५॥
वीर ते अपमान कैसा साहतील। द्यूत खेळतील पुनरपि ॥ ६ ॥
अज्ञातवासाचा लावूनियां पण। पुढती लढून सुखी होऊं ॥ ७ ॥

अव्हेरूनी सभ्यां नृपाळ संमत । अडवूनी मार्गांत आणा म्हणे ॥८॥
वासुदेव म्हणे स्नेहांध नृपाळ । करीतसे खेळ प्राणांसवें ॥ ९ ॥

अध्याय ७५ वा

१६३

म्हणे गांधारी नृपासी । नका धरूं बालबुद्धि ॥ १ ॥
शांत अग्नि प्रज्वलित । करितां कुलाचा विध्वंस ॥ २ ॥
स्मरुनी विदुरवचन । सोडूं नका निजधर्म ॥ ३ ॥
क्रूर पावती विनाश । शांत चढती वैभवास ॥ ४ ॥
राव नायके वचन । म्हणे सकल दैवाधीन ॥ ५ ॥
पूर्ण होवो पुत्रहेत । घडो पुनरपि द्यूत ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे काळ । खेळे इच्छेसम खेळ ॥ ७ ॥

अध्याय ७६ वा

१६४

आणिलें धर्मासी पाठवूनी दूत । म्हणती करूं द्यूत पुनरपि ॥ १ ॥
विधिलिखित हें न टळे म्हणे धर्म। मायामृगा राम लुब्ध झाला ॥२॥
शकुनी म्हणे धर्मा माझा एक पण । पराभवें वन स्वीकारावें ॥ ३ ॥
अजिनधारी वनीं द्वादशाब्द वास । अज्ञात निवास एक वर्ष ॥ ४ ॥
हरेल तयानें वर्तावें या रीति । वन पुनरपि ज्ञात होतां ॥ ५ ॥
क्षात्रधर्में राव आव्हान स्वीकारी । सभा ते निवारी कौरवांसी ॥ ६ ॥
परी न ऐकतां पण लावियेला । क्षणांत जिंकिला शकुनीनें तो॥ ७ ॥
वासुदेव म्हणे हेतु पूर्ण झाले । आनंद पावले दुर्जन ते ॥ ८ ॥

अध्याय ७७ वा

१६५

पराभूत वीर लेऊनी अजिनें । चालले धैर्यानें वनामाजी ॥ १ ॥

दुःशासन म्हणे राज्यभ्रष्ट झाले । नरकीं लोटिलें आम्ही यांसी ॥२॥
मयसभेमाजी हांसले दर्पानें । क्लीब हे अजिनें विराजती ॥ ३ ॥
याज्ञसेनी आतां वरीं आम्हां एका । चर्ममय मृगां त्यागीं सुखें ॥४॥
तैलबिंदुवीण तीळ हे सेवोनी । व्यर्थ कां कल्याणि कष्टसी तूं ॥५॥
वासुदेव म्हणे ऐकूनियां भीम । खवळला जाण सिंहापरी ॥ ६ ॥

१६६

भीम म्हणे अरे नीचा । सूड घेईन मी तुझा ॥ १ ॥
येतील जे रक्षणासी । धाडीन त्यां यम लोकीं ॥ २ ॥
गौ गौः म्हणुनी ऐसें । हर्षे दुःशासन नाचे ॥ ३ ॥
भीम म्हणे संधी हेचि । पुढती प्राशीन रुधिरासी ॥ ४ ॥
मूढबुद्धि दुर्योधन । दावी वांकुल्या मागून ॥ ५ ॥
भीम म्हणे सहपरिवार । वधुनी दावीन यमपुर ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे भीम । ऐका वदला जें वचन ॥ ७ ॥

१६७

दुर्योधन–दुःशासनां । वधील हा भीम जाणा ॥ १ ॥
धनंजय राधेयासी । सहदेव तो शकुनीसी ॥ २ ॥
सत्यप्रतिज्ञा आमुची । संधि लाभतां युद्धाची ॥ ३ ॥
भीमालागीं म्हणे पार्थ । पुढती पाहूं, भाषा व्यर्थ ॥ ४ ॥
नीचांचें या रुधिर भूमी । प्राशितांचि पाहीन मी ॥ ५ ॥
भीम म्हणे चतुर्दश । वर्षीं घडेल हें सत्य ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसी । घोर प्रतिज्ञा वीरांची ॥ ७ ॥

१६८

वधीन कर्णासी वदे पार्थवीर । साह्यार्थ जे वीर तयांसवें ॥ १ ॥
चतुर्दशवर्षीं राज्य न लाभतां । सत्य सत्य वाचा आमुची हे ॥ २ ॥
ढळेलै तो गिरि सूर्य न तपल । शैत्यही त्यागील निशीकांत ॥ ३ ॥
परी माझी वाणी असत्य न कदा । ध्यानीं धरा सदा क्षत्रिय हा ॥ ४ ॥

नकुल सहदेव देती अनुमोदन । भीमाचें वचन उच्चारून ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे करोनी प्रतिज्ञा । धृतराष्ट्र चरणा विनवितातीं ॥ ६ ॥

अध्याय ७८ वा

१६९

धर्मराज म्हणे जातों वनामाजीं । निरोप आम्हासी द्यावा प्रेमें ॥ १ ॥
आप्त गुरुजनां तेंवि सभासदां । लोभ असो सदा म्हणती आतां ॥ २ ॥
अधोमुख झाले भीष्म–द्रोणादिक । विदुर कुंतीस ठेवा म्हणे ॥ ३ ॥
सुकुमार वृद्धा राहो मजकडे । संमति असोंदे युधिष्ठिरा ॥ ४ ॥
पराजयदुःख नसे धार्मिकासी । विजय तुम्हांसी खचित लाभे ॥ ५ ॥
बोध जो तुम्हासी केलासे ज्ञात्यांनीं । नित्य तोचि मनीं तुमच्या वसो ॥
आयुरारोग्याचा लाभ घडो तुम्हां । सुखानें स्वस्थाना याल तुम्ही ॥ ७ ॥
होईल वीरांनो सर्वदा कल्याण । क्षत्त्याचें वचन सार्थ असे ॥ ८ ॥
वासुदेव म्हणे वंदूनी सर्वांसी । वनगमनासी सिद्ध होती ॥ ९ ॥

अध्याय ७९ वा

१७०

गेली कुंतीपाशीं कृष्णा । म्हणे लाभावी अनुज्ञा ॥ १ ॥
सकल स्त्रियांसी वंदूनी । मागे निरोप त्या क्षणीं ॥ २ ॥
कुंती म्हणे शीलवती । अये श्रेष्ठ गुणवती ॥ ३ ॥
उभय कुळांचे भूषण । करीं निर्विघ्न गमन ॥ ४ ॥
कौरवांसी न शापिलें । भाग्य तयांचें उदेलें ॥ ५ ॥
आजवरी यांसी कांता । आतां होईं वनीं माता ॥ ६ ॥
विधिघटनेसी दोष । नच देती स्त्रिया श्रेष्ठ ॥ ७ ॥
वासुदेव म्हणे कुंती । सांगे सांभाळीं सोनांसी ॥ ८ ॥

१७१

बोध कुंतीचा ऐकूनी हालविली मान ॥
शब्द नुमटे मुखानें भरले नयन ॥ १ ॥

---

१ नकुल-सहदेवांस.

रजस्वला, एकवस्त्रा मुक्त जिचे केश ॥
निरोप घेवोनी जातां करी ते आक्रोश ॥ २॥
मागोमाग द्रौपदीच्या दुःखी पृथा जाई ॥
चर्मे आच्छादूनी सुत लज्जित ते पाही ॥ ३ ॥
हर्षित कौरव, दुःखी भीष्मादिक होते ॥
हृदयीं धरोनी माता करी विलापातें ॥ ४ ॥
वासुदेव म्हणे कुंती दुःखार्त बेभान ॥
आर्त होऊनियां बोले सद्गद वचन ॥ ५ ॥

१७२

उदारचरित तुम्ही मर्यादाभूषित ॥
महाभक्तहो तुम्हासी कैंवि हें संकट ॥ १ ॥
शतशृंगावरूनी मी कासयासी आलें ॥
तेचि दैवशाली स्वर्गी निघूनी जे गेले ॥ २ ॥
महत्प्रयासें पुत्रांचा लाभ मज झाला ॥
अंतक कसा रे देवा मज विसरला ॥ ३ ॥
द्वारकाधीशा हे कृष्णा गेलासी तूं कोठें ॥
दुःखसागरीं न कैसा तारिसी आम्हांतें ॥ ४ ॥
आदिअंतशून्या नित्य तारितोसि भक्तां ॥
संतवचनासी देवा विसरसी कैसा ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे कुंती प्रार्थी यादवाला ॥
दुःख बालकांचें पाहीं माधवा दयाळा ॥ ६ ॥

१७३

नीतिशास्त्रज्ञ हे भीष्म द्रोण कृप । असतां जिवंत बघती काय ॥ १ ॥
हर हर पांडो नृपाळा तूं कोठें । पुत्रांसी कपटें जिंकियेलें ॥ २ ॥
अनाथासमान वनामाजी जाती । उपेक्षा तयांची करिसी कैसी ॥३॥
बाळा सहदेवा तूं तरी न जाई । बालक तूं राहीं माझ्या संगें ॥ ४ ॥
विदारक ऐसा शोक करी कुंती । वंदूनियां जाती वीर वनीं ॥ ५ ॥

हुंवरडा फोडी पुत्र वियोगानें । सकळांचा प्रेमें दाटे कंठ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे विदुर त्या वेळीं । समाधान करी बोलूनियां ॥ ७ ॥

१७४

दुःखाकुल विदुर म्हणे । दुर्लंघ्य हें दैव जाणें ॥ १ ॥
नको खिन्न होऊं पृथे । धर्म तारील सुतांतें ॥ २ ॥
होऊं नये पुत्रस्मृति । ऐसी रक्षीन तुजसी ॥ ३ ॥
सकल स्त्रिया करिती शोक । निंदिताती दुर्जनांस ॥ ४ ॥
भीति पांडव क्रोधाची । रायासह सकलांसी ॥ ५ ॥
झाला उद्विग्न नृपाळ । नित्य विचारें व्याकुळ ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे, तदा । वदे भेटवा रे क्षत्ता ॥ ७ ॥

अध्याय ८० वा

१७५

राजा म्हणे तदा विदुरालागूनी । पांडव ते वनीं गेले कैसे ॥ १ ॥
येरु म्हणे ऐक तयांचें लक्षण । मुख आच्छादून धर्म गेला ॥ २ ॥
अवलोकी वाहु तयावेळीं भीम । पार्थ सिकताकण फेंकीतसे ॥ ३ ॥
राख फांसूनियां सहदेव चालला । मृत्तिका अंगाला नकुळ लावी ॥४॥
विखुरले केश तया द्रौपदीचे । मंत्र तैं यमाचे धौम्य गाई ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे हेतु या कृतीचा । पुशितांचि राजा, विदुर सांगे ॥६॥

१७६

दृष्टि न बाधो संतप्त । म्हणुनी आच्छादिलें मुख ॥ १ ॥
अजिंक्य हें बाहूबल । ऐसें सुचवी वृकोदर ॥ २ ॥
ऐसे असंख्यात बाण । सुचवी कृतीनें अर्जुन ॥ ३ ॥
गुप्तवेष इंद्रियजय । कथिती माद्रीचे तनय ॥ ४ ॥
अंतीं शत्रुस्त्रिया ऐशा । भाव ऐसा द्रौपदीचा ॥ ५ ॥



२५४२१　२१०५

पुढती कौरव पुरोहितां । सुचवी धौम्याची हे वाच ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐसा । भाव व्यक्त करी क्षत्ता ॥ ७ ॥

१७७

विदुरासि राव म्हणे नागरिक । बोलले तें सांग मजलागीं ॥ १ ॥
क्षत्ता म्हणे तयां हळहळ वाटली । निंदिलें त्यावेळीं कौरवांसी ॥२॥
हास्तिनापुरांत दुश्चिन्हें जाहलीं । विनाशाची आली म्हणती वेळ ।३।
नृपाळासी ऐसें विदुर बोलला । नारद पातला सभेमासी ॥ ४ ॥
आजपासूनियां चतुर्दश वर्षीं । विनाश तुम्हासी कथुनी गेला ॥ ५ ॥
दुर्योधन करी आश्रय द्रोणाचा । अर्पितों मी राज्या, साह्य करा ॥ ६ ॥
वासुदेव म्हणे ऐका द्रोणवाणी । धरितां ते ध्यानीं लाभ घडे ॥ ७ ॥

१७८

दुर्योधनादिकां म्हणती गुरुद्रोण । अजिंक्य नंदन पांडूचे ते ॥ १ ॥
शरणागताच्या अभयार्थ रण । करीन हा धर्म जाणूनियां ॥ २ ॥
परी द्रुपदाचा पुत्र मृत्यु माझा । आप्त पांडवांचा जाणीतसां ॥ ३ ॥
संयमी ते वीर योग्यवेळीं येती । धरूनी सूडाची इच्छा मनीं ॥ ४ ॥
पार्थ तरी मज प्राणाहूनी प्रिय । करावें सत्कार्य ऐशावेळीं ॥ ५ ॥
क्षणभंगुर हे संपत्ती लाभली । जाणूनी या वेळीं पुण्य करा ॥ ६ ॥
राव म्हणे क्षत्त्या पांडवांसी आणीं । मागुती स्वस्थानीं वसोत ते ।
तोषवा तयांसी क्लेश होती वनीं । वासुदेव गानीं रमला त्यांच्या ॥

अध्याय ८१ वा

१७९

म्हणे संजय रायासी । कां रे अद्यापि तूं दुःखी ॥ १ ॥
राजा म्हणे पांडववैर । सहन करी कोण वीर ॥ २ ॥
म्हणे संजय विनाश–। काळ येतां बुद्धिनाश ॥ ३ ॥
करी विपरीत बुद्धि । हेचि शक्ति त्या काळाची ॥ ४ ॥
तुझ्या पुत्रांचें तें कर्म । न टळे आतां भोगाविण ॥ ५ ॥
वासुदेव म्हणे दैन्य । प्रतिकूल होतां कर्म ॥ ६ ॥

१८०

राव बोलला संजया । रडल्या सकलहि स्त्रिया ॥ १ ॥
पुत्र एकतरी आतां । वांचेल कां सांगें माझा ॥ २ ॥
झालीं दुःश्चिन्हें अपार । शिणला सांगूनी विदुर ॥ ३ ॥
त्याचा बोध तो ऐकून । दिधलें तयां राज्य धन ॥ ४ ॥
परी आतां करूं काय । बहुत वाटे हाय हाय ॥ ५ ॥
मान्य करी मूर्खपण । सभापर्व हें संपूर्ण ॥ ६ ॥
वासुदेव दास दीन । सेवा करी कृष्णार्पण ॥ ७ ॥

## सभापर्व समाप्त

पुढील वनपर्वाचा आद्य श्लोक—

जनमेजय उवाच—

एवं द्यूतजिताः पार्थाः कोपिताश्च दुरात्मभिः ।
धार्तराष्ट्रैः सहामात्यैर्निकृत्या द्विजसत्तम ॥ १ ॥

भगवान् श्रीगोपालकृष्णार्पणमस्तु ।

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों. दि. ...
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०५३०

राष्ट्रीय कीर्तनकार श्री. कोल्हटकरकृत

## राम–गीत–सुधा

### *भाग १ ला व २ रा*

**मूल्य–अनुक्रमें २ रु. व ३ रु. ट. ह. वेगळें**

या दोन्ही भागांत श्रीवाल्मीकी रामायणाचे आधारानें प्रभु श्रीरामचंद्राचें संपूर्ण चरित्र गद्य–पद्यांत सहृदयतेनें, साधार व रसपूर्णतेनें वर्णिलें आहे. यांतील पदें नवीन व भावमधुर चालींवर रचिलेलीं असून तीं प्रासादिक आहेत. दोन्ही भागांत एकंदर पदांची संख्या ३६२ आहे.

बालकांडापासून किष्किंधाकांडापर्यंतचा विषय पहिल्या भागांत आला असून, सुंदरकांडापासून उत्तरकांडापर्यंतचा सर्व विषय दुसऱ्या भागांत आला आहे.

रामकथेचा मुख्य आधारग्रंथ आणि जगांतील पहिलें महाकाव्य या दृष्टीनें प्रत्येक मनुष्यानें वाल्मीकीरामायण आयुष्यांत एकदां तरी अवश्य वाचावें अशी त्याची महती आहे. रामगीत सुधेच्या वाचनानें संपूर्ण वाल्मीकी-रामायण वाचल्याचें श्रेय लाभेल अशीच या दोन्हीं पुस्तकांतील विषयांची रचना करण्यांत आली आहे.

रामगीत सुधेवर केसरी, सकाळ, किर्लोस्कर इत्यादि नियतकालिकांनीं उत्कृष्ट अभिप्राय दिले आहेत.

## अभंग–रामायण

श्रीवाल्मीकीरामायणाची अमृतमाधुरी सर्वांस मुक्तपणें चाखावयास मिळावी म्हणून श्रीमन्महाभारताप्रमाणेंच श्रीवाल्मीकीरामायणाचाहि अभंग-मय भावार्थ ग्रथित करण्याचें कार्य सुरू आहे. योग्य वेळीं तेंहि प्रकाशित होईल.

**पत्ताः—** व्यवस्थापक– धर्मचैतन्य संस्था, सदाशिव पेठ, पुणें २.

REFBK-0010530

REFBK-0010530